सुंदर कथा | त्यागातील वैभव | यज्ञ | अमोल गोष्टी

क्र. ५४५२



# मेंग चियांग व इतर कथा

साने गुरुजी

# मेंग चियांग व इतर कथा

साने गुरुजी

रिया पब्लिकेशन्स्

मेंग चियांग व इतर कथा : साने गुरुजी

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शितल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
ॐकार मुद्रणालय, कोल्हापूर.

**आवृत्ती**
१५ ऑगस्ट, २०११

**किंमत**
रुपये २३०/-

---

© सदर पुस्तकातील मजकुराचा हक्क मुक्त आहे; परंतु या पुस्तकातील मांडणी, मुखपृष्ठ किंवा एकंदरीत रचना यांची नक्कल करता येणार नाही, तसेच ट्रेसिंग किंवा निगेटिव्हच्या साहाय्याने छापताही येणार नाही. तसे आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

---

## अनुक्रमणिका


- मेंग चियांग /५
- सुंदर कथा /७९
- त्यागातील वैभव /९५
- यज्ञ /११९
- अमोल गोष्टी /१६१


++

# मेंग चियांग



श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

# मेंग चियांग

चीनमध्ये लूपू राजा होता. त्यांचे मोठे उद्योग, अचाट आणि विचित्र! मानवी हृदयावर न कोरलेल्या गोष्टी विसरल्या जातात; परंतु घोर पापांच्या कथा, त्या कोण विसरेल? त्या युगानुयुगे चालत येतात. शापित अशा कथा.

लूपूने साम्राज्य वाढविले आणि संरक्षणासाठी उत्तरेकडे भिंत बांधायचे ठरविले. भिंतीजवळ हाडांच्या राशी पडत आहेत. दृश्य बघून लोकांच्या अंगावर काटा येत आहे. सर्वत्र जुलूम आणि भीती! आकाश रडू लागले, भूमाता रडू लागली. ग्रंथ जाळण्यात येत आहेत, पंडितांना ठार करण्यात येत आहे, जिवंत पुरण्यात येत आहे. कायदा नाही, नीतिनियम नाही. धर्म सारा लोपला.

मेंग चियांग निघाली. ती पतिव्रता सती. तिचा पती कामाला सक्तीने नेण्यात आला. ती रडत बसे. किती कृश झाली आहे बघा. गाल खोल गेले. डोळे निस्तेज. अरेरे ! तिचे लक्ष उत्तरेकडे आहे. तेथे कडक हिवाळा आहे! माझा पती! पुस्तकात रमणारा, नाजूक, सुकुमार! त्याच्याने दगडधोंडे, विटा कशा उचलल्या जातील? कोण त्याची कीव करील? कठोर अधिकारी हुकूम सोडीत असतील, वादीचे चाबूक कडाड् उडवीत असतील. हे का त्याच्या नशिबी असावे? हे घर स्मशान वाटते. कशी येथे राहू? किती वाट पाहू? हृदय दुभंगते. मी त्याला शोधायला जाणार, भेटायला जाणार! दहा हजार मैल का असेना अंतर! मी जाईन.

ती निघाली. ती कोमलांगी, कृशांगी निघाली. शरीराने दुबळी; परंतु आत्मा वज्राचा होता. साधे सुती लुगडे ती नेसली होती. ना अलंकार ना काही. तिचे ते सौंदर्य हाच तिचा दागिना. सौंदर्याचा प्रकाश फेकीत वाऱ्यातून, वादळातून, पावसातून ती निघाली. जवळच्या गाठोड्यात काय आहे? पतीसाठी हाताने तयार करून आणलेले

गरम कपडे! उत्तरेकडे चावरी थंडी आहे. जात होती. वाटेत नद्या लागत आहेत. दिवस मावळत आहे. गाईगुरे घरी येत आहेत. चूल पेटत आहे. परंतु ती? तिला विसावा नाही. अनंत पृथ्वी, अनंत आकाश! एकटी, हो एकटी, जा एकटीच रडत, अश्रूंचे सडे घालीत. पावले उचलत नाहीत. थकली बिचारी! पदर चिखलात पडत आहे; तिला भान नाही. ओचा सुटला; कळत नाही. ते उघडे हात थंडीने हिरवे– निळे झाले.

जाताना तो म्हणाला होता, ‘‘मी परत येईन काय भरवसा? राजाचा हुकूम! कोणी मोडायचा? आता एका उशीवर डोकी ठेवून आपण पाखरांच्या जोडप्यांप्रमाणे पुन्हा प्रेमाने पडणार नाही. प्रिय सखी, पतिव्रते, खोटे स्वप्न मनात नको खेळवू. मनात आशा नको. पुन्हा परत येणे कठीण आहे.’’ ‘नाथ’ त्या शब्दात करुणा होती. ‘तुम्ही का माझा मार्ग मोकळा करून जात होता? आपले वैवाहिक जीवन का विसरलात? मासा आणि पाणी तसे आपले एकत्र जीवन. माझे हृदय शुद्ध आहे. पातिव्रत्य हेच माझे बळ. मायबापांची शिकवण का विसरू? मी येणार, पाठोपाठ, येणार भेटायला, तुला गरम कपडे द्यायला. तुला मदत करायला, दहा हजार मैल अंतर असले म्हणून काय झाले?’

दु:खाने ती दग्ध झाली होती. जरा काही सळसळले तरी घाबरे. आज थंड चावरे वारे वाहत आहेत. कावळे चालले घरट्यांकडे. ही कोठे जाणार? घंटांचा आवाज येत आहे. मिणमिण दिवा दूरचा दिसत आहे. गाव आहे जवळ? गाव नव्हता. त्या जंगलात ते देऊळ होते.

त्या लहानशा देवळात ती बसली. देवासमोर अश्रू ढाळीत बसली, ‘‘देवा, अश्रूंनी तुझे मंदिर मलीन करीत आहे म्हणून रागावू नको. मुलीला क्षमा कर. मी दुर्दैवी आहे. थंडीवाऱ्यात तुझ्या पायी निवारा, उबारा.’’ तेथे जागा झाडून दात शिवशिवत ती झोपली. कोठली झोपली? तिच्या फाटक्या वस्त्रांतून वारा घुसत होता. ती गारठली. आकाशात अष्टमीचा चंद्र मावळत होता. ती देवाला म्हणाली, ‘‘देवा, माझ्या पतीला स्वप्न पाड. मी गरम कपडे घेऊन येत आहे. सांग, त्याला धीर येईल. माझ्यावर दया कर. वीस वर्षेही माझ्या वयाला नाहीत! लहान मी. परंतु जाईन त्याला शोधीत.’’

गालांवरून अश्रू घळघळले. ती पुन्हा जुडी करून पडली.

स्वप्नात अस्थिपंजर पतीला ती बघते.

‘‘कशाला तू आलीस?’’ तो म्हणतो.

‘‘नाथ, या, या,’’ असे म्हणत त्याला ती हृदयाशी धरू बघते, तुम्हाला ऊब देते म्हणते.

बाहेर सों, सों वारा करतो. तिला जाग येते. अनंत तारे चमचम करीत असतात. सभोवती पृथ्वी धुक्यात वेढलेली. हे स्वप्न दुर्दैवाचे सूचक का? तो नाही भेटणार?

तो स्वप्नात म्हणाला, ''माझी मूठभर हाडे, माझी माती, हीच तुझ्या अनंत श्रमांची भरपाई, दुसरे काय तुला मिळणार?''

माझे विचार भरकटत गेले असतील. ते स्वप्न प्रचंड नद्या नि उंच पर्वत यावरून येत होते. त्यामुळे ते अस्ताव्यस्त झाले असावे. मी का त्याला मातीच्या ख़ाली पाहीन? हे का माझ्या नशिबी असेल? निदान त्याच्याजवळ मीही पडेन. हे का कमी?

उजाडले. धुके पडून सारे ओलसर आहे. कावळे हिंडू-फिरू लागले. देवाला नमस्कार करून ती निघाली. हृदयात आशा-निराशा. म्हणाली, ''किती संकटे असोत, कष्ट असोत. पतिपत्नींचे ऐक्य त्याची कसोटी आहे.''

दंवाने तिचे वक्ष:स्थळ ओले झाले आहे आणि अश्रूंनीही. कठोर वारा तिला मिठी मारीत आहे. ती थरथरत आहे. पतीला हाक मारून म्हणते, ''कोठल्या बाजूला वळू, कोठे तुला पाहू? कधी पुन्हा माझ्या केसांत फुले घालशील? माझ्या कानांत कर्णफुले घालशील? आपण रात्री चांदण्यात फुलबागेत सारंगी वाजवित होतो. उत्तरेच्या भिंतीकडे मी येत आहे. भेटशील का? पुन्हा घरी जाऊन आपण सायंकाळचे जेवण करू का? जिन्यातून दोघे बरोबर जाऊ का? नाथ, पूर्वजन्मी आपले काय पाप घडले की हे भोगायला लागावे? तळवे फाटले रे, सुकलेल्या फुलागत माझी दशा.'' वाटेत कधी झोपडी आढळे. कुत्रा भुंके. कोंबडा आरवताना कानांवर येई. कधी रस्त्यात खानावळ लागे. तेथे चार घास खाई. तिच्याकडे पाहून खानावळवाला म्हणे, ''थोरामोठ्यांची दिसते. दृष्टीत दु:ख आहे. परंतु किती सुंदर आहे ही नाही?''

त्याची बायको तिला विचारी, ''बाई कोठून आल्यात, कोठे जायचे?''

तिचे अश्रू धावत येत. हुंदका आवरून म्हणे, ''भिंत, उत्तरेकडची प्रचंड भिंत! वेठीला धरून माझ्या पतीला त्यांनी ओढीत नेले. त्याला भेटायला जाते. हे गरम कपडे घेऊन थंडीवाऱ्यातून जात आहे. घरी रडत बसण्यापेक्षा हा दु:खदायक प्रवास बरा. त्याला शोधीत जात आहे. त्याला पाहीन नि शांत होईन.''

''वेडी तर नाहीस तू मुली? शेकडो-हजारो मैल कशी चालत जाशील? थंडीचा कडाका. वाटेत वाटमारे, डाकू. तू सुंदर आहेस. तेच तर भय. नको जाऊ. हे तुझे सुकुमार पाय.''

“सर्व नात्यांत पतिपत्नीचे नाते श्रेष्ठ. सर्व संकटांची मला जाणीव आहे, परंतु माझे वेडे हृदय त्याला पाहिल्याशिवाय विसावणार नाही. परत नाही फिरायचे या निश्चयाने मी निघाले आहे. मग आमची भेट धरित्रीच्या पोटात व्हायची असेल तरी तेथे होवो.”

ती म्हातारी खानावळीण बाई म्हणते, “मुली, तू एकटी. मी येऊ का सोबतीला? एकीपेक्षा दोघी बऱ्या. हा थकलेला देह येऊ दे का तुझ्या संगे?”

“नको आजीबाई नको. तुम्ही प्रेम दिलेत, दया दाखवलीत. तुमच्या मरणाला का मी कारणीभूत होऊ? शिव शिव. नाही आजी, ते बरे नाही. तुम्ही मला आईचे प्रेम दिलेत. पती भेटल्यावर परतेन तेव्हा तुमचे ऋण फेडीन हो.”

आजीबाई आणि मेंग चियांग कितीतरी वेळ बोलत असतात. मग डोळा लागतो. उजाडले आता. रात्रीचे पहाऱ्याचे हाकारे थांबले. कोंबडा आरवला. ती उठली. कपड्यांचे बासन घेऊन निघाली.

थंडी, थंडी, कडक थंडी. कशी ही जाणार, कशी चालणार? वारा, चावरा वारा. झोंबतो अंगाला. कशी ही जागणार? पायांची चाळण झाली. अंगावरच्या वस्त्राच्या चिंध्या झाल्या. कशी राहणार थंडी? धुके, बर्फ सारे गार गार. तिची हाडे दुखत आहेत. रक्ताळ अश्रू गळत आहेत. सुस्कारें! ते पाहा उंच पर्वत दिसू लागले. भिंत जवळ आली का? उत्तरेची भिंत? ती पर्वत चढू लागली. भिंत कोठे आहे ती विचारी आणि एक शेतकरी म्हणाला, “आता जवळच आहे. समुद्रापर्यंत भिंत आता भिडेल. अघोरी काम.”

तिचे हृदय आशेने फुलले. जवळ आली भिंत. समोरचाच रस्ता. त्याला बघेन नि सारे श्रम नाहीसे होतील. अश्रूंची फुले होतील.

भिंतीचे काम लवकर आटपा. अपार खर्च होत आहे. करांखाली प्रजा आहे. लवकर आटपा काम. डोंगरावर पाणी न्यायचे, दगड चढवायचे! पाठीवर कडाड् चाबूक वाजे. हजारो मरत. सभोवती हाडांचे ढीग!

आणि फॅन चि लियांगला तर कष्टांची सवय नाही. हातात पुस्तक खेळवणारा, तो दगडधोंडे उरापोटी उचलीत होता. तो कसा वाचणार? त्याची वेठीची मुदत संपण्याआतच तो मरणार! आणि खरेच काम करताना एक दिवस तो पडला, मेला! कामगार हळहळले. तेथे त्या विटांतच त्यांनी त्याचीही समाधी बांधली! त्या भिंतीतच!

आज संक्रांत होती. सुटीचा दिवस आणि ती आली. कोणाला विचारणार पत्ता? ते पाहा फाटक्या कपड्यांतले बिगारी. ती लाजऱ्या धीटपणाने पुढे होऊन म्हणाली,

"एक क्षणभर थांबा मित्रांनो,"

ती थकलेली होती तरी सुंदर दिसत होती. थोरामोठ्यांच्या घरातील वाटली. ते थांबले.

"येथे टेकड्या आणि समुद्र मिळत आहेत. येथल्या कामात माझा पती होता. फॅन चि लियांग त्याचे नाव. कोठे आहे तो?"

ते बांधकाम करणारे गवंडी होते. ते सद्‌गदित झाले व म्हणाले, "त्याच्यासाठीच आज आलो आहोत. तो कोवळा तरुण होता. सुकुमार होता. श्रमाची सवय नाही त्याला. त्याचे प्रेत उघडे कसे टाकायचे? आम्ही त्याला पुरले. आज सणाचा दिवस. त्याच्या समाधीला फुले वाहायला, मैत्री दाखवायला आलो आहोत."

ते बोलत होते. तिचे डोळे निराशेने जवळजवळ मिटत आले. प्रियजनांचा चिरवियोग यासारखे दु:ख नाही. पतिपत्नींना जोडणारे नाते प्राणमय असते. पती मेला ऐकताच तिचा तडफडणारा, विव्हळणारा आत्मा शरीर फाडून जायला लागला.

शेवटची वेदनामय वाणी मुखातून बाहेर पडत आहे, "नाथ... नाथ!"

ती पडली!

थोड्या वेळाने पुन्हा सचेत होऊन म्हणाली, "माझा पती किती सद्वर्तनी. तो प्रवचने करी, धर्मग्रंथ सांगे. तो परत येईल म्हणून कितीजण वाट पाहात आहेत तिकडे, परंतु पाण्यात दगड बुडावा तसा तो गेला. नाही, पुन्हा दिसणार नाही! शेवटचा निरोप घेताना तो जे बोलला त्याने पाषाणही पाझरेल. म्हणाला, 'पतिपत्नींचे अभेद्य नाते असते. दोन पक्ष्यांचा जोडा, परंतु दुर्दैव ओढवले म्हणजे त्यांनाही विमुक्त व्हावे लागते. पतीने पुरुषार्थ मिळवावा, कधी पत्नीला सोडू नये असे मला नाही का वाटत? परंतु येथे काय इलाज? पूर्वजन्मीच्या पापांची ही शिक्षा! दैवाला कोण जिंकणार? त्या लांब भिंतीपासून पुन्हा यायचा रस्ता नाही. आपण स्वप्नातच भेटू. नाथ, तुमची वाणी खरी ठरली अखेर. मलाही परत जायला रस्ता नाही! मला आता घर ना दार... मी मेल्यावर माझ्या देहाचे काय होईल चिंता नको. वारा माझ्या या भग्न हाडांची धूळ जगभर फेकील." ते बांधकाम्ये गहिवरले व म्हणाले, "नका रडू, पुसा डोळे, विसावा घ्या."



श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

तिने डोळे पुसले. ती शांत झाली व म्हणाली, ''तुम्ही माझ्या पतीला मूठमाती दिलीत. तुमचे उपकार कसे फेडू? हृदयावर ते कोरलेले राहतील. मला ती जागा दाखवता, जेथे त्याला पुरलेत?''

''तुमच्याबरोबर आम्ही अश्रूंची तिलांजली द्यायला येतो चला.''

घट्ट पदर बांधून जड गाठोडे उचलून ती निघाली. हृदय फोडून अश्रूंचे पाट वाहत येत होते.

''ते पाहा. भिंतीचे शेवटचे टोक. समुद्राला ते मिळाले आहे. खाली लाटा उसळत आहेत. आकाशाला भेटू बघत आहेत!'' ते म्हणाले.

ती म्हणाली, ''कोठे पुरलेत? दाखवा थडगे.''

ते म्हणाले, ''ही सारी सम्राटाची जागा. त्याची मालकी. येथे कोणाला कसे पुरता येईल? म्हणून येथे भिंतीच्या पायाशी त्याला पुरले. खूण म्हणून तीन हाती दगड बसवला. त्यावर त्याचे नाव खोदले. ही अमर शिळा आहे. ती बघा, ती.''

तिने तो दगड पाहिला. वारा, पाऊस, ऊन यांना पुसून टाकता न येणारे नाव तिने पाहिले. तिची प्रेमज्वाळा पेटली, भडकली. ''नाथ, वेड्या आशेने तुम्ही जिवंत भेटाल म्हणून आले आणि आता का एकटी राहू? शून्य आकाशाकडे बघत? नाही, कधीही नाही!''

तिचे प्रेम, तिचे पातिव्रत्य आकाशाला भेदून गेले. पातिव्रत्याची शक्ती विश्वाला हलवील. ती आपल्या पतीची हाडे मिळतात का पाहात होती आणि भिंत फाटली! दगड-माती जरा दूर झाली. पतीची त्रिभुवन मोलाची हाडे मिळाली. अंमलदाराने सम्राटाला चमत्कार कळविला. सम्राटाने मेंग चियांगला प्रासादराणी करतो कळविले!

सम्राटाची आज्ञा ती धिक्कारते. ती हाडे आपल्या विश्वासू हृदयाशी धरून लांब भिंतीच्या टोकावर ती उभी राहते. खाली समुद्र उसळत असतो.

घेतली तिने उडी! डुबू!

पूर्व समुद्रात ती विलीन झाली.

आणि सम्राटाला तिच्या पातिव्रत्याची खात्री पटली. तेथे त्या भिंतीजवळ तिचे समाधीमंदिर त्याने उभारले. तिचा दिवस चीनभर पाळण्यात येऊ लागला. तिची पूजा होऊ लागली. मेंग चियांग अमर झाली!

(एक चिनी लोककथा)

+++

# आशा आणि समीर

त्याचे नाव होते समीर. समीर म्हणजे वारा. वाऱ्याप्रमाणेच समीरची वृत्ती होती. लहानपणापासूनच तो जरा आडमुठाच. सुधे ऐकायचा नाही. सुधे करायचा नाही. मुलांमध्ये भांडेल, मारामारी करील, घरांवर चढेल, धावेल. कौले फुटायची. लोक तक्रार करायचे, आईबाप रागवायचे, परंतु समीर का कोणाचे ऐकणार होता? बाल्य संपले, तारुण्य आले. वाऱ्याला माळ घालायला कोण तयार होणार? समीरचा भरवसा काय? तो दिसे सुंदर. चेहऱ्यावर एक प्रकारची विश्वविजयी वृत्ती, परंतु घर ना दार. नोकरी ना चाकरी. लहर लागली तर चांगले काम करी, भरपूर मजुरी मिळवी. लहर लागली तर वाचीत बसेल, परंतु तो केवळ पुस्तकी ज्ञानाचा भोक्ता नव्हता. हे विश्व म्हणजे त्याची विराट शाळा होती.

समीरवर एका मुलीचे प्रेम होते. वाऱ्याशी आपल्या प्रेमाने मोट बांधायला ती उभी राहिली.

"कशाला त्याचा ध्यास घेतेस? सारे त्याला नावे ठेवतात." शेजारणी पाजारणी आशाला म्हणत.

"तो काय वाईट आहे?" ती म्हणे.

"तुला तो फसवील. त्याचा का भरवसा आहे? गेला सोडून तर तू कोठे जाशील? त्याची चंचल वृत्ती." मैत्रिणी म्हणत.

"त्याच्या चंचलपणातही मधुरता आहे, तेज आहे. ठरीव चाकोरीतून जाणाऱ्या जीवनात तरी काय मौज? वारा सर्वत्र नाचतो म्हणून त्याला का आपण वाईट म्हणू? उलट तो त्रिभुवनाला प्रदक्षिणा घालतो. तो घरकुल मांडीत नाही म्हणून तो पवित्रच वाटतो!" आशा म्हणे.

"परंतु तुला संसार करायचा आहे ना? समीरने तुला सोडून इतरांभोवती प्रदक्षिणा घातल्या तर तुला आवडेल?"

"मला काही समजत नाही. समीर मला आवडतो. तो माझ्या जीवनाचा प्राण आहे. तो कसाही असो. माझ्या भावनेने त्याच्याकडे बघा. तो तुम्हाला त्रिभुवन-सुंदर वाटेल." आशा उचंबळून म्हणे.

सर्वांचे म्हणणे दूर सारून आशेने समीरला वरले. एका लहान झोपडीत दोघे राहू लागली.

थोडे दिवस गेले आणि एके दिवशी समीर नाहीसा झाला. आठवडा गेला, महिना गेला, वर्ष गेले. समीरचा पत्ता नाही!

"तुला आम्ही सांगितले होते. बस आता रडत. अविवेकाचा हाच परिणाम." बायका म्हणत.

"आशा, पुन्हा लग्न कर, समीरशी लग्न ते का लग्न? साऱ्या मुलखाचा भटक्या तो. फसलीस. तरुणांना का तोटा आहे? सोन्यासारखे आयुष्य, त्याचे मातेरे नको करूस. ऐक आशा." मैत्रिणी म्हणत.

आशा बोलत नसे. ती समीरला धुंडीत हिंडे फिरे, रानात जाई. ती मोळी घेऊन येई. विकी. दोन घास खाई. उरलेला वेळ पतीला शोधण्यात दवडी. समीर, समीर ती हाका मारी, परंतु धो धो करणारा वारा उत्तर देई. कधी उन्हातून ती हिंडे. पाय चटपट भाजायचे, परंतु तिला शुद्ध नसे. काट्यांतून जायची, तिला शुद्ध नसे. प्रेमाच्या प्रकाशात तिला काटे दिसत नसत, दगड खुपत नसत. प्रेमाच्या प्रकाशात अंधारही तिला प्रकाशमय वाटे. असा कसा समीर? कोठे गेला तो? अपघात तर नाही ना झाला? डोहात नाही ना बुडाला, दरीत नाही ना पडला, श्वापदाने नाही ना त्याला खाल्ले? आशाच्या मनात शत शंका येत, परंतु तिचे मन म्हणे, 'समीर सुरक्षित आहे. तो येईल.'

समीर त्या दिवशी भटकत गेला. कोठे जातो त्याला कळेना आणि एका भेसूर गावात आला. ती पृथ्वी होती का ते पाताळ होते? कोणाची ती दुनिया, कोणता लोक? तेथे नाना पशू होते, नाना प्राणी. उंदीर, घुशी, सरडे, साप, विंचू, वाघ, लांडगे, कोल्हे नाना प्रकार. समीरच्या भोवती ही गर्दी. त्याला कोणी चावत नव्हते. जो तो त्याला ओढू बघे. काय आहे हे सारे? कोठून आली ही मानवेतर दुनिया? कोठले साप नि सरडे, उंदीर नि घुशी?

''आम्ही तुझीच रूपे. तुझ्याच नाना वासना येथे आम्ही तुझ्यासमोर मूर्त झालो आहोत. तुझीच ही अंत:सृष्टी. आम्हाला दूर नको लोटू. नावे नको ठेवू. डोळे नको मिटून घेऊ. अरे, तुझीच आम्ही रूपे, तुझीच.'' असे उंदीर, घुशी, कोल्ही, कुत्री त्याला म्हणत. त्याचा पिच्छा ती पुरवीत. तो जिकडे जाईल तिकडे ती येत. कशी सुटका व्हायची?

परंतु तो मुक्त झाला. एके दिवशी ते सारे जंगल दूर झाले. तो खिन्न होता. कोठे आलो तेही कळेना. आपण म्हातारे झालो असे त्याला वाटले.

तो समोर त्याला समुद्र दिसतो.

तेथे एक गलबत असते. गलबतात कोणीतरी असतात.

''कोठे जाते गलबत?''

''वेड्याच्या गावाला.''

''मी येऊ?''

''ये.''

तो गलबतात चढला. वारा अनुकूल होता. बाणाप्रमाणे गलबत चालले. वेड्यांची नगरी आली. तेथे सारे वेडे. समीर त्यांना पाहून घाबरला.

''अरे, मी बादशहा आहे जगाचा. इकडे ये. माझी आज्ञा आहे.'' एक वेडा म्हणाला.

''सारी संपत्ती माझी. कोण नेणार बघतो माझी संपत्ती. मी का वेडा आहे माझी संपत्ती वाटायला?'' दुसरा म्हणाला.

एकाने समीरला हाक मारली. तो वेडा जरा शांत दिसत होता.

''काय आहे म्हणणे?'' समीरने विचारले.

''तुला एक गोष्ट माहीत आहे का?'' वेड्याने विचारले.

''कोणती?''

''काल रात्री बारा वाजता बुद्धी मेली. तिची प्रेतयात्रा प्रचंड होती. तू नाही गेलास?''

''बुद्धी मेली?''

''हो. खरोखर मेली. आम्ही खोटे बोलायला का वेडपट आहोत?''

समीरला त्या वेड्यांच्या संगतीत गुदमरल्यासारखे वाटते. तो पुन्हा समुद्रतीरावर येतो. गलबत तेथे असते.

"मला न्याल का?" तो विचारतो.

"कोठे?"

"माझ्या गावाला."

"चल, परंतु तुझे दिवस थोडे आहेत."

"लवकर न्या."

तो गलबतात बसतो. तेथे एक विचित्र मनुष्य असतो. तो निरनिराळे ठसे पाडीत असतो. बटणे करीत असतो. जी नीट बसत नाहीत ती पुन्हा मोडतो.

"आपण कोण?" समीर विचारतो.

"मी बटण-मेकर. जी बटणे नीट काम देत नाहीत, त्यांना मी वितळवतो, भट्टीत घालतो. पुन्हा बनवतो." तो म्हणाला.

समीर विचार करीत होता. ईश्वरही असेच करीत असेल. त्याच्या विश्वयोजनेत जो नीट बसत नसेल त्याला तो मोडून पुन्हा बनवीत असेल. मी त्याच्या विश्वयोजनेत बसलो की, नाही? ज्या कामासाठी त्याने मला निर्मिले ते मी नाही का बजावले? म्हणून का मला मोडून पुन्हा बनवणार? तो विचारात होता. गलबत तीराला लागले. तो उतरला नि निघाला. कोठे जात होता तो? त्याला आशाची आठवण आली. कोठे असेल आशा, खरेच कोठे असेल?

आशा भटकून दमली. गावातील लोकांची बोलणी ऐकायला न यावीत म्हणून रानात झोपडी घालून ती राहिली. तेथे दिनरात चरख्यातून ती सूत कातीत बसे. तो येईल, येईल, असे म्हणे. ते सूत ती विकी नि दोन घास खाई.

ती आता आंधळी झाली होती. ती चरख्यावर गाणे गात, काठी टेकीत गावात जाई नि सूत विकी. ती वृद्ध झाली तरी तिची श्रद्धा कमी झाली नव्हती आणि समीर झोपडीच्या दारात येऊन उभा होता.

आशा गीत गात होती, "येईल, माझा समीर येईल. कोठे अडचणीत सापडला माझा समीर? जग त्याला वाईट म्हणे. वेडे आंधळे जग. समीरसारखा सुंदर कोण आहे? त्याच्यासारखा चांगला कोण आहे? ये, समीर ये. फुलांच्या सुगंधाबरोबर ये, वाऱ्याच्या झुळकेबरोबर ये. पाखरांच्या किलबिलीबरोबर ये, सूर्यचंद्राच्या

किरणांबरोबर ये. पर्जन्यधारांबरोबर ये, वसंत ऋतूच्या बहराबरोबर ये. शहद ऋतूतील शांत वैभवाबरोबर ये. ये समीर ये."

"आशा, हा बघं समीर. समीर आला आहे."

"ये. दमला असशील समीर. ये माझ्या मांडीवर नीज."

तो तिच्या मांडीवर डोके ठेवतो. तिचे आंधळे डोळे प्रेमाने त्याच्याकडे बघतात. आनंदाश्रू घळघळतात.

"आशा, तुला वाईट वाटले?"

"नाही रे राजा, हें आनंदाचे अश्रू."

"मी वाईट, तुला टाकून गेलो."

"असे नको म्हणूस, तू किती चांगला ! तू दमला आहेस नीज."

"मी तुला अजून चांगला दिसतो."

"अजून म्हणजे?"

"कोठे आहे मी चांगला?"

"माझ्या आशेत, माझ्या स्वप्नात, माझ्या श्रद्धेत तू नेहमी सुंदर नि चांगलाच दिसतोस. नीज, तुला गाणे म्हणते."

समीर झोपला. ती का चिरनिद्रा होती?

आशा गाणे म्हणत बसली होती. तिच्या श्रद्धेच्या डोळ्यांना सारे 'सत्य शिव सुंदर'च दिसत होते!

(इब्सेनचे 'पीर जिंट' स्मरून)

+++

# देवाचे हेतू

मुलांनो, तुम्हाला एका साधूची गोष्ट सांगतो. 'हर्मिट' नावाच्या एका इंग्रजी कवितेत मी ती वाचली होती.

एक होता साधू. तो रानावनात राही. झऱ्याचे पाणी पिई, झाडांची फळे खाई व देवाचे नाव घेई. त्याच्या मनात नाही आली कधी शंका, नव्हते कधी असमाधान.

परंतु एक दिवस काय झाले, सापाने बेडकाला धरताना त्याने पाहिले. साधू विचार करू लागला. या बेडकाचे काय पाप की, असे मरण त्याला यावे? या जगात न्याय आहे की नाही? ज्या देवाचे मी नाव घेतो तो का लहरी आहे? त्याच्या या जगात दुष्टांची चलती व्हावी नि निरपराध का मारले जावेत? शांत सरोवरात दगड टाकला तर एक लाट दुसऱ्या लाटेला जन्म देते, ती तिसरीला. असे हजारो तरंग उठतात. त्या साधूच्या मनात एक लहानसा संशय आला व त्यातून हजारो संशय नवे नवे जन्मू लागले.

चला आपण जगात जाऊन देवाच्या सृष्टीतील प्रकार पाहू तरी असे म्हणून व ते वन सोडून साधू निघाला. कितीतरी वर्षांनी त्या वनातून आज तो या जनांत येत होता. हातात एक काठी घेऊन, खाकेला झोळी अडकवून तो निघाला. त्याला वाटेत एक तेजस्वी तरुण भेटला.

"कोठे जायचे?" साधूने तरुणास विचारले.

"निश्चित नाही." तो तरुण म्हणाला.

"मला तुम्ही बरे साथीदार मिळालात. माझेही अमक्याच दिशेने जायचे, अमक्याच गावी जायचे असे ठरलेले नाही."

"चला दोघे जाऊ." साधू म्हणाला.

ते दोघे जात होते. सायंकाळ झाली. एकाएकी आकाश मेघांनी भरून आले. विजाही चमकू लागल्या. कडाड्कडाड् गर्जना होऊ लागल्या. झाडे एकमेकांवर आदळत होती आणि पाऊस सुरू झाला. मुसळधार पाऊस. जणू प्रलय ओढवला. ते दोघे तरुण भिजून ओलेचिंब झाले. जवळपास ना दिसे कुठे गाव ना काही परंतु पाऊस थांबला. जिकडे तिकडे नद्यानाल्यांना भयंकर पूर आले होते. पाण्यातून दोघे जात होते. तो त्यांना दूर अंधुक उजेड दिसला. गाव असेल, घर असेल असे त्यांना वाटले. दोघे पळत निघाले. गारठलेल्या शरीरात पळण्यामुळे उष्णता आली. तो एक प्रचंड वाडा होता. त्यातूनच तो मिणमिण उजेड त्यांना दिसला होता. त्यांनी त्या भक्कम दरवाजावर दगडाने मोठमोठ्याने आवाज केला. दार उघडेना परंतु त्यांनी प्रयत्न सोडला नाही. अखेर कोणीतरी दिवा घेऊन येत आहे असे वाटले. एक वृद्ध गृहस्थ आला. त्याने दरवाजाची फक्त मधली लहान दिंडी उघडली.

"कोण पाहिजे? अपरात्री का दार ठोठावता?" त्याने निष्ठुरपणे विचारले.

"आम्ही मुशाफीर आहोत. पावसाने भिजून ओलेचिप्प झालो. थंडीने कुडकुडत आहोत. आजच्या रात्रीला निवाऱ्याची जागा द्या. नाही म्हणू नका." साधू म्हणाला.

त्या मालकाने त्या दोघांकडे नीट न्याहाळून पाहिले आणि शेवटी त्याने त्यांना आत घेतले.

"पडा येथे." तो म्हणाला.

"काही कोरडे अंथरायला द्या." तरुण म्हणाला.

त्या भुतासारख्या मालकाने त्यांना फाटकी घोंगडी, फाटकी वाकळ आणून दिली. फाटके कपडे अंगावर घालायला दिले. ते दोघे गुरगुंटी करून झोपले. आता पहाट झाली. कोंबडे आरवू लागले, पक्षी किलबिल करू लागले. साधू जागा झाला व तो तरुणही.

"चला, आपण जाऊ." साधू म्हणाला.

"चला." तरुण म्हणाला.

परंतु निघण्यापूर्वी तरुणाने आपल्या पिशवीतले एक सुंदरसे चांदीचे भांडे काढले नि तेथे त्या फाटक्या कपड्यांजवळ ठेवून दिले. आपले ओलसर कपडे पेहरून ते दोघे हळूच बाहेर पडले. सृष्टी धुतल्यासारखी दिसत होती. आकाश निरभ्र होते. सूर्य

उगवला. त्याचे सोनेरी किरण हिरव्यागार स्वच्छ ताडामाडांवर पडून रम्य शोभा दिसत होती. ते दोघे जात होते. पुन्हा सायंकाळ झाली. त्यांना एक गाव दिसला. ते त्या गावात शिरले.

''येथे अतिथी-अभ्यागताला कोणी आश्रय देतो का?'' साधूने लोकांना विचारले.

''तो पलीकडे मोठा वाडा आहे तेथे जा. तेथे सर्वांचे स्वागत होते. कोणाला नकार मिळत नाही.'' लोक म्हणाले.

ते दोघे वाटसरू त्या वाड्याकडे गेले.

''या महाराज बसा.'' मालक म्हणाला.

तेथे सुंदर बैठक होती. पानसुपारीचे तबक होते. त्या गृहस्थाने त्या पाहुण्यांना सुंदर मेजवानी दिली. चांदीची ताटे होती, चंदनी पाट होते. आपले सारे वैभव मालक दाखवीत होता. भोजनोत्तर त्यांना स्वच्छ अंथरुणे देण्यात आली. दमलेले वाटसरू सुखाने झोपले. नेहमीप्रमाणे साधूला पहाट होताच जाग आली. तरुणही जागा होता.

''चला जाऊ.'' तो म्हणाला.

''त्यांचे आभार मानून जाऊ'' साधू म्हणाला.

''काही नको. उगीच उशीर होईल. गळ घालतील, राहा म्हणतील. चला निघू.''

''ठीक तर.''

परंतु निघताना तेथे जो चांदीचा गडवा होता व पाणी पिण्याचे फुलपात्र होते, ती तरुणाने आपल्या झोळीत घातली.

''हे काय करतोस?'' साधूने विचारले.

''तुम्हाला कळत नाही. चला!'' तो म्हणाला.

दोघे निघाले. रस्त्याने जात होते. कोणी बोलत नव्हते. त्या तरुणाची साधूला थोडी भीती वाटू लागली. पुन्हा चालता-चालता सायंकाळ झाली. एक गाव दिसला. त्या गावात दोघे शिरले.

''येथे कोठे आधार मिळेल का?'' साधूने विचारले.

''त्या पलीकडच्या वाड्यात जा. तेथे तुमचे स्वागत होईल.'' लोक म्हणाले.

ते वाटसरू त्या मोठ्या हवेलीजवळ आले. मुलाला खेळवीत एक म्हातारा तेथे बसला होता.

''यावे महाराज. बसा. हा बघा तुमच्याकडे बघत आहे. एवढासा आहे, पण सारे त्याला कळते. अहो, इतके दिवस मूलबाळ नव्हते. देवाच्या दयेने आता झाले. बघता ऐकतो आहे लबाड.'' मालकाची टकळी सुरू झाली.

रात्री चारी ठाव जेवण सुरू झाले. मऊ गाद्यांवर दोघे पहुडले. रात्र केव्हाच संपली, परंतु अजून सृष्टी झोपेत होती. तो साधू नि तो तरुण उठले.

''चला जाऊ.'' तरुण म्हणाला.

''आभार नाही मानायचे?''

''उगीच घोळ घालतील. चला जाऊ.''

''ठीक तर.''

परंतु त्या तरुणाने काय केले. आत पाळण्यात मूल निजले होते, तेथे जाऊन त्याने मुलाचा गळा एकदम दाबला. मुलाचा प्राण गेला.

''अरे, काय करतोस?'' साधू म्हणाला.

''तुम्हाला कळत नाही.'' तरुण म्हणाला.

आता तर साधूला त्या तरुणाची फारच भीती वाटू लागली. मुकाट्याने सायंकाळपर्यंत दोघे जात होते. पुन्हा एक गाव आला. एका भल्या माणसाकडे उतरले. रात्रभर पाऊस पडत होता; परंतु पहाटेच्या वेळेस थांबला. हे दोघे उठून निघाले. सकाळी उठून यजमान बघतो तो दोघे पाहुणे गेलेले.

तो आपल्या गड्याला म्हणाला, ''अरे, ते रस्ता चुकतील. नदीला पूर आला आहे. त्यांना साकव आहे तिकडचा रस्ता दाखव.''

गडी पळत आला व म्हणाला, ''साकवाच्या बाजूने चला. इकडून उतार नाही. साकवावरून पलीकडे जायला हवे. मी दाखवितो रस्ता.''

तिघे जात होते.फेसाळ नदी दुथडी उसळत जात होती.

''हा बघा साकव.'' गडी म्हणाला.

गडी पुढे, तरुण मागे, त्याच्या मागे तो साधू असे साकवावरून जात होते. तो तरुणाने त्या गड्याला एकदम नदीत लोटले. गडी गटांगळ्या खाऊ लागला. तुफान नदीने त्याला नेले.

''हे काय केलेस दुष्टा!'' साधू ओरडला.

''तुम्हास कळत नाही.'' तरुण म्हणाला.



श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

नदीपलीकडे दोघे आले. याला काहीतरी करून चुकवावे असे साधूला वाटत होते; परंतु तो तर छायेप्रमाणे पाठोपाठ येत होता. साधू भराभर जाऊन झाडाआड लपे तर तो तरुण तेथे येई व म्हणे, ''चला.''

परंतु एकाएकी तरुण अदृश्य झाला. साधू इकडे तिकडे पाहात होता. तो तरुण कोठेच दिसेना. इतक्यात एकाएकी तेथे एक दिव्य आकृती त्याला दिसली.

''कोण तुम्ही?'' साधूने विचारले.

''मी देवदूत. मीच तुमच्याबरोबर होतो.''

''तुम्ही?''

''हो. तुझ्या मनात आलेला संशय दूर करण्यासाठी देवाने मला पाठविले.''

''संशय तर वाढतच आहेत. तुमच्या वर्तनाचाच आधी उलगडा करा. आपण त्या प्रचंड वाड्यात रात्री राहिलो. तुम्ही तेथे चांदीचे भांडे ठेवलेत. याचा अर्थ काय?''

''तो मालक मोठा कंजूष. आजपर्यंत त्याने कधी कोणाला आश्रय दिला नव्हता; परंतु आपणाला मध्यरात्रीला त्याने घरात घेतले. फाटके तुटके का होईना अंथरापांघरायला, नेसायला दिले. सकाळी उठल्यावर त्या चिंध्यांच्या जवळ जेव्हा ते चांदीचे भांडे तो पाहील तेव्हा म्हणेल, ''मी यांना फाटक्या चिंध्या दिल्या तर चांदीचे भांडे मिळाले. मग त्यांना अधिक चांगल्या रीतीने वागविले असते तर?'' तो मनुष्य आता उदार होऊ लागेल. त्याच्या जीवनात क्रांती होईल. माझ्या वागण्याचा कळला अर्थ?''

''हो. परंतु नंतरच्या त्या वाड्यात तुम्ही चांदीची भांडी चोरलीत.''

''त्याचाही अर्थ ऐक. त्या माणसाला आपले ऐश्वर्य दाखवावयाची फार हौस. आता त्या गोष्टीला जरा आळा बसेल. थोडा विवेक येईल त्याच्या जीवनात.''

''आणि त्या बालकाचा गळा का दाबलात?''

''मूल होण्यापूर्वी तो मनुष्य देवाचे स्मरण करायचा, लोकांच्यामध्ये मिसळायचा, परंतु मूल झाल्यावर ते मूल म्हणजे सारे त्रिभुवन त्याला वाटू लागले. त्या माणसाचा विकास थांबला. मुलाची देणगी देवाने त्याला दिली; परंतु त्याने त्याचा अध:पात होऊ लागला म्हणून ती देणगी देवाने परत नेली.''

''आणि नदीवरचा पूल दाखवायला जो आला, त्याला तुम्ही नदीत का लोटलेत?''

“अरे, आपल्या धन्याचा आज तो खून करणार होता!”

“देवदूता, देवाचे हेतू कोणाला कळणार? आम्ही क्षुद्रदृष्टी लोक !”

“या विश्वाच्या अनंत रचनेत कोठे काय हवे याचा तुम्हाला पत्ता कसा लागणार? म्हणून संशयी न होता शेवटी सारे चांगल्यासाठीच ती विश्वशक्ती करीत असेल असे मनात धरून आपापली कर्तव्ये तुम्ही करीत राहा. अच्छा.” तो म्हणाला.

“नमस्ते.” साधू म्हणाला.

देवदूत अदृश्य झाला. साधू पुन्हा त्या पूर्वीच्या वनात प्रभूचे नामस्मरण करीत शांतीने राहू लागला.

आमची गोष्ट सरे पोट तुमचे भरे.

+++

# शहाणा झालेला राजपुत्र

एक होता राजा. त्याला एक मुलगा होता. एकुलता एक मुलगा म्हणून राजाराणी त्याला जीव की प्राण करीत, परंतु लाडामुळे मुलगा बिघडला.

राजा मनात म्हणाला, ''याला घालवून द्यावे. टक्कटोणपे खाऊन शहाणा होऊन घरी येईल.'' राजाने राणीला हा विचार सांगितला.

''आज ना उद्या सुधारेल तो. नका घालवू त्याला दूर.'' ती रडत म्हणाली.

''तुम्हा बायकांना कळत नाही. आज त्याला हाकलून देणे तुला कठोर वाटले तरी तेच हिताचे आहे.'' तो म्हणाला. राणी काय करणार, काय बोलणार? रात्रभर तिला झोप आली नाही. साने गुरुजी

सकाळी राजा मुलाला म्हणाला, ''राज्यातून चालता हो. आपण आता शहाणे झालो असे वाटेल तेव्हा घरी ये.''

''तुमची आज्ञा प्रमाण!'' असे म्हणून पित्याच्या पाया पडून तो आईचा निरोप घ्यायला गेला. तो आईच्या पाया पडला. आईने त्याला पोटाशी धरिले, ''हे घे चार लाडू. भूक-तहानेचे लाडू.'' ती म्हणाली.

आईचा आशीर्वाद घेऊन, ते लाडू घेऊन, धनुष्यबाण नि तलवार घेऊन तो निघाला. पायी जात होता. दिवस गेला, रात्र गेली, चालत होता. थकल्यावर दगडाची उशी करून झाडाखाली झोपे, पुन्हा उठे नि चालू लागे. त्याला भूक लागली. त्या लाडूंची त्याला आठवण झाली. एक झरा खळखळ वाहत होता. हातपाय धुऊन तेथे बसला. त्याने एक लाडू फोडला तो आतून एक रत्न निघाले. त्याला आनंद झाला. आईला किती चिंता, असे मनात येऊन त्याचे डोळे भरून आले.

लाडू खाऊन पाणी पिऊन तो पुढे निघाला. तो त्याला एक हरिणी दिसली. तिच्या भोवती तिची पाडसे खेळत होती. राजपुत्राने धनुष्याला बाण लावला. तो त्या हरिणीला मारणार होता; परंतु त्याला स्वत:ची आई आठवली. माझी आई मला, तर ही हरिणी या पाडसांना. त्याचे हृदय द्रवले. त्याने बाण न मारता भात्यात ठेवला. तो पुढे निघाला. काही अंतर चालून गेल्यावर मागून कोणीतरी येत आहे असे त्याला वाटले. एक स्त्री येत होती. साधी भोळी निष्पाप दिसत होती. तो थांबला. ती स्त्री जवळ आली.

"कोण तुम्ही, कुठल्या? या रानावनातून एकट्या कुठे जाता?"

"मी तुझी बहीण होऊ इच्छिते. मला नाही म्हणू नको." ती म्हणाली.

"ये माझ्याबरोबर. भावाला बहीण झाली." तो म्हणाला. दोघे जात होती. दोघांना भूक लागली. एका खळखळ वाहणाऱ्या झऱ्याच्या काठी दोघे बसली. त्याने एक लाडू फोडला. त्यातून पुन्हा एक रत्न निघाले. अर्धा अर्धा लाडू दोघांनी खाल्ला. इतक्यात केविलवाणा शब्द कानी आला. एका सापाने बेडकाला तोंडात धरले होते. बेडूक वाचवावा तर सापाची भूक कशी शमायची? राजुत्राने जवळच्या तलवारीने मांडीचे मांस कापून सापाकडे फेकले. तो लाल तुकडा पाहून बेडकाला सोडून साप तिकडे धावला. बेडूक टुणटुण उड्या मारीत गेला. सापाची भूक शमली, बेडकाचे प्राण वाचले. भावाची रक्तबंबाळ मांडी पाहून बहिणीचे डोळे भरून आले. ती पटकन कुठेतरी गेली नि पाला घेऊन आली. तिने त्या पाल्याचा चोळामोळा करून तो पाला आपला पदर फाडून तिने जखमेवर बांधला. दोघे पुढे जाऊ लागली. तो पाठीमागून कोणी येत आहे असे त्यांना वाटले. दोघे थांबली. एक तरुण येत होता.

"कोण रे तू, कुठला? रानावनात एकटा का?" राजपुत्राने विचारले.

"मला तुमचा भाऊ होऊ दे." तो म्हणाला.

"ठीक. काही हरकत नाही." राजपुत्र म्हणाला.

तिघे चालू लागली तो आणखी एक तरुण धावत आला.

"तू रे कोण?" राजपुत्राने विचारले.

"मला तुमचा भाऊ होऊ दे, नाही म्हणू नका." तोही म्हणाला.

राजपुत्राने त्यालाही आपल्या बरोबर घेतले. ती चौघे जात होती. सर्वांना भुका लागल्या. दोन लाडू शिल्लक होते. एका सरोवराच्या काठी चौघे बसले. राजपुत्राने दोन्ही लाडू फोडले. त्यातूनही दोन रत्ने निघाली. अर्धा अर्धा लाडू सर्वांनी खाल्ला.

सर्वांना ढेकर आली. आईच्या हातचा लाडू, त्याने नाही तृप्ती व्हायची तर कशाने? जवळच एक शहर दिसत होते. प्रासादांचे, मंदिरांचे कळस दिसत होते.

राजपुत्र दोन भावांना म्हणाला, ''त्या राजधानीत जा. ही रत्ने विकून एक राजवाडा खरेदी करा. तेथे नोकर चाकर ठेवा आणि हत्ती, घोडे विकत घ्या. घोडेस्वार तयार करा. मला सन्मानाने मिरवत नेण्यासाठी या.''

दोघे भाऊ त्या नगरीत गेले. दोन रत्ने त्यांनी विकली. त्याचेच दहा लाख रुपये मिळाले. दुसरी दोन विकावी लागली नाहीत. त्यांनी राजवाडा खरेदिला. नोकर चार ठेवले. राजवाडा शृंगारला गेला. ठायी ठायी गालिचे होते. ठायी ठायी आसने. फुलांचे गुच्छ होते, पडदे सोडलेले होते. चांदी-सोन्याची भांडी होती. त्या दोन भावांनी घोडेस्वार तैनातीस ठेवले आणि हत्ती सजविला. त्याच्यावर अंबारी ठेवण्यात आली.

राजपुत्राला आणायला घोडेस्वारांसह, त्या हत्तीसह ते दोघे भाऊ गेले. आली सारी मंडळी वनात. राजपुत्र अंबारीत बसला. बहीण एका पालखीत बसली. दोन भाऊ दोन उमद्या घोड्यांवर बसले. मिरवणूक निघाली. शहरात आली. दुतर्फा लोक बघत होते. राजपुत्र राजवाड्यात उतरला. तेथील जीवन सुरू झाले. त्या नगरीच्या राजाच्या कानांवर वार्ता गेली.

राजाचा एक खुशमस्कऱ्या होता. राजाने त्याला विचारले,

''कोण आला आहे राजपुत्र?''

''मी बातमी काढून आणतो.'' तो म्हणाला.

खुशमस्कऱ्या राजपुत्राकडे गेला. पहारेकऱ्यांनी त्याला हटकले.

तो म्हणाला, ''मी येथल्या राजाची करमणूक करणारा. तुमच्या राजपुत्राची करमणूक करायला आलो आहे.'' नोकराने राजपुत्राला जाऊन विचारले.

''पाठवा त्याला.'' राजपुत्र म्हणाला

तो खुशमस्कऱ्या आला. राजपुत्राची तो करमणूक करू लागला. तेथील हास्यविनोद ऐकून त्याची बहीणही आली. थोड्या वेळाने खुशमस्कऱ्या जायला निघाला.

''येत जा.'' राजपुत्र म्हणाला.

''राजाने येऊ दिले तर.'' तो म्हणाला.

खुशमस्कऱ्या राजाकडे गेला व म्हणाला, ''राजा, राजा, त्या राजपुत्राची पत्नी फार सुंदर आहे. ती तुम्हालाच शोभेल. तुम्ही तिच्यासाठी मागणी करा.''

“ठीक आहे.” राजा म्हणाला.

दुसऱ्या दिवशी राजाने राजपुत्राला बोलावणे धाडले. राजपुत्र आला, आसनावर बसला. कुशल प्रश्न झाल्यावर राजा म्हणाला, “तुमची पत्नी फार लावण्यवती आहे असे ऐकतो.”

“ती माझी बहीण.”

“ती माझी राणी होऊ दे.”

“मी तिला विचारीन.”

“कळवा मला काय ते.”

त्याने बहिणीला सारी हकिकत सांगितली. ती म्हणाली, “राजाला सांग मी व्रती आहे. मी कोणाची राणी होऊ शकत नाही.”

राजपुत्राने राजाला त्याप्रमाणे सांगितले नि तो परत आला. राजा विचार करू लागला. इतक्यात खुशमस्कऱ्या आला.

“काय उपाय?” राजाने विचारले.

खुशमस्कऱ्याने सुचविले, “त्याला म्हणावे तुझी बहीण तरी दे. नाहीतर रात्री पायी चाळीस कोस चालत जा व त्या अंधाऱ्या दरीतील पांढरी फुले घेऊन उजाडता हजर हो. नाहीतर डोके उडवण्यात येईल.”

राजपुत्राला निरोप कळविण्यात आला. तो रडत बसला. बहीण येऊन म्हणाली, “दादा, का रडतोस?” त्याने वृत्तांत सांगितला.

ती म्हणाली, “गावाबाहेर जाऊन दोन कोसांवर बसून राहा. चिंता करू नकोस.”

राजपुत्र पायी निघाला व जाऊन बसला. बहीण घरातून बाहेर पडली आणि शहराबाहेर पडल्यावर ती हरणी बनली. वाऱ्याप्रमाणे ती पळत सुटली. अंधाऱ्या दरीतील पांढरी फुले तिने तोडली. ती फुले दातात धरून सूर्योदयाच्या आत ती आली. पुन्हा बहीण बनून राजपुत्राजवळ ती फुले देऊन ती म्हणाली, “जा, राजाला ही नेऊन दे.”

राजपुत्राने ताऱ्यांप्रमाणे चमकणारी ती फुले राजाला नेऊन दिली. निरोप घेऊन तो परत घरी आला.

राजा खुशमस्कऱ्याला म्हणाला, “आता कोणता उपाय?”

“त्याला सांगा की बहीण तरी दे किंवा मागील राणीची समुद्रात पडलेली नथ आणून दे. नाहीतर डोके उडीन.”

खुशमस्कऱ्याने सुचविले.

राजपुत्रोला ती गोष्ट कळविण्यात आली. राजपुत्र रडत बसला. एक भाऊ येऊन म्हणाला, "दादा, का रडतोस?"

राजपुत्राने वृत्तांत निवेदिला. "रडू नको दादा. शहराबाहेर बस. चिंता नको करूस."

राजपुत्र शहराबाहेर जाऊन बसला. तो भाऊही बाहेर गेला नि तो बेडूक बनला. ड्राँव ड्राँव करून त्याने बेडकांना हाका मारल्या. लाखो बेडूक जमा झाले. तो त्यांना म्हणाला, "त्या राजपुत्राने माझा प्राण वाचविला आहे. आपण त्याच्यासाठी काही करूया. आपण समुद्रात रात्रभर पुन:पुन्हा बुड्या मारू. मिळतील ते मोती तोंडात धरून आणू, राजाच्या अंगणात ढीग घालू."

साऱ्या बेडकांनी ऐकले आणि त्याप्रमाणे त्यांनी केले. राजाच्या दारात झळाळणाऱ्या मोत्यांचे ढीग पडले.

भाऊ राजपुत्राकडे येऊन म्हणाला, "राजाला अंगणातील मोत्यांपैकी नथीचे मोती निवडून घ्यायला सांगा. लाटांनी नथ मोडली. मोती अलग झाले. घ्या म्हणावे ओळखून."

राजपुत्र राजाला तसे सांगून आपल्या राजवाड्यात परत आला. राजाने खुशमस्कऱ्याने विचारले, "आता काय?"

"त्या राजपुत्राला म्हणावे बहीण दे नाहीतर स्वर्गात जाऊन तेथे आमच्या वडिलांची करमणूक करायला कोणी आहे की नाही ते विचारून ये." खुशमस्कऱ्याने सुचविले.

"तो स्वर्गात कसा जाणार?"

"तुमच्या वडिलांना मेल्यावर सरणावर घालून स्वर्गात पाठविले. त्याच रस्त्याने राजपुत्राला पाठवू."

राजपुत्राला ती गोष्ट कळविण्यात आली. राजपुत्र सचिंत होऊन बसला. तो दुसरा भाऊ येऊन म्हणाला "दादा, का दु:खी?" राजपुत्राने सारी कथा सांगितली.

"रडू नका. मी देतो तो रस अंगाला लावा आणि चितेवर निजा. तुम्हाला वेदना होणार नाहीत, परंतु जळून तर जाल. राजाला सांगून ठेवा की माझी राख माझ्या घरी पाठवा." राजपुत्र तो रस अंगाला लावून राजाकडे गेला. माझी राख माझ्या घरी द्या असे त्याने सांगितले. हजारो लोक तो प्रकार पाहात होते. चितेवर राजपुत्र निजला. अग्नी देण्यात आला. गहरी पेटली चिता. राजपुत्र जणू शांत झोपला होता. त्याच्या

देहाची राख त्याच्या घरी पाठवण्यात आली. रात्रीच्या वेळेस तो एक भाऊ ती राख घेऊन बाहेर पडला. तो सर्प बनला. राखेचे भांडे तोंडात धरून तो पाताळात गेला.

त्याने शेषाला सारा वृत्तांत निवेदिला, ''महाराज, या राखेवर शिंपडायला अमृताचे चार बिंदू द्या.''

''हा साप तुझ्याबरोबर अमृतबिंदू घेऊन पृथ्वीपर्यंत येईल.'' शेष म्हणाला.

एक सर्प या सर्पाबरोबर निघाला. दोघे पृथ्वीवर आले. पाताळातील सर्पाने राखेवर अमृत शिंपले नि तो निघून गेला. राखेतून राजपुत्र उभा राहिला. जवळ भाऊही होता. तो म्हणाला, ''दादा, जा व राजाला सांग की, त्यांच्या वडिलांना स्वर्गात करमत नाही. खुशमस्कऱ्याची आठवण येते. त्याला लवकर पाठवून द्या.''

राजपुत्र परत आलेला पाहून सारे आश्चर्यचकित झाले. राजवाड्यासमोर ही गर्दी.राजपुत्राने राजाला त्याच्या वडिलांचा निरोप सांगितला. राजाने खुशमस्कऱ्यास बोलावले व सांगितले, ''अरे, माझे बाबा तुझी आठवण काढीत आहेत. जा तू त्यांच्याकडे.''

''मी कसा जाऊ?''

''या राजपुत्राला पाठविले त्याच मार्गाने तूही जा.''

लोकांनी टाळ्या पिटल्या. दुष्टाची बरी जिरली, कोणी म्हणाले. राजपुत्र लगबगीने आपल्या राजवाड्यात आला व भावंडांना म्हणाला, ''हा राजा लहरी दिसतो, वेडपट दिसतो. येथे राहण्यात अर्थ नाही. चला आपण जाऊ.'' रात्री चौघे भावंडे निघाली. रात्रभर चालत होती. बरोबर फराळाचे होते. सकाळी प्रातर्विधी करून सर्वांनी फराळ केला. ती पुन्हा चालू लागली. तो एक भाऊ म्हणाला, ''दादा, मला निरोप दे. मी जातो.''

''मला कंटाळलास?''

''दादा, मी साप होतो. तुम्ही माझी भूक शमवण्यासाठी मांडीचा तुकडा कापून फेकलात. तुमचे उपकार फेडावे म्हणून तुमचा काही दिवस मी भाऊ झालो. आम्ही सापही केलेले उपकार स्मरतो. येतो दादा, सुखी व्हा.'' असे म्हणून तो भाऊ साप होऊन फण् करीत निघून गेला.

थोड्या अंतरावर दुसरा भाऊ म्हणाला, ''दादा, मलाही निरोप दे.''

''का रे जातोस?''



श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

''दादा, मी तो बेडूक. सापाला मांडीचा तुकडा कापून देऊन माझे प्राण तुम्ही वाचविलेत. तुमचे उपकार फेडण्यासाठी मी तुमचा भाऊ बनलो. आम्ही य:कश्चित बेडूक; परंतु केलेले उपकार आम्ही स्मरतो.'' असे म्हणून तो भाऊ बेडूक बनला व टुणटुण उड्या मारीत निघून गेला.

पुन्हा थोड्या अंतरावर बहीण म्हणाली, ''दादा, मलाही निरोप दे.''

''तूही चाललीस?''

''होय दादा, पाडसे वाट पाहात असतील. मी ती हरिणी. तू माझ्यावर बाण सोडणार होतास; परंतु तुझे मातृप्रेम जागे झाले. तू मला मारले नाहीस. तुझे उपकार फेडायला मी हरिणी झाले. आता जाते, सुखी हो, असाच दयाळू मायाळू हो.''

बहीण हरिणी बनून कृतज्ञतेने मधून मधून मागे बघत वाऱ्याप्रमाणे पाडसाकडे पळत गेली.

राजपुत्र आता एकटाच राहिला. विचार करीत तो निघाला. पशुपक्ष्यांतही केवढी कृतज्ञताबुद्धी असे त्याच्या मनात येत होते. मग माणसाने किती चांगले वागले पाहिजे असा विचार त्याच्या मनात आला आणि या विचारात तो आपल्या घरी आला. पहाटेची वेळ होती.

मुलगा गेल्यापासून राणीला झोप येत नसे. ती गच्चीत उभी होती, देवाला प्रार्थीत होती.

''कोण आहे?'' पहारेकऱ्यांनी दरडावले.

''मी राजपुत्र.''

''माझा बाळ, माझा बाळ.'' म्हणत राणी धावतच खाली आली. तिने राजपुत्राला हृदयाशी धरले. राजाही आला. पुत्र पित्याच्या पाया पडला.

''शहाणा होऊन आलास?'' राजाने विचारले.

''होय तात.'' तो नम्रतेने म्हणाला.

राजाने राजपुत्राला गादीवर बसविले. त्याचे लग्नही करून दिले. राजाराणी मुलाला व सुनेला आशीर्वाद देऊन तपश्चर्येसाठी वनात निघून गेली. नवीन राजाराणी उत्कृष्ट राज्यकारभार चालवू लागली. सारी प्रजा सुखी झाली. तुम्ही आम्हीही होऊया.

गोष्ट आमची संपली. शेरभर साखर वाटली.

✦✦✦

# अद्‌भुत खानावळवाला

''आज या गावात कसली आहे सभा? कोणाची पुण्यतिथी?''

एका नवशिक्याने एकाला विचारले.

''रामा खानावळवाल्याची.''

''खानावळवाल्याची पुण्यतिथी? उद्या एखाद्या हॉटेलवाल्याचीही कराल?''

''मग त्यात काय बिघडले? प्रत्येक क्षेत्रातील साधुसंत आज देशाला हवे आहेत. हॉटेलवाला जर आदर्श हॉटेल चालवील, सेवेच्या भावनेने चालवील तर तोही का सत्पुरुष नाही?''

''रामा खानावळवाला का संत होता, साधू होता?''

''तुम्हाला आश्चर्य वाटते? आपल्याकडे साधुसंत निरनिराळी कामे का करीत नसत? सेना न्हावी डोई करण्याचे काम करी, सावता माळी भाजीपाला करी, गोरा कुंभार मडकी भाजी, जनाबाई दळी, कबीर विणी. आपापली कामे करून सारे मुक्त झाले.''

''तुमच्या रामा खानावळवाल्याची सांगा तरी हकिकत.''

''रामा आईबापांचा एकुलता एक मुलगा. मागे ती मानमोडीची साथ आली होती–''

''म्हणजे इन्फ्लूएंझा ना? १९१८ साल. अहो, हिंदुस्थानात ६० लाख माणसे मेली त्या साथीत ! मुंबईला रोजचा मरणाचा आकडा हजार हजार लागायचा.

''३० वर्षे झाली त्या गोष्टीला. रामाचे आईबाप त्या साथीत देवाघरी गेले. रामा निराधार झाला. आईबाप मेले तेव्हा इंग्रजी शाळेत शिकत होता; परंतु आता कसे व्हायचे शिक्षण? आणि फार बुद्धिमानही नव्हता. त्याला कोणी सांगितले की, ''रामा

या गावात चांगलीशी खानावळ नाही. तू घाल खानावळ.'' काही विद्यार्थ्यांनीही त्याच्या खानावळीत जायचे कबूल केले. काही शिक्षकांनी व त्याचा वडिलांच्या काही मित्रांनी त्याला थोडे भांडवल दिले. रामाने सामान आणले. भांडी घेतली, पाट घेतले. पहिल्याने त्याला पाच गिऱ्हाईके मिळाली. रामाच स्वयंपाक करी, रामाच वाढी. स्वच्छ पाट मांडलेले, स्वच्छ ताटे आणि पाणी पिण्याची भांडी आरशासारखी असत. रामा सारे शास्त्रीय पद्धतीने करायचा. लिंबाची फोड असायची. कच्चा कोबी, टमाटो, काकडी, बीट यांची कोशिंबीर असायची. ताक असायचे छान. त्याच्या खानावळीत आहारासंबंधी तक्ते लावलेले असायचे आणि तेथे वृत्तपत्रे असत. लहानसे ग्रंथालयही होते. निवडक पुस्तके त्यात होती. येणारी पुस्तकेही चाळीत बसत. शाळेतील परगावचे विद्यार्थी हे रामाचे मुख्य गिऱ्हाईक. त्याची शक्ती मर्यादित होती. त्याने मेंबर फार वाढविले नाहीत. सर्वांची काळजी कशी घेता येईल? शाळेला सुटी लागली व मुले घरी जाऊ लागली की, रामा रडू लागायचा. तो त्यांना पोहोचवायला जायचा. म्हणायचा, ''आता माझे देव केव्हा यायचे परत?'' मुलांना घरचे अन्नही आवडायचे नाही. सुटीत घरी आईला मुलगा म्हणायचा, ''रामाच्या हातच्या जेवणात आई काही विशेष आहे खरे.'' केव्हा जाऊ व रामाच्या हातचे खाऊ असे मुलांना व्हायचे.

एकदा एक चमत्कार झाला. एक व्यापारी आला होता. त्याला कोणी सांगितले की, रामाच्या खानावळीत जा. व्यापारी रामाच्या खानावळीत आला. फारसे पाहुणेरावळे खानावळीत येत नसत, परंतु रामा म्हणाला, ''सर्वांची जेवणे होऊन गेली परंतु तुम्हाला माहीत नसावे! आलात, बसा. दूरदेशचे दिसता. बसा हां. ताजे जेवण पटकन करतो.'' ते शेटजी तेथे वाचीत बसले. रामाने सुरेख स्वयंपाक केला. त्याचे गडी कामे आटपून पडले होते. रामाने त्यांना उठवले नाही, परंतु आवाजाने ते उठले. रामा म्हणाला, ''निजा तुम्ही. दमलात सकाळपासून.'' शेटजी जेवायला बसले तो काय आश्चर्य? एकेक घास घेत तो त्यांना काही अपूर्व वाटे. आपल्या शरीरातील अणुरेणू बदलत आहे असे त्यांना वाटले. त्यांच्या देहालाच पौष्टिक आहार मिळत होत असे नव्हे तर मनोबुद्धीसही जणू खाद्य मिळत होते. जेवण झाले. त्या व्यापाऱ्याच्या तोंडावर निराळेच तेज दिसू लागले. ''किती पैसे?'' त्याने विचारले. ''दर तेथे लिहिलेला आहे.'' रामा म्हणाला. व्यापाऱ्याने दहाची नोट दिली. ''जो दर आहे

तेवढेच पैसे द्या.'' ''घ्या हे दहा रुपये. पुस्तके आणा. तुमच्या वाचनालयाला देणगी समजा. तुम्ही मला आज असे भोजन दिले आहे की, ज्याची किंमत करता येणार नाही.''

रामा काय बोलणार? व्यापारी गेला; परंतु तो व्यापारी खानावळ विसरला नाही. तो आपल्या गावी गेला. तो पूर्वी घरी नीट वागत नसे. पत्नीला मारहाणही करायचा. जरा बाहेरख्याली होता; परंतु घरी गेला व पत्नीच्या पाया पडला. तिला आश्चर्य वाटले. ''मी अपराधी आहे. क्षमा कर. एका खानावळीत जेवलो. तेथे जेवत असताना मी जणू निराळा होत होतो. जणू जीवनातील वाईट जात होते. मंगल येत होते. मला सांगता येत नाही काय ते!'' ''तो खानावळवाला का देव होता?'' ''रामाची खानावळ म्हणतात त्याला. किती मनापासून वाढले त्याने ! म्हणायचा. 'देवा, प्रसन्नपणे जेवा. पोटभर जेवा. तुम्ही येणार माझ्या गरिबाच्या खानावळीत!' त्याच्या शब्दांत जणू अमृत होते.'' व्यापाऱ्याच्या बायकोने रामाच्या खानावळीला हजार रुपयांचा एक चेक पाठवला. माझ्या पतीचे प्रेम मला तुम्ही परत दिलेत म्हणून ही अल्प देणगी असे तिने लिहिले होते. पैशांचे काय करायचे? रामाने दोन खोल्या बांधल्या. गरीब विद्यार्थी तेथे राहात.

''एकेक आश्चर्य तुम्ही सांगता आहात. कादंबरी तरी नव्हे?''

''कधी कधी सत्य कादंबरीपेक्षा अद्भुत असते. प्रत्येकाचे जीवन म्हणजे कादंबरीच आहे. पाहायला डोळे हवेत. रामाच्या कितीतरी गोष्टी आसपास पसरल्या आहेत. अहो, एक मुलगा होता. मास्तर त्याला थट्टेने म्हणाले, ''रामाच्या खानावळीत तरी जेवायला जात जा. बुद्धी येईल.'' तो मुलगा खरेच रामाच्या खानावळीत येऊ लागला जेवायला आणि किती वाचले तरी त्याच्या लक्षात राहायचे नाही अशा त्या विद्यार्थ्याच्या आता लक्षात राहू लागले. त्याच्या मनाची एकाग्रता होऊ लागली. शिक्षकांना आश्चर्य वाटले आणि एका मुलाचे वडील काही केल्या बरे होत नव्हते. तो त्यांना आमच्या गावी घेऊन आला. रामाने विद्यार्थ्यांसाठी ज्या खोल्या बांधल्या तेथे त्या वडिलांना रामाने जागा दिली. रामा त्यांच्यासाठी निराळा स्वयंपाक करी. त्यांची शुश्रूषा करी. त्यांना काही वाचून दाखवी. जणू रामा नकळत निसर्गोपचार-कुशल होता. मानसशास्त्र कुशल होता. त्याची प्रेमशक्ती अपूर्व होती. प्रेमामध्ये अनंत शक्ती आहे असे म्हणतात ते खरे आहे.

''दिवसेंदिवस रामा आपल्या साधनेत अधिकच तन्मय झाला. जेवायला मुले आली की, हात जोडायचा व म्हणायचा, 'या देवरूपांनो, या भारतमातेच्या लाडक्यांनो, या आत्मरूपांनो, या निष्पापांनो!' तो कधी कधी वाढायचे विसरायचा. मुले म्हणायची, 'रामा, भाकरी वाढ व मग डोळे मिटून उभा राहा.'' सुटीत मुले गेली की, रामा खिन्न होई. वाट पाहात असायचा मुले केव्हा येतील म्हणून. आणि पाच वर्षांपूर्वीची गोष्ट. उन्हाळ्याची सुट्टी संपून शाळा पुन्हा गजबजल्या. काही नवी व काही जुनी मुले रामाच्या खानावळीत आली. त्याच्या खानावळीत प्रवेश मिळावा म्हणून मुलांची धडपड असे. रामाच्या खानावळीत जेवणारा आजारी पडत नाही, नापास होत नाही, अशा दंतकथा गावोगावी पसरल्या होत्या. 'या लाडक्यांनो, या.' मुलांना पाहून रामा उचंबळून म्हणाला आणि त्याने खरोखरीच त्यांच्या पुढे लोटांगण घातले. 'रामा, पुरे नमस्कार. ऊठ आता. ही नवीन मुले आली आहेत.' एक जुना मुलगा म्हणाला, परंतु रामा उठेना. हालचाल नाही. मुले घाबरली. त्यांनी डॉक्टरांस आणले. 'रामाने राम म्हटला.' डॉक्टर म्हणाले. ती मुले रामाभोवती अश्रू ढाळीत बसली. रामा मुक्त होऊन गेला.''

''त्याची का आज पुण्यतिथी? त्याची खानावळ आता कोण चालवितो?''

''त्याचाच एक मित्र चालवीत आहे; परंतु सारेच रामासारखे कसे होणार? आपल्या देशाला आज रामा हवे आहेत. जनता म्हणजेच जनार्दन समजून कामे करणारे. मग म्युनिसिपल कारभार सुधारेल. मग काळे बाजार बंद होतील. मग आगगाड्या, आगबोटी स्वच्छ राहतील. जो तो एकमेकांस देव समजून वागला तर जीवनात केवढी गोडी येईल! स्पृश्यास्पृश्य, हिंदूमुसलमान, मालकमजूर या नाना भेदांत अभेद होऊन सामंजस्य निर्माण होईल, परंतु खरा धर्म हवा आहे. असो.

''साऱ्या गावभर ती बातमी गेली. शाळेला सुट्टी मिळाली. विद्यार्थी आले, शिक्षक आले. वकील आले. व्यापारी आले. श्रीमंत आले. तो साधा खानावळवाला, परंतु त्या गावची आध्यात्मिक संपत्ती होता. त्याची खानावळ म्हणजे सेवेचे महान व्रत होते. जो कोणी जेवायला येई तो प्रभूची मूर्ती या भावनेने राम पाही. त्याला तो वाईट जेवण कसे देणार? तांदूळ पुन्हा पुन्हा निवडी. एक भातकण नसे. एक दगड नसे. जीवनसत्त्वे ज्यात आहेत त्या भाज्या आणायचा, त्या कोशिंबिरी करायचा.

कोंड्यासकट खावे म्हणून व्याख्यान द्यायचा. पटवायचा. सारे स्वच्छ. रागाचा शब्द नाही, अपमान कोणाचा नाही.''

''चला, तुमच्याबरोबर मीही येतो सभेला.'' नवशिका म्हणाला.

''सारे खानावळवाले, सारे हॉटेलवाले आज मिरवणूक काढतील. आपण मिरवणुकीत सामील होऊन सभास्थानी जाऊ.''

''ठीक तर.''

तो नवशिका त्या माणसाबरोबर मिरवणुकीत सामील झाला. मिरवणूक सभास्थानी आली. रामा खानावळवाल्याची सुंदर तसबीर तेथे होती. पुष्पहारांनी ती मांडीत होती. सभेत भाषणे झाली. अनेकांनी रामा खानावळवाल्याच्या आठवणी सांगितल्या. त्याच्या जयजयकारात सभा संपली. रामाच्या तसबिरीला प्रणाम करून तो नवशिका नवीन दृष्टी घेऊन निघून गेला.

✦✦✦

# आत्म्याची हाक

प्रभाकरने आपल्यापुढे करियरिस्ट होण्याचे ध्येय ठेवले नव्हते. त्याचे नाव यामुळे पहिल्या दहा किंवा पाचात कधी झळकले नव्हते; परंतु हायस्कूलपासून तो एक आनंदी परंतु तत्त्वनिष्ठ मुलगा म्हणून सर्वांना ठाऊक होता. देशप्रेम, समाजसुधारणेविषयी आस्था आणि समाजातील अन्याय, विषमता यामुळे त्याचे रक्त उसळे.

यामुळेच तो विद्यार्थी जीवनातही अनेक चळवळींत भाग घेत असे. त्याच्या वक्तृत्वात आणि लेखनात एक प्रकारची धार असे. कॉलेजात गेल्यावर त्याला थोडे व्यापक क्षेत्र मिळाले. त्याच्या बहुमुखी प्रतिभेला मोठे क्षेत्र मिळाले. कॉलेजच्या आवाराबाहेरही प्रभाकर दिसू लागला. वृत्तपत्रांतून त्याचे लेख मधून मधून झळकू लागले. त्याला सर्वांत चीड कसली असेल तर सर्वत्र बोकाळलेल्या दांभिकतेची. धर्मात, राजकारणात, एवढेच नव्हे तर शिक्षण क्षेत्रातही दांभिकता पाहून त्याला वाईट वाटे आणि त्याचा आत्मा बंड करून उठे. समाजाच्या दु:खाचे सर्वांत मूळ कारण म्हणजे दांभिकता असे तो म्हणे आणि समाजाला जर थोडे अधिक सुख मिळवून द्यावयाचे असेल तर ही दांभिकतेची प्रतिष्ठा समाजातून नाहीशी केली पाहिजे असे त्याचे म्हणणे. त्याच्या या नवविचाराने तो कोठल्याच चौकटीत बसत नव्हता.

आपली कॉलेजची चार वर्षे त्याने पुरी केली. घरची गरिबी होती. प्रभाकरची चार वर्षे कधी पूर्ण होतात याकडे त्याचे वडील डोळे लावून होते. प्रभाकर परीक्षा देऊन घरी आला. वडिलांच्या त्याच्याबद्दल मोठमोठ्या अपेक्षा होत्या. तो मोठा पगारदार अधिकारी होईल असे त्यांना वाटे. तो परत आला आणि त्यांनी त्याच्यामागे नोकरीचे टुमणे लावले. निकाल लागेपर्यंत थांबायलाही ते तयार नव्हते. त्यांच्या आग्रहाला कंटाळून मग प्रभाकर एखाद दुसरा अर्ज रोज पाठवी. अर्ज पाठविताना त्याच्या मनाला

वेदना होत. आपण कॉलेजात समजत होतो तितका जीवन-संग्राम सोपा नाही हे त्याला दिसले. अर्ज करता करता त्याचा रिझल्ट लागला. तो पास झाला; परंतु त्याच्या अर्जाला समाधानकारक उत्तर कोठेच नव्हते. त्याच्याबरोबर मॅट्रिकला बसलेली मुले कुठे कुठे चिकटली होती. वरच्या जागा काहींना मिळाल्या होत्या. काहींनी मायाही बरीच जमा केली होती. प्रभाकरच्या वडिलांच्यासमोर ही दृश्ये दिसत.

प्रभाकरच्या निकालाच्याच दिवशी वर्तमानपत्रात एक जाहिरात होती. संपादकाच्या जागेसाठी अर्ज मागविले होते. 'नवसमाज' मासिक निघायचे होते. संपादकाला तीनशे रुपये पगार मिळायचा होता. प्रभाकरने अर्ज केला. त्याच्या डोळ्यांसमोर 'नवसमाज'चे आपण संपादक झाल्याची दृश्ये तरळू लागली; परंतु मनात वाटे, 'माझ्यापेक्षा कितीतरी अनुभवी लोकांचे अर्ज येतील. तीनशे रुपये पगार म्हणजे मामुली गोष्ट नव्हे. कसची आपल्याला ती जागा मिळते.' आणि जेव्हा पंधरा दिवस वाट पाहून उत्तर आले नाही तेव्हा तर तो निराशच झाला. पुन्हा दुसऱ्या जाहिराती शोधू लागला.

पण इतक्यात एक तारवाला आला. 'नवसमाज'चे मालक दीनदयालजी यांची तार होती आणि प्रभाकरला भेटीसाठी पाचारण केले होते. प्रभाकर लगेच निघाला. जाताना गाडीत त्याने 'नवसमाज' कसे सजवायचे, कोणती सदरे द्यायची, याचा आराखडा तयार केला. सहज एका कागदावर त्याने लिहिले, प्रभाकर भारती, बी. ए., संपादक- नवसमाज. तो कागद हातात खेळवीत होता, पण मग लाज वाटली. अजून कशाचा पत्ता नाही. जर कोणी आपल्याला पाहिले तर काय म्हणेल! त्याने तो कागद लगेच खिशात कोंबला.

त्याचे उतरायचे स्टेशन आले. दीनदयालजींचा मनुष्य स्टेशनवर आला होताच. प्रभाकरला त्याने लगेच हुडकून काढले. घरी जाताच दीनदयालजींची मुलाखत झाली. म्हणाले, ''तुमचा स्पष्टवक्तेपणा मला आवडला. इतरांनी अर्जात समाजसेवेची इच्छा आहे वगैरे हजार भानगडी लिहिल्या पण तुम्ही स्पष्ट लिहिले की, मला नोकरीची गरज आहे. समाजसेवा नोकरी करताना करता आली तर हवी आहे. तुमची कात्रणे पाहिली. चांगले लिहिता तुम्ही. तुमच्या लेखणीत जोश आहे.''

''तसे काही नाही. आपली कृपा आहे.''

"मी उगाच स्तुती नाही करीत. तुम्हीच नवसमाज सांभाळा. पहिला अंक कधी काढायचा? आज आहे जुलैची पहिली तारीख."

"१५ ऑगस्टला काढू. स्वातंत्र्यदिनापासून 'नवसमाज' सुरू होऊ दे."

"ठीक, पण जमेल एवढ्यात?"

प्रभाकरची निवड झाली. प्रभाकर कंबर बांधून कामाला लागला. १५ ऑगस्टला नवसमाजचा पहिला अंक निघाला आणि वाचकांच्या नुसत्या उड्या पडल्या त्याच्यावर. लेख, गोष्टी, कविता उच्च प्रकारच्या आणि मुखपृष्ठ सुरेख आणि अंतरंगाची कल्पना देणारे होते. वृत्तपत्रातून उत्कृष्ट अभिप्राय आले. एकजात सर्वांनी 'नवसमाज'ची पाठ थोपटली होती. दीनदयालजीही खूश होते. अंक एकापेक्षा एक सरस निघत होते.

सात-आठ अंक निघाले असतील नसतील. गावात नगरपालिकेच्या निवडणुकीची धामधूम सुरू झाली. दीनदयालजी उभे राहिले. त्यांच्याविरुद्ध एक पेन्शनर हेडमास्तर उभे होते. हे हेडमास्तर फार लोकप्रिय होते. समाजसेवेच्या प्रत्येक क्षेत्रात अग्रभागी असत. गावातले कुठलेही सेवाकार्य असो तेथे ते असायचेच.

आणि एक दिवस निवडणुकीनिमित्त सभा झाली. म्युनिसिपल निवडणूक हा विषय होता. प्रभाकर बोलणार होता. लोकांची अफाट गर्दी झाली. प्रभाकरचे प्रवाही आणि प्रभावी भाषण सुरू झाले. कॉलेजमधला दांभिकतेविरुद्धचा सारा जोश त्याच्या अंगात संचारला. म्हणाला, "नगरपालिका सुधारल्यावाचून स्वराज्य झोपड्यांपर्यंत पोहोचणार नाही. सर्व लोभ, भये सोडून त्यागी समाजसेवकांना निवडून देण्याची हिम्मत मतदारांनी बाळगल्यावाचून नगरपालिका कशा सुधारणार? उद्याच्या निवडणुकीत सर्व मतदारांनी दाखविले पाहिजे की, खरे खोटे तुम्ही ओळखता. आपला हितकर्ता कोण ते तुम्हाला समजते. तुम्ही मते कोणाला देणार? तुमच्या सेवेसाठी अखंड तळमळणाऱ्या या हेडमास्तरांना ज्यांनी लोकशिक्षणाचे कार्य सतत तीस वर्षे केले आहे त्यांना की, केवळ पैसा आहे म्हणून नगरपालिकेचे राजकारण करू पाहणाऱ्या दीनदयालजींना?"

प्रभाकरच्या वक्तृत्वाचा परिणाम जनतेवर झाला आणि दीनदयालजींवरही. दुसऱ्या दिवशी दीनदयालजींनी त्याला बोलाविले व सभेतील भाषणाविषयी विचारले.

ते म्हणाले, ''मी तुमचे काय घोडे मारले होते माझ्याविरुद्ध प्रचार केलात!''

''मी नोकरी पत्करली म्हणजे माझी मते विकलीत असे नाही. मला जे खरे वाटेल ते बोलण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे.''

एवढे बोलून तो तडक घरी आला आणि त्याने राजीनामा पाठवून दिला. तसे न करण्याबद्दल त्याला अनेकांनी सल्ला दिला. हेडमास्तर तर म्हणाले, ''मी आपले नावच मागे घेतो.'' पण प्रभाकरने निश्चय पार पाडला. ज्या स्पष्टवक्तेपणामुळे तो संपादक झाला त्यामुळेच त्याला नोकरी सोडावी लागली.

निवडणुका झाल्या. शेटजींना विजयाची खात्री वाटत होती. आपल्या पैशाचा पुढे पुढे करणाऱ्यांचा त्यांना फार भरवसा होता, पण निवडणुकीत हेडमास्तर निवडून आले. इकडे प्रभाकर राजीनामा देऊन बाहेर पडला. त्याला त्याच्याजोगती नोकरी मिळाली नाही. शेवटी तो आपल्या गावी आला. एक छोटेसे दुकान त्याने घातले, पण व्यापारी कौशल्य त्याच्यात नव्हते. दुकानातून घरखर्च चालत नसे. शेतीवाडीतही प्रभाकर लक्ष घाली. त्याचे जीवन कसेतरी चालले होते. लोक त्याच्याबद्दल हळहळत होते.

आणि एक दिवस त्याच्या त्या खेड्यातल्या दुकानापुढे एक मोटार उभी राहिली. दीनदयालजींनी विचारले, ''कसे काय चालले आहे दुकान?''

प्रभाकरला वाटले, जखमेवर मीठ चोळण्यासाठी हे आले आहेत. चांगले चालले आहे, द्यावे दडपून असा विचारही डोकावून गेला, पण त्याने स्वतःला सावरले. म्हणाला, ''कसातरी संसार रेटतो आहे.''

दीनदयालजींनी प्रभाकरला मिठी मारली. ते म्हणाले, ''जीवनाशी खरा प्रामाणिक आहेस. 'नवसमाज' तुझ्यावाचून पोरका आहे. आजही उत्तम साहित्य त्यात आहे, पण ते तेज आज तेथे नाही, आत्मा तेथे नाही. तूच 'नवसमाज' सांभाळ. आत्म्याची हाक ऐकणारा प्रामाणिक, निर्भय मनुष्य तू आहेस. 'नवसमाज' चालवायला तूच लायक. माझी चूक झाली. तुझी आत्म्याची हाक दडपून टाकायला मी चुकीने सांगत होतो. तू आपल्या आत्म्याच्या हाकेचा अपमान केला नाहीस. 'नवसमाजा'ला तू लायक आहेस. माझ्या विनंतीचा अव्हेर करू नकोस.''

दुसऱ्या महिन्यापासून पुन्हा प्रभाकरच्या संपादकत्वाखाली 'नवसमाज' निघू लागला.

+++



श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

# नवी दृष्टी

"आनंदराव, तुम्ही निवडणुकीला उभे राहाच. आम्ही तुमच्यासाठी हिंडू फिरू, आमचे टांगे देऊ, बैलगाड्या देऊ. तुम्हाला निवडून आणू. नाही म्हणू नका. माघार घेऊ नका." रघुनाथराव म्हणाले.

"परंतु दौलतरावही उभा राहात आहे. आम्ही दोघे मित्र. कोणीतरी एकाने बसले पाहिजे." आनंदराव म्हणाले.

"तुम्हीच काय म्हणून माघार घ्यायची? हा दौलत्या अलिकडे जरा शिरजोरच झाला आहे. तुमच्यासाठी त्याने बसले पाहिजे. तुमचे केवढे घराणे, केवढा तुमचा तेगार!" धोंडिबाने भर दिली.

आनंदरावांच्या दिवाणखान्यात मंडळी बसली होती. पानसुपारीचे तबक होते. त्यात सिगारेटची पेटीही होती. नोकराने चहा आणून ठेवला. मंडळी पीत होती. चर्चा चालू होती. जिल्हा बोर्डाची निवडणूक. तशी महत्त्वाची नव्हती; परंतु गावातील निरनिराळे गट दौलतराव नि आनंदराव यांना चढवीत होते.

आनंदराव नि दौलतराव दोघे मित्र. दौलती लहानपणी गरीब होता, परंतु तो अति मेहनती नि कष्टाळू. पैसे शिल्लक टाकून त्याने बिघा दोन बिघे वावर विकत घेतले आणि केळीचा मळा केला. दौलती नि त्याची बायको दोघे कामाला वाघ. पहाटे उठून दौलती मोट चालवायचा. पुन्हा सकाळी दुसरीकडे कामाला जायचा. लढाईच्या काळात केळ्यांना फारच भाव. दौलतीने बरीच माया जमवली. त्याने सुरेखसे घर बांधले. मोठ्या मुलास तिकडे दूर बोर्डिंगात शिकायला ठेवले. गावात त्याला मान मिळू लागला. आनंदराव जन्मजात श्रीमंत, मोठी इस्टेट, जमीनजुमला भरपूर. या दोघांच्या प्रेमामुळे गावात एकी होती. दौलतराव गरिबांचा वाली, आनंदराव बड्या

लोकांचा प्रतिनिधी; परंतु हे दोघे मित्र. त्यामुळे गावात बेदिली माजली नाही. गावात सुधारणा आली. गावकऱ्यांनी रस्ते सुधारले. गटारे बांधली. गावातील तळे स्वच्छ केले. गावाभोवती नवीन वनराई उभी केली. गावात आनंद होता. रामनवमीला उत्सव व्हायचा. नाटक व्हायचे. नाटकात आनंदराव, दौलती हेही कामे करायचे. आनंदरावांचा मुलगा जयंता आणि दौलतीचा मुलगा रवी. दोघे मित्र. शाळेत एके ठायी बसत. एकमेकांना विसंबत नसत. गावच्या नदीत दोघे डुंबायचे, वनराईत झाडांवर चढायचे. कधी रवी पावा वाजवी तर जयंत गाणे म्हणे. कधी रवी नाचे तर जयंता ताल धरी. दोघे आता तिकडे छात्रालयात शिकत होते. त्यांची मैत्री पाहून सर्वांना कौतुक वाटे.

निवडणुकीचे अर्ज दिले गेले. दौलतीने नाव मागे घेतले नाही. आनंदरावाने नाही. बाहेरची दडपणे होती. गरिबांचा पक्ष, श्रीमंतांचा पक्ष असे प्रकार होते. गरिबांच्या पक्षाचे पुढारी येऊन दौलतीस म्हणाले, ''हा तत्त्वाचा प्रश्न आहे. व्यक्तिगत मैत्रीचा नाही. गरिबांची बाजू घेऊन तुम्ही उभे राहिले पाहिजे. गरिबांविषयी आनंदरावांना आस्था असेल तर त्यांनी खाली बसावे. त्यांनी आमच्या पक्षाच्या वतीने उभे राहावे. आम्ही त्याला तयार आहोत.''

''परंतु त्याला ते तयार नाहीत.'' एकजण म्हणाला.

आणि निवडणूक जवळ आली. प्रचार सुरू झाला. दोघांचे प्रचारक वाटेल ते बोलू लागले. एकदा निवडणूक म्हटली की मर्यादा राहात नाही. दारू, तमाशे, पैसे सर्व गोष्टी सुरू झाल्या.

आणि दौलतीचा विजय झाला. आनंदराव पडले. दौलतीची मिरवणूक काढण्यात आली. आनंदरावांच्या वाड्याजवळ आली. दौलतराव उतरून आनंदरावांना भेटायला गेला.

''मी म्हणजे तुम्हीच समजा.'' म्हणाला.

''मग मला का नाही उभे राहू दिले?''

''तुम्ही या पक्षाच्या वतीने उभे राहिला असता तर मी कशाला उभा राहिलो असतो? परंतु तुम्ही धनिकशाहीचे प्रतिनिधी व्हायचे ठरवलेत. जाऊ दे. आपण मैत्री नाही विसरता कामा.''

दौलतीची मिरवणूक पुन्हा सुरू झाली; परंतु एक सूं करीत दगड आला. दौलतीला लागला. मारामारीच व्हायची. दौलतीचा मुलगा रवी, याने मारामार टाळली.

"रवी, तू आज मोठे काम केलेस." दौलती घरी म्हणाला.

"ही सेवा दलाची शिकवण." तो म्हणाला.

जयंता तिकडे छात्रालयात होता. बाप निवडणुकीत पडला म्हणून तो घरी गेला नव्हता. रवी पुन्हा छात्रालयात आला; परंतु जयंता त्याच्याजवळ बोलेना. रवी दोनतीनदा त्याच्या खोलीत गेला; परंतु तो येताच जयंता उठून जाई. एकदा तर म्हणाला, "तुझ्या वडिलांनी माझ्या वडिलांचा पाणउतारा केला. मी हे कसे सहन करू? येत जाऊ नकोस माझ्याकडे." आणि रवी जाईनासा झाला.

उन्हाळ्याचे दिवस आले. गावात तापाची साथ आली. जयंता आजारी पडला. छात्रालयात त्याची काळजी घेतली जात होती. पुढे त्याच्या घरी कळवण्यात आले. आनंदराव आले. जयंताची आई आली. ती पाहा खोली. त्या खोलीत जयंता निपचित पडून आहे. आईबाप आहेत. पहाटेची वेळ होती. रवी त्या खोलीच्या दाराजवळ येऊन उभा होता. हातात सुंदर गुलाबाचे फूल होते. जयंताच्या अंथरुणाजवळ आरामखुर्चीत पिता पडून होता. रवी हळूच आत गेला. ते फूल उशीजवळ ठेवून तो गेला.

सकाळ झाली. जयंताने डोळे उघडले. तो तेथे सुंदर फूल.

"कोणी दिले फूल बाबा?"

"येथे होते खरे. नीज. बोलू नको."

जयंता ते फूल हातात घेऊन पडून राहिला.

रात्रीची दोनची वेळ होती. जयंताचे वडील डॉक्टरला बोलवायला जात होते. जयंता वातात होता. तो त्यांना तेथे व्हरांड्यात अंधारात कोणी दिसले.

"कोण आहे येथे बसलेले?"

"मी रवी."

"काय करतोस रे अंधारात?"

"माझे आयुष्य जयंताला मिळावे म्हणून मी प्रार्थना करीत आहे. रोज करतो. का नाही ऐकत देव?"

"तूच का ते फूल आणून ठेवले होतेस?"

"हो."

"तू दौलतीचा मुलगा?"

"हो."

"तुझे जयंतावर प्रेम आहे."

"असे का विचारता?"

"दौलती नि मी तर एकमेकांचे तोंड पाहात नाही."

"तुम्ही मोठी माणसे. आम्ही लहान मुले."

"आज तुझी प्रार्थना देव ऐकेल."

"बरा आहे जयंता?"

"ताप वाढला आहे. मी डॉक्टरांकडे जात आहे."

"मीच जातो. तुम्ही त्याच्याजवळ बसा." असे म्हणून रवी पळतच गेला. डॉक्टर आले. तो काय आश्चर्य? जयंताला थोडा घाम येत होता.

"ताप उतरणार." डॉक्टर म्हणाले. काही औषध देऊन डॉक्टर गेले. रवी खोलीच्या बाहेर होता.

"ये रवी, आत ये." आनंदराव म्हणाले.

"जयंता रागवेल." रवी म्हणाला.

"नाही रागवायचा." पिता म्हणाला, परंतु रवी निघून गेला. जयंताला घेऊन आनंदराव घरी गेले. मुलाला बरे वाटत होते; परंतु जयंताचे वर्ष फुकट जाणार होते. त्याला परीक्षेस बसता येत नव्हते.

"वाईट नको वाटून घेऊ बाळ." पिता त्याला समजावी.

"रवी पुढे जाईल. लोक तुमची आणखी फजिती करतील. म्हणतील दौलतीचा मुलगा चालला पुढे." जयंता म्हणाला.

"रवी तुझा मित्र आहे." पिता म्हणाला.

"तुम्ही नि दौलतराव मित्र बनाल तर पुन्हा आम्ही मित्र बनू. तुमच्यासाठी मी रवीला दूर केले. मला त्याची रोज आठवण येते. तापातही तो दिसे."

"तो तुझ्यासाठी प्रार्थना करी. त्यानेच फूल आणून दिले होते."

"तुम्ही सांगितले का नाही?"

‘‘मला वाटले, तुमची मैत्री तुटली. मला वाटले की, तो तुला डोळ्यासमोर आवडत नाही. रवीही तसेच म्हणाला.’’

‘‘वेडा रवी. माझे मन त्याला काय कळे?’’

आनंदराव सायंकाळी एकटेच गावाबाहेरच्या देवळात जात होते. तो त्यांना राईत रवी दिसला.

‘‘काय रे रवी? परीक्षा झाली का? सुटी का लागली?’’ त्यांनी विचारले.

‘‘परीक्षेला मी बसत नाही.’’

‘‘का?’’

‘‘जयंता नि मी एका वर्गात राहू. मी पुढे जाऊ त्याला मागे टाकून? मी घरी आलो निघून.’’

‘‘दौलती रागावला नाही?’’

‘‘नाही. त्यांच्या डोळ्यांत माझे शब्द ऐकून पाणी आले.’’ आनंदराव देवदर्शनास गेले. रवी तेथे पावा वाजवित होता; परंतु आज जयंता कोठे आहे?

‘‘दौलती आहे का घरात?’’ उजाडत येऊन आनंदरावांनी विचारले.

‘‘या बसा.’’ तो म्हणाला.

‘‘आज तुम्ही सारे माझ्याकडे जेवायला या. रवी कुठे आहे?’’

‘‘तो अजून निजला आहे. जयंताला केव्हा भेटेन असे त्याला झाले आहे.’’

‘‘आज ये म्हणावे, पोटभर भेट. जयंताही उत्सुक आहे.’’ आणि रवी आला. दोघे मित्र भेटले, सद्गदित झाले. दोघांचे वडील त्या प्रेमळ दृश्याकडे बघत होते.

‘‘तुम्ही आमचे गुरू.’’ आनंदराव म्हणाले.

‘‘तुम्ही नवदृष्टी देणारे.’’ दौलती म्हणाला.

‘‘आम्ही श्रीमंत-गरीब भेद दूर करू. सहकारी समाजवाद आणू.’’ रवी म्हणाला.

‘‘हो आणू.’’ जयंता म्हणाला.

‘‘कोणी रे तुम्हाला शिकवले?’’

‘‘जगातील आजचे वारे.’’

✦✦✦

# अखेरची मूर्ती

नारायण पिल्ले सत्तर वर्षांचा म्हातारा. त्याच्या चेहऱ्यावर काळाने आपले अस्तित्त्व सुरकुत्यांच्या रूपाने दाखवायला सुरुवात केली होती. यौवनाचे कोणतेही चिन्ह तेथे नव्हते; परंतु त्याच्या हातात अजब कलाकौशल्य होते. साध्या मातीतून तो जी चित्रे तयार करी ती सजीव भासत. त्याच्या हातच्या खेळण्यांची सर्वत्र प्रसिद्धी झाली होती.

मुरुगन नारायण पिल्लेचा मानलेला मुलगा. खराखरा मुलगाही त्याला होता. कृष्ण त्याचे नाव. कृष्ण एक चांगला सुस्वभावी मुलगा होता. आपल्या पित्याच्या हातात असलेले अजब कौशल्य त्याला ठाऊक होते; परंतु त्याचे लक्ष कलेपेक्षा फायद्याकडेच अधिक असे. तो व्यापारी वृत्तीचा होता. तोही खेळणी तयार करी; परंतु ती खेळणी त्याच्या वडिलांच्या खेळण्यांइतकी सजीव नसत वाटत. तेच रंग, तीच माती, परंतु त्याच्या बापाच्या हातची खेळणी हजारांतून लोक हुडकून काढीत.

कृष्णाचा व्यवहारीपणा पाहून म्हाताऱ्याला आनंद नसे होत. त्याला दु:ख वाटे. कलेकडे दुर्लक्ष करून केवळ पैशामागे कृष्णा लागला आहे. जीवन सुखाने चालेल इतके तो मिळवित तर होताच, पण तेवढ्याने म्हाताऱ्याला ना समाधान, ना आनंद. त्याला वाटे ही मातीची खेळणी पैशा दोन पैशात हा विकील, चैनीने राहील, परंतु त्याचे नाव नाही राहणार मागे. कृष्णाचे वयही तीस वर्षांचे. आता कला तो काय आपलीशी करणार? बापाला दु:ख वाटे की, आपल्या कलेची परंपरा चालविणारे कोणी नाही. ही कला आपल्या या पार्थिव देहाबरोबरच नाहीशी होणार की काय याने तो साशंक असे. त्याला गरिबीचे दु:ख नव्हते. दु:ख, कलेची परंपरा नाहीशी होईल याचे होते.

परंतु मुरुगन आला. तो आला तो बागडत नाचतच. म्हणाला, ''नको मला मजुरी की पगार. जेवणखाण द्या, तुमच्या कलेच्या प्रसादाचा मी भुकेला आहे. त्याने

माझे पोट भरेल. तृप्त होईन मी.'' मुरुगनला आल्याला १० वर्षे झाली. या दहा वर्षांत नारायण पिल्लेचे हृदय त्याने जिंकून घेतले. तो त्यांना बाबाजी म्हणे. त्यांची सेवा करी. त्याने बाबाजीचे प्रेम मिळविले. कलेच्या बाबतीतली त्याची निष्ठाही अद्वितीय होती. बाबाजींच्या कुटुंबातल्या इतरांनाही त्याचा लळा लागला. मुरुगन निष्ठेने कला आत्मसात करत होता. कृष्णाला वाटले बरा बिनपगारी नोकर मिळतो आहे. खाण्यापरी इतके जीव तोडून कोण करतो काम? परंतु बाबाजी मुरुगनला प्रेम दाखवू लागले; तोच आपला खरा पुत्र मानू लागले तेव्हा कृष्णाच्या मनात मुरुगनविषयी द्वेष निर्माण झाला. त्याला वाटे हा उपटसुंभ बाहेरून आला आणि आज बाबाजींचे मन जिंकून त्यांचा मुलगा बनून बसला आहे, परंतु मुरुगनच्या हातातील स्फूर्ती अद्वितीय होती. म्हाताऱ्याने नुसते वर्णन करावे नि मुरुगनने त्या मातीतूनं तशीच मूर्ती उभी करून दाखवावी. शिवाय खेळणी करण्याचा त्याचा वेग तरी किती! झटपट त्या मातीतून जणू सजीव मूर्ती उभ्या राहात. त्याचे भावनाशील मन मुरुगनबद्दल प्रक्षोभ दाखवी तर व्यापारी मन म्हणे, इतका स्वस्त, इतका मन लावून काम करणारा, जिव्हाळ्याचा कारागीर तरी कुठे मिळणार!

नवरात्र जवळ आली होती. नवरात्रीची यात्रा सर्वत्र भरते. किसानाजवळ पैसेही चार असतात. या यात्रा म्हणजे नारायण पिल्लेच्या कुटुंबाला पर्वणी. वर्षाची निम्मी कमाई नवरात्र यात्रांतून व्हायची. मुरुगन एखाद्या राक्षसासारखे काम करी. त्यांची खेळणी दूर दूर जात. तिकडे मद्रासपर्यंत त्याचा खप असे. कृष्ण आणि मुरुगन पार्सल करून रोज हजारो खेळणी सर्वत्र पाठवित. एक दिवस दोघे असेच परत येत होते स्टेशनवरून. कृष्ण विचार करीत होता. मुरुगन म्हणजे देवमनुष्य आहे. त्याच्यासारखा कारागीर कोठे मिळणार? मुरुगनच्या सुखाची, आरामाची आपण कधी चिंता केली नाही याचे त्याला वाईट वाटले. मुरुगनचे लग्नाचे वय होते, पण त्याला कधी कोणी याबद्दल विचारले नव्हते. आज त्याने तोच विषय काढायचा ठरविले.

परंतु स्टेशनच्या पायऱ्या ते उतरत होते तोच 'मुरुगा, मुरुगा' करीत एक म्हातारा चांभार पुढे आला. त्याने मुरुगनला मिठी मारली. म्हणाला, ''मुरुगा, किती रे तुला पाहायचे? मला म्हाताऱ्याला सोडून गेलास? इतके दिवस राहवले तरी कसे तुला? तुला किती शोधले मी! घर तुझ्याशिवाय जसे खायला येई, शोध करून करून थकलो. गेल्या वर्षी इथं आलो. बरे झाले भेटलास. चल माझ्याबरोबर.'' कृष्णाच्या लक्षातच

येईना की, प्रकरण आहे तरी काय? काय त्या चांभाराचा नि मुरुगनचा संबंध? कृष्णा त्या म्हाताऱ्यावर खेकसला, ''काय रे थेरड्या, वेडबिड तर नाही ना लागले तुला? या मुरुगनच्या का मागे लागला आहेस?''

''नको हो दादा असे करू. माझ्या या मुलाला, मुरुगनला नका माझ्यापासून नेऊ. त्याच्याविना किती दु:खे काढली मी ही दहा वर्षे!''

त्या म्हाताऱ्याला काय ठाऊक की त्याच्या ह्या प्रेमाने त्याच्या आवडत्या मुलावरच मोठी आपत्ती येणार आहे. क्षणभर कृष्ण दिङ्मूढ आला. मुरुगनविषयी जी कृतज्ञतेची भावना त्याच्या मनात उचल खाऊ पाहात होती; ती कोठल्या कुठे विलुप्त झाली. त्याच्या मनात मुरुगनविषयीचा जो द्वेषाग्नी होता त्याला ही संधी सापडली. मुरुगननेही बापाची ओळख लपविली नाही. त्याने फक्त मौन स्वीकारले.

कृष्णाच्या हाती छत्री होती. त्या छत्रीचा तो मुरुगनवर प्रयोग करू लागला. ''पापी, चांडाळा, चांभारड्या आम्हाला फसवलेस. सारे घर बाटविलेस.''

कृष्णाच्यामधली स्वजातिप्रतिष्ठा, मुरुगनबद्दल वाटणारी ईर्ष्या, त्याच्यामुळे बाबाजींनी त्याचा केलेला अपमान साऱ्यांचा जणू तो सूड उगवित होता. छत्री मोडेपर्यंत त्याने मुरुगनला मारले. मुरुगनची शरीरप्रकृतीही ठीक होती. मनात आणता तर कृष्णालाही त्याने थोडा प्रसाद दिला असता; परंतु त्याने सारे सहन केले.

कृष्णाला खरा सूड मुरुगनचा नव्हता घ्यायचा. त्याचा बाबाजींवर खरा राग होता. त्याच्या मनातला ईर्ष्याग्नी बाबाजींनी मुरुगनचे कौतुक करून आणि कृष्णाला नावे ठेवून जागवला होता. घरी जाऊन त्याने बाबाजींच्या साऱ्या बोलण्याची परतफेड केली. मुरुगनला शिव्या देऊन घेतल्या. त्याच्या प्रेमातला भागीदार मुरुगन आता त्याच्या मार्गातून दूर झाला.

तो म्हातारा चांभार. गरीब बिचारा. स्तिमित होऊन नुसता पाहात राहिला, परंतु कृष्ण गेल्यावर तो मुलाला झोपडीत घेऊन आला.

कृष्णाने पंचायत केली. प्रायश्चित्त करून शुद्ध झाला, परंतु त्याच्या मनात एकच गोष्ट डाचत होती. मुरुगन त्याच्या धंद्यामधला इतके दिवस दुवा होता. आता तो त्याचा दुश्मन झाला होता. त्याचे व्यापारी मन म्हणे, ''बाबाजींची कला तो शिकून गेला आहे. त्याचा उपयोग तो नक्की करील. जर उपयोग त्याने केला तर माझा धंदा कसा चालणार?'' मुरुगन गेल्यापासून स्वत: बाबाजींनी एकही खेळणे केले नव्हते.

सदा ते खिन्न असत. या धक्क्याचा त्यांच्या प्रकृतीवरही परिणाम झाला होता. कसेही करून मुरुगन हा धंदा करणार नाही असे आश्वासन तरी त्याच्यापासून घेतले पाहिजे.

मुरुगन थोड्याच दिवसांत आपल्या बापाचा चांभारीचा धंदा शिकला. त्याही कलेत तो निपुण झाला; परंतु बाबार्जींनी दिलेली कला त्याला स्वस्थ बसू देईना. तो अगदी पोटापुरती चांभारी करी. इतर वेळ माती घेऊन खेळणी, मूर्ती बनवी. त्या मातीच्या मूर्ती बनविताना तो आजूबाजूची सारी सृष्टी जणू विसरून जात असे. त्याच्या त्या सुंदर मूर्ती, ती खेळणी पाहून त्याचा बाप म्हणे, ''ही तर विक. चांगले पैसे मिळतील तुला.''

''नाही. बाबार्जींना दाखवल्याशिवाय कशी विकू ही मी? मला त्यांनी प्रेमाने ही कला दिली. ही खेळणी पाहून बाबार्जींना किती आनंद होईल!'' पण मुरुगनची ही खेळणी बाबार्जींपर्यंत कशी पोहोचणार? कोण घेऊन जाऊन ती बाबार्जींना दाखवून आणणार? बिचारा मुरुगन ! त्याच्या कलाप्रेमालाही जातीयवादाने जणू ग्रासले. आपल्या ओळखीच्या एका चांभाराला घेऊन कृष्ण मुरुगनकडे आला एक दिवस. मुरुगनने प्रेमाने स्वागत केले. म्हणाला, ''किसनदादा या. बाबार्जींची तब्येत ठीक आहे ना आता?''

पण कृष्ण प्रेमाने नव्हता आला तेथे. असल्या कुशल प्रश्नांची जरूरी त्याला नव्हती. म्हणाला, ''मोठा बाबार्जींची काळजी करणारा आला आहे? काढ किती खेळणी आतापर्यंत तू बनविली आहेस ती सारी. याच्यापुढे जी खेळणी काही बनवशील ती सारी मला देत जा. घे शपथ.''

कृष्णाच्या वागण्याने मुरुगनला अति दुःख झाले. त्याला त्याच्या कलेतून पैसा नको होता. बाबार्जींच्या प्रेमाचा, आशीर्वादाचा तो भुकेला होता. कृष्णाच्या वर्तनाने त्याच्या डोळ्यांत अश्रू आले. म्हणाला, ''किसनदादा, देवाशपथ सांगतो की, जी काही खेळणी तयार करीन ती सारी सारी तुलाच देईन.''

त्याने बनविलेली सारी खेळणी कृष्णाला दिली. म्हणाला ''घेऊन जा. पुन्हा या. बनविलेली सारी खेळणी देत जाईन पण एकच करा माझ्यासाठी. बाबार्जींना तेवढी दाखवा, त्यांना पसंत पडली की सारे मला पोहोचले. त्यांचे धन्योद्गार मला प्यारे आहेत.''

कृष्णाच्या मनात ईर्ष्याग्नी तेथेही त्याला स्वस्थ बसू देईना. धनलोभापेक्षाही तो प्रबल झाला. ''बाबार्जींच्याकडून शाबासकी पाहिजे काय तुला! मला

हिणवू पाहतोस? घे, बाबाजींची शाबासकी.'' असे पुटपुटत गावातल्या कुंभारवाड्याजवळच्या एका दगडावर त्याने सारी खेळणी आपटून फोडून टाकली.

बाबाजींना मुरुगनची चिंता वाटे. अगदी राहवले नाही म्हणजे म्हणत, ''कृष्णा, मुरुगनचे ठीक आहे ना रे? विचार तरी कोणाला.''

पण कृष्ण म्हणे, ''तो चांभारडा मरो की तडफडो. पाजी माणसाने सारी कमाई खाल्ली. प्रायश्चित्ताला हजार रुपये लागले.''

बाबाजींना वाटे, कुठून आपण हा विषय काढला, परंतु त्यांचे मन सारखे मुरुगनकडे ओढ घेई. त्यांनी मुरुगनचा जणू ध्यास घेतला. मुरुगनची ती मूर्ती, ती कलामग्नता सारे त्यांच्या डोळ्यांपुढे येई. 'किती सेवाभाव! चांभार असला म्हणून काय झाले, पण किती कलाप्रेम! माझा खरा वारस तर मुरुगनच आहे.' पण हे सारे तोंडातून उच्चारायची सोय नव्हती. त्यांना जीवन नीरस वाटे. दिवसेंदिवस प्रकृती खालावत गेली. मुरुगनचा जप करीत त्यांनी प्राण सोडला. मुरुगनला बाबाजींच्या मृत्यूची वार्ता समजली. फार वाईट वाटले त्याला. त्यांचे शेवटचे दर्शन घेऊन यावे असे त्याच्या मनात येई, परंतु कृष्णाचा स्वभाव त्याला ठाऊक होता. शेवटी रात्री गुपचूप तो स्मशानात गेला. खूप रडला. चितेला अश्रूंची अंजली त्याने वाहिली. ते भस्म डोक्याला लावले, डोळ्यांना लावले, बाबाजींना जणू तो आपल्यात सामावून घेऊ पाहात होता. बाबाजींच्या स्मरणाने त्याचे डोळे भरून येत. त्याने विचार केला, बाबाजींचीच एक मूर्ती केली तर! आपल्या घरात तेच त्यांचे स्मारक.

आता तो सारे विसरला. बाबाजींची मूर्ती करण्यात तन्मय झाला आणि एक दिवस मूर्ती तयार झाली. सुंदर रंग त्याने आणले. रंगीत मूर्ती. जणू प्रत्यक्ष बाबाजीच समोर उभे आहेत. पण हाय! किसनदादाने हीही मूर्ती हिसकावून घेतली तर? नाही. ही लपवून ठेवू. नाही द्यायची ही मूर्ती त्याला.

आणि एक दिवस कृष्ण आला.

''काढ मूर्ती साऱ्या.''

''या दोनच आहेत. घेऊन जा तेवढ्या.''

''इतक्याच?''

''जोडे बनवायचे काम होते, वेळ नाही मिळाला या आठवड्यात.''

''खोटे बोलतोस? ते रंग कशाला मग आणले होतेस? मी पाहिले आहे. काढ ती रंगीत मूर्ती.''

कृष्णाने घरात घुसून ती मूर्ती काढली. ती घेऊन निघाला. मुरुगनला वाटले आपले काळीजच कुणी काढून नेतो आहे आणि त्या बलिदानाच्या– होय, ज्या ठिकाणी मुरुगनच्या कलेचे बलिदान तो करीत होता त्या दगडापाशी तो आला. मुरुगनचा सूड उगवायची त्याची ती जागा, परंतु बाबाजींची मूर्ती! ती जणू करुण दृष्टीने कृष्णाकडे पाहात होती. किती अपूर्व कला! जणू बाबाजीच समोर उभे असावेत. ती मूर्ती मूर्ती नव्हती. कलाकाराची सारी कला, सारी कृतज्ञता, सारे प्रेम त्यात होते. कृष्णही विरघळला. त्याच्याही डोळ्यांत दोन अश्रू आले. त्याच्या मनातला सारा द्वेष त्या दोन अश्रुबिंदूत लुप्त झाला. त्या मूर्तीकडे तो निर्निमेष पाहात राहिला. त्याची जणू समाधी लागली आणि तेथून पुन्हा तो मुरुगनच्या झोपडीपाशी आला. ती मूर्ती घेऊन आला.

''भाई मुरुगा–'' अडखळत अडखळत त्याने हाक मारली.

कृष्णाचा, त्याच्या किसनदादाचा आवाज त्याने ओळखला.

पण त्याला भाई कोणी म्हटले? तो बाहेर आला.

''भाई मुरुगन, मला माफ कर. मी फार तापी आहे. तुझा घोर अपराध केला आहे. माफ केल्यावाचून नाही जाणार मी येथून. म्हण माफ केले.''

''पण झाले तरी काय? नि ही मूर्ती परत घेऊन आलात? ती मी तुम्हाला दिली. खरंच अगदी खुशीने दिली. जा घेऊन.''

''नाही. हे माझे बाबाजी नाहीत. खरोखर तुझे ते बाबाजी. मी त्यांचा नालायक वारस. किती प्रेम त्यांचे तुझ्यावर! मरताना तुझे नाव घेऊन गेले, पण मी चांडाळाने तुला नाही येऊ दिले शेवटच्या दर्शनाला. तूच खरा यांचा मुलगा शोभतोस. मला माफ कर. मी नाही समजू शकलो तुझ्या प्रेमाला.''

मुरुगनच्या डोळ्यांत अश्रू आले. त्याने मूर्ती घेतली. म्हणाला, ''दादा, माझी इच्छा पूर्ण झाली. ही मूर्ती म्हणजे माझा प्राण. माझा कलेजा. माझे सर्चस्व ओतून मी ही बनविली. ही मूर्ती आपल्याजवळ ठेवण्याची आशा पूर्ण झाली. आता मी शपथ घेतो, पुन्हा नाही मूर्ती करणार. हीच माझी शेवटची मूर्ती. जोडे बनवायचे माझे काम. ते करण्यातच मला आनंद आहे.''

(तमिळ लेखक जगन्नाथ अय्यर यांच्या कथेच्या आधारे)

+++

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय सातारा
दाखल नं 99५०७३ ग्रंथानुक्रमांक ८०·५७५२
किंमत २३०/- पाने २००

# कुटुंबाचा आधार

''आई, तिकडे कर्जतपर्यंत मी नाही जाणार. आगगाडीतील ते चहावाले मला मारतात, येऊ नको विकायला म्हणतात. ते दुसऱ्या मुलांना येऊ देतात. मलाच हाकलतात.'' दौलत म्हणाला.

''रोज नाही मारणार, रोज नाही हाकलणार, परंतु कर्जतपर्यंत गेलास म्हणजे अधिक खपतील वड्या. अपमान सोसायला हवा बाळ. तू तर या कुटुंबाचा आधार. आज तुझे बाबाही अंथरुणावर आहेत. त्यांच्या पायाला जखम झाली. पाय सुजला. तू दिवसभर खपशील तरच सर्वांना घास मिळेल.''

''आई, खाटीमिठी खाटीमिठी करताना घसा दुखतो. किती गं ओरडायचे?''

''काय करायचे बाळ? हे तुझे शिकण्याचे वय, परंतु संकटे आली. कराचीहून जिवानिशी आलो हीच देवाची कृपा. आपण महाराष्ट्रीयन माणसे. नाहीत वशिले, नाहीत आपल्यात शेटसावकार. येथे या छावणीत थोडा राहायला आधार मिळाला हीच देवाची कृपा. हेही दिवस जातील. तुझी लहान भावंडे शिकतील. जा बाळ, उशीर होईल. सकाळची एक्स्प्रेस येईल. कर्जतला मेल पुण्याची येईल. तिने परत ये. खपेल माल. गोड बोल. तू नको भांडण करू.''

आणि दौलत तो चपटा वाटोळा डबा घेऊन निघाला. रोज सकाळी तो तीनचार रत्तल लिमलेट घेई. माल विकून पैसे मालकाला नेऊन देई. त्यातील ५० टक्के त्याला कमिशन मिळे. रोज रुपया दीड रुपया तो मिळवी. दिवसभर खपे, ओरडे. दहा-बारा वर्षांचा दौलत. लहान दोन-तीन भावंडे. सर्वांचा आज तो आधार होता. आईने पाठीवरून हात फिरविला आणि तो गेला. कल्याणला गाडी आली. तिच्यात तो

चढला. ''पार्लेवाला खाटीमिठी, आण्याला आठ, हे आण्याला आठ.'' तो बाळ ओरडत होता. ओरडताना तोंड जरा वाकडे होई. रोज रोज ओरडायचे.

''आई, वडी घे.'' एका मुलाने हट्ट घेतला.

''एवढ्यात रे कसला खाऊ?'' आई म्हणाली.

दौलत तेथे उभा होता, त्याने त्या मुलाला एक वडी दिली. त्या आईला काय वाटले कोणास ठाऊक? तिने दोन आण्याच्या वड्या घेतल्या. लहान दौलतची ती वृत्ती पाहून आणखीही काही जणांनी वड्या घेतल्या आणि तो पाहा एक गृहस्थ. मोठा चिक्कू दिसत आहे.

''काय रे पोरा, अच्छा है क्या माल?''

''अच्छा है. लेवो जी. कितनेका?''

''दे चार आण्याच्या.''

दौलतने ३२ वड्या मोजून दिल्या. तो गृहस्थ पुन्हा मोजू लागला.

''दोन कमी आहेत रे.''

''कमी? बरे या घ्या.''

दौलत विश्वासू होता; परंतु एका गृहस्थाने त्या वड्या मोजताना पाहिले होते. तो मनुष्य खोटे बोलत होता.

''त्या गरीब पोराला का फसवता? बिचारा दिवसभर खपवित हिंडतो. दोन वड्या का घेतल्या जास्त?'' तो गृहस्थ म्हणाला.

''तुम्हाला काय जरूर? मोठे गांधी की नाही तुम्ही?''

तो लफंगा म्हणाला. तेथे भांडण सुरू झाले.

''जाऊ दे. दोन वड्या गेल्या तर गेल्या. भांडण नको. भांडण वाईट. आईने मला सांगितले आहे गाडीत भांडू नको. जाऊ दे.'' तो लहान दौलत म्हणाला.

त्या लफंग्याला काय वाटले कोणास माहीत? तो म्हणाला,

''आणखी एक आण्याच्या दे.''

दौलतने आठ मोजून दिल्या. त्या माणसाने दोन परत दिल्या. ''घे बाळ. तुझ्या तोंडून गांधी महात्मा जणू बोलत आहे.'' तो म्हणाला.

दौलत हिंडत दुसऱ्या डब्यात गेला. दरवाजातून बाहेर पडून झोळीत डबा घालून गजांना धरून तो गेला. लहान मुले, परंतु परिस्थितीने त्यांना शूर बनविले. ना मरणाची

भीती ना कशाची. दोन आणे अधिक कसे मिळतील याची चिंता. असे करता करता कर्जत आले. दौलत उतरला. तेथे तो पाणी प्यायला आणि पुण्याची मेल आली. तो तिच्यात चढू लागला. तो तेथे दुसरा एक मुलगा खाटीमिठी विकणारा होता. तो त्याला आत येऊ देईना. तो जरा धट्टाकट्टा होता. तो दारात बाहेर उभा राहिला. दौलतही गजाला धरून उभा राहिला. तो दुसरा मुलगा एका हाताने दौलतच्या तंगड्या ओढू लागला. गाडी तर सुरू झाली. लट्ठ मुलगा का दौलतला खाली लोटणार?

"येऊ दे त्याला. का त्याला लोटणार तू? हो दूर." तेथील एक तरुण पुढे होऊन म्हणाला.

तो धट्टा मुलगा बाजूला झाला. त्या तेजस्वी तरुणाने दौलतला आत घेतले.

"खाटीमिठी आणे मे आठ आठ." दौलत म्हणाला.

"यहा नहीं बेचना." तो दुसरा मुलगा म्हणाला.

"विकणार."

"विकण्याची परवानगी नाही."

असे त्या दोघांचे भांडण जुंपले. तो गाडीतला चहा विकणारा आला.

"क्यों रे क्यों आया? एक दफे कहा ना यहां आना नहीं. यहा बेचनेकी परवानगी नहीं. यहा हमारा राज है." तो चहा विकणारा गरजला.

तो धट्टाकट्टा मुलगा त्याच्या पाठोपाठ गेला. तो तिकडे वड्या विकू लागला. दौलत मात्र भीतीने तेथेच उभा राहिला. त्याला आत घेणाऱ्या त्या तरुणाने त्याला जवळ बसविले.

"मला दे एक आण्याच्या." तो म्हणाला.

दौलतने इकडे तिकडे पाहून दिल्या, इतरही आया बाया घेऊ लागल्या. तो चहावाला येत नाही बघून दौलत देई. सर्वांना त्याच्याविषयी सहानुभूती वाटली.

"तुझे काय नाव?" त्या तरुणाने विचारले.

"दौलत."

"तू कुठला?"

"आम्ही सिंधमधून आलो. कल्याणजवळ राहतो. निर्वासितांच्या छावणीत. आई, वडील, भावंडे आहेत. वडील मोटार कारखान्यात दुरुस्तीला जातात; परंतु ते आजारी आहेत. मी वड्या विकतो. दिवसा तीन रत्तल तरी खपवतो. म्हणजे रुपया

मिळतो. तिकडे, कल्याणच्या तिकडे नाही होत त्रास. लोकल गाडीत त्रास नाही; परंतु हा चहावाला मारतो. आई म्हणते कर्जतपर्यंत जावे. लांबची माणसे असतात. लहान मुले–बाळे असतात. वड्या घेतात. म्हणून येतो. आज तुम्ही आधार दिलात. कोणी तरी भेटतो.'' तो बोलत होता. लोकांना त्याच्याविषयी प्रेम वाटले. जवळजवळ सतरा अठरा लोकांनी आण्या आण्याच्या वड्या घेतल्या आणि दौलत मोजीत होता. त्याचे तोंड हसले, फुलले. आज किती लवकर खरेदी झाली आणि कल्याण स्टेशन आले. दौलतने आठ वड्या घेतल्या आणि त्याला गाडीत घेणाऱ्या त्या तरुणाला म्हणाला,

``घ्या तुम्ही घ्या. नाही म्हणू नका. तुम्ही मला जवळ बसवलेत. आई विचारील ना त्यांना दिलीस का वडी. मग काय सांगू? घ्या. गरिबाची भेट घ्या.''

तो तरुण घेईना, परंतु त्या लहान मुलाच्या मनातील कृतज्ञतेची भावना दुखावली जाऊ नये म्हणून त्याने त्या घेतल्या, परंतु कर्जतला घेतलेला चिवड्याचा पुडा अर्धा शिल्लक होता. त्या तरुणाने तो चिवडा त्याला दिला.

``हा घे. मजजवळ तुला द्यायला दुसरे काय आहे? घरी तू, तुझी भावंडे खा. सुखी असा. तू कष्ट करतोस. देव तुला सांभाळील.''

दौलत उभा होता. मेल निघाली. तो तरुण गाडीत बसला. तो खिडकीतून बघत होता. दौलतही त्याच्याकडे पाहात होता. गेली गाडी आणि दौलत धावत घरी आला.

``आई, आज किती लवकर विक्री !''

असे म्हणून त्याने सारी हकिकत सांगितली. तिने त्याला पोटाशी धरले. तिचे अश्रू त्याच्या मस्तकावर पडले.

+++

# अधिक थोर देणगी

इटलीच्या दक्षिण भागातील एका दूरच्या गावात दोन मुले राहात होती. त्या गोष्टीला दोनशेहून अधिक वर्षे झाली. त्या दोघांचे एकमेकांवर फार प्रेम. एकाचे नाव मेरियो, दुसऱ्याचे अॅन्सेलमो. मेरियो एका श्रीमंत जमीनदाराचा मुलगा होता. तो हुशार होता, महत्त्वाकांक्षी होता; परंतु अॅन्सेलमो पुढे पुढे करणारा नव्हता. जोडे शिवणाऱ्या एका गरिबाचा तो मुलगा होता.

दोघे मित्र हिंडाफिरायला जायचे, भविष्याबद्दल बोलायचे. मेरियो गंभीरपणे म्हणायचा, "मी मोठा धर्मोपदेशक होईन. आईबापांची ती इच्छा आहे. मोठ्या व्यासपीठावरून बोलेन. राजेमहाराजे ऐकतील. भालदार-चोपदार ललकारतील." एके दिवशी दोघे मित्र एका द्राक्षमंडपात बसले होते. मेरियो म्हणाला, "धर्मोपदेशक व्हायचे म्हणजे उत्कृष्ट वक्तृत्व हवे. या देणगीशिवाय फुकट."

अॅन्सेलमोने आपल्या मित्राकडे भावपूर्ण दृष्टीने, उत्कटतेने पाहिले आणि सकंप आवाजात तो म्हणाला, "मेरियो, देवाने ती देणगी तुला द्यावी म्हणून मी रोज प्रार्थना करीन." धर्मोपदेशक होऊ इच्छिणारा मेरियो धर्मप्रवृत्तीचा नव्हता. मानमान्यता, झगमगाट यांचा तो भुकेला होता. त्याला मित्रांचे शब्द ऐकून थोडे हसू आले. अॅन्सेलमोच्या खांद्यावर हात ठेवून म्हणाला, "तू प्रार्थना करशील. कर. मी आभारी राहीन, परंतु काही झाले तरी मला वक्तृत्वकलेचा अभ्यास करायला हवा."

आणि पुढे मेरियो धर्मसंस्थेत शिरला. तो एका गावचा बिशप झाला. अॅन्सेलमोला विरह सहन होईना. तोही मित्र ज्या गावी गेला तेथील धर्मगटात शिरला. तो तेथे गडी झाला. झाडलोट करी. दोघा मित्रांची भेटगाठ क्वचितच होई, परंतु अॅन्सेलमो संधी साधी, मित्राजवळ दोन शब्द बोले. निदान डोळे तरी भेटत.

आज मेरियोचे पहिले प्रवचन होते. तो चर्चमध्ये शिरला, तेथील एका कमानीखाली बाजूला ॲन्सेलमो होता. तो म्हणाला ''मेरियो, तुझी इच्छा पुरी होत आहे. धन्य हो, मी तुझ्यासाठी प्रार्थना करीन.''

आणि मेरियो व्यासपीठावर चढला. त्याला कोपऱ्यातील तो मित्र दिसत होता. प्रेमळ भक्तिभावाने पाहणारा तो मित्र आणि मेरियोला अपार स्फूर्ती आली. फार उत्कृष्ट असे ते प्रवचन झाले. आजवर कोणी असे ऐकले नव्हते आणि पुढे अशीच प्रवचने होऊ लागली. श्रोते संस्फूर्त होत, उचंबळत. आपल्या मित्राचे यश पाहून ॲन्सेलमोचे डोळे आनंदाश्रूंनी भरून येत. मेरियोची कीर्ती दूरवर पसरली. त्याला दुरून बोलावणी येऊ लागली. एकदा त्याच्या वरिष्ठांनी त्याला एके ठिकाणचे आमंत्रण स्वीकारायला सांगितले. मेरियो म्हणाला, ''ॲन्सेलमो माझ्याबरोबर हवा.''

अशी वर्षे गेली. मेरियोबरोबर ॲन्सेलमो गडी म्हणून जाई. मेरियोची स्तुती जो तो गाई आणि शेवटी तो राजाचा धर्मगुरू झाला. त्याला राहायला राजवाडा मिळाला. मोठमोठी माणसे प्रणाम करीत, त्याचा आशीर्वाद मागत. मेरियो रुबाबदार दिसे. तो आता ॲन्सेलमोकडे लक्ष देत नसे; परंतु हा प्रेमळ मित्र जरी थकला तरी सेवा करीतच होता.

आणि तो रविवार आला. बिशप मेरियो प्रवचन देऊ लागला, परंतु सभोवतालच्या परिस्थितीत काहीतरी कमी आहे असे त्याला वाटले. त्याने खाली पाहिले. नेहमीच्या जागेवर आज ॲन्सेलमो नव्हता, परंतु त्याला लाज वाटली. आपण का ॲन्सेलमोच्या अस्तित्वावर अवलंबून, असे मनात येऊन तो सुंदर शब्द आठवू लागला; परंतु विचाराचे अनुसंधान राहिले नाही. शब्द सुचत ना. कसेतरी प्रवचन संपले. संपल्यावर त्याने 'ॲन्सेलमोला बोलवा.' म्हणून आज्ञा केली. कोणी काही बोलेना, परंतु एक वृद्ध धर्मसेवक शांतपणे म्हणाला, ''पंधरा मिनिटांपूर्वी तो मरण पावला.''

मेरियोचा विश्वास बसेना. त्याला धक्का बसला. तो वृद्ध धर्मसेवक पुन्हा म्हणाला, ''कितीतरी महिने तो आजारी होता. रोग हटत नव्हता, परंतु आपल्याला कळवून तकलीफ देण्याची त्याला इच्छा नव्हती.''

मेरियोच्या हृदयात दुःख दाटले. दुःखापेक्षाही आपले व्यक्तिगत नुकसान झाले असे त्याला वाटले. ''मला त्याच्या खोलीत न्या.'' तो म्हणाला आणि एका लहान

अंधाऱ्या खोलीत तो आला. फाटक्या कपड्यात गुंडाळलेला तो देह तेथे होता. तो बालपणचा मित्र तेथे पडला होता. मेरियो विचारमग्न दिसला. मित्राचे हे दारिद्र्य आणि स्वत:चें वैभव याचा का विचार त्याच्या मनात आला?

''येथे तो राही?'' त्याने विचारले.

''होय. महाराज.''

''आणि वेळ कसा दवडी?''

''तुमची कामे करून.''

''आणखी काय करी?''

''कामे करून फार थोडा वेळ उरे, परंतु रोज बागेत जाई. आपल्या भाकरीतून पाखरांना देई आणि लहान मुलांजवळ बोले आणि प्रार्थना करी.''

''प्रार्थना?'' तो शब्द मेरियोला जणू चमत्कारिक वाटला.

''होय, तो प्रार्थना करी. त्याला जर विचारले का करतोस प्रार्थना, तर म्हणायचा एका सद्हेतूने.'' मेरियोची मुद्रा अगम्य दिसली. हृदयात कोणी सुरी भोसकावी तसे त्याला झाले, परंतु आपण मित्राची चिंता वाहिली नाही, आपण आपल्याच वैभवाच्या गुर्मीत राहिलो, असे त्याच्या मनात आले नाही. त्याला निघणे प्राप्त होते. रोम शहरात धर्माचार्यासमोर त्याचे प्रवचन व्हावयाचे होते.

त्याच्या आयुष्यातील महत्त्वाचा दिवस. बडी बडी मंडळी प्रवचन श्रवणार्थ आली होती, परंतु त्याला काही सुचेना. तो घामाघूम झाला. निराशेने त्याने मित्र दिसतो का पाहिले, परंतु तो तर देवाघरी गेला होता. ती जाणीव त्याला झाली. प्रवचन जमेना. लज्जेने अर्धमेला होऊन ते व्यासपीठ सोडून तो निघून गेला.

परंतु असला दुबळेपणा लाजिरवाणा आहे असे त्याला वाटले. ही भावना जिंकून घ्यायचे त्याने ठरविले. पुढील प्रवचन त्याने काळजीपूर्वक तयार केले. इटलीतील सर्वांत मोठ्या प्रवचनकाराची शक्ती ती का सामान्य माणसाच्या प्रार्थनेवर अवलंबून होती? छे: ती गोष्ट त्याला सहन होईन. तो पुन्हा प्रवचनाला गेला; परंतु मागीलपेक्षाही वाईट अनुभव आला. मेरियो हतबुद्ध झाला. तो गांगरला. आपण पडतो असे त्याला वाटले. त्याला हात धरून जवळच्यांनी नेले. जाताना तो स्फुंदत म्हणाला, ''होय. तो मित्र. त्याचीच ती शक्ती, त्याचे ते बळ. मी केवळ फोलपट आहे. निस्सार वस्तू.''

वैद्य म्हणाले, ''फार काम करता. म्हणून ही दशा. विसावा घ्या.'' परंतु तो आपल्या पहिल्या मठात आला. तेथेच ॲन्सेलमो त्याच्या सेवाचाकरीसाठी प्रथम आला. त्या मठाजवळ ॲन्सेलमो पुरला गेला होता. तेथे मेरियो एकांत जीवन कंठू लागला. तेथील बागेत एकटा फिरे. मित्राच्या समाधीजवळ बसे. त्याच्या जीवनात क्रांती झाली. अहंकार हरपला. वृत्ती नमली.

एके दिवशी तो मित्राच्या समाधीजवळ गुडघे टेकून डोळे मिटून बसला होता. जवळच मठपतीही येऊन बसले. मेरियोने डोळे उघडले. मठपतींनी त्याच्या डोक्यावर हात ठेवला. त्यांनी विचारले,

''बाळ, काय पाहिजे तुला? वक्तृत्व पुन्हा पूर्ववत यावे म्हणून का ही प्रार्थना?''

''नाही तात; त्याहूनही थोर देणगी त्याने मला द्यावी म्हणून ही प्रार्थना आणि ती देणगी म्हणजे नम्रतेची, निरहंकाराची.''

+++

# मोठी गोष्ट

"एक जरा मोठी गोष्ट सांगा. झाडामाडांची सांगा."

"बरे तर ऐका."

तो होता लहान बाळ. आई होती सावत्र. ती आपल्या मुलाबाळांना दागिन्यांनी नटवी, सुंदर वस्त्रांनी भूषवी, परंतु आईवेगळ्या राजाला कोण? एके दिवशी तो घरातून निघून गेला. गाव संपला. नदी संपली आणि जंगल लागले.

राजा दमला. तेथे रडत बसला. शेवटी त्याला झोप लागली.

एक म्हातारी बाई तेथे आली. तिने त्या मुलाचे डोके मांडीवर घेतले. राजा जागा झाला. तो जवळ ए कआजीबाई.

"तुम्ही कोण?" त्याने विचारले.

"मी रानातली आजीबाई."

"तुम्ही काय करता?"

"रडणाऱ्यांना हसवते, भुकेल्यांना जेवू घालते, उघडे असतील त्यांना कपडे देते."

"मला दे आजी."

"हे समोर लहानसे झाड आहे. त्याच्याजवळ हवे ते माग; परंतु एक गंमत आहे, झाड विचारील, 'ही गोष्ट दुसऱ्याला सांगशील की, सांगणार नाहीस?' तर 'सर्वांना सांगेन' असें म्हण बरं का?"

राजाने कबूल केले. समोरच लहानसे झाड होते. त्याच्यावर सर्व रंगांची फुले होती. किती सुंदर दिसत होते! जणू वनदेवीच्या दिवाणखान्यातील ती फुलदाणी होती. नानारंगी नानागंधी फुलांचा तो जणू गुच्छ. राजाने त्या पुष्पवृक्षाला प्रणाम केला.

"काय पाहिजे बाळ?" झाडाने विचारले.

"मला अन्न हवे."

"ही घे डबी. यातून नेहमी मिळेल, परंतु हे झाड डबी देते असे कोणाला सांगणार तर नाहीस?"

"सांगेन. मला एकट्याला मिळून काय उपयोग? सर्वच अनाथांना अशा डब्या द्या. मी त्यांना तुमच्याकडे पाठवीन."

"बरं पाठव. आणखी काय हवे?"

"कपडे."

"हे घे गाठोडे. यातून मिळत जाईल, परंतु उधळपट्टी नको करूस. दोन अगोदर फाटले म्हणजे आणखी माग. सोसासोसाने, ऐट करावी म्हणून मागशील तर गाठोडे पुढे देईनासे होईल बरं का. तू आहेसच शहाणा."

"मी तसे करीन आणि जो कोणी उघडा गरीब भेटेल त्याला तुमचा पत्ता सांगेन."

"बरे हो. पाठव. कोणी दुःखी कष्टी नका राहू. आणखी काय हवे?"

"ज्ञान. मला पुस्तके हवीत. सारे हवे."

"ही घे पेटी. हिच्यातून पुस्तके मिळतील. चित्रांची, नाना भाषांची, हिंदुस्थानातील सर्व भाषांची यात आहेत, परंतु लिपी एकच नागरी. नागर लिपीत लिहिलेलीच बंगाली, गुजराथी, तामिळ, तेलगू, कन्नड वगैरे.

"छान. मी पटपट शिकेन आणि यात दुर्बिण आहे?"

"हो. या पेटीतून प्रयोगाचे सामानही मिळेल. दुर्बिणीने तारे बघ. हे विश्व किती मोठे आहे ते शीक. पेटीतून शास्त्राची पुस्तके मिळतील आणि प्रयोगाचे सामानही मिळेल. तू लहानशी प्रयोगशाळा कर. स्वतंत्र भारतात आता विज्ञान हवे. गावोगावी प्रयोगालये हवीत. तू शहाणा हो."

"मी आता जातो. मी शिकेन. नवहिंद बनवीन."

"रडू नको. उद्योगी हो. कष्ट कर. वेळ उगाच नको दवडू. उत्साहाने काम करा. हे बघ. अरे माझी मुले रात्रंदिवस खपतात तेव्हा ही सुंदर फुले फुलतात. माझे लहानसे जीवन, परंतु हे वैभव बघ. जवळच्या दगडाजवळही गोड बोलून मी मैत्री जोडली. माझी कोवळी मुले त्यांच्या अंगाखालीही गेली आणि त्यामुळे ही निळी फुले फुलली.

निरनिराळी जमीन, निरनिराळे दगड, सर्वांजवळ मी जातो आणि प्रेमाने एकजीव होऊन हे अनंत विविध वैभव मिळवतो. मी लहान आहे, परंतु वनदेवतेचे मजवर अपार प्रेम. मी म्हणेन तसे होते. ईश्वराने विश्वाची संपत्ती जणू माझ्याजवळ आणून दिली. नाहीतर कोठून देऊ अन्नाची डबी, वस्त्राचे गाठोडे, पुस्तकांची पेटी, खरं ना? तुम्ही भारतीय बाळे अशी व्हा. श्रमणारी, प्रेम करणारी, प्रयोग करणारी व्हा. जा."

प्रणाम करून राजा निघाला. तो आजीबाईच्या पाया पडला.

"ये. शतायुषी हो." ती म्हणाली.

राजा आपल्या गावी आला. डोंगराच्या पायथ्याशी लहान झोपडी करून राहू लागला. त्याने तेथे प्रयोगालय घातले, ग्रंथालय सुरू केले. एक पंचा नेसी. एक कोपरी अंगात. वाची, प्रयोग करी. आजूबाजूची मुले येऊ लागली.

सावत्र आई एके दिवशी त्याच्याकडे आली व म्हणाली, "कोणी दिले हे?" त्याने हकिकत सांगितली. ती आपल्या मुलाला म्हणाली, "जा रानात. माग त्या फुलझाडाजवळ."

तिचा मुलगा भिकू निघाला. त्याला ती म्हातारी भेटली, परंतु त्याला प्रेमाने बोलणे, नमस्कार करणे माहीत नाही. तरीही म्हातारी म्हणाली,

"या झाडाजवळ माग. मला मिळाले तसे सर्वांना मिळो असे म्हण. त्यांना इकडे यायला सांगेन असे म्हण."

तो काही बोलला नाही. भिकू झाडाजवळ जाऊन म्हणाला.

"झाडा झाडा, मला सारे दे."

"सारे म्हणजे काय?"

"तुझ्याजवळ असेल नसेल ते."

"तू इतरांना इकडे पाठवशील?"

"नाही. हा पत्ता कोणाला मी देणार नाही. नाहीतर माझ्याप्रमाणे दुसरेही सुखी होतील, श्रीमंत होतील. माझे पाहतील, त्याहून अधिक तुमच्याजवळ मागतील. झाडा, झाडा, मी पत्ता सांगणार नाही. तो राजा वेडपट. त्याने केले तसे मी करणार नाही. तुम्हाला त्रास होईल असे मी करणार नाही. मी सुखी झालो म्हणजे पुरे. मला भरपूर खायला मिळो. माझी चंगळ चालो."



श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

तो असे म्हणताच आजूबाजूने दगड येऊ लागले. काटे येऊ लागले. भिकू ओरडू लागला. ती म्हातारी दूर उभी होती. ''मी सांगितले होते तरी ऐकले नाहीस. जा आता पळ.''

भिकू पळत सुटला. बाण यायचे थांबले. त्या झाडाने थोडी चुणूक दाखवली. सूडबुद्धी त्यात नव्हती, जागृती यावी हा हेतू.

राजाचे नाव सर्वत्र झाले. तो सर्वांना देई. सर्वांबरोबर खपे, परंतु त्याने त्या वस्तू आता कपाटात ठेवल्या. आता तो आयते खात नसे. आयते मागत नसे. त्याने पडिक जमीन लागवडीस आणली. खताचा शोध लावला. श्रम हाच परीस असे तो म्हणे. गावाजवळ देवकापूस त्याने लावला. गावाला कापड किती हवे त्याची योजना केली आणि गावात माग लागले. छोटी छोटी मुले फटक फटक माग चालवीत, म्हातारी माणसे कातीत. गावात सारे स्वच्छ ! ज्ञान, विज्ञान, आरोग्य सारे त्या गावात. त्या गावची कीर्ती सर्वत्र गेली. ते गाव तीर्थक्षेत्र झाले. राजा नि त्याचा गाव सुखी झाला, तसे तुम्ही नि तुमचे गाव सुखी होवो. संपली गोष्ट, तुमचे होवो अभिष्ट.''

''छान होती गोष्ट.''

''नवभारताच्या निर्मितीची गोष्ट.''

''नवसमाज निर्मितीची.''

''पुरे आता. पळा. मला आहे काम. जय हिंद.''

+++

# खंडित आत्मा

वीराच्या लहानशा झोपडीत चिनी आपल्या खेळण्याशी खेळत होती. चिनीचे वय पाच वर्षांचे, केस विखुरलेले, फाटके कपडे अंगावर. तिचे तोंड मोहक होते. ते तिचे चिमणे वाटोळे लांब हात! लाकडी बाहुली, मातीची बोळकी ही तिची इस्टेट. खेळात रमली होती, बाहेर ऊन मी म्हणत होते. रस्त्यावर चिटपाखरूही नाही. एखादी स्त्री डोक्यावर मडके घेऊन पाण्याला जाताना मधून दिसे. चिनीची आई विहिरीवर गेली होती. तेथे अपार गर्दी. झोपडीपासून अर्धा मैल तरी ती विहीर लांब होती. दर वर्षी उन्हाळ्यात पाण्याचा दुष्काळ असे. यावर्षी तर आधीच अवर्षण! चिनीची आई विहिरीवर दोन तास बसली तेव्हा कोठे नंबर लागला. घरी मुलीला तहान लागली होती. या मडक्यात बघे, त्या मडक्यात बघे. पाणी नाही. पुन्हा खेळात ती रमली.

इतक्यात तिचा बाप वीरा घरी आला.

"बाबा, पाणी द्या." ती म्हणाली.

त्याने तिला जवळ घेतले.

"अजून विहिरीवरून नाही आई आली. कोठे गेली आई?" तिने विचारले.

"बसली असेल गप्पा मारीत. पोर तहानेने मरत आहे. तिला काय चिंता?" बाप म्हणाला.

वीरा मोठा शौकीन प्राणी. काळासावळा सुंदर दिसे. चाळीस वर्षांची उमर तरी तरुण वाटे. त्याचे डोळे सर्वांना आकर्षून घेत. सफेद पेहरण आणि धोतर हा त्याचा पोषाख. पायांत चप्पल. त्याचा धंदा चुना तयार करण्याचा, परंतु त्याची पत्नीच ते सारे काम करी. तो मजा मारी. सिद्धाप्पा म्हणून त्याचा एक व्यापारी मित्र होता. सिद्धाप्पा

श्रीमंत होता, तरुण होता. तो व्यसनात बुडाला होता. दारू, जुगार इत्यादी विलासात तो मग्न. तरीही सिद्धाप्पा अब्रूदार मानला जाई. कारण त्याच्याजवळ लक्ष्मी होती. त्याच्या अनेक फंदात वीरा त्याला मदत करी. त्यामुळे सिद्धाप्पा त्याला पैसे पण देई. गरीब लोकांत वीराचा दरारा होता. काही बरेवाईट झाले तर सिद्धाप्पा वीराला वाचविल्याशिवाय राहणार नाही असे त्यांना वाटे.

वीराचे कुटुंब तीन माणसांचे. तो, त्याची नीलम आणि मुलगी चिनी. चिनीप्रमाणे साखरेप्रमाणेच ती मुलगी गोड होती. नीलमचे वय चौतीसएक वर्षांचे असेल. तोंड सुकलेले, डोळे खोल गेलेले. तोंडावर चिंता नि काळजी. यंत्राप्रमाणे तिचे जीवन चालले होते. चुलीवर काय असेल ते शिजत ठेवून ती टेकडीवर जाई. चुनखडीचे दगड गोळा करून आणी. दुपारी वीराला ती जेवण वाढी. मुलीला देई. उरेल ते स्वत: खाई. नंतर भट्टी पेटवून ती पाणी आणायला जाई. सायंकाळी जळण गोळा करायला वणवण हिंडे. अंधार पडल्यावर काटक्या-कुटक्या घेऊन घरी येई. रसोई करी. नवऱ्याला, मुलीला जेवण देई. मग स्वत: खाई. भांडी घासी, निजायला बारा वाजत. पुन्हा पहाटे उठे. तिची आजी, तिची आई, साऱ्यांना असेच काम करताना तिने पाहिले होते. आजूबाजूच्या स्त्रियांचे हेच जीवन– काम करीत मरणे हेच स्त्रियांचे जीवन अशीच तिची समजूत झाली होती. पतीसाठी नि मुलीसाठी सतत कष्ट करणारी नीलम म्हणजे करुणामूर्ती होती. चुनखडीचे दगड आणणे, भट्टीत जाळणे, बाजारात विकणे, घरची रसोई, पाणी उदयक, सारे तिलाच करावे लागे. पतीला तीच धोतरे घेऊन देई. मुलीला परकर पोलके तीच करी. स्वत:ची साडी तीच आणी. एवढे सारे करूनही पतीची मर्जी गेली तर पाठीत काठी बसे.

वीरा उद्योगहीन माणूस. ताडीचा वेडा. कोठे नाटक, तमाशा असला म्हणजे जायचा. सर्कस आली, रामलीला आली तर पहिल्या रांगेत जाऊन बसेल. लोकांना आश्चर्य वाटे की, याची चैन चालते तरी कशी! पत्नीच्या श्रमातून नि अश्रूंतून ती चैन फुलत होती.

नीलम मडके घेऊन आली. वीराने पाहिले. वादळ होणार नीलमने ओळखले.

"इतका वेळ होतीस कुठे? ही पोर पाण्यासाठी मरत आहे आणि तू विहिरीवर गप्पा मारीत बसलीस? घरात पाण्याचा टाक नाही. आम्ही मेलो तरी तुला काय पर्वा?" तो बोलतच होता.

नीलम शांत होती. तिने चिनीला पाणी दिले, ती पोर खेळायला गेली. वीराला तिने जेवण वाढले. आज शेजारच्या गावात यात्रा होती. त्याच्याजवळ पैसे नव्हते. चिनीच्या अंगावर फाटके कपडे होते.

वीरा म्हणाला,

''थोडे पैसे दे. चिनीच्या अंगावर नुसत्या चिंध्या. यात्रेतून नवीन कपडे आणीन.''

''चिनीला कपडे मी शिवीन.'' ती म्हणाली.

वीरा रागावला. इतक्यात चिनी रडत येऊन म्हणाली,

''बाबा, मला नवीन आणा परकर पोलकं. आणाल ना?''

''ही पोर रडते आहे. दे ना चार रुपये. तुला का पोरीच्या डोळ्यांतील पाणी दिसत नाही?''

नीलमने चार रुपये काढून त्याला दिले. चिनी पित्याबरोबर जायला निघाली. ती रडू लागली. नीलम पतीला म्हणाली, ''घरीच राहा ना. मी चुनखडीचे दगड आणायला जात आहे.'' टोपली घेऊन नीलम गेली आणि वीरा कोठला घरी राहायला? तोही पसार झाला. चिनी रडत होती. शेवटी बाहुलीशी खेळत बसली आणि तेथे झोपली.

आता संध्याकाळ झाली. चिनी उठली. पुन्हा खेळू लागली. आईही घरी आली. मुलीला एकटी खेळताना पाहून मातेचे हृदय भरून आले. मुलीजवळ खेळातली जातुली होती. चिनी त्या जातुलीला फिरवीत होती आणि ओव्या म्हणत होती,

''स्त्रियांचा हा जन्म
नको देऊ सख्या हरी
रात्रंदिवस जन्मभर
परक्याची ताबेदारी।।
स्त्रियांचा हा जन्म
देव घालून चुकला
रात्रंदिवस जन्मभर
बैल घाण्याला जुंपला।।''

चिनीने कोठे ऐकल्या होत्या त्या ओव्या? त्या ओव्या नीलमच दळताना म्हणत असेल. शेजारच्या बायका म्हणत असतील. त्या ओव्या ऐकत नीलम खिडकीजवळ उभी होती. तिला आपले सारे आयुष्य त्या ओव्यांत दिसत होते. तिची हृदयवीणा वाजू लागली. नाना विचारांचे ध्वनी ऐकू येऊ लागले. फुकट, स्त्रियांचे जीवन फुकट, असे तिचे मन म्हणत होते आणि माझी ही गोड चिनी! तिच्या जीवनाची हीच दशा व्हायची. याच वेदना, हेच कष्ट तिलाही पुढे भोगणे प्राप्त.

ती निराशेने म्हणाली, ''हरे राम! आपण कशाला जन्मलो? वीराच्या हातची रोज मारझोड!''

ती एकच प्रार्थना करी. 'प्रभो, मी ज्या यातना भोगीत आहे त्या चिनीला भोगाव्या न लागोत.'

नीलमने चुलीवर काही शिजत ठेवले. ती दारात उभी होती. आपण आणखी कोठेतरी थोडे पैसे ठेवल्याची तिला आठवण झाली. सापडली पुरचुंडी. थोडे पैसे घेऊन ती बाजारात गेली. तिने स्वत:ला एक साडी आणली. ती घरी आली. चिनीचे फाटके कपडे शिवत बसली. चिनी बापाची वाट पाहात होती. तो नवीन कपडे आणणार होता, परंतु वाट पाहून ती झोपली.

मध्यरात्र होत आली. नीलम वीराची वाट पाहात होती. दारातून दूरवर पाही. शेवटी अंधारात झुकांड्या खात कोणी येताना तिला दिसले. नीलमने जेवायला वाढले. वीराने डोक्यावरचा रुमाल फेकला. त्याचे लक्ष एकदम साडीकडे गेले. ती हातात घेऊन म्हणाला,

''केव्हा आणलीस?''

''आजच.''

''किती पैसे पडले?''

''चार रुपये.''

वीराच्या डोळ्यांत जंगली क्रूरपणा चढला.

''तो पलीकडचा हॉटेलवाला पैसे दिल्याशिवाय मला सोडीत नव्हता आणि तू नवीन साडी आणतेस! तुझ्याजवळ पैसे आहेत. लपवून ठेवतेस.'' असे बोलून त्याने तिच्या फाडकन तोंडात मारली.

वीराच्या तोंडाला घाण येत होती. चार रुपये दारूत उडवून तो आला होता. त्याची तार आणखी चढत होती.

''मुसमुसू नकोस. ओरडू नकोस.'' असे म्हणून कोपऱ्यातले लाकूड त्याने उचलले. नीलमच्या डोक्यावर त्याने हाणले, पाठीवर मारले. नीलम खाली पडली. त्याने तडाखे हाणले. इतक्यात चिनी उठली. तिने विचारले,

''बाबा, माझे परकर पोलके?''

तो काही बोलला नाही. चिनी बापाजवळ जाऊन रडू लागली. त्याने तिच्या एक थोबाडीत मारली आणि घराबाहेर निघून गेला. दुर्गादेवीच्या देवळात झोपण्यासाठी एक चादर घेऊन गेला.

नीलम उठली. तिने चिनीला जवळ घेतले. तिच्या केसांवरून हात फिरवीत होती.

''रडू नको हं. तुझ्यासाठी परकर पोलके उद्या मी आणीन हं. उगी, उगी.''

आईच्या मांडीवर चिनी होती. ती आईच्या तोंडाकडे पाहात होती. आईच्या डोळ्यांतील अश्रू तिला बघवत ना. इतक्यात चिनीच्या गालांवर एक थेंब पडला! रक्ताचा थेंब. नीलमने तो पटकन पुसला. तिने आपल्या केसांत बोट फिरवले. डोक्यातून रक्त येत होते.नीलम मनात म्हणाली, ''हे भगवान, तू मला स्त्रीचा जन्म कशाला दिलास?''

नीलम दूरच्या भविष्याकडे बघत होती आणि या चिनीचेही असेच होईल का? असे मनात येऊन तिचे डोळे भरून आले. चिनीच्या तोंडावर ते दयेचे, सहानुभूतीचे, वात्सल्याचे अश्रू पडले.

''आई, तू रडतेस, का रडतेस?'' चिनीने विचारले.

त्या खोलीत मंद प्रकाश होता. एक माता मुलीच्या केसांवरून हात फिरवीत होती. काय होते तिच्या मनात? त्या मुलीच्या केसांतून ती आपली बोटे प्रेमाने का फिरवीत होती?''

प्रा. सदाशिव वोडीयार यांच्या गोष्टीवरून

+++

# चिटुकल्या गोष्टी

एक होता राजा, त्याला बऱ्याच वर्षांनी मुलगा झाला. मग सोहळा काय वर्णावा? हत्तीवरून साखर वाटण्यात आली. शेतसारे कमी करण्यात आले. कैद्यांना सोडण्यात आले. शहरांतून, खेड्यापाड्यांतून रोषणाई करण्यात आली. गाणे बजावणे चालू होते. मौज होती, आनंद होता.

राजाच्या दरबारात एक विदूषक होता. त्याला राजाने विचारले, ‘‘सर्वत्र सोहळा आहे, आनंद आहे. तुम्हाला हा प्रसंग कसा वाटतो?’’

विदूषक म्हणाला, ‘‘शौचास व्हावे तसा वाटतो.’’

राजा रागावला. त्याने विदूषकाला घालवून दिले. एका झोपडीत विदूषक राहू लागला, परंतु काही दिवसांनी राजाला करमेनासे झाले. त्याने विदूषकाला बोलावणे पाठविले. विदूषक गेला नाही.

तेव्हा स्वत: राजा विदूषकाकडे आला व म्हणाला, ‘‘चल बाबा, तुझ्यावाचून सारे अळणी आहे.’’

‘‘महाराज, आपण आलात, आज माझ्या हातचे जेवा. मग तुम्ही नि मी नावेतून दूर जाऊ. मान्य करा.’’

राजाने मान्य केले. विदूषकाने पंचपक्वान्नांचे जेवण केले. राजाला आग्रह करकरून वाढले. नंतर दोघे नावेत बसून जलविहाराला गेले. विदूषकाने नाव दूर दूर नेली, परंतु राजाचे पोट दुखू लागले. तो कष्टी दिसू लागला.

‘‘काय होते महाराज?’’

‘‘नाव मागे फिरव. लवकर किनाऱ्याकडे ने. पोटात कळा येतात.’’

‘‘ते बघा नदीतील बेट. तेथे लावू का जरा नाव?’’

“लाव कुठेही. मला शौचास लागली आहे बळकट.”

विदूषकाने नदीतील बेटाला नाव लावली. राजा घाईघाईत उतरला. बेटावरील झुडपांच्या आड बसून त्याने शौचविधी आटोपला. त्याला हलके वाटले. तो आनंदला. पुन्हा नावेवर तो चढला.

“महाराज, आता कसे वाटते?”

“काय सांगू? ब्रह्मानंद वाटतो रे. कसे हलके हलके वाटते आहे.”

“महाराज, मी मागे म्हटले की, तमच्या मुलाचा सोहळा शौचानंदाप्रमाणे आहे. तर तुम्हाला राग आला, परंतु हा आनंद म्हणजे ब्रह्मानंद असे तुम्हीच म्हणता. पुत्रजन्माचा उत्सव मी तुच्छ नव्हता मानला. तो ब्रह्मानंदाच्या बरोबरीचा असे मी म्हटले.”

“शहाणा आहेस रे तू. म्हणून तर तुला न्यायला आलो. तू हसवतोस परंतु ज्ञान देतोस.”

✦✦✦

# लाडकूची गोष्ट

एका गावात एक मुलगा होता. त्याचे आईबाप लहानपणीच वारले. मावशीने त्याचा सांभाळ केला. माय मरो, मावशी जगो म्हणजे आहे. मावशीलाही कोणी नव्हते. भाच्यावर तिचा सारा जीव. भाच्याचे नाव लाडकू. लाडकू दिवसभर हिंडे; फिरे. काम ना धाम. संध्याकाळी घरीही वेळेवर यायचा नाही. मावशी म्हणायची, ''वेळेवर येत जा रे घरी.'' लाडकू लवकर का येता आले नाही याच्या रोज नवीन नवीन सबबी सांगायचा आणि मावशीचा राग शांत व्हायचा.

एके दिवशी रात्रीचे दहा वाजले तरी लाडकूचा पत्ता नाही. मावशी दारात उभी होती. रागाने म्हणाली, ''त्याला आज घरातच घेत नाही.''

इतक्यात धापा टाकीत कावराबावरा झालेला लाडकू आला. त्याच्या तोंडातून जणू शब्द फुटेना. मावशीने विचारले,

''काय झाले लाडकू? असा का?

''काय सांगू? मरणाची वेळ आली होती मावशी. खरेच सांगतो.''

''काय झाले? आत ये बाळ.''

घरात येऊन भाचा म्हणाला, ''लवकर घरी येण्यासाठी म्हणून निघालो, परंतु त्या जंगलातून वाघ आला. मी पटकन् झाडावर चढलो. वाघ झाडाच्या मुळाशी बसलेला. खाली कसा उतरणार मी? आणि मावशी, मला एकीची घाई झाली. मी वरूनच मग एकी करू लागलो. तो काय आश्चर्य? ती धार धरून वाघ वर येऊ लागला मावशी. मी घाबरलो. एकदम एकी बंद झाली, परंतु धार थांबल्यामुळे वाघ धपकन खाली पडला आणि दगडावर आपटल्यामुळे मेला. मी हळूच खाली उतरलो न जाणो असली धुगधुगी तर पाठोपाठ यायचा म्हणून

पळत आलो. मावशी, खरेच लवकर येणार होतो घरी. उशीर झाला म्हणून रागवू नकोस.''

मावशीची हसता हसता मुरकुंडी वळली व म्हणाली ''लाडकू, लबाड आहेस हो तू. आज तुला घरात घेणार नव्हते. बरे, चल जेवायला.''

+++

## पाखरू उडाले

''आज तुम्ही गोष्ट गोष्ट करीत आहात. पाऊसही पडत आहे. गोष्ट तर सांगायला हवी. छोटी चालेल का?''

''चालेल.''

''ऐका तर. अगदी लहान मुलांची गोष्ट. बहीण भाऊ खेळत होते. चेंडू आपटला की वर जायचा. भाऊ बहिणीला म्हणाला, ''ताई, यात पाखरू आहे कोंडलेले. आपण चेंडू आपटला की, ते पंख फडफडवते व चेंडू वर उडतो. आपण त्या पाखराला सोडू. ये.''

ताई म्हणाली, ''खरंच दादा. किती त्रास होत असेल त्या पाखराला. आपण हळूच भोक पाडू. आतल्या पाखराला तर लागता कामा नये. मी आधी नुसती सुई टोचून पाहते.''

तिने सुई टोचली. चेंडू जरा बारीक झाला. त्यांनी तो आपटला. तो वर उडेना.

भाऊ म्हणाला, ''ताई, पाखरू उडून गेले की काय? चेंडू उडत नाही.''

ताई म्हणाली, ''गेले असावे उडून, परंतु उडताना दिसले नाही. सुईच्या लहानशा भोकातून का गेले? काही असो. गेले बिचारे. छान झाले नाही?''

''हो छान झाले. पाखरू उडाले.''

दोघेजण नाचू लागली. संपली गोष्ट.

''अशी कायही गोष्ट! अगदीच लहान. दुसरी सांगा.''

''कोणाची सांगू? झाडामाडाची की भुताखेताची? थोरामोठ्यांची की छोट्यामोठ्यांची? नवलकथा सांगू की सत्यकथा?''

+++

## बापूजींचा चुटका

''आधी एक बापूजींचा चुटका सांगा.''

''बारा भागांतून ते सारे येणारच आहे.''

''ते येईल तेव्हा येईल. आता सांगा.''

''सांगतो ऐका. एकदा बापूजी सायंकाळचा आहार घेत होते. कोणी द्राक्षे आणून दिली होती. बापूजी पाच पदार्थांहून अधिक एकाचेही घेत नसत. ते फळे खात होते. त्याच वेळेस त्यांच्या भेटीस कोणी कुटुंब आले. आईबाप, लहान मुलगा अशी मंडळी होती. प्रणाम करून सारी बसली. लहान मुलगा आईला म्हणाला,

''गांधीजी वेडे आहेत.''

''अरे, असे बोलू नये.''

''होय. वेडेच आहेत गांधीजी. अगदी वेडे.''

''चूप.''

गांधीजींचे लक्ष गेले. ते हसून म्हणाले, ''काय म्हणतो आहे लबाड? काय रे?''

''तुम्ही वेडे आहात.''

''मी वेडा? का रे?''

''तुम्ही एकटे एकटे खाता. आई मला मागे म्हणाली, एकट्याने खाऊ नये. एकट्याने खाणे म्हणजे वेडेपणा. तुम्ही तर एकटे खाता.''

गांधीजींना हसू आवरेना. सर्वांना हसू आले.

''बरे, माझ्याबरोबर तू ये खायला. ही घे फळे. ये.''

''मला नको.''

“का?”

“आई पुन्हा रागावेल. दुसऱ्याने दिले तरी हावऱ्यासारखे घेऊ नये असे ती सांगते. मला घरी रागावेल, हावरट म्हणेल.”

“परंतु तू एकदम नको घेऊस. मी आग्रह करतो. म्हणजे नाही हावरट होणार. तूही मग शहाणा आणि मीही. खरे ना?”

असा हा चुटका. छान आहे ना?

+++

# मारुतीची गोष्ट

मारुती हा चिरंजीव आहे. जोवर जगात रामकथा आहे तोवर मारुतीला मरण नाही.

रामाचा अवतार संपला होता व कृष्णाचा सुरू होता. हिंडता हिंडता तो द्वारका शहराजवळ आला. शहराबाहेरच्या बागेतील वृक्षावर बसला. तेथे पहारेकरी होते.ते त्याला हाकलू लागले.

''ही बळरामांची बाग. चालता हो. बळराम रागावतील.''

''हा कोण बळराम?''

''बळराम द्वारकेचा राजा.''

''जगात एक राम झाला– हा दुसरा बळराम कोण?''

असे म्हणून मारुतीने त्या सर्व पहारेकऱ्यांना शेपटात बांधले आणि दूर भिरकावले. ते रडत बळराम महाराजांकडे आले. त्यांनी सारी हकिकत सांगितली. बळरामाने सैनिक पाठविले. ते येऊन मारुतीला ''माकडा, चालता हो'' म्हणाले.

मारुतीने विचारले, ''तुम्ही कोण?''

''बळराम महाराजांचे सैनिक.''

''हा बळराम कोण?'' असे म्हणून मारुतीने त्यांना शेपटात बांधून भिरकावले.

आता मोठी सेना पाठविण्यात आली. मारुतीने आपले शेपूट लांबविले व सर्वांना बांधून दूर फेकले. कृष्णाच्या कानावर गोष्टी गेल्या. सर्वांचा गर्व दूर होत आहे हे पाहून त्याला आनंद झाला. मी मी म्हणणारे सारे फेकले जात होते.

शेवटी कृष्ण एकाला म्हणाला, ''जा, त्याला सांग की, हे शहर रामाचे आहे.''

एक सैनिक भीत भीत आला. ''हे शहर रामाचे आहे.'' भीत भीत हळूच म्हणाला.

''दाखव, मला राम दाखव.'' मारुती म्हणाला.

तो सैनिक घाबरला. पळणार तो मारुतीने शेपटात त्याला पकडले, ''चल, मी तुझ्याबरोबर येतो, दाखव राम.'' मारुती म्हणाला.

मुठीत प्राण घेऊन तो सैनिक जात होता. इकडे कृष्णाने रामाचे रूप धारण केले. बळराम लक्ष्मण झाला. ''सत्यभामेला जाऊन सांग की, सीता होऊन ये.''

नारद कळलाव्या. त्याने सत्यभामेला सांगितले. ती त्याला म्हणाली, ''नारदा, सीता कशी होती?''

''उंची वस्त्रे नेस. खूप दागिने घाल.''

सत्यभामा नटली, काजळकुंकू ल्याली. राम आणि लक्ष्मण बसले होते. सीता तेथे आली.

तो कृष्ण हसला. ''वनात का अशी सीता होती? जा तू. नारदा, रुक्मिणीला सांग जा.''

रुक्मिणीला निरोप कळताच ती, एकदम सहज साधी सीता झाली. रामाजवळ येऊन बसली. तेथे गर्दी जमली. तो मारुती आला. समोर राम दिसला. मारुती धावला, चरणांवर डोके ठेवता झाला!

रामाने त्याला हृदयाशी धरले व सांगितले, ''मारुते, पूर्वीचा राम मी कृष्ण झालो, लक्ष्मण बळराम झाला. पूर्वी मी मोठा भाऊ होतो, आता लक्ष्मण मोठा भाऊ. पूर्वी त्याने माझी सेवा केली, आता त्याची मी करतो. तो राजा.''

मारुतीने पुन: पुन्हा प्रणाम केला व जाताना म्हणाला, ''देवा, तू अनंत रूपधारी परंतु तुझे वनवासातले रूपच मला आवडते!''

मारुती रामनामाचा जप करीत गेला. राम, लक्ष्मण, सीता पुन्हा कृष्ण, बळराम, रुक्मिणी झाली. गंमत झाली.

+++

# भीमाची गोष्ट

एकदा पांडवांकडे कसला तरी सण होता. धर्माला वाटले की, कृष्णालाही आज जेवायला बोलवावे. आधी कळवता आले नव्हते, परंतु कृष्ण आढेवेढे घेईल असे कोणालाच वाटले नाही.

धर्मराज अर्जुनाला म्हणाले, ''तू जा. देवाचे तुझ्यावर सर्वात अधिक प्रेम. घेऊन ये त्याला जेवायला.''

अर्जुन निघाला. आज कृष्ण सर्वांची परीक्षा करणार होता. देव पलंगावर झोपून राहिले. अर्जुन हाका मारीत आला. कृष्ण भगवान झोपलेले. देवाला जागे करून अर्जुन म्हणाला,

''जेवायला चल आधी. सारे खोळंबले आहेत.''

कृष्ण म्हणाला, ''अर्जुना, आज बरे नाही वाटत. पडूनच राहतो.''

अर्जुन म्हणाला, ''तुला अगदी माज चढला वाटते आज? मी आग्रह नाही करीत बसणार. देवा, येतोस की नाही?''

''अरे, मला का आग्रह लागतो? तू जा.'' देव म्हणाले.

अर्जुनाच्या बोलावण्यानेही देव आला नाही. आता काय करायचे?

नकुल म्हणाला, ''मी जाऊन येतो.''

कृष्णाने त्यालाही गोड बोलून दिले लावून. सहदेवाची तीच गत झाली. आता राहिला गदाधारी भीम.

''मी जाऊ का दादा?'' त्याने धर्माला विचारले.

त्याबरोबर सारे खो खो करून हसू लागले. ''तू का त्याला गदेची धमकी देणार की ऐरावत स्वर्गातून आणलास त्याप्रमाणे त्याची गठडी बांधून आणणार?'' अर्जुनाने विचारले.



श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

धर्मराज शांतपणे म्हणाले, ''हसू नका रे. तुम्ही सारे जाऊन आलात. त्यालाही जाऊन येऊ दे. भीमा, जा तू. यांच्या हसण्याकडे नकोस लक्ष देऊ.''

भीम निघाला. कृष्णाने तर्क केलाच होता की, आता भीमदादा येतील म्हणून. त्याने कपाळावर सुंठ घातली होती. चांगलेच नाटक केले.

भीम येऊन म्हणाला, ''देवा, चल जेवायला.''

''अरे, तुम्हाला का वेड लागले? मला का आग्रह लागतो? भीमा, फारच दुखते हो आज डोके.'' देव म्हणाला.

''कृष्णा, मी तुला कधी कसली प्रार्थना आजवर केली नाही. अर्जुनाने तुला घोडे हाकायला बसविले. त्याने प्रतिज्ञा कराव्या, तुला त्या निस्तराव्या लागायच्या. मी साऱ्या जन्मात आज तुला प्रार्थायला आलो. ही पहिली आणि शेवटची प्रार्थना. चल हो देवा.''

''नको हो भीमा, खरेच जा तू. धर्माला सांग की, डोके फार दुखते आहे म्हणून.''

भीम खिन्न वदन करून निघाला, परंतु तो घरी नाही गेला. कृष्णाच्या घराजवळ महादेवाचे मंदिर होते. त्या मंदिरात भीम गेला. गाभाऱ्याचे दार लावून तो ओक्साबोक्शी रडत बसला.

कृष्ण हसत हसत बाहेर आले. मनात म्हणाले, ''एकजणही म्हणाला नाही की, येणार नसशील तर येथे डोके फोडतो म्हणून. फुकट सारे.'' ते बागेत आले तो त्यांना मोठा हुंदका ऐकू आला. भीमाचे रडणेही भीमासारखेच. कृष्ण त्या रडण्याच्या अनुरोधाने मंदिरात आले. गाभाऱ्याचे दार लावलेले. जोराने धक्का देताच ते उघडले. तो शंकराच्या पिंडीला भीमाच्या डोळ्यांतील गंगायमुनांचा अभिषेक होत आहे असे दृश्य देवाला दिसले.

''हे रे काय? अरे तू रडतोस? साऱ्या जगाला तू रडवणारा. भीमा, उगी. वेडा कुठला.'' देव त्याला शांत करू लागला.

भीमाला अधिकच हुंदका आला.

''रडू नकोस. चल मी येतो. काय करायचे?'' कृष्ण म्हणाला.

आणि भीमाने डोळे पुसले. त्याचे तोंड हर्षाने फुलले. दोघे हसतबोलत हातात हात घालून आले. कृष्ण आलेला पाहताच धर्माला अपार आनंद झाला, परंतु बाकीच्यांची तोंडे जरा पाहण्यासारखी झाली होती.

''देवा, तू लबाड आहेस.'' अर्जुन म्हणाला.

''देव भावाचा भुकेला.'' कृष्ण म्हणाला.

+++

# सुंदर कथा

मुलांवर साने गुरुजींची अपरंपार माया. मुलांमध्ये ते फुलत–खुलत. आपल्याजवळ जे जे काही सर्वोत्कृष्ट ते ते या मुलांसाठीच, अशी त्यांची भावना असे. त्यांचे समवयस्क त्यांचा स्नेह लाभावा म्हणून झुरत, पण गुरुजींच्या मनाच्या पाकळ्या उमलवण्याचे सामर्थ्य त्यांच्यात नसे. 'मुले म्हणजे देव' 'मुले म्हणजे राष्ट्राची मोलाची ठेव' असे साने गुरुजींना वाटे. प्रभूशी आपला संबंध जोडणारा हा एक दुवा आहे. अशी त्यांची भावना होती. मुलांची बुद्धी प्रखर आणि मने कोवळी असावीत यासाठी ते लिहीत. मुले हा त्यांच्या साहित्याचा वाचकवर्ग. त्या मुलांना समोर कल्पूनच ते सारे लिहीत, बोलत. वात्सल्यात ओला होऊन प्रत्येक शब्द त्यांच्या लेखणीतून उमटे. ते म्हणत,

**'करी मनोरंजन जो मुलांचे,**
**जडेल नाते प्रभूशी तयाचे.'**

**– यदुनाथ थत्ते**

## न्याय जिवंत झाला !

"मग तू देतोस की नाही तुझे शेत? मी म्हणून तुला इतकी किंमत देत आहे. अरे, आजूबाजूला आता सगळीकडे माझी जमीन! मध्ये तुझेच हे शेत आडवे येते. मी सांगतो ऐक. आढेवेढे नको घेऊस!" केशवचंद्र म्हणाले.

"माझी जमीन विकणार नाही. गावातली सगळी जमीन तुम्ही या ना त्या मार्गाने आपलीशी केलीत. आता माझ्या या सोन्यावाणी तुकड्यावरही तुमची गिधाडी दृष्टी आली. राग नका मानू दादा; परंतु खरे ते मी सांगतो. वाडवडिलांपासून चालत आलेली ही जमीन. ही का मी विकू? जमीन म्हणजे आई. आईला का कोणी विकतो? राहू द्या एवढी जमीन. पोटापुरते ती देते. मुलेबाळे तेथे येतात, खपतात, खेळतात. सत्तेची जमीन सोडू नये, दादा!" भीमा म्हणाला.

"भीमा, जमीन नाही ना देत?"

'कशी द्यायची?"

"द्यायची की नाही ते सांग!"

"नाही, त्रिवार नाही!"

"याद राख! तुझीही ही मगरूर वृत्ती तुला मातीत मिळवल्याशिवाय राहणार नाही. माझी गिधाडी दृष्टी तुला भिकेला लावल्याशिवाय राहणार नाही!"

"देव काही मेला नाही, केशवबाबा!"



श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

''जेथे सत्ता नि संपत्ती असते तेथे देव असतो, समजलास! देव माझ्या तिजोरीत आहे!''

''माझा देव सर्व जग व्यापून राहिलेला आहे!''

''बघतो तुला वाचवायला कोण येतो ते! हे तुझे शेत गेले समज आणि तुला पैही न मिळता. आज मी तुला तू मागशील ती किंमत द्यायला तयार झालो होतो; परंतु तुझी बुद्धी भ्रष्ट झाली आहे. तू तरी काय करशील? ठीक तर!'' असे धमकीचे भाषण करून केशवचंद्र निघून गेले.

शेतातील विहिरीच्या काठी भीमा बसला होता. त्याचे ते लहानसे शेत; परंतु खरेच सोने पिकवी. भीमाच्या वाडवडिलांच्या हातची तेथे झाडे होती. त्यानेही दोन-चार कलमे लावली होती. विहिरीच्या कडेला फुलझाडे होती. पलीकडे त्याचा लहानसा गोठा होता. भीमाचा शब्द ऐकताच गोठ्यातील गाय हंबरायची. खरोखरच त्या शेतावर भीमाचे जीव की प्राण प्रेम होते. ते विकणे त्याच्या जिवावर येत होते. केशवचंद्रांनी गावातील जवळजवळ सारी जमीन गिळंकृत केली होती. सावकारी पाशात सारे शेतकरी सापडले. पाचाचे दहा झाले, दहाचे शंभर झाले आणि मग ते देणे कधी फिटायचे? शेताचे मूळचे मालक मजूर झाले. अजून हा भीमाच काय तो तेथे स्वाभिमानाने आपल्या शेताचा मालक म्हणून नांदत होता. केशवचंद्रांना ते सहन होत नव्हते. गोडीगुलाबीने भीमा शेत विकतो का ते ते बघत होते; परंतु काही केल्या जमेना. आज सकाळी ती शेवटची बाचाबाची झाली. सावकार का ही जमीन लाटणार? या जमिनीचा मी मालक. उद्या मला येथे मजूर म्हणून का कामासाठी यावे लागेल? भीमा विहिरीच्या काठी बसून विचार करीत होता. त्याचे तोंड चिंतेने जरा काळवंडले. इतक्यात त्याची वडील मुलगी भीमी लहान भावंडाला घेऊन आली.

''बाबा, आईने घरी बोलावले आहे.'' ती म्हणाली.

''कशाला गं, पोरी?''

''सावकार आला आहे घरी.''

''काय म्हणतो तो?''

''आईला म्हणाला, 'हजार रुपये घ्या व शेत द्या!' आणि मला म्हणाला, 'तुझ्या बापाला काही कळत नाही.' बाबा, शेत का तुम्ही विकणार?''

'प्राण गेला तरी विकणार नाही. तुझी आई काय म्हणाली?''

''ती म्हणाली, 'त्यांना विचारा.' आणखी आई त्यांना म्हणाली, 'पैसे काय, आज आहेत उद्या नाहीत, जमीन कायमची सत्तेची. ती विकून कुठे जायचे?''

''शहाणी आहे तुझी आई!''

भीमा मुलीबरोबर घरी आला. सावकार निघून गेला होता. बायकोने सारी बोलणी भीमाच्या कानावर घातली.

''साप आहे तो मेला! तो आपला सत्यानाश केल्यावाचून राहणार नाही!'' तो म्हणाला.

''गावातील सारे शेतमालक मजूर झाले. त्यांच्या बाबतीत देव मेला, तसा आपल्या बाबतीतही मरायचा!''

''त्यांनी हिंमत सोडली म्हणून त्यांचा देव मेला! जो सत्यासाठी उभा राहतो त्याचा देव मरत नाही. समजलीस?''

काही दिवस गेले. केशवचंद्राने न्यायालयात फिर्याद केली. भीमाकडे असलेली जमीन वास्तविक आपली आहे. जुने कागदपत्र सापडले आहेत त्यावरून हे सिद्ध होत आहे, वगैरे त्याचे म्हणणे. न्यायाधीश केशवचंद्रांच्या मुठीतले. पैशाने कोण वश होत नाही! भीमाला न्यायालयात बोलावण्यात आले. केशवचंद्राने म्हातारे शेतकरी पैशाने विकत घेऊन साक्षीदार म्हणून आणले होते. त्याने आपली बाजू मांडण्यासाठी कायदेपंडितही आणला होता. भीमाची बाजू कोण मांडणार? तो न्यायाधीशास एवढेच म्हणाला,

''महाराज, देवाधर्माला स्मरून मी सांगतो की ही माझी जमीन आहे. वाडवडिलांपासून ही चालत आली आहे. सावकाराला बघवत नाही. हजार रुपये द्यायला तयार झाला होता...''

''हजार रुपये? थापा मार! त्या तुकड्याचे का कोणी हजार रुपये देईल?''

''देवाला माहीत आहे!''

''देव दूर आहे आभाळात. येथे तुम्ही आम्ही आहोत. कागदपत्रं काय सांगतात? हे म्हातारे शेतकरी साक्षीदार का खोटे सांगतात?'' वकील म्हणाला.

न्यायाधीशाने भीमाची मालकी काढून घेतली. केशवचंद्राचीच जमीन आहे, असा त्याने निर्णय दिला. भीमा बाहेर येऊन आकाशाकडे हात करून म्हणाला,

''तुझ्या जगात देवा, का न्याय नाही?''

“न्याय आमच्या हातात असतो, भीमा. देवबीव सत्तेजवळ असतो, संपत्तीजवळ असतो.” वकील कुऱ्यांने म्हणाला.

भीमा दु:खाने घरी गेला. तो कपाळाला हात लावून बसला.

“काय लागला निकाल?” बायकोने विचारले.

“आपण चोर ठरलो नि चोर मालक ठरला. आपण उद्यापासून मजूर झालो.” तो दु:खाने बोलला.

त्या गावातील सारे गोरगरीब केशवचंद्राच्या नावे खडे फोडीत होते; परंतु करतात काय?

या प्रांताचा राजा दौऱ्यावर निघाला होता. केशवचंद्राने वशिला लावून राजा आपल्या गावी येईल असे केले. गाव शृंगारण्यात आला आणि एक सुंदर सभामंडप उभारण्यात आला. तेथे राजासाठी सिंहासन तयार करण्यात आले होते. राजाच्या सत्कार समारंभासाठी आजूबाजूच्या पाचपन्नास कोसांतील शेकडे मोठमोठी माणसे येणार होती. सरदार–जहागीरदार, सावकार, व्यापारी येणार होते. तेथे फक्त गरिबांना येण्यास बंदी होती. केशवचंद्राला गावातील लोकांची भीती वाटत होती. राजाच्या कानावर ते कागाळ्या घालतील, अशी त्याला शंका होती. म्हणून त्याने सर्वांना ताकीद दिली की, त्या दिवशी घराबाहेर फिरकू नका. राजा जाईपर्यंत आपापल्या झोपड्यांत बसून राहा.

सभामंडप भरून गेला होता. आजूबाजूच्या पाचपन्नास कोसांतील साऱ्या संपत्तीचे तेथे जणू प्रदर्शन होते. नटूनथटून श्रीमंत मंडळी आली होती. आणि बारा वाजले. राजा आला वाटते? हां, हे बघा घोडेस्वार! आणि वाद्ये वाजू लागली. जयघोष कानावर आले.

सारे शेतकरी भीतीने घरात बसून आहेत; परंतु भीमा कुठे आहे? गावाबाहेर एक जुने देवीचे मंदिर होते. त्या मंदिरात एक प्रचंड घंटा होती. गावात कोणी मेले, तर ती घंटा वाजविण्यात येई. भीमा आज त्या मंदिरात गेला आणि ती घंटा दाणदाण वाजवू लागला.

“कोण मेले?” म्हाताऱ्या गुरवाने विचारले.

“न्याय मेला.” भीमा म्हणाला.

“खरेच, न्याय उरला नाही.” देवीचा तो पुजारी म्हणाला.

घंटेचा आवाज ऐकून देवीच्या देवळाकडे शेतकरी येऊ लागले, 'कोण मेले' म्हणून विचारू लागले. 'न्याय मेला' असे जो तो उत्तर देऊ लागला.

'मोठ्याने घंटा वाजवा. न्याय मेला!' तरुण म्हणू लागले.

एक थकला की दुसरा वाजवू लागे. तो थकला की तिसरा. सारा गाव दणाणून गेला.

तिकडे सभामंडपात राजाचा सत्कार होत होता. मानपत्र वाचले जात होते. परंतु त्या घंटेचा दाणदाण आवाज तेथे ऐकू येत होता आणि मानपत्र मात्र कोणालाच ऐकू जाईना.

''कसला हा आवाज?'' राजाने विचारले.

''कोणीतरी मेले असावे. गावचा रिवाज आहे की, कोणी मेले तर घंटा वाजवायची.'' केशवचंद्र नम्रपणे म्हणाला.

''आमचे येणे म्हणजे अपशकुनच झाला म्हणावयाचा. कोण मेले, चौकशी तरी करा.'' राजा म्हणाला.

दोन घोडेस्वार चौकशीसाठी पाठवण्यात आले. देवीच्या देवळाजवळ अपार गर्दी होती.

''काय आहे भानगड? कोण मेले!'' घोडेस्वारांनी विचारले.

''न्याय मेला!'' लोक गर्जले.

ते घोडेस्वार आश्चर्य करीत आले. त्यांनी येऊन राजाला सांगितले, ''महाराज, न्याय मेला!''

''मी जिवंत आहे तोवर न्याय कसा मरेल? चला, मला पाहू दे काय आहे भानगड ती!''

राजा रथातून निघाला, त्याबरोबर सारेच निघाले. कोणी घोड्यावरून, कोणी पायी निघाले.

तिकडे भीमाने काय केले ते ऐका. तो लोकांना म्हणाला,

''आपण न्यायदेवाची एक प्रतिमा करून ती तिरडीवर ठेवूया. खांद्यावरून ती नेऊया. 'न्याय मेला, हाय हाय; न्याय मेला, हाय हाय' असे दुःखाने म्हणूया!'' सर्वांना ती कल्पना आवडली. एक तिरडी तयार झाली. तिच्यावर न्यायदेवतेची एक प्रतिमा निजवण्यात आली. खांद्यावर घेऊन लोक निघाले.

तिकडून राजा हजारो शेठसावकारांसह, शेकडो सरदार जहागीरदारांसह येत होता आणि इकडून ती न्यायदेवाची प्रेतयात्रा येत होती. दोघांची वाटेत गाठ पडली. राजा रथातून खाली उतरला व तो शेतकऱ्यांकडे जाऊन म्हणाला,

''तुम्ही हे काय म्हणता? मी जिवंत असताना न्याय कसा मरेल?''

''या गावात तरी न्याय नाही!'' भीमा म्हणाला.

''काय आहे तुमची तक्रार?'' राजाने विचारले.

''महाराज, या गावचे शेतमालक आज मजूर झाले. ज्या केशवचंद्राने तुमचे स्वागत आज मांडले आहे, त्यानेच आमचे संसार धुळीला मिळविले. पाचाचे पन्नास केले नि साऱ्या जमिनी तो बळकावून बसला. महाराज, या गावातील सर्वांच्या जमिनी गेल्या तरी माझी उरली होती. केशवचंद्र म्हणे, 'हजार रुपये घे, परंतु ती मला विकत दे!' मी जमीन विकायला तयार नव्हतो. तेव्हा खोटा खटला भरून माझ्याजवळून जमीन हिसकावून घेण्यात आली. न्यायाधीश पैशांचे मिंधे. वकील म्हणाला, 'देव आकाशात नसतो, पैशाजवळ असतो!' महाराज, खरेच काय देव उरला नाही? न्याय उरला नाही? तुमच्या भोवती दागदागिन्यांनी सजलेली ही बडी मंडळी आहेत, आणि ही इकडची गरीब मंडळी पाहा. या आयाबाया, ही आमची मुले. ना पोटभर खायला, ना धड प्यायला. कसे जगावयाचे? श्रमणारे आम्ही. परंतु आम्हीच मरत आहोत. आम्ही सारे पिकवतो आणि हे खुशालचेंडू पळवतात. न्याय, कोठे आहे न्याय?

वाडवडील म्हणत, 'जो नांगर चालवील तो खरा मालक.' परंतु आज गादीवर बसणारा मालक ठरला आणि आम्ही श्रमणारे चोर ठरलो, अन्नाला महाग झालो. महाराज, कोठे आहे न्याय? या केशवचंद्राने आम्हाला आज घरातून बाहेर पडू नका म्हणून बजावले. आम्ही तुमच्या कानांवर गोष्टी घालू अशी त्याला भीती वाटली; परंतु मला घंटेची आठवण झाली. न्याय मेला, तुम्हास कळवावे म्हणून आम्ही सारे घंटा वाजवीत बसलो.''

''चला त्या मंडपात. मी सारी चौकशी करतो.'' राजा म्हणाला.

सारी मंडळी सभामंडपात आली. एकीकडे श्रीमंत बसले. एकीकडे गरीब बसले. राजाने सारी चौकशी केली. केशवचंद्राचे गुन्हे सिद्ध झाले. तो पैसेखाऊ न्यायाधीश, तो वकील, सारे तेथे अपराधी म्हणून उभे राहिले.

''यांना कोणती शिक्षा देऊ? तोफेच्या तोंडी देऊ?'' राजाने विचारले.

“त्यांना मारण्याची जरूरी नाही. ते आमच्यात राहोत. आमच्याबरोबर खपोत, श्रमाचे खावोत, त्यांची बुद्धी आमच्या कामी पावो, आमचा हिशेब ठेवोत. महाराज, या गावची जमीन साऱ्या गावाच्या मालकीची असे करा. सारे मिळून श्रमू. येथे स्वर्ग आणू. येथे नको कोणी उपाशी, नको कोणी चैन चालवणारा.” भीमा म्हणाला.

“तुमचा प्रयोग यशस्वी करा. भरपूर पिकवा. नवीन नवीन उद्योग शिका. तुमचा गाव आदर्श करा. तुम्हाला छळणाऱ्यांवरही तुम्ही सूड घेऊ इच्छित नाही, ही केवढी उदार बुद्धी! मला राजालाही आज तुम्ही खरी दृष्टी दिलीत. सूडबुद्धीने शेजारच्या राजाशी मी युद्ध करायच्या विचारात होतो; परंतु आता दुसऱ्या भल्या मार्गाने जाईन. शाबास तुमची! तुमचे समाधान झाले ना?” राजाने प्रेमाने विचारले.

“होय, महाराज!” लोक आनंदाने उद्गारले.

“मग आता काय घोषणा कराल?” राजाने विचारले.

“न्याय मेला होता, परंतु जिवंत झाला, अशी घोषणा करू.” लोक म्हणाले.

राजा निघून गेला. केशवचंद्र व भीमा प्रेमाने एकमेकांस भेटले. तो गाव सुखी झाला, तसे आपण सारे होऊया.

✦✦✦

# विश्वाला नाचवणारा शेतकरी

फार दिवसांपूर्वीची गोष्ट. त्या काळात मोठमोठे यज्ञ होत असत. बारा-बारा वर्षेही चालत. यज्ञप्रसंग म्हणजे उत्सवचे. जणू जत्राच तेथे भरे. हजारो लोक यायचे-जायचे. परस्परांस भेटायचे. तेथे बसलेल्या दुकानांतून माल न्यायचे. तेथे होणाऱ्या कथाकीर्तनांतून, पुराण प्रवचनांतून धर्म शिकायचे. तेथे खेळ असत, कुस्त्या असत. नवीन नवीन नाटके व्हायची व चांगली ठरतील त्यांना बक्षीसे मिळावयाची. अशी त्या काळातील गंमत.

एकदा देवांच्या मनात आले की, कधी झाला नाही एवढा मोठा यज्ञ करावयाचा. त्यांनी दानवांना विचारलं की, "याल का यज्ञाला?" दानव हो म्हणाले.

मानवांनाही निरोप आला. मानवांनीही जायचे ठरविले. देव, दानव, मानव सारे एकत्र जमणार? कधी झाली नव्हती अशी गोष्ट होणार होती. देवांनी हजारो विमाने या सर्वांना आणण्यासाठी पाठवली. सरसर विमाने येत होती; उंच जात होती. त्या विमानांचा आवाज नसे होत. ती शांत-दांत विमाने होती. सारी मंडळी जिवंतपणी स्वर्गात चालली. ढगांतून उंच चालली. त्या विमानांतून हवा मिळण्याची व्यवस्था होती. मानवांना हवेशिवाय राहण्याची सवय नाही. देवांनी हवेशिवाय राहण्याचा कधीच शोध लावला होता.

स्वर्गात आनंदी आनंद होता. नक्षत्रांची तोरणे होती. कल्पवृक्षांच्या माळा ठायी होत्या. देव स्वागताला उभे होते. देव-दानव, मानव परस्परांना भेटत होते आणि महान यज्ञ झाला. स्वर्गातील गाईंचे सुंदर तूप अग्निनारायणाला देण्यात येऊ लागले.

"आई, तूप का जाळतात? आपल्याला का देत नाहीत? आपण घरी नेऊ!" एका मुलाने विचारले.

"देवाला द्यायचे. अग्निदेवाला. काहीतरी विचारू नकोस. लोक हसतील!" आई म्हणाली.

"मी कोरडी भाकर खायची नि या देवाला किती तूप! आई, मला न देता तुला खाववेल का गं?"

"बोलू नको."

"सांग ना!"

"अरे, तुला आधी देईन, मग उरले तर मी खाईन!"

"मग देव असा कसा हावरा? आम्हा मुलांना उपाशी ठेवून आपण तुपाशी जेवतो आहे. ते बघ, तूप ओतताहेत, बघ!"

"बोलू नको रे, बाळ!"

काही दिवस यज्ञ चालला होता; परंतु एके दिवशी चमत्कार झाला. सर्वांना आपण फिरत आहोत असे वाटू लागले. हळू हळू सारे नाचू लागले. ते अग्निकुंड नाचू लागले. तूप ओतणारे, मंत्र म्हणणारे नाचू लागले. तुपाची भांडी नाचू लागली. देव, दानव, मानव सारे नाचू लागले. अप्सरा नाचू लागल्या. नंदनवन नाचू लागले. ऐरावत नाचू लागला. कल्पवृक्ष नाचू लागला. दूरवर सारे नाचता नाचता बघू लागले. सारे ब्रह्मांड नाचत आहे असे त्यांना दिसले. समुद्र, नद्या, नाले नाच करिताहेत. हिमालयादी पर्वत नाचत आहेत. कोणाला काही कळेना. प्रथम मौज वाटली; परंतु मागून सारे घाबरले. विश्वकंप होणार की काय? सारे ब्रह्मांड, सारे त्रिभुवन का कोसळणार? कोट्यवधी तारे का एकमेकांवर आपटणार? काय आहे हे सारे?

"चला, शोध करू!" कोणी म्हणाले.

"सारे दानव, मानव तर येथे. जाऊन कोणाला विचारणार? कोणाला पुसणार?"

"मी जातो. मी नेहमी त्रिभुवनात हिंडणारा, वाऱ्याप्रमाणे जाणारा; प्रभूचे गीत गाणारा नि नाचणारा, मला नाही भय. मला सवय आहे नाचत हिंडायची, गिरक्या घेत जाण्याची." असे नारद म्हणाला.

"नारदा, लवकर ये. आम्ही किती वेळ नाचत राहणार? दोन तास झाले. बसलो तरी गरगर फिरतो. निजलो तरी गरगर फिरतो. वाचव बाबा!" सारे म्हणाले.

नारद प्रकाशाच्या वेगाने निघाले. सारे बघत भूतलावर उतरले. क्षणात हिंदुस्थानातही आले. ज्ञानकिरणांच्या प्रकाशात झटकन सारा देश त्यांनी पाहून घेतला. तो त्यांना एक माणूस नाचताना दिसला. ते पटकन त्याच्याजवळ आले. कोण होता तो मनुष्य? तो का वेडा होता? तो एक शेतकरी होता. समोर सुंदर शेत होते. भाताला लोंबी आल्या होत्या. जवळच फुलांचा मळा होता. पलीकडे सुंदर बैल चरत होते. शेतकऱ्याच्या हातात विळा होता. बांधावरचा चारा तो कापीत होता. वाऱ्याची झुळूक येई नि ते शेत डोले. शेतकरी आनंदला. तो तसाच उभा राहिला. शेताकडे बघून नाचू लागला.

"माझं शेत माझं शेत लई लई छान
माझं शेत माझं शेत आहे माझा प्राण।।
येथे राबेन येथे खपेन
येथे काम येथे राम
संसाराला ना माझ्या मुळी कधी वांण।।
स्वर्गात गेलेले खाली येतील
येऊनी शानी ते काय खातील?
माझें शेत वाचवील त्यांना देऊनिया धान्य।। माझं।।"

असे गाणे गात तो नाचत होता. जणू त्याची समाधी लागली होती. आणि त्याचे शेत नाचू लागले. झाडे-माडे नाचू लागली. बैल नाचू लागले. टेकड्या नाचू लागल्या. हळूहळू त्याच्या नाचात सारे त्रैलोक्य ओढले गेले. त्याच्या त्या सेवाकर्मात, त्या स्वधर्माच्या आचरणात सर्वांना खेचून घेण्याची शक्ती होती. नारद बुद्धिमान. त्याच्या चटकन सारे लक्षात आले. यज्ञयागांचे धर्म निस्सार आहेत. समाजाच्या सेवेचा कोणता तरी उद्योग मन लावून करीत राहणे म्हणजे खरा धर्म, म्हणजे एकमेकांची झीज भरून काढणारा खरा सहकारी यज्ञधर्म. यज्ञ शब्दाचा हा अर्थ. मी पिकवीन, तुला देईन; तू विणून मला दे. एकमेकांना सारे सांभाळून आणि जीवनाचा सर्व बाजूंनी विकास करून घेऊ. नारदाला त्या शेतकऱ्याच्या नाचात, त्या मंगल कर्मोत्साही नृत्यात सारा धर्म दिसला. त्याने त्या शेतकऱ्याच्या चरणांना वंदन केले. तंबोरा हातात घेऊन तोही नाचू लागला. त्या वीणेच्या तारांचा झंकार ऐकताच शेतकरी हळूहळू भानावर आला. परंतु नारद नाचत होता-

"काम करा काम करा
कामामध्ये राम
हातामध्ये काम
अन् मुखामध्ये नाम ।। काम ।।"

शेतकऱ्याने नारदाचे पाय धरले नि विचारले,

"देवा, कोण आपण?"

"मी तुझा शिष्य."

"असे कसे देवा होईल?"

"तसेच आहे. आपापले काम नीट करीत राहणे म्हणजेच धर्म, हे महान तत्त्व तू त्रिभुवनाला नकळत शिकवलेस. तू साधा शेतकरी, परंतु विश्वाला आपल्याबरोबर तू नाचायला लावलेस, धन्य तू!"

✦✦✦

# त्यागातील वैभव

मुलांवर साने गुरुजींची अपरंपार माया. मुलांमध्ये ते फुलत-खुलत. आपल्याजवळ जे जे काही सर्वोत्कृष्ट ते ते या मुलांसाठीच, अशी त्यांची भावना असे. त्यांचे समवयस्क, त्यांचा स्नेह लाभावा म्हणून झुरत, पण गुरुजींच्या मनाच्या पाकळ्या उमलवण्याचे सामर्थ्य त्यांच्यात नसे. 'मुले म्हणजे देव' 'मुले म्हणजे राष्ट्राची मोलाची ठेव' असे साने गुरुजींना वाटे. प्रभूशी आपला संबंध जोडणारा हा एक दुवा आहे अशी त्यांची भावना होती. मुलांची बुद्धी प्रखर आणि मने कोवळी असावी यासाठी ते लिहीत. मुले हा त्यांच्या साहित्याचा वाचकवर्ग. त्या मुलांना समोर कल्पूनच ते सारे लिहीत, बोलत. वात्सल्यात ओला होऊन प्रत्येक शब्द त्यांच्या लेखणीतून उमटे. ते म्हणत,

**'करी मनोरंजन जो मुलांचे,**
**जडेल नाते प्रभूशी तयाचे.'**

**– यदुनाथ थत्ते**

# त्यागातील वैभव

लक्ष्मीला आपले वैभव सर्व देवांगनांना दाखवावे, अशी इच्छा उत्पन्न झाली; परंतु ते केव्हा दाखवायचे? कोणता तरी प्रसंग पाहिजे होता. एखादा उत्सव-समारंभ योजिला पाहिजे होता. ती विचारात होती.

"आज तू सचिंत का दिसतेस?" भगवान विष्णूंनी प्रश्न केला.

"तुमचे पाय चेपून चेपून कंटाळले. लग्न झाल्यापासून तुमचे पाय चुरीत बसले आहे; परंतु पुरे म्हणाल तर शपथ! आधी मुळी बोलायलाच तुम्हाला वेळ होत नाही. सदैव विश्वाची चिंता. ज्याला स्वतःच्या पत्नीच्या सुख-दुःखाची चिंता नाही, तो विश्वाची चिंता काय करणार?" लक्ष्मी रागावून म्हणाली.

"परंतु माझे पाय चेप म्हणून मी कधीतरी सांगितले का? तूच माझ्याकडे आलीस, माझ्या गळ्यात माळ घालून पाय चेपीत बसलीस. तुझ्या स्वयंवर मंडपातसुद्धा मी आलो नव्हतो. मी विश्वाचा सेवक, विश्वाचे पालन करणारा. मला कोठून होणार वेळ, तुला हे समजत नव्हते का?"

"समजत होते, परंतु गर्वाने पण करून चुकले. त्रिभुवनातील झाडून सारे पुरुष माझ्या आशेने आले होते. स्वयंवर मंडपात किती गर्दी! मी दृष्टीस पडावे म्हणून माना उंच करून बघत होते. प्रत्येकाला वाटत होते की, ही लक्ष्मी स्वतःला मिळावी; परंतु माझ्यासाठी लाळ घोटीत येणाऱ्यांना मी कशी किंमत देऊ? जो अजिंक्य आहे, त्याला जिंकण्यात पुरुषार्थ आहे. ते तर सारे केव्हाच माझ्यासाठी वेडे झाले होते. माझ्यासाठी

जो वेडा झालेला नाही, माझी ज्याला इच्छा नाही, त्याला मी माळ घालणार आहे, असा मी माझा पण जाहीर करताच सर्वांची तोंडे काळवंडली, सारे निराश झाले.

कोण असा आहे की, जो माझ्यासाठी वेडा झाला नाही, ते पाहण्यासाठी मी हातात माळ घेऊन निघाले. माझ्यासाठी वेडा न होणारा असा कोण वेडपट आहे? माझी इच्छा न करणारा असा कोण निरिच्छ आहे? लक्ष्मीहूनही थोर असे रत्न कोणाजवळ आहे, ते पाहावयास मी निघाले. तुम्ही दिसलात. विश्वाच्या चिंतेत दिसलात. तुम्ही त्रिभुवनाच्या कल्याण चिंतनात मग्न होता. जगाचे कल्याण करणे ही लक्ष्मीहूनही थोर गोष्ट आहे, असे तुम्हाला वाटत होते. माझ्याकडे ढुंकूनही तुम्ही पाहिले नाही. माझा अहंकार दुखावला गेला. माझ्याकडे ढुंकून न पाहणाऱ्या या वेड्याला माझ्या पायाशी लोळण घेणारा बनवीन, अशा ईर्ष्येने मी तुम्हाला माळ घातली. एक दिवस तुम्ही माझे पाय चेपाल, अशा आशेने मी रात्रंदिवस तुमचे पाय चेपीत बसले. एक दिवस तुम्ही माझे दास व्हाल, या आशेने मी तुमची दासी झाले. तुम्हाला जिंकून घेण्यासाठी नम्र झाले; परंतु देवा, माझा अहंकार गेला. इतकी वर्षे मी तुमचे पाय धरून बसले आहे, परंतु तुम्ही आहात तसेच आहात. कधी बाहेर हिंडायला गेले नाही. कधी मैत्रिणींना भेटले नाही. कधी नटले नाही. शृंगारसाज केला नाही. सारे जीवन जणू फुकट गेले! न पतीचे प्रेम, न सुखभोग, न काही.''

''लक्ष्मी, वेडी आहेस तू. माझे तुझ्यावर प्रेम आहे. प्रेम नसते तर ही तुझी सेवा मला भारभूत वाटली असती. बरे, ते जाऊ दे. तू उद्यापासून काही दिवस इकडे-तिकडे जा. अलंकार घाल. सर्वत्र मिरव. पाहा त्यात आनंद वाटतो का?''

''उगीच का दागदागिने घालून मिरवायचे? ते दाखवायचे तरी कोणाला?''

''मला दाखव.''

''तुम्ही तर विरक्त.''

''मग कोणाला दाखवतेस?''

''तेहेतीस कोटी देवांगना बोलवाव्यात, अप्सरा बोलवाव्यात. पार्वती, सावित्री यांनाही आमंत्रण द्यावे, असे मनात येते; परंतु प्रसंग हवा ना?''

''अगं, आता पृथ्वीवर वसंतपूजा सुरू आहेत. वसंतोत्सव सर्वत्र होत आहेत. हळदी-कुंकवाचे समारंभ होत आहेत. तूही हळदी-कुंकू समारंभ कर. या निमित्ताने साऱ्या देवांगना एकत्र जमा, सुखसंवाद करा. तू सर्वांच्या ओट्या भर. तू समुद्राची

मुलगी. तुला काय तोटा! हिऱ्या-मोत्यांच्या राशी आण. त्यांनी भर ओट्या. तूही अलंकारांनी नट. जरा गंमत करा. माझी ना नाही.''

''मग करू वसंतपूजा? करू हा हळदी-कुंकू समारंभ?''

''कर. मी जरा बाजूला जाऊन बसेन. तेहेतीस कोटी देवांगना येणार. गलबला व्हायचाच. बायकांची तोंडे बंद झाली तर एकदम बंद होतात. मग एक शब्द नाही बोलणार. तोंडे सुरू झाली तर मग आवरणे कठीण! खरे ना?''

''बायकाही शांत राहतात. मी सरस्वतीला बोलवीन. ती सुंदर गाणी म्हणेल. साऱ्या स्त्रिया स्तब्ध बसतील. उगीच स्त्रियांची निंदा नका करू. पुरुषांच्या सभांतून का गोंधळ नसतात? जाऊ दे. आताच भांडण नको. मग, ठरले हं!''

''ठरले.''

लक्ष्मीने तयारी चालविली. ती आधी माहेरी गेली. विष्णूला माळ घातल्यापासून ती पित्याकडे गेली नव्हती. पित्याला अपार आनंद झाला.

''किती दिवसांनी तू आलीस!'' सागर म्हणाला.

''पतीचे प्रेम जिंकून घेईन, मग कोठे ती जाईन, असे मी मनात ठरविले होते. म्हणून आले नाही.'' लक्ष्मी म्हणाली.

''तू व चंद्र दोघे मला फार आवडता. चंद्र वर दिसताच माझे हृदय उचंबळते. सहस्रावधी हातांनी त्याला जवळ घेऊन नाचवावे, खेळवावे असे वाटते; परंतु तो दूरच राहतो. माझे हात पोहोचत नाहीत आणि तो लबाड आहे. आपले संपूर्ण तोंड मला कधी दाखवत नाही. कधी हळूच जरा डोकावतो व अदृश्य होतो. कधी थोडेसे तोंड दाखवतो, जरा हसतो व पळतो. कधी जरा डोळे मिचकावतो व जातो निघून. महिन्यातून फक्त एक दिवस संपूर्ण दर्शन मला देतो. चंद्राचे स्पर्शन नाही तर निदान असे दर्शन तरी होते; परंतु तुझे दर्शनही नाही. रात्रंदिवस मी तुम्हाला हाका मारीत असतो. तुम्हाला भेटण्यासाठी अधीर होत असतो. आज आलीस. पती हे तुझे सर्वस्व! ही गोष्ट जरी खरी असली तरी पित्याचीही आठवण ठेवावी, हो बाळ! आणि तू किती वाळलीस! लग्नाच्या आधी कशी होतीस?'' असे म्हणून सागराने सहस्रावधी प्रेमळ हातांनी मुलीला पोटाशी धरले. डोळ्यांतून गळणाऱ्या अश्रूंनी मुलीला स्नान घातले.

''बाबा, आम्हाला आठवून तुमच्या हृदयाचे अगदी पाणी पाणी होऊन गेले असेल, नाही? परंतु काय करायचे? आताही मी आले आहे; परंतु लगेच जायचे आहे.''



श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

“भेटलीस, पुरे झाले. कर्तव्यकर्म ज्याला त्याला आहे.”

“बाबा, तुमच्याजवळ एक गोष्ट मागायला आले आहे. लग्न झाल्या दिवसापासून मी कधी उत्सव-समारंभ केला नाही. आता मी मोठा उत्सव करणार आहे. सर्व देवांगनांना बोलावणार आहे. त्यांच्या ओट्या भरणार आहे. तुमची काही संपत्ती मला द्या. सर्व देवांगनांची हिरे-माणकांनी ओटी भरावी, मोत्यांच्या अक्षता कपाळी लावाव्यात, असे मनात आहे. माझी इच्छा तुमच्याशिवाय कोण पुरविणार? आणि सुंदर रंगांची पोवळीही हवी आहेत, त्यांची तोरणे करून लावीन. जे जे सुंदर असे तुमच्याजवळ असेल ते ते द्या.”

“बाळे, सारे देईन हो! तुला काही कमी पडू देणार नाही. तुझा गरुड पाठव. तो करील खेपा. तू किती नेणार? तुझा पिता रत्नाकर आहे. माझ्याजवळ मोत्यांची कोट्यवधी शेते आहेत. हिरे-माणकांच्या अनंत खाणी आहेत. पोवळ्यांची लागवड कमी केली होती; परंतु पुन्हा वाढवण्याचे ठरवीत आहे. तू कधी मागितलेच नाहीस. मुलांचे लाड पुरवावेत, त्यांच्या हौशी पुरवाव्यात, हाच आई-बापांचा आनंद असतो.”'

लक्ष्मी पित्याजवळ दोन दिवस राहिली. नंतर निरोप घेऊन जावयास निघाली. पित्याने तिला अमोल अलंकार दिले. सूर्यकिरणांसारखी वस्त्रे दिली. पुत्रीला निरोप देताना त्याची विशाल छाती दुःखाने खालीवर होऊ लागली. त्याला अपार हुंदका आला, तो आवरेना.

“बाबा, हे काय? असे रडू नका. मुली का घरी राहायच्या असतात? त्या पतिगृही जाण्यातच त्यांची कृतार्थता! मी आता मधून-मधून येत जाईन.”

“मी तुझ्या पतिदेवांना एक प्रार्थना करणार आहे.”

“ती कोणती?”

“ते रात्रंदिवस काम करतात. जराही विसावा घेत नाहीत. मी त्यांना सांगेन चार महिने तरी माझ्याकडे येऊन राहात जा. संपूर्ण विश्रांती घेत जा. आठ महिने कष्ट करा. चार महिने विसावा घ्या.”

“परंतु ते ऐकतील का?”

“त्यांना सांगेन की, माझी मुलगी तुमच्या पदरी पडली. मुलीच्या सौभाग्याची पित्याला चिंता असते. तुम्ही रात्रंदिवस अविश्रांत श्रम करून प्रकृती बिघडून घ्याल.

मग माझ्या मुलीच्या दुःखाला सीमा राहणार नाही. संसारात पडले म्हणजे जरा जपून वागावे लागते. मग केवळ आपलाच हेका चालवणे बरे नव्हे, असे त्यांना सांगेन. ते ऐकतील. हजारो हातांनी प्रणाम करून त्यांना प्रार्थीन. बाळे, मग चार महिने येऊन राहशील? पावसाळ्यात चार महिने राहात जा. त्या चार महिन्यांत माझीही प्रकृती जरा बिघडते. पावसाळा असल्यामुळे बाळ चंद्र वर दिसत नाही. त्याला काळे काळे ढग आच्छादून टाकतात. ते मला बघवत नाही. मी खवळतो, गर्जतो, प्रक्षुब्ध होतो. सारे विश्व ग्रासून टाकावे, असे मला वाटते. स्वतःची मर्यादा सोडावी, असाही वेडा विचार मनात येतो. बाळ, ते चार महिने मी कसे दवडीत असेन ते माझे मला माहीत. सारखा अस्वस्थ व अशांत असतो. सारखे सुस्कारे सोडीत असतो. धावत धावत जातो व दगडाधोंड्यांवर डोके आपटू बघतों; परंतु शेवटचा धीर होत नाही. पुन्हा कष्टाने मागे येतो. लक्ष्मी, तूही तुझ्या पतीचे मन वळव. त्याला सांग की, बाबा वृद्ध झाले आहेत. पावसाळ्यात चार महिने त्यांना बरे नसते. त्यांच्याकडेच जाऊन राहू. ते ऐकतील आणि माझ्याकडे राहूनही त्यांना विश्वाचा कारभार चालवता येईल; परंतु त्यांनी विसावा घेणेच बरे! मला आधार होईलं व त्यांना विसावा होईल.''

''बाबा, त्यांना मी सांगेन. आता जाते. फार रडत जाऊ नका. उगीच आमची काळजी करू नका. तुमच्या आशीर्वादाने माझे व चंद्ररायाचे नीट चालले आहे. येते हं मी.''

पित्याचा आशीर्वाद घेऊन लक्ष्मी वैकुंठाला परत आली. एक मोठा प्रासाद उभारण्याचे काम सुरू झाले. त्वष्टा त्या कामावर देखरेख करीत होता. समुद्राच्या निर्मळ फेसापासून प्रासाद उभारण्याचे त्याने योजिले होते. शुभ्र स्वच्छ प्रासाद. मधून मधून हिरे, माणके, पाचू, इंद्रनील वगैरे रत्ने बसविण्यात आली होती. पोवळ्यांचे नयनमनोहर वेल ठायी ठायी सोडण्यात आले होते. शेषाने सर्पांच्या मस्तकावरचे कोट्यवधी तेजस्वी मणी पाठवून दिले. ते मणी सर्पाकार असे भिंतीतून बसविण्यात आले. कुबेर आपले सर्व भांडार घेऊन तेथे आला होता. त्या भांडारातून लागेल तो माल त्वष्टा नेत होता. त्याची यादी करून ठेवण्यात आली. नंदनवनातील कल्पवृक्षांचे पल्लव आणून तेही मधून मधून लावण्यात आले होते. त्वष्ट्याने रत्ने व पुष्पे यांचाच जणू तो प्रासाद बनविला.

''ताई, तुझ्या समारंभात मी कोणते काम करू?'' चंद्राने हळूच येऊन विचारले.

''भाऊराया, तू येऊन सौम्य, सुंदर प्रकाश पाड. तुझा प्रकाश सर्वांना आवडतो. तू उगवलास की सर्वांना आनंद होतो. ताईच्या हळदी-कुंकू समारंभास शोभा आण.''

''मी नक्षत्रांच्या माळा पाठवू का? तू जपून वापरणार असशील तर पाठवीन.''

''हं, पाठव. प्रासादाच्या आत लावू. फार सुंदर दिसतील, नाही?''

''ताई, वायूदेव व पर्जन्यदेव यांचीही फार इच्छा आहे की काही काम करावे म्हणून.''

''त्यांना कसे सांगायचे काम? तू माझा भाऊ म्हणून दिवाबत्तीचे काम तुला सांगितले. तुला सांगायला संकोच नाही.''

''ताई, थोरांकडेच काम करावे व कृतकृत्य व्हावे, असे सर्वांना वाटत असते. तुझा पती विश्वाची काळजी वाहतो. त्याची तू पत्नी. तुझे काम म्हणजे भगवान विष्णूचे काम. सांग, त्यांनाही काही काम सांग.''

''त्यांना काम करण्यात कृतार्थता वाटत असेल तर सांगते काम. आमचे बायकांचे काय? आम्ही सर्वांना राबवून घेऊ शकतो. कोणी नसले तरी एकट्या आम्ही रात्रंदिवस काम करू व प्रसंग पार पाडू. बरे, शंभर माणसे कामाला असली तरीही आम्हाला पुरी होत नाहीत. वायूदेवाला म्हणावे, हळद-कुंकवाच्या दिवशी मंद, शीतल असा वाहत राहा. माझ्या बाबांच्या गावाहून येत राहा. म्हणजे थंडगार असा असशील. तसेच बरोबर सुगंध आण म्हणावे आणि सारे रस्ते स्वच्छ ठेव. इवलासुद्धा केरकचरा त्या दिवशी नको. वाटेत दगडधोंडे, काटे काही नको. सारे म्हणावे उडवून टाक. कोट्यवधी बायका येणार. कोणाला वाहने असतील, कोणाची नसतील. रस्ता सुंदर ठेवणे आपले काम आणि पर्जन्यदेवाला म्हणावे सारा रस्ता शिंपडून ठेव. चिखल नको मात्र होऊ देऊस. बेताचा झिम् झिम् सडा घाल. म्हणजे पायांनी धूळ उडणार नाही. सांग ही त्यांना कामे.''

''सांगेन. त्यांना आनंद होईल. जातो हं ताई!'' असे म्हणून चंद्र गेला.

लक्ष्मीचा आनंद गगनात मावेना. तो प्रासाद पाहून तिची दृष्टी सुखावली. अतिरम्य असा तो प्रासाद होता. त्याच्यावर चंद्राचे किरण पडून तो अधिकच मनोहर दिसला असता. गरुडाने सागराकडून रत्नांच्या राशी आणून ठेवल्या. शिवाय सागराने हिरव्या-निळ्या रंगांची अनंत वस्त्रे पाठविली होती. सर्व रस्त्यांवरून पायघड्या घालण्यासाठी ती दिंडे पाठवण्यात आली होती.

"माझ्या बाबांना सारे सुचले. थोर आहेत माझे बाबा." ती म्हणाली. लक्ष्मीने गरुडाला सर्व देवांकडे जाऊन आमंत्रणे देण्यास सांगितले.

"लक्ष्मीबाई, मी सर्वत्र जाईन; परंतु शंकराकडे जाणार नाही." गरुड म्हणाला.

"का रे बाबा?"

"तेथे तो व्रात्य नंदी आहे. त्याने एकदा मागे एका हुंकारासरशी मला नाकात ओढले. कोण माझी त्रेधा! शिवाय तेथे ती भुते-प्रेते-पिशाच्चे असतात. मला भीती वाटते."

"शंकर तर भोळे. तेथे कशाची भीती?"

"ते भोळे आहेत; परंतु त्यांच्या भोवतालची मंडळी भोळी नाहीत."

"बरे, नको जाऊस. पार्वतीला आपोआप कळेलच की वैकुंठात हळदी-कुंकू आहे म्हणून. तो नारद आहे ना, तो सारी बातमी नेईल. देवलोकीचे ते जिवंत वृत्तपत्र! आणि बोलावले तरी पार्वती येणारही नाही. साऱ्या देवांगना नटूनथटून येणार. पार्वतीला यायला लाज वाटेल. तिच्याजवळ ना धड वस्त्र, ना एखादा दागिना. राहू दे. बाकी सर्वत्र तर जाऊन ये. ब्रह्मदेवाकडे जा. गणपतीकडे जा. कोणास वगळू नकोस. समजलास ना?"

गरुड स्वर्गलोकी गेला. सर्व देवांच्या घरी त्याने निमंत्रण दिले. देवांच्या बायकांना आनंद झाला. आज त्यांना मिरवायला सापडणार होते. साऱ्या देवांगना आपापले अलंकार घासून-पुसून स्वच्छ करू लागल्या. तगवणीची राखीव लुगडी सर्वांनी बासनातून काढली. त्यांनी नीट वेण्याफण्या केल्या. कल्पवृक्षांची फुले त्यांनी केसांतून गुंफिली. त्या अप्सराही नटल्या. इंद्राणीने सर्वांचे झाले का म्हणून चौकशी केली. सारी सिद्धता झाली.

"आई, तुझ्याबरोबर मी येतो." जयंत म्हणाला.

"तू का आता लहान? साऱ्या बायका हसतील." इंद्राणी म्हणाली.

"आईला मूल कितीही वाढले तरी लहानच असते, असे तूच ना परवा बाबांना म्हणालीस?"

"तू ऐकायचा नाहीस. हट्टी आहेस अगदी!"

"जयंत, इकडे ये. जायचे नाही." इंद्राने रागाने सांगितले.

"जा बाळ, मी तुला खाऊ आणीन. पोवळ्याच्या माळा आणीन. असा हट्ट नको करू. ते मारतील हो नाहीतर!"

“तू आता त्याच्याशी बोलत नको बसू. निघा तुम्ही आणि वेळेवर या.”

“एक दिवस मेले जात आहोत जरा बाहेर, तर लगेच हुकूम, ‘वेळेवर या.’ आमचे आटपेल तेव्हा येऊ. समजले ना?”

“चल जयंता, का हवे चौदावे रत्न?” इंद्राने मुलावर राग काढला.

जयंत रडत रडत तेथे उभा राहिला. इंद्राने बकोटी धरून त्याला ओढीत नेले. इंद्राणीने मागे वळून पाहिले. जयंताला बरोबर न्यावे असे तिला वाटत होते; परंतु इतर बायका हसतील म्हणून तिने त्याला बरोबर घेतले नाही. ‘एवढा रडतो आहे तर घ्या त्याला बरोबर.’ असेही इतर देवांगनांनी म्हटले नाही.

शृंगारलेल्या ऐरावतावर सोन्याच्या अंबारीत बसून इंद्राणी चालली होती. बरोबर सर्व देवांगना होत्या. त्या निरनिराळ्या वाहनांवर बसून चालल्या होत्या. रंभा, उर्वशी, तिलोत्तमा, मेनका वगैरे सौंदर्यलतिका सर्व अप्सरांसह निघालेल्या होत्या. नाना परीची वस्त्रे, नाना अलंकार. त्यांच्या लक्षावधी छटा चमकत होत्या. अप्सरा वाटेत गाणी गात होत्या. त्यामुळे अधिकच रंग चढला होता.

सत्यलोकाहून आपल्या मैत्रिणींसह सावित्री निघाली. ब्रह्मदेव वेदाध्ययनात मग्न होते.

“म्हटलं, मी वैकुंठास जाते. अंगाखांद्यावर काय घालू?” सावित्रीने विचारले. ब्रह्मदेवाचे लक्ष नव्हते. तो पुराणपुरुष, तो वेदमूर्ती ज्ञानोपासनेत तल्लीन होता. पुन्हा सृष्टी उत्पन्न करायची झाली तर काय फेरफार करावेत, याचे चिंतन करीत होता. ‘धाता यथापूर्वमकल्पयत्’ या वचनाची त्याला चीड आली होती. आता विधाता नवीन कल्पनेने नवीन विश्व सृजील, असे तो मनात म्हणत होता.

सावित्री चिडली.

“एवढं मेलं माणसानं विचारावं तरी बोलायला वेळ नाही. लग्न तरी केलंत कशाला? ऐकलंत का? मी वैकुंठास जात आहे.” ती त्यांच्या कानात ओरडून म्हणाली.

ब्रह्मदेवाने समाधी सोडली. स्त्रियांसमोर समाधी कशी टिकणार!

“काय म्हणतेस? वैकुंठास जातेस?”

“हो.”

“बरे. पित्याला माझा कृतानेक साष्टांग नमस्कार सांग.”

“प्रणाम सांगेन; परंतु कोणते वस्त्र नेसू, कोणते अलंकार घालू?”

''मला काय ठाऊक, तुझ्याजवळ कोणती वस्त्रे आहेत व कोणते अलंकार आहेत? जे आवडेल ते वस्त्र नेस. आवडतील ते अलंकार घाल.''

''लग्न झाल्यापासून एक दागिना केला असेल तर शपथ!''

''लक्ष्मीआईने दिले होते ना थोडेसे!''

''तेही त्यांच्या माहेरचे आणि त्यांनी दिलेलेच दागिने घालून त्यांच्याकडे जाऊ वाटतं?''

''मग नको घालूस.''

''मग का अशीच जाऊ?''

''तुम्हा बायकांशी कसे वागावे समजत नाही.''

''मी ते दागिने घालते व ते शुभ्र वस्त्र नेसते. हंसावर बसून जावे, असे माझ्या मनात आहे.''

''हंसाचा वेग सहन होईल का?''

''त्याला जरा हळू उड्डाण करायला सांगा.''

''सांगेन, चल.''

''मला बसवा ना! जरा हात द्या. असे काय अगदी करता ते!''

''तुम्ही बायका म्हणजे गाठोडी. बस पटकन. मार उडी. जेथे तेथे तुमचा हात धरायला हवा.''

''तुम्हीच ही सवय लावलीत. तुम्हीच आम्हाला अबला केलेत व पुन्हा असे बोलता. हिंडू-फिरू देत नाही. घरात बसून आम्ही बनतो मातीचे गोळे. हं, धरा जरा हात.''

''तोल सांभाळ हो! हंसावर बसणे म्हणजे होडीत बसण्यासारखे आहे. तोल गेला तर पडशील.''

''परंतु या हंसाला जपून जायला सांगा.''

ब्रह्मदेवाने हंसाला सूचना दिली. सावित्री एकदाची हंसाच्या पाठीवर बसली.

''मी बसू का पाठीमागे? मीही येतो.''

''तुम्ही असे कसे बाईलवेडे! तरी बरे, चार तोंडे झाली; आता का दहा व्हायला हवी आहेत? तेथे बायकांचे हळदी-कुंकू. पुरुषांचे काय काम? म्हणे मी येऊ का? तेथे काही मी राहायला नाही जात. परत येणार आहे. चल रे हंसा. जरा जपून हो!''

हंस निघाला. ब्रह्मदेव चारी तोंडे एका दिशेकडे करून पाहू लागले. सावित्रीने मागे वळून पाहिले तो पती उभाच. तिने हाताने खूण केली की जा मागे. हंस दूर चालला. आता नुसती रुपेरी रेषा त्याची दिसत होती. ब्रह्मदेव आसनावर जाऊन बसले. पुन्हा अनंत विचारात तल्लीन झाले.

"तू माझ्या मूषकावर बसून जा." गणपती सरस्वतीला म्हणाले.

"तुमची नेहमी उठून थट्टा!" सरस्वती म्हणाली.

"यात काय थट्टा? हा उंदीर टुणटुण उड्या मारीत जाईल. वैकुंठात तुम्हा बायकांचे प्रदर्शन व दुसरे सर्व वाहनांचे प्रदर्शन! हत्ती, बैल, हंस, गरुड, उंदीर–जमू देत सारे पशू–पक्षी."

"उंदीर ओंगळ आहे. त्याच्यावर तुम्हीच शोभता."

"म्हणजे मी ओंगळ वाटते?"

"ओंगळ नाही तर काय? नीटनेटके राहताच येत नाही. अघळपघळ सारे काम. उगीच का तो चंद्र मागे हसला?"

"चंद्र हसला म्हणून तूही हसतेस वाटते? केलेत कशाला लग्न?"

"विद्या आहे तुमच्याजवळ म्हणून! मी बाकीचे तुमचे स्वरूप विसरून जाते व केवळ ज्ञानमय असे जे मंगल स्वरूप, त्याच्याकडे बघत राहते."

"मग कशावर बसून जातेस?"

"मोरावर. हातात वीणा घेईन व मोरावर बसेन."

"मोरावर तू किती छान दिसतेस! त्या मोराच्या पिसाऱ्यात जसे हजारो डोळे असतात, तसे हजारो डोळे मला फुटावेत व त्यांनी तुझ्याकडे पाहात राहावे असे वाटते. ते असू दे, परंतु काही दागिने घालून जा. ती तत्त्वचिंतामणीची माळ घाल. ती प्रमेयरत्ने कानात घाल."

सरस्वती मयूरावर बसून निघाली. वीणेच्या तारांचा झंकार झाला. गणपतीच्या अंगावर आनंदाचे रोमांच उभे राहिले.

वैकुंठाला आज अपूर्व सोहळा. सर्वत्र सुगंध दरवळला होता. मंद शीतल वारा वाहत होता. सर्वत्र स्वच्छता व सौंदर्य यांचे साम्राज्य होते. त्रिभुवनातील सारी संपत्ती तेथे एकवटली होती. मंगल वाद्ये वाजत होती. देवी लक्ष्मी सर्वांचे स्वागत करीत होती. त्या अपूर्व प्रासादात निरनिराळ्या रंगांच्या फुलांची आसने बसण्यासाठी मांडण्यात आली

होती. इंद्राणी शेवंतीच्या आसनावर बसली. सावित्री जाईजुईच्या आसनावर बसली. देवी सरस्वती दुर्वादलांनी वेष्टित अशा जपाकुसुमांच्या आसनावर बसली. सर्वांना आसने मिळाली. चंद्राचा रमणीय प्रकाश सर्वत्र पसरला होता. सर्व देवांगनांचे डोळे तेथील सौंदर्य व भाग्य पाहून दिपून गेले.

''सरस्वतीदेवी, तुम्ही काही मंगलगीते म्हणा.'' लक्ष्मीने विनविले.

''परंतु अजून माझ्या सासूबाई का नाही आल्या?'' तिने विचारले.

''सासूबाई म्हणजे कोण?'' शचीदेवीने विचारले.

''अगं, कैलासावरची पार्वती!'' सावित्री म्हणाली.

''नाही आल्या तर नाही; तुम्ही म्हणा गाणे. उशीर होत आहे. घरी जायला उशीर झाला तर रागावतील.'' इंद्राणी म्हणाली.

''इतका का दरारा आहे?'' सावित्रीने विचारले.

''ते काही विचारू नका आणि जयंत पुन्हा रडत बसला असेल. म्हणा हो सरस्वतीदेवी.'' इंद्राणी म्हणाली.

''सासूबाईंना अपमान वाटेल.'' सरस्वती म्हणाली.

''स्मशानात राहणाऱ्यांना कसला मान नि कसला अपमान!'' इंद्राणी म्हणाली.

''स्वाभिमान सर्वांना आहे.'' सरस्वतीने शांतपणे उत्तर दिले.

''आता वाद पुरे, सरस्वतीदेवी. एकीसाठी सर्वांचा खोळंबा नको. म्हणा हो गाणे.'' लक्ष्मी म्हणाली.

सरस्वतीचे काही चालेना. शेवटी तिने वीणा वाजविली. सर्वत्र शांतता पसरली. गायन सुरू झाले. वाग्देवतेचे गायन. विश्वाचा सांभाळ करण्यासाठी भगवान शंकर हलाहल प्राशन करीत आहेत, विश्वाच्या कल्याणासाठी स्वतःचे बलिदान करीत आहेत, अशा प्रसंगावरचे ते अमर गीत होते. सरस्वती ते गीत गाता गाता समरस झाली.

शंकराच्या महिम्याचे ते गीत वैकुंठी चालले असता तिकडे कैलासावर काय चालले होते? पार्वतीच्या कानावर सर्व गोष्टी आल्या होत्या. सर्व देवांगनांना भेटावयास ती अधीर होती; पण बोलावणे नव्हते. बोलावल्याशिवाय कसे जायचे? पार्वती दुःखी होती.

''मला वाटते तुम्ही जायला हरकत नाही.'' देवर्षी नारद म्हणाले.

''नारदा, आम्हाला वाटते स्वाभिमान नाही?'' पार्वती म्हणाली.

"मी नाही का सर्वत्र जात? मला कोण बोलावते? आता मी तुमच्याकडे आलो. तुम्ही का बोलावले होतेत? मी निमंत्रणाशिवाय वाटेल तेथे जातो. माझा कधीही कोणी अपमान केला नाही. आमंत्रणाशिवाय न जाणे म्हणे अहंकार! जे थोर असतात त्यांना आपपर नसते. भगवान शंकराच्या पत्नीने तरी असले क्षुद्र विचार मनात आणू नयेत. लक्ष्मी कदाचित आमंत्रण पाठवायला विसरली असेल किंवा तो गरुड यायला भ्याला असेल किंवा मुद्दाम आमंत्रण पाठविले नाही, असेही समजून चालूया; परंतु ती त्यांची चूक. आमंत्रण नसतानाही आपण मनाचा मोठेपणा दाखवून जावे व त्यांना लाजवावे, असे माझे मत आहे." नारद म्हणाले.

"मलाही जावेसे वाटते." पार्वती म्हणाली.

"तेथे अपमान होईल. मागे एकदा दक्षाकडे तुझा अपमान झाला व तू आगीत उडी घेतलीस. अपमान इवलाही तुला सहन होत नाही. आजही तेथे असेच काही झाले तर आणखी कुठे उडी घेशील. मग माझी पुन्हा तारांबळ." भगवान शंकर म्हणाले.

"मी का पूर्वीसारखीच अजून रागीट आहे? त्या वेळेस घेतली उडी, आता नाही घेणार. मनुष्य का तसाच राहतो?" पार्वतीने विचारले.

"स्वभाव बदलतो; परंतु त्यासाठी प्रयत्न करावे लागतात. जा. माझी ना नाही. आता नंदीवर बसून जा. पायी जायला उशीर होईल. जायचेच तर वेळेवर जावे." शंकर म्हणाले.

"जो वेळेवर जात नाही तो मोठा! छोटे लोक वेळेच्या आधीपासूनच गर्दी करतात. मध्यम लोक साधारण वेळेच्या सुमारास येतात. बडे लोक वेळेनंतर येतात." नारद हसून म्हणाले.

"असला मोठेपणा आम्हाला नको." शंकर म्हणाले.

"मी पायीच जाते. या नंदीचे व गरुडाचे तेथे भांडण व्हायचे एखादे. सोहळा बाजूलाच राह्यचा. मी भरभर जाईन." पार्वती म्हणाली.

"वाटेत अडखळशील, पडशील." शंकर म्हणाले.

"पडत नाही. रडत नाही. मी पर्वताची मुलगी. दगडधोंडे मला लागत नसतात. शिवाय, आज रस्ते साफ असतील. जाते मी." असे म्हणून पार्वती निघाली.

तिच्या अंगा-खांद्यावर दागिने नव्हते. नेसू उंची वस्त्र नव्हते. पायी जात होती. आपणाला कोणी हसेल, असे तिच्या मनातही आले नाही. दागदागिन्यांची तिला

आठवण झाली नाही. तिचा पती स्मशानात राहणारा, अंगाला भस्म फासणारा, कातडी पांघरणारा! पार्वतीजवळ कोठून येणार वस्त्रे नि अलंकार? वल्कलांचीच वस्त्रे नेसून ती जात होती. पिता हिमालय, त्याच्या घराच्या झाडांच्या सालींपासून ती वस्त्रे तयार केलेली होती. ती वल्कलेही माहेरची होती.

शंकरांच्या विषाचा दाह शांत करणारे राम–नाम ओठांनी म्हणत पार्वती वेगाने जात होती. तिला वैकुंठ दिसले. तो नयनमनोहर प्रासाद दिसला. रम्य चंद्रकिरण दूरवर पसरले होते. रस्ता दिसत होता. स्वच्छ सुंदर रस्ता, सर्वत्र सुगंध दरवळला होता. सीमेवरची मंगल वाद्ये कानावर येत होती.

प्रासादाच्या अंगणात पार्वती आली. तेथे सारे स्तब्ध होते. आत सरस्वतीदेवी गात होती. भगवान शंकरांचा महिमा गात होती. ते गीत ऐकून पार्वती तटस्थ झाली. तेथेच उभी राहिली. ते गाणे संपले. वीणेचा आवाज बंद झाला. शंकरांचा महिमा इतर देवांगनांना सहन नाही झाला.

“असले नको गाणे, रडगाणे. गमतीचे म्हणा.”

“मला असलीच गाणी येतात. ही रडगाणी नाहीत. ही त्यागाची, पराक्रमाची गाणी आहेत. देवांगनांना असा थोर पराक्रम केव्हापासून रुचेनासा झाला?” सरस्वतीने टोमणा मारला.

इतक्यात पार्वती आत आली. तिचे कोणी स्वागत करीना. या हो, बसा हो म्हणेना. शेवटी सरस्वती आपल्या आसनावरून उठली. तिने सासूबाईंना वंदन केले व त्यांना आपल्या आसनावर बसविले. साऱ्या देवांगना हसू लागल्या. पार्वती शांतपणे बसली. परंतु ते हसणे सरस्वतीस सहन झाले नाही.

“झालं काय तुम्हाला फिदीफिदी हसायला?” तिने विचारलं.

“हसू नको तर काय रडू?” इंद्राणी म्हणाली.

“नवऱ्याने कांहीच दिले नाही वाटते अंगावर घालायला? नाकात नथ नाही, हातात पाटली नाही.”

“अहो, गळ्यात मणीमंगळसूत्रही नाही.”

“असेल नवऱ्याजवळ तेव्हा ना? तो भुरा अंगाला फासतो. साप गळ्याभोवती गुंडाळतो. मेलेल्या पशूंची कातडी पांघरतो.” अशा प्रकारे त्या देवपत्न्या बोलू

लागल्या. पार्वतीकडे बघून हसू लागल्या. लक्ष्मी आता ओट्या भरीत होती. तिलाही हसू आवरेना. शेवटी ती म्हणाली–

"पार्वतीबाई, आज तरी पीतांबर–पैठणी परिधान करून यावे की नाही? आज तरी शृंगारसाज करून यावे की नाही? साऱ्या देवांगना नटूनथटून येणार आणि त्यांत तुम्ही असे यावे का? सारा मग विरस होतो. या देवपत्न्यांचा अपमान केल्यासारखे होते. अशा सुंदर स्त्रियांत आपण एखाद्या भिल्लीणीप्रमाणे– रानवटाप्रमाणे यावे, याला काय म्हणावे? थोडा तरी विवेक हवा माणसाला. थोडे तरी देशकालवर्तमान पाहून माणसाने वागले पाहिजे. इतरांच्या आनंदात भर घालावी. दुसऱ्यांच्या आनंदात मिठाचा खडा घालू नये. सर्वांचा एकमेळ असता विसंवादी सूर उत्पन्न करू नये. तुम्हाला नसेल त्यांनी काही दिले तर यायचे नव्हते."

"मला वाटले नव्हते की येथे अलंकारांचे प्रदर्शन आहे. मला वाटले की, सर्व देवांगना प्रेमाने परस्परांस भेटण्यासाठी जमणार आहेत, म्हणून मी आले. म्हणून मी पतिदेवांजवळ काही मागितलं नाही." पार्वती म्हणाली.

"आणि मागितले असते तरी काय मिळाले असते?" उर्वशी म्हणाली.

"नवरा तर जोगडा! हातात कपालपात्र मिरविणारा."

"आणि माहेरी बापाजवळ दगड नि धोंडे!"

"जंगलेही आहेत. झाडांच्या साली नेसाव्यात व पानांनी नटावे."

"का अशा हसता? जगाच्या कल्याणासाठी हसत हलाहल प्राशन करणाऱ्या शंकरांना का हसता? त्यांच्या अंगाला विभूती असेल; परंतु त्या विभूतीच्या एकेका कणात सर्व विश्वाची संपत्ती आहे." सरस्वती म्हणाली.

"हे खरे असेल तर जा, घेऊन ये संपत्ती." सर्व देवांगना म्हणाल्या.

"जाते, घेऊन येते. मी येईपर्यंत थांबा मात्र!" सरस्वती म्हणाली.

सती पार्वतीच्या डोळ्यांतून पाणी येत होते. तीच परत जायला निघाली; परंतु सरस्वती म्हणाली, "तुम्ही थांबा. मी जाऊन येते. या सर्व देवांगनांचा गर्व आज दूर होऊ दे. त्यागातील वैभव त्यांना दिसू दे. त्यांचे डोळे केवळ बहिर्मुख झाले आहेत. ते अंतर्मुख होऊ देत. बसा तुम्ही या आसनावर. मी आता जाऊन येते."

"सरस्वती, हंसावर बसून जा, म्हणजे लवकर येशील. पायी जाऊन केव्हा येणार? शिवाय त्या कैलासाची वाट दगडाळ व धोंडाळ. मी सावित्रीदेवीस विचारते!" लक्ष्मी म्हणाली.

''नाहीतर आमच्या ऐरावतावर बसून जा.'' इंद्राणी म्हणाली.

''ऐरावत नको. तेथे सिंह असतील, येतील अंगावर धावून.'' लक्ष्मीने सांगितले.

''सरस्वतीच्या पतीचे शरीर पाहून सिंहांना आता हत्तीबद्दल प्रेम वाटू लागले असेल. निदान हिमालयातील सिंह तरी हत्तीवर हल्ला करणार नाहीत.तो गजाननांचा अपमान होईल.'' एक अप्सरा म्हणाली.

''जरा जपून बोला. थट्टामस्करीलाही मर्यादा हवी.'' सरस्वती रागावून परंतु राग दाबून म्हणाली.

''तुमचा गरुड का नाही देत, माझा हंस कशाला?' सावित्री लक्ष्मीस म्हणाली.

''माझा गरुड दिला असता, परंतु त्या नंदीचे व त्याचे आहे विळ्या-भोपळ्यासारखे! छत्तीसाचा आकडा. म्हणून हो तुमचा हंस द्या म्हटले. देता का?'' लक्ष्मीने पुन्हा विचारले.

''सरस्वतीला नीट बसता येईल का? तिला मोरावर बसायची सवय. मोर डुलत डुलत जाणारा. हंस जातो तीरासारखा, मनाच्या वेगासारखा. पाहा बाई सरस्वती, नाहीतर एक करता एक व्हायचे. लंबोदर रागवायचे.'' सावित्री म्हणाली.

''तुम्हाला द्यायचा असेल तर द्या. सतरा आढेवेढे कशाला? कोणाचा उपहास कशाला?'' सरस्वती म्हणाली.

''बरे, जा घेऊन तो हंस. जपून जा.'' सावित्रीने अनुज्ञा दिली. हंसावर बसून सरस्वती निघाली. हिमालयाची शिखरे खाली दिसू लागली. हंसाला मानस-सरोवर दिसले. त्याला तेथील कमळे खावी, पाणी प्यावे, असे वाटले; परंतु त्याने आपली इच्छा दाबली. मंडलाकार हळूहळू तो खाली आला. देवी सरस्वती मृत्युंजय शिवशंकरांचे महिम्नस्तोत्र गात कैलासावर उतरली. शंकर तांडवनृत्य करीत होते. शृंगीभृंगी वाद्ये वाजवीत होते. सरस्वतीला पाहताच शृंगीभृंगीची वाद्ये थांबली. वाद्ये थांबताच तांडवनृत्यही थांबले. शंकर भानावर आले. सरस्वतीने वंदन केले.

''तू आलीस. ती कोठे आहे?'' शंकरांनी विचारले.

''त्यांनी मला पाठविले आहे.'' सरस्वती म्हणाली.

''काय आहे निरोप?''

''सासूबाईंनी दागदागिने मागितले आहेत. तेथे लक्ष्मीसहित सर्व देवांगना त्यांना हिणवीत आहेत. सासूबाईंचा त्यांनी अपमान केला. नाही नाही ते उन्मत्त बायका

बोलल्या. सासूबाईंचे डोळे भरून आले. मी त्यांना म्हटले की, तुम्ही थांबा. मी घरी जाऊन दागदागिने घेऊन येते. मामंजी, असेल नसेल ते द्या. देवांगनांचा गर्व हरवा.''

''मजजवळ काय आहे?''

''तुमच्याजवळ सारे आहे. मला माहीत आहे. त्रिभुवनातील सारी संपत्ती, सारे सामर्थ्य तुमच्याजवळ आहे. कारण तुम्ही त्रिभुवनाशी एकरूप झालेले आहात. त्रिभुवनाच्या कल्याणासाठी एकरूप झालेले आहात. देवा महादेवा, द्या. जे जवळ असेल ते द्या.''

''जटेचा एक केस देतो. चालेल?''

''त्याचे काय करू?''

''तो केस घेऊन कुबेराकडे जा व त्याला सांग की, या केसाच्या भारंभार दागिने दे.''

''कुबेर वैकुंठासच आला आहे.''

''मग तर बरेच झाले. तुला दुसरीकडे त्याला शोधीत जायला नको. तरी मी तिला सांगत होतो की, जाऊ नकोस. तुला हसतील आणि तू मग रडशील. असो. हा घे केस व जा.''

सरस्वतीने श्रद्धेने व विश्वासाने तो केस घेतला. मामंजीस प्रणाम करून हंसावर बसून ती निघाली. वैकुंठात सर्वांची उत्कंठा वाढली होती. लक्ष्मी सर्वांच्या ओट्या भरीत होती. पार्वतीची अद्याप राहिली होती.

''त्यांची सर्वांच्या मागून भरा, सर्वांच्या मागूनच नाहीतरी त्या आल्या.''

''आणि उरलीसुरले माणिक-मोती त्यांना द्या.''

''उरलेसुरले भिकाऱ्याला देतात.''

''मग का त्या श्रीमंत आहेत? नवऱ्याला दारिद्र्यामुळे तर विष खाण्याची पाळी आली. यांनीच त्यांना सतावले असेल. हे द्या, ते द्या म्हटले असेल. लागला नवरा विष प्यायला. म्हणे, जगाच्या कल्याणासाठी विष प्यायले! सारे देखावे! घरात असतील रोज उठून झगडे! निघाले जीव द्यायला. ते विष प्यायला कोणी हवेच होते. स्वारी उभी राहिली. फुकटाचे हुतात्म्यत्व मिळाले तर कोणाला नको असते? परंतु मरणाची इच्छा होती कोठे? विष प्यायले ते पोटात जाऊ नये म्हणून खटपटी करू लागले. थंडावा मागू लागले. म्हणे, गंगा आणा, चंद्र आणा! सारे देखावे. सारे दंभाचे पसारे!''

अशी बोलणी चालली होती. पार्वती पर्वताप्रमाणे शांत होती. कावळ्यांच्या कलकलाटात ती हंसाप्रमाणे गंभीर व निश्चल होती.

तोच सरस्वती आली. 'काय आणले, काय आणले,' साऱ्याजणी उत्सुकतेने विचारू लागल्या.

"सरस्वती, आणलेस का दागदागिने?" इंद्रायणीने विचारले.

"पाहू द्या तरी!" रंभा उत्कंठेने म्हणाली.

"घालतील अंगावर, मग दिसतील." मेनका म्हणाली.

"दिसत तर नाही कोठे?" उर्वशी म्हणाली.

"मी भगवान शंकरांच्या जटेतील एक केस आणला आहे." सरस्वती म्हणाली.

"जटेतील केस?"

"अय्या!"

"तो कशाला?"

"पत्नीने केसाने गळा कापून घ्यावा म्हणून?"

"सरस्वती, सारे काय ते सांग." लक्ष्मी म्हणाली.

"भगवान शंकर म्हणाले की, या केसाच्या वजनाइतके कुबेराजवळून दागिने घ्यावेत."सरस्वती म्हणाली.

"केसाच्या वजनाइतके?"

"इतके दागिने अंगावर घालवतील का?"

"पार्वतीदेवी वाकून जातील इतक्या दागिन्यांच्या राशीखाली."

"पर्वताच्या त्या कन्या आहेत. त्या वाकणार नाहीत."

"बोलवा कुबेराला येथे तराजू घेऊन." लक्ष्मी म्हणाली.

कुबेर तराजू घेऊन आला. तो गुंजा दोन गुंजा सोने घेऊन आला. साऱ्या हसू लागल्या. फक्त सरस्वती व पार्वती हसत नव्हत्या. कुबेराने एका पारड्यात तो केस ठेवला. दुसऱ्या पारड्यात एक गुंजभर सोने टाकले. परंतु केसाचे पारडे खालीच होते. त्याने आणखी एक गुंजभर सोने टाकले. तरी केसाचे पारडे खालीच. मग दोन मासे टाकले, तोळाभर टाकले. तरी केसाचे पारडे वर उठेना. पाच तोळे, दहा तोळे, शंभर तोळे सोने घातले गेले. तरी केसाचे पारडे खाली.

कुबेराने आता मोठा तराजू आणला. त्यात तो भराभरा आपली संपत्ती ओतीत होता. सर्व संपत्ती संपली, तरी त्या गुंतवळाचे वजन होईना. देवांगनांची तोंडे काळवंडली. त्यांच्या नागिणीप्रमाणे वळवळ करणाऱ्या जिभा लुळ्या पडल्या. लक्ष्मीने आपल्या माहेरची सर्व संपत्ती त्या पारड्यात घातली. तरी काही नाही. सर्व देवांगनांनी, अप्सरांनी आपले अलंकार त्या पारड्यात घातले, तरी त्या केसाची बरोबरी.होईना. कुबेर तोल करून करून थकला. शेवटी तो म्हणाला, ''या केसाच्या भारंभार माझ्याजवळ सोने नाही. मी भिकारी आहे. दुसरा कोणी मोठा कुबेर असेल, तर त्याच्याकडे हा केस घेऊन जा.''

सती पार्वतीचे मुख तेजाने फुलले. सरस्वती आनंदली. लक्ष्मी, इंद्राणी आदी करून सर्व देवांगना खट्टू झाल्या. आपले भाग्य मिरवण्याचा लक्ष्मीचा गर्व गळाला. सर्व देवांगनांचा गर्व नाहीसा झाला. त्या सर्वजणी सती पार्वतीच्या पाया पडल्या व म्हणाल्या, 'हे सती पार्वती, हे जगदंबे, आम्ही अज्ञ मुली. आम्हाला क्षमा करा. तुझ्या पतीची तपश्चर्या थोर, त्याग अपार, वैराग्य अनंत. ते दिसतात भिकारी, परंतु सर्वांहून ते श्रीमंत आहेत. जग सुखाने नांदावे म्हणून जो भिकारी झाला, सर्वांचे संसार सुखाचे व्हावेत यासाठी ज्याने फकीरीपण पत्करले, तोच खरोखर सर्वांहून थोर, सर्वांहून श्रीमंत! ही बाहेरची श्रीमंती काय चाटायची? आज आमचे डोळे उघडले. खरी श्रीमंती कशात आहे ते कळले. आज आम्हाला खरी दृष्टी आली. दृष्टीवरची पटले उडाली. दृष्टी निर्मळ झाली. आम्ही वाटेल तसे बोललो. देवी, तुझा अपमान केला, परंतु हलाहल पिणाऱ्या पतीची तू पत्नी. हलाहलाहूनही तीव्र असे अपमानाचे, निंदेचे, उपहासाचे विष तू प्यायलीस. थोर पतीला तू शोभतेस. जगातील विष तुम्ही पिता व जगाला मंगल देता. धन्य आहे तुमचा जोडा. तुम्हाला कोटी कोटी प्रणाम!''

लक्ष्मीने सती पार्वतीची भक्तिप्रेमाने ओटी भरली. सरस्वतीचीही ओटी भरली.

''सरस्वती, पुन्हा एकदा ते गीत गा. भगवान शंकरांच्या महिम्याचे एखादे गीत गा. आम्हाला ऐकू दे व पावन होऊ दे.'' सर्व देवांगना म्हणाल्या.

सरस्वतीने वीणा छेडली. सर्वत्र स्तब्धता पसरली. सती पार्वतीने डोळे मिटले. एक दिव्य गीत सुरू झाले.

'प्रणाम प्रणाम
धन्य धन्य देवा, शंकराचे नाम'

असे ते दिव्य गान देवी सरस्वतीने म्हटले. सर्वांची एकतानता झाली. देवा शंकरांना प्रणाम प्रणाम असे सर्वांचे ओठ म्हणू लागले. एका उच्च वातावरणात सर्वांची मने गेली. ते गीत संपल्यावर काही वेळ अगाध स्तब्धता होती. मग त्या देवांगना उठल्या व एकमेकीस भेटल्या. एकत्वाचे वातावरण उत्पन्न झाले. सारे विरोध मावळले. क्षुद्रभाव विरले.

पाषाणां पाझर फुटती रे ।

एकमेकां लोटांगणी येती रे ।।

अशी सर्वांची स्थिती झाली. हृदये हृदयांना भेटली. मधले दागिने वितळून गेले. भावना ओसरल्यावर लक्ष्मीचा निरोप घेऊन सर्व देवांगना निघाल्या. पार्वती–सरस्वती निघाल्या. लक्ष्मी तेथे नम्रपणे निरोप देत उभी होती.

आता तेथे कोणी नव्हते. भाऊ चंद्रही गेला. लक्ष्मी एकटीच तेथे अनंत आकाशाखाली नम्रपणे बसली होती. भगवान विष्णू शांतपणे हळूच तिकडून आले.

''झाले का हळदी–कुंकू?'' त्यांनी मंजूळ वाणीने विचारले.

''झाले.''

''दागदागिने घालून झाले एकदा मिरवून?''

''देवा, का आता टोचून बोलता? तुम्हाला सारा वृत्तांत कळला आहे. लक्ष्मीचा गर्व नाहीसा झाला आहे. पुन्हा आता मी मिरवू पाहणार नाही. त्या क्षुद्र इच्छा गेल्या. खरे भाग्य निराळेच असते. खरा दागिना वेगळाच असतो.''

''कोणते खरे भाग्य, कोणता खरा दागिना?''

''विभूतीचे भाग्य, त्यागाचा दागिना. जगाची सेवा करता करता ज्याने सर्वस्वाचा त्याग केला, तोच खरा भाग्यवान! त्याच्या भाग्याला मोज ना माप, अंत ना पार. आज मला हे ज्ञान झाले. चला. पुन्हा तुमचे प्रेमाने व भक्तीने पाय चेपीत बसते. तुमचे पाय, तुमच्या पायांची धूळ, त्यातील एक कण म्हणजेच माझी हिरे–माणके. जेथे त्याग तेथे वैभव!''

✦✦✦

# यज्ञ

मुलांवर साने गुरुजींची अपरंपार माया. मुलांमध्ये ते फुलत-खुलत. आपल्याजवळ जे जे काही सर्वोत्कृष्ट ते ते या मुलांसाठीच, अशी त्यांची भावना असे. त्यांचे समवयस्क त्यांचा स्नेह लाभावा म्हणून झुरत, पण गुरुजींच्या मनाच्या पाकळ्या उमलवण्याचे सामर्थ्य त्यांच्यात नसे. 'मुले म्हणजे देव' 'मुले म्हणजे राष्ट्राची मोलाची ठेव' असे साने गुरुजींना वाटे. प्रभूशी आपला संबंध जोडणारा हा एक दुवा आहे. अशी त्यांची भावना होती. मुलांची बुद्धी प्रखर आणि मने कोवळी असावी यासाठी ते लिहीत. मुले हा त्यांच्या साहित्याचा वाचकवर्ग. त्या मुलांना समोर कल्पूनच ते सारे लिहीत, बोलत. वात्सल्यात ओला होऊन प्रत्येक शब्द त्यांच्या लेखणीतून उमटे. ते म्हणत,

**'करी मनोरंजन जो मुलांचे,**
**जडेल नाते प्रभूशी तयाचे.'**

**– यदुनाथ थत्ते**

# यज्ञ

परमेश्वराने सर्व ब्रह्माण्ड निर्मिले. स्वतःच्या संकल्पातून ही चराचर सृष्टी त्याने उत्पन्न केली. त्याला एकटे राहवेना. अनंत वस्तू निर्माण करून त्यात रमावे, असे त्याच्या मनात आले. त्याने आकाश निर्मिले, काळ निर्मिला, सूर्य, चंद्र, तारे यांना निर्मिले. सप्तसागर, नाना सरोवरे, अनेक सरिता निर्मिल्या, अग्नी निर्मिला, वायू निर्मिला. अठरा लक्ष भार वनस्पती, चौऱ्याऐंशी लक्ष योनी निर्मिल्या. त्याने देव, दानव, मानव यांना निर्मिले.

सृष्टी निर्मिल्यावर परमेश्वर म्हणाला, विशेषतः मानवांना उद्देशून म्हणाला, ‘‘मी तुम्हा सर्वांना उत्पन्न केले आहे. आता उत्कृष्ट खेळ करून दाखवा. मला खेळ दाखविण्यापूर्वी आधी तुम्ही तो पुन्हा पुन्हा करून पाहा. आता खेळ चांगला वठेल, असे जेव्हा तुम्हाला वाटेल, तेव्हाच मला हाक मारा. मध्येच मला कोणी हाक मारू नका. काही अडचणी आल्या, काही संकटे आली, तरी मला नका हाक मारू. आधी तुम्ही प्रयत्न करा. सारेच उपाय हरले तर मी येईन, परंतु आधी येणार नाही. उठल्याबसल्या देवाचा धावा नका करू. मी तुम्हाला एक सार्वभौम उपाय सांगून ठेवतो. संकटनिवारणाची एक राजविद्या सांगून ठेवतो. त्या उपायाचा अवलंब कराल, तर सदैव विजयी व्हाल. त्या उपायामुळे आपत्तीचा परिहार होईल, विघ्ने नष्ट होतील. हा उपाय म्हणजे यज्ञ. यज्ञाने सर्व संकटांचा नाश होईल. यज्ञ हा तुमचा परमेश्वर, यज्ञ हा सखा, यज्ञ ही कामधेनू, यज्ञ हा कल्पवृक्ष, यज्ञ म्हणजे चिंतामणी, स्पर्शमणी. या

यज्ञाची कास सोडू नका. यज्ञ म्हणजेच नरांना कसे जगावे, कसे वागावे, हे शिकविणारा नारायण. यज्ञ हा आमचा आधार, यज्ञ म्हणजे परमागती. यज्ञाने–महान यज्ञानेही– जेव्हा कार्यनिष्पत्ती होणार नाही, संकटे दूर होणार नाहीत, त्या वेळेस मला हाक मारा. माझी योगनिद्रा सोडून मी येईन. पांघरलेली मायेची शाल फेकून मी धावत येईन, परंतु यज्ञोपासना परिपूर्ण झालेली असेल तरच येईन. ध्यानात धरा. जा आता सारी. खेळ सुरू करा. प्रयोग सुरू करा. मोडा, पडा, चढा, रडा, हसा. ज्या दिवशी खेळ मला दाखविण्याच्या लायकीचा झाला असे वाटेल, त्या दिवशी मला कळवा. तो प्रयोग मी पाहीन. खेळ चांगला करून दाखविला, तर मग दुसरा करायला देईन. जा आता.''

परमेश्वर चिन्मयाच्या पलंगावर पहुडला. मायांबर अंगावर घेऊन पडून राहिला. इकडे विश्वाचे चक्र सुरू झाले. विराट खेळ सुरू झाला. वारे वाहू लागले. सूर्य तळपू लागला. समुद्र नाचू लागला. तारे चमचम करू लागले. मेघ वर्षू लागले. तृणांकुरांनी पृथ्वी नटू लागली. वृक्ष–वनस्पती वाढू लागल्या. फुले फुलली. भुंगे गुंऽ गु करू लागले. फळे डोलू लागली. पाखरे उडू लागली. किलबिल करू लागली. घोडे दौडू लागले. गाई हंबरू लागल्या. सिंह–वाघ गर्जू लागले. मानवही आपापली कामे करू लागले.

खेळ रंगात येऊ लागला. निरनिराळे संघ होऊ लागले. हत्तींचे कळप झाले. लांडग्यांचे थवे जमले. हरणे संघ करून राहू लागली. चिमण्या, कावळे, मोर, पारवे यांनीही आपापल्या संघटना केल्या. मनुष्यप्राणीही संघ करून राहू लागला.

मानवांचा संघ सुव्यवस्थित होऊ लागला. नीतिनियम होऊ लागले. व्यवहाराची अनुभवाने घडी बसवू लागले. प्रयोग करीत चालले. कसे बोलावे, कसे वागावे, काय खावे, केव्हा खावे, काय प्यावे, किती प्यावे, केव्हा निजावे, केव्हा उठावे, कसे बसावे, कसे हसावे, कोणाला मान द्यावा, कोणाचा कान धरावा, वगैरे सारे ठरू लागले. बारीकसारीक गोष्टींचेही नीट निरीक्षण, परीक्षण होऊ लागले. कोणाला कोणते काम झेपेल, कोणाची काय आवड, ते पाहण्यात येऊ लागले. ती ती कामे त्यांनी त्यांनी करावीत, असे दंडक झाले. विवाहपद्धतीचा विकास झाला. स्त्री–पुरुषांचे संबंध कसे असावेत, त्याचा गंभीर विचार होऊ लागला. वैवाहिक नीती उद्भवत होती. नवीन नवीन कल्पना, नवीन नवीन विचार स्फुरत होते. ते आपले पहिले पूर्वज मोठे प्रतिभावान होते. त्यांचा मेंदू सुपीक होता. हृदय भावनाप्रधान होते.

जीवनाला ते आकार देत होते. मनातील विचार व कल्पना श्रेष्ठ धारिष्ट्य दाखवून ते कृतीत आणीत होते. त्या प्रयत्नात कोणी कोणी स्वतःची जीवने गमावली, परंतु त्यांच्या अनुभवांनी पुढील पिढी श्रीमंत होई, अधिक सुखी होई.

असे विश्वयंत्र चालू लागले. जोरात फिरू लागले. मधूनमधून परमेश्वर मुलांची परीक्षा घेई. आपण सांगितलेल्या गोष्टी मानवांच्या ध्यानात आहेत की नाहीत, ते पाही. एके दिवशी पडल्या पडल्या प्रभूच्या मनात सर्वांची परीक्षा घ्यावी, असे आले. तो आपल्या अनंत मनात विचार करू लागला. शेवटी त्याच्या संकल्पातून एक बाळ जन्माला आले. मोठे विचित्र होते ते बाळ. काळे काळे स्वरूप होते त्याचे. त्याला आपला आकार इच्छेप्रमाणे कमी-अधिक करता येत होता. नाना रूपे त्याला धारण करता येत. ते बाळ क्षणात लहानशा ठिपक्याप्रमाणे होई, तर क्षणात सारे त्रिभुवन व्यापी.

ज्याने चंद्र-सूर्य निर्मिले, सुंदर फुले निर्मिली, मोर-पोपट निर्मिले, त्यानेच तो असुर निर्मिला होता. काळा काळा अक्राळविक्राळ असा तो असुर दिसत होता. त्याचे रूप पाहून प्रभूही जरा दचकला.

''तात, तुम्ही मला निर्माण केलेत आणि तुम्हीच का घाबरता?'' त्या असुरबाळाने विचारले.

''अरे, माझ्यासमोर जरा सौम्य रूप धर. तुझे जीवनकार्य करताना तुला पाहिजे असेल ते रूप घे.'' प्रभू म्हणाला.

''कोणते माझे जीवनकार्य?''

''वत्सा, तुझे काम या सर्व प्राणिमात्रांची परीक्षा घेण्याचे. या जगाला मी जी शिकवण दिली, तिची त्यांना स्मृती आहे की नाही, हे पाहा. लोक यज्ञनिष्ठ आहेत की नाहीत ते पाहा. एकाही व्यक्तीच्या ठिकाणी हे यज्ञतत्त्व उत्कृष्टपणे बिंबले असले तरी पुरे! ती एक व्यक्तीही विश्वाला तारील. जा!''

''तात, मी परीक्षा कशी घेऊ? मी माझे काम कसे करू? कोणती माझी साधने? आधी माझे नाव काय, ते मला सांगा. त्या नावावरून माझ्या कर्माचा मला नीट बोध होईल. नावावरून कर्म सुचते, जीवनाची दिशा समजते. सांगा, मला कोणत्या नावाने संबोधणार?''

''तुझे नाव, वृत्र. समजलास ना? त्या नावात सारे आहे. जा आता. आपल्या कार्याला लाग. तुझ्या हृदयात तुझ्या कर्माची प्रेरणा मी ठेविली आहे. ती अंतःप्रेरणा

ओळख. मी आता आणखी काही सांगणार नाही. मी थोडी सूचना देत असतो. तीवरून सारे समजून घ्यावे.''

वृत्राला निरोप देऊन प्रभू पुन्हा मायेचा पितांबर घेऊन चिन्मयाच्या पलंगावर पहुडला. वृत्र विचार करीत निघून गेला. तो एका डोंगराच्या शिखरावर बसला. तेथून तो सारे पाहात होता, पाहून विचार करीत होता. प्रभूने माझे नाव वृत्र ठेविले आहे. वृत्र म्हणजे आच्छादणारा, पांघरूण घालणारा. मी कोणाला आच्छादू, कोणाला पांघरूण घालू? कोणाला पोटात घेऊ? कोणाचा घोट घेऊ? कोणाला गिळू? काय माझे काम? कोणता माझा स्वधर्म? जगाची परीक्षा घ्यायची, कशी घेऊ? माझा स्वधर्म कसा पार पाडू? जगाची कसोटी कशी घेऊ?

वृत्र विचार करीत करीत वर वर चालला. विश्वाला तो प्रदक्षिणा घालू लागला. सर्व चराचरांचे तो निरीक्षण करू लागला. या चराचरांची मुख्य नाडी कशात आहे, ते शोधू लागला. आजूबाजूच्या सृष्टीचे स्वरूप नीट समजून घेतल्याशिवाय आपले जीवितकार्य आपणास नीट पार पाडता येत नसते, यासाठी वृत्र सारे न्याहाळीत होता.

वृत्राच्या दृष्टीत एक गोष्ट विशेष करून भरली. प्रत्यही प्रभातवेळी पूर्व दिशेला तो एक सुंदर चमत्कार बघे. ते दृश्य मोठे नयनमनोहर असे. किती पाहिले तरी वृत्राला समाधान होत नसे. त्या पूर्व दिशेला सूर्य नावाचा एक तेजस्वी गोपाल उभा राही. चराचराचा जणू तो मित्र होता. त्या गोपालाजवळ सहस्रावधी गाई होत्या. नाना रंगांच्या गाई. सात रंगांच्या त्या गाई होत्या. त्या गाईंच्या कासेतून प्रकाशाच्या धारा बाहेर पडत. दुधासारख्या धारा. त्या धारांचा पृथ्वीवर वर्षाव होई; परंतु दुपारची वेळ होत आली म्हणजे हे काम रंगात येई. भराभरा धारा सुटत. सूर्य सायंकाळी दमे व थके. गाईंच्या कासाही रिकाम्या होत. मग त्या गाईंना नंदनवनातील कुरणात सूर्य घेऊन जाई. तेथील मधुर व तेजोमय चारा त्या खात, तेथील अमृत पोटभर पीत. पुन्हा प्रभात होताच सूर्य त्या सहस्रावधी धेनूंचे दोहन करू लागे. चराचराला धारोष्ण दूध मिळे. प्रकाशमय, जीवनदायी अशा दुधाचा तो वर्षाव करी.

त्या गाईंच्या कासेतील धारा नाचत नाचत झरकन् पृथ्वीवर येत. त्या धारा म्हणजे जणू त्या गाईंच्या जिभा होत्या. त्या प्रकाशमय जिभा चराचराचे अंग चाटीत. चराचराला तेज चढे. कळा चढे. झाडे टवटवीत दिसू लागत. फुले फुलत. धान्ये वाढत, फळांना रंग येई. पाखरे नाचू लागत. माणसांना उत्साह मिळे. त्या प्रकाशमय

धारा खिडकीतून, झरोक्यातून घरात शिरत, सर्वांना आनंदवीत व हसवीत. त्या धारा म्हणजे जणू आरोग्याचे रसायन, जीवनाचे पुष्टिप्रदान. त्या धारा म्हणजे जणू प्रभूचा हात, प्रभूचा मंगल आशीर्वाद!

अशा प्रकारचे काम तो तेजोमय सूर्य प्रत्यही करीत असे. त्याला कधी कंटाळा माहीत नव्हता. त्या स्वकर्मात तो सूर्य रमे. सारे चराचर त्याचे आभार मानीत. सूर्य दिसताच फुले वर माना करून त्याचे स्वागत करीत. आपल्या सुगंधाची आरती त्याला ओवाळीत. तळ्यातून झोपलेली कमळे हळूच डोळे उघडून प्रेमभक्तीने सूर्याकडे बघत. झाडे आपली हिरवी अंगे प्रेमाने नाचवीत. गिरीशिखरे त्या सूर्यनारायणाला आपल्या डोक्यावर घेऊन नाचवू बघत, पाखरे त्याची गाणी गात. घारी, गरुड, चंडोल यांना तर सूर्याला मिठी मारावी असे वाटे. उंच उडत ती जात. चंडोल तर फारच उंच जाई. परंतु प्रणाम करून पुन्हा खाली येई.

मनुष्यप्राणीही सूर्याचे उपकार जाणी. 'सूर्य आत्मा जगतस्तस्थुषश्च' सूर्य हा चराचराचा आत्मा आहे, अशा अर्थाची स्तुतिपर गीते मानव रचू लागला. कोणी म्हणत, 'हा ईश्वराचा डोळा आहे', कोणी म्हणत, 'हा ईश्वराचा मुकुट आहे', कोणी म्हणत, 'ईश्वराच्या भव्य मंदिरातील हा दीप आहे', कोणी म्हणत, 'ईश्वराच्या कानातील कुंडल आहे', कोणी म्हणत, 'त्याच्या वक्षःस्थलावर रुळणाऱ्या हारातील हे दिव्य पदक आहे.' अशा प्रकारे प्रतिभावान कवी कल्पनाविलास करीत होते. त्या सूर्याचे वर्णन करून, स्वतःची वाणी पावन करून घेत होते.

सूर्याजवळ धगधगीत प्रकाश दिसे. अल्पही मालिन्य त्याच्याजवळ दिसत नसे. आपल्या बुद्धीतही किल्मिष नसावे, मालिन्य नसावे, असे मननशील मानवाला वाटे. तो सूर्याला म्हणे, 'हे सूर्या! तुझ्या तेजोमय प्रकाशधारा पिऊन आमची बुद्धी निर्मळ होवो. आमची बुद्धी स्वतंत्र असो, जागृत असो. मालिन्याचा लवलेशही आमच्या बुद्धीजवळ नसो.'' अशी प्रार्थना करून कृतज्ञतेने मानवप्राणी सूर्याला अर्घ्य देत. त्याला सुंदर फुले देत. कोणी त्याचा जप करीत, कोणी त्याचे सतत स्तवन करीत.

वृत्र या सर्व गोष्टी पाहात होता. चराचराचे जीवन मुख्यत्वे करून हा सूर्य व याच्या या तेजःप्रसवा गाई यांच्यावर अवलंबून आहे, ही गोष्ट प्रखर प्रज्ञेच्या वृत्राच्या ध्यानात आली. चराचराच्या जीवनाचा सूर्य हा प्राण आहे, आधार आहे. या सूर्याला त्याच्या गाईंसह आपण गिळून टाकिले तर? असा एक विचार वृत्राच्या मनात आला. सूर्य व



श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

त्याच्या गाई नसतील, तर सारे विश्वयंत्र बंद पडेल. सर्वत्र अंधार पसरेल. उष्णता नाहीशी होईल. वारे वाहणार नाहीत, मेघ बनणार नाहीत, पाऊस पडणार नाही, वृक्षवनस्पती वाढणार नाहीत, मानव जगणार नाहीत. सर्वत्र प्रेतकळा ओढवेल. या विश्वाचे मग कोण रक्षण करील? कोणता देव वा मानव उभा राहील? प्रभू म्हणाला की, यज्ञधर्म जिवंत असेल तरच त्याचे रक्षण होईल. पाहूया. हीच परीक्षा होईल, गंमत होईल.

वृत्र हसला. भेसूर हसणे, मरणरूप हसणे. ते हसणे म्हणजे चराचराचे मरण होते. गिळू का गाईंसह हा सूर्य? त्याने स्वत:ला प्रश्न विचारला. या सूर्याला गाईंसह गिळण्याची आहे का आपली शक्ती, या गोष्टींचा तो विचार करू लागला. पुन्हा तो हसला व म्हणाला, 'वेडाच आहे मी. माझ्या स्वरूपाचाच मला विसर पडला. मी वाटेल तेवढा मोठा होऊ शकतो. या ब्रह्मांडाचा मी एक घास करू शकेन. वाढवू का माझे रूप? होऊ का विराट वेशधारी? परंतु माझा नाश तर नाही ना कोणी करणार? कोण करणार माझा नाश? महान यज्ञाशिवाय कोणतेही शस्त्र माझ्यावर चालणार नाही. यज्ञधर्म तर मेल्यासारखाच झाला आहे. हे स्वर्गात राहणारे देव तर नाचरंगात दंग झाले आहेत. अमृताचा पेला व अप्सरांच्या ओठांचा पेला हे दोन पेले त्यांना सदैव लागतात. यज्ञाचे त्यांना भानही नाही; परंतु मानवात यज्ञधर्म अद्याप रूढ आहे. मानवांनी यज्ञधर्म परमोच्च मानला आहे. यज्ञोपासना ते वाढवीत आहेत; परंतु जाऊन पाहिले पाहिजे. या बाह्य यज्ञोपासनेच्या आत डोकावून पाहिले पाहिजे.'

वृत्राने लघुरूप धारण केले व तो भूतलावर हिंडू फिरू लागला. त्याने नाना देश पाहिले. द्वीपद्वीपांतरे पाहिली; परंतु निर्मळ व सोज्वळ यज्ञोपासना त्याला कोठेही दिसली नाही. हिंडता हिंडता तो खाली भारतभूमीत आला. हिमालयाची सूर्याला भेटू पाहणारी ती स्वच्छ शिखरे पाहून तो आनंदला. हिमालयाच्या पोटातून वाहणाऱ्या सिंधू, गंगा, ब्रह्मपुत्रा वगैरे पवित्र नद्या त्याने पाहिल्या. त्याने खालचा विंध्याद्रीचा हिरवागार कमरपट्टा पाहिला. पूर्वेस व पश्चिमेस उचंबळणारा सहस्रावधी लाटांचा सागर त्याने पाहिला. भारताचे भौगोलिक सौंदर्य पाहून वृत्र वेडा झाला. निरभ्र आकाश, प्रसन्न नद्या, उत्तुंग पर्वत, पाताळाला भेटू पाहणाऱ्या खोल नद्या, नाना रंगांची व गंधांची फुले, नाना स्वादांची मधुर फळे, नाना प्रकारचे धीरगंभीर वृक्ष,

नाचणाऱ्या वेली, सुंदर मोहक रंगांचे पक्षी व त्यांचे कर्णमधुर आलाप – सारे वातावरण हृदयहारी होते. वृत्राने भारताला प्रणाम केला.

परंतु वृत्राला आंतरिक सौंदर्य बघावयाचे होते. या सुजला, सुफला, सस्यश्यामला, मलयजशीतल भारतभूमीच्या लेकरांचे अंत:करण त्याला पाहावयाचे होते. त्याला ब्रह्मर्षी, राजर्षी दिसू लागले. त्याला जपीतपी दिसू लागले. परंतु वृत्र आणखी आत जाऊ लागला. त्याला पुष्कळशी नकली नाणी दिसून आली. बाहेर संयम, परंतु हृदयात वासनांचा नाच. बाहेर दिसायला साळसूद, पोटात कामक्रोधांचे गराळे. कोणाचे जप राज्यासाठी, कोणाचे यज्ञ पुत्रासाठी, कोणाची तपश्चर्या आयुष्य वाढावे म्हणून, कोणाची तपश्चर्या त्रिभुवनाचे भस्म करता यावे म्हणून. त्या जपतपाच्या मुळाशी नाना प्रकारच्या वासना होत्या.

आणि काही काही ठिकाणी तर त्याने विचित्र प्रकार पाहिले. वर्षानुवर्षे चाललेले यज्ञ त्याच्या दृष्टीस पडले. त्या यज्ञातून सहस्रावधी पशूंचे हसत हसत हवन केले जाई. मांस खावयास मिळावे म्हणून यज्ञ! जिभेचे चोचले पुरविण्यासाठी यज्ञ! धर्माच्या नावाने अधर्म चालला होता. सारा जणू स्वैराचार चालला होता. मांस खावे, सोम प्यावा, खाणेपिणे यापलीकडे काही आहे, याची स्मृतीच नाहीशी झाली. पशूंना खाऊन मानव पशू होऊ लागला.

परंतु यज्ञाच्या या विकृत स्वरूपाविरुद्ध बंड उभारणारे लोकही वृत्राला दिसले. मांसाशनासाठी वृक्व्याघ्रांप्रमाणे ओठ चाटणारे व मिटक्या मारणारे लोक एकीकडे होते, परंतु दुसरीकडे –

'आत्मा यजमानः श्रद्धा पत्नी, मन्युः पशुः तपो अग्नि ।'

अशा प्रकारचा दिव्य यज्ञधर्म समाजाला देऊ पाहणारे महर्षीही उभे होते.

परंतु एकंदरीत पृथ्वीची स्थिती भयाण होती. खरा त्याग, खरा धर्म कोठेच जवळजवळ नव्हता. भरत खंडातही तो फारच थोडा आढळला. वृत्र तपोवनातून गेला. तेथे त्याला पुष्कळच काथ्याकूट आढळला. शब्दांचा कीस काढणारे शब्दवेल्हाळ त्याला आढळले. एकीकडे मांस मटकावणारे, तर दुसरीकडे शब्दच्छल करणारे. पृथ्वीत राम उरला नव्हता. सृष्टीची, चराचराची नाडी वृत्राने पाहिली. माझ्या परीक्षेत हे विश्व टिकणार नाही, असे त्याला वाटले. रोगी मरणार, असे त्याला वाटले.

परंतु ईश्वराने नेमलेले कार्य कठोर असले, तरी वृत्राला करणे भाग होते. सूर्याला धेनूसहवर्तमान गिळून टाकण्याचे त्याने निश्चित केले. सूर्याला सहस्रावधी गाईंसह एकदम गिळण्याची त्याची शक्ती होती, परंतु खेळत खेळत, हळूहळू सर्वांना गिळावे, असे त्याने योजिले.

एके दिवशी प्रभातकाळी भगवान सूर्यनारायण आपल्या गाईंचे थवे घेऊन पूर्वेस उभा राहिला. सौम्य, सुंदर प्रभा सर्वत्र फाकली होती. लाल, पांढऱ्या, निळ्या, पिवळ्या, नाना रंगी गाईंचे दूध सूर्य काढू लागला. पृथ्वीवर प्रकाशधारांचा वर्षाव होऊ लागला. इतक्यात तो वृत्र लहानसे काळे रूप धरून तेथे अकस्मात येऊन उभा राहिला. काही गाईंचे त्याच्याकडे लक्ष गेले. त्या अशांत झाल्या. गाईंत हालचाल सुरू झाली.

त्यांनी कान टवकारले. शिंगे सावरली. त्यांचे डोळे अस्थिर झाले. काही गाई बुजल्या व त्या धावू लागल्या. काही गाई शिंगे उगारून वृत्राच्या अंगावर धावल्या. परंतु वृत्राने त्यांची शिंगे धरून त्यांना दूर फेकले. काहीतरी अशुभ आहे, असे गाईंच्या मनात आले. त्या थरथरू लागल्या. पुन्हा काही गाई धीर करून शिंगे उगारून धावत आल्या. वृत्राने एकदम 'आ' पसरला. प्रचंड जबडा. जणू अंधारमय अनंत दरीच! त्या गाईंना त्याने गिळले. पोटात गेल्या त्या धीट गाई त्या शिंगांनी वृत्राचे पोट फाडू लागल्या. परंतु ते पोट जणू पोलादी होते. गाईंची शिंगे मोडून गेली, परंतु वृत्राचे ते पोट फाटेना, शेवटी त्याच्या पोटात त्या चुळबूळ करीत राहिल्या.

प्रत्यही असे होऊ लागले. वृत्र समोर दिसताच सूर्य अधिक तापू लागे, परंतु सूर्याची ती आटापीट पाहून वृत्र हसे. हसत हसत तो पुढे जाई व सूर्य पळू लागे. वृत्र काही गाईंना गिळी. गाईंची संख्या कमी होऊ लागली. एके दिवशी नंदनवनातील कुरणाचा अधिकारी सूर्याला म्हणाला, –

''धेनूनां संख्या क्षीणा दृश्यते । कुत्र गतास्ते धेनवः । न सम्यक् परिपालनं करोषि इति दृश्यते ।''

सूर्य म्हणाला, –

''भद्र, महान् करालो रिपुः संजातः । स प्रतिदिनं आगच्छति धेनूश्च भक्षयति । किमहं करोमि । अक्षमोऽस्मि तस्य निवारणार्थम् । भवान् एक देवराजाय महेन्द्राय निवेदयतु इमं वृत्तांतम् ।''

शेवटी इंद्राच्या कानावर गोष्टी गेल्या, परंतु त्याने लक्ष दिले नाही. अप्सरांच्या नाचात तो दंग होता. शुभांगी रंभा, तिला आलिंगीत होता. इंद्राने लक्ष दिले नाही, मग इतर देव तरी का देतील? जसे वरिष्ठांचे वर्तन, तसे कनिष्ठांचे.

हळूहळू पृथ्वीला प्रकाशदुधाचा पुरवठा पुरा पडेना. वृक्ष-वनस्पती निर्जीव व निःसत्त्व दिसू लागल्या. त्यांचे तजेलदार रंग गेले. वाराही नीट वाहीना. लोकांनाही कसेसेच वाटू लागले. त्यांना गार गार वाटे. पोटातील अग्नीही मंदावला. काय झाले, काय झाले, असे लोक एकमेकांस विचारीत. ते सूर्याकडे बघत. सूर्यही त्यांना खिन्न दिसे, निस्तेज दिसे. प्रभातकाळी वा सायंकाळी पूर्वीसारखा रंगसागर उचंबळत नसे. मध्यान्ही तेजस्वी ऊन पडत नसे. काय झाले सूर्याला? काय होणार या विश्वाचे, या चराचराचे?

एके दिवशी सायंकाळी उरल्यासुरल्या गाई घेऊन सूर्य लगबगीने जात होता. आज जरा लवकरच तो परत निघाला होता. वृत्र येण्याच्या आत जाऊ पाहात होता. इतक्यात समोर वृत्र दिसला. सूर्य काळवंडला.

‘‘अरे, मला चुकवून कोठे चाललास? मरण चुकवता येत नाही. माझ्या पोटात जा. तेथे तुझ्या गाई आहेत. माझ्या पोटाच्या दरीत नांदा. राहा उभा!’’ वृत्र म्हणाला.

‘‘अजून तुझी भूक शमली नाही का? या चार गाई तरी राख. इतके तरी प्रकाशाचे दूध मला जगाला देऊ दे. कोण आहेस तू? का हा संहार आरंभिला आहेस? मी नसेन, माझ्या या गाई नसतील, तर चराचराच्या नाड्या आखडतील. सारे संपुष्टात येईल. असे करू नकोस! ईश्वराची सुंदर सृष्टी मोडू नकोस. ऐक माझे. मी तुझ्या पाया पडतो. या सृष्टीसाठी पाया पडतो. माझ्या प्राणासाठी नव्हे.’’

‘‘ईश्वरानेच मला पाठविले आहे. मी विश्व मोडू पाहात आहे. या जगात जर कोणी खरा धर्मात्मा, खरा महात्मा असेल, तर तोच या संकटापासून विश्वाचे रक्षण करू शकेल. असा कोणी आहे का यज्ञस्वरूपी मानव, तेच तर मला पाहावयाचे आहे. मला फारसे बोलायला आवडत नाही. उभा राहा! माझ्या पोटात जाऊन राहा!’’

वृत्राने जबडा पसरला. गाई धावू लागल्या. परंतु जबडा वाढत त्यांच्यापुढे आला. गडप! एकदम सूर्य गाईंसह गिळला गेला. सूर्य वृत्राच्या पोटात सर्व शक्तीने तळपू लागला. परंतु वृत्राच्या पोटात अशी काही शक्ती होती की, तो सारा ताप ते पोट सहज सहन करी. आपला पालनकर्ता आपल्याबरोबर आहे, हे पाहून त्या धेनूंना त्या

संकटांतही धीर आला. सूर्याचे अंग प्रेमाने त्यांनी चाटले. धेनूंच्या डोळ्यांत पाणी आले.

"भगवान, पृथ्वीवरील सारी आमच्या प्रकाशमय पान्ह्याची वाट पाहात असतील. भुकेले असेल विश्व. आमच्या कासा तटातटा फुगल्या आहेत, कोठे सांडू हे दूध. कळा लागल्या स्तनांना." गाई म्हणाल्या.

'धीर धरा. जातील हे दिवस. विश्वाची परीक्षा विश्वंभर घेत आहे. पुन्हा आपण बाहेर पडू व चराचराला प्रकाशमय दूध देऊ. डोळ्यांत पाणी आणू नका." सूर्य म्हणाला.

पृथ्वीवर हळूहळू प्रकाश कमी होत गेला. लोकांचे लक्ष त्या गोष्टीकडे गेले होते, परंतु एके दिवशी प्रकाश आलाच नाही. आदल्या दिवशी सूर्य गेला तो गेला. आकाशातील तारे चमकत होते. कोठे गेला सूर्य? तो का मेला, तो का विझला? लोक कितीतरी वेळ अंथरुणातच होते. सूर्य आता येईल, थोड्या वेळाने येईल, अशी आशा करीत होते. परंतु सूर्याचा पत्ता नाही. अंथरुणात कंटाळा आला. पाखरे घरट्यांतून जागी झाली. मुले अंथरुणात जागी झाली, परंतु पाखरे बाहेर पडत ना. मुले बाहेर जात ना. बाहेर रात्र होती. न संपणारी रात्र... अनंत रात्र... हळूच कोणी बाहेर डोकावत. पुन्हा अंथरुणावर येऊन पडत.

अंधारातच लोक हिंडू लागले. जिकडे तिकडे भीतीचे वातावरण पसरले. कोणी वाळलेला पाला पेटविला. कोणी घरी दिवे लावले. काहींच्या घरी तेल नव्हते, तेथे कोठला दिवा? आणि रोज दिवे तरी कोण लावणार? सारे उद्योग थांबले. विणकर विणीना, तेली तेल काढीना. शेतात कोण जाणार? मळ्यात कोण जाणार? सर्वत्र अंधार, अंधार!

दोन-चार दिवस उष्णता पुरली, परंतु पुढे भयंकर स्थिती आली. कोणास बाहेर पडवेना. हातपाय गारठून गेले. वारा नव्हता तरी गारठा होता. असह्य गारठा. वृक्ष-वनस्पती थंडीने करपून गेल्या. गाई-गुरे गोठ्यात मृतवत पडली. पाखरे मेल्यासारखी झाली. माद्या पिलांना पंखात घेत होत्या. पाखरे एकमेकांचे वैर विसरून एकमेकांच्या जवळ आली. एकमेकांच्या अंगाची ऊब एकमेकांस देऊ लागली. पशूही तसेच करू लागले. सिंह गारठले, ते हरणांच्या अंगाला चिकटून बसले. हरणांनी आपली अंगे सिंहाच्या आयाळीत घुसविली. लांडग्यांच्या जवळ ससे येऊन राहिले. संकटात

प्रेमधर्म आला. सूर्याचा प्रकाश गेला, परंतु प्रेमाचा प्रकाश आला. प्रेमाची ऊब मिळाली.

मानवांची त्रेधा नि तिरपीट. कोणाला उठवेना, फिरवेना, माता मुलांना कुशीत घेऊन पडून राहिल्या. काय खायला देणार, काय प्यायला देणार? सर्वांचे प्राणच जावयाचे, परंतु अद्याप धुगधुगी होती. आकाशातील ताऱ्यांची थोडीशी उष्णता येत होती आणि अज्ञात ऋषिमुनींची तपश्चर्या–तीही ऊब देत होती.

संत आपल्या तपश्चर्येने विश्वाचे तारण करतात. लहानमोठे असे हे मानवजातीतील तपःसूर्य, जगततलावरील या तपज्योती, त्यांच्यापासून उष्णता मिळत होती. जग जगत होते. कसे तरी जगत होते. ना धड जीवन, ना धड मरण. ना धड जागृती, ना सुषुप्ती. केवळ विकल अशी दशा चराचराला आली. कोणी त्राता राहिला नाही.

''आई!'' बाळ क्षीण स्वरात हाक मारी.

''काय बाळ!'' असे माता म्हणे व त्याला घट्ट धरू बघे, परंतु हात धरू शकत ना. शक्ती गेली. मुलांना माता जवळ घेऊ बघे; परंतु हातात शक्ती नव्हती. डोळ्यांतही शक्ती नव्हती. अंधारात काही दिसेना आणि दिसले तरी काय उपयोग? डोळे उघडले तर ते मिटण्याची शक्ती नसे. मिटले तर उघडण्याची शक्ती नसे. पाय लांब केले तर आखूड करता येत ना. आखूड केले तर लांब करता येत ना. एका कुशीवर वळले तर दुसऱ्या कुशीवर वळण्याची पंचाईत. सारे चमत्कारिक झाले. कण्हणे, विव्हळणे, त्याचीही शक्ती उरली नाही. पृथ्वी निःशब्द झाली. चलनवलनहीन झाली. परंतु धुगधुगी होती. नाडी मंद उडत होती. हृदयाची क्रिया थोडी तरी चालू होती.

कृपाळू वरुण देव, ते आधी विचार करू लागले. वरुण ही नीतीची देवता. सकल विश्वाचे नियमन करणारी देवता. कर्माकर्म पाहणारी, पापपुण्य पाहणारी देवता. इंद्र ही युद्धदेवता. विश्वावर संकट आले तर इंद्राने निवारावे. वरुणाने पापपुण्याचा विचार करावा. परंतु जेथे सारे कर्मच लोपले तेथे पापपुण्याचा निवाडा तरी कोणता करावयाचा? वरुणदेव महाराज इंद्राला भेटण्यासाठी निघाले.

इंद्राला कशाचे भान नव्हते. तो आपल्या विलासात दंग होता. इतर देवही तेच करत होते. वरुणदेव आले, परंतु त्यांचे स्वागत करायला कोणीही नव्हते. वरुणदेव इंद्राच्या प्रासादाबाहेर येऊन उभे राहिले. इतक्यात काही अप्सरांना ती गोष्ट कळली. त्या घाबरल्या. त्यांनी इंद्राला वार्ता दिली. इंद्र लाजला. नंतर तो बाहेर आला.

"अभिवादन्." इंद्र म्हणाला.

"प्रत्यभिवादनम्." वरुणदेव म्हणाले.

"आज का झाले आगमन? मुखश्री अशांत का? काही अशुभ वार्ता आहे की काय? काही संकट आहे का? माझे वज्र आहे. संकटांचा चुरा करीन. सांगा."

"महाराज, जगाचे पापपुण्य पाहणे हे माझे कर्म; परंतु ते कसे पार पाडू? सारे कर्म मात्र थांबले आहे. बाह्यकर्म थांबले तरी मनात वैचारिक वा वैकारिक कर्म– हे सूक्ष्म कर्म सुरूच असते. मनाचे व्यापार चालूच असतात. त्यांच्यावरूनही मी नियमन केले असते; परंतु विचार करण्याचीही शक्ती मानवी मनाला उरली नाही. माणसे जणू मढी बनली. ना हाताचे व्यापार, ना मनाचे. भूतलावर हाहाकार उडाला आहे. कहर उडाला आहे. पृथ्वी का मरणार? एक काडीही राहणार नाही, चिटपाखरूही उरणार नाही, असे दिसते. सारी उष्णताच संपली. सारे थंडगार झाले. सूर्य दिसत नाही. त्याच्या सहस्रावधी प्रकाशधेनू, कोठे गेल्या साऱ्या? कोणीतरी असुर मातला असावा. त्याने हा विश्वसंहार मांडला असावा.

इंद्रदेव, तुम्ही काय करीत होतात? तुम्ही या गोष्टीकडे लक्ष दिले नाही. मागे तुमच्या मनावर कोणीतरी गोष्ट घातली होती, परंतु तुम्ही लक्ष दिले नाही. खानापानात दंग राहिलात. भोग भोगीत राहिलात. परमेश्वर काय म्हणेल? तुम्ही मुख्य कार्यवाह; परंतु तुम्हीच अदक्ष राहिलात. इंद्रदेवा, बोलतो त्याची क्षमा करा; परंतु तुमच्याही कर्माकर्माचा न्याय मला करावा लागेल. तुम्ही स्वकर्तव्यात अळंटळं कराल तर तुमचेही शासन दुःखाने का होईना, परंतु मला करावे लागेल. विश्वात कोठे काय बिघडते, कोणते विघ्न येत आहे, कोणते संकट येत आहे, इकडे अहोरात्र तुमचे डोळे हवेत. तुम्हाला उगीच का देवेंद्र केले? मोठे पद म्हणजे मोठी जबाबदारी, परंतु तुम्ही स्वस्थ व सुस्त राहिलात. आज गोष्टी या थराला आल्या. चराचर संपुष्टात आले. प्राणज्योती विझू पाहात आहेत. किती दिवस तुमच्याकडे येईन येईन म्हणत होते, परंतु हिय्या होईना. आज धैर्य केले. म्हटले, सांगावे जाऊन. कर्तव्य हे कठोर असते. देवांनाही कर्तव्यपराङ्मुख होऊन चालणार नाही. देवांनीही 'धृतव्रत' असे राहिले पाहिजे. ऋतंसत्याचे परिपालन त्यांनीही केले पाहिजे. इतरांपेक्षा अधिक कसोशीने केले पाहिजे. आता तरी तुम्ही उठा. शत्रू शिरजोर झाला आहे. तो आहे कोठे, त्याचा तपास काढा. त्याचा नाश करा. त्याला शरण यायला लावा.

त्या शत्रूने सूर्य तर गिळला, आता इतर तारामंडळही तो गिळू पाहात आहे. आपल्याविरुद्ध कोणीच कोठे हालचाल करीत नाही, हे पाहून तो उन्मत्त झाला आहे. देवेन्द्रा, उठा. सारी शक्ती पणास लावा. बाकी तुमची शक्ती कितपत पुरी पडेल याची मला मोठी शंका आहे. कर्तव्यपालनाने सामर्थ्य वाढते. कर्तव्यहीनतेने शक्ती क्षीण होते. विलास म्हणजे विनाश. तुम्ही तर सारे विलासलोलुप झालात. तरीही प्रयत्न करून पाहा. तुमची शक्ती अपुरी पडली तर मानवांची मदत घ्या. मानव जरी आज मरत पडले असले, तरी कोणी कोणी महात्मे तपश्चर्या करीत असतील. त्यांच्यामुळेच अद्याप जगात धुगधुगी आहे. त्या महात्म्यांची मदत घ्या. सुरांनी, नरांनी सहकार्य करून शत्रूचा नि:पात करावा. तुम्ही सारे देव बाहेर पडा. मीही मानवजातीत जाऊन कोणी आहे का महात्मा, ते नीट पाहून येतो. कोणी दिसला तर तुम्हाला येऊन सांगतो. जातो इंद्रदेवा, क्षमा करा कमीअधिक बोलल्याची. शेवटी आपण सारे कर्तव्यदेव आहोत, हे आपण ध्यानात धरूया.'

असे बोलून वरुणदेव निघून गेले. ते आपल्या दिव्य सिंहासनावर बसून पृथ्वीचे नीट निरीक्षण करू लागले. कोणता महात्मा तारील, त्याची चिकित्सा करू लागले. नीतीचा प्रकाश, सुरम्य प्रकाश त्यांच्या सिंहासनाभोवती झळकत होता. त्यांच्या सिंहासनाला नाना सद्गुणांचे हिरेमोती झळकत होते. वरुणदेवांची मुद्रा गंभीर दिसत होती. ती क्षणात करुण होई, क्षणात क्रोधी होई.

वरुणदेव गेले. इंद्र तेथेच बसून राहिला. त्याला वाईट वाटले. वरुणदेवांनी केलेली कानउघडणी वर्मी लागली. परंतु त्यात अयोग्य काय होते? वरुणदेव यथार्थ तेच बोलले. इंद्र अजून पक्का कर्तव्यच्युत झाला नव्हता. त्याचे मन त्याला खाऊ लागले. निजलेली कर्तव्यबुद्धी जागी झाली. सदूसद्विवेकबुद्धीचा डोळा उघडला. मुकाट्याने तेथे तो बसून राहिला. मुखकळा म्लान झाली होती. खिन्नता मुद्रेवर पसरली. अधोवदन तो बसला होता. पापाला वर पाहवत नसते. पापाची मान शेवटी खालीच व्हावयाची, आज ना उद्या.

इंद्र आपल्या अंत:पुरात गेला. तेथे रडत बसला. इंद्राणी बाहेर गेली होती. नंदनवनातील फुले गोळा करायला गेली होती. नवीन शेज रचायची होती. नंदनवनातील कल्पवृक्ष रोज नवीन रंगाची फुले देत. 'कल्पवृक्षांनो, आज नवीन गंधांची, नवीन रंगांची, नवीन आकारांची फुले द्या.' असे म्हणताच ते देत. तेथे काय तोटा?



श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

इंद्राणी आनंदाने नाचत आली. फुलांचे झेले हातात घेऊन आली,परंतु पती ना वर बघे, ना हसे, ना बोले. इंद्राणी पतीच्या जवळ गेली. त्याच्या खांद्यावर आनंदाने हात ठेवून म्हणाली,

''नाथ, का अशी मुद्रा? कोणते दु:ख, कोणती वेदना? माझा का काही अपराध आहे? माझ्यावर रागावलात? दु:ख व क्रोध जवळजवळच राहतात. प्रेमळ क्रोधाचे दु:खात रूपांतर होते. त्या दिवशी तुम्ही सांगितलेले ते दिव्यांबर मी नेसले नाही म्हणून रागावलात? आज सकाळी तुम्ही आणलेली फुले मी केसांत घातली नाहीत म्हणून का हा अबोला? का बाळ जयंताची काही चूक झाली? एकुलता एक मुलगा. केली असेल काही चूक. त्याला का मारलेत बिरलेत म्हणून आता त्याचे वाईट वाटते? जयंता तसा गुणी आहे. एखाद्या वेळेस करतो व्रात्यपणा. त्या दिवशी ऐरावताचे दात धरून ओढीत होता. मी त्याला बोलले; परंतु लगेच पोटाशी धरले. मुलाची जात. तुम्ही काहीच बोलत नाही. का नाही बोलत, का नाही माझ्याकडे बघत?''

''काय सांगू? तू मला भूल पाडलीस. त्या अप्सरांनीही आम्हा देवांना लंपट केले. आम्ही नि:सत्त्व झालो, कर्तव्यच्युत झालो. महान शत्रू उत्पन्न झाला आहे. तुमच्या विलासात आम्ही दंग राहिलो; परंतु उशाशी सर्प येऊन बसला. तुम्ही बायका अशाच पदच्युत करणाऱ्या. गोड गोड बोलता व आम्हाला जाळ्यात पकडता. हिमालयाला हलवणारे आमचे हात, परंतु तुमचे कोमल हात दूर करता येत नाहीत. दृष्टीतील तेजाने जगाला भस्म करू शकणारे आमचे डोळे, परंतु तुमच्या दृष्टीसमोर ते मिटतात. तुम्ही जादूगारणी आहात. बुद्धीला भ्रंश पाडणाऱ्या आहात. भ्रम पाडणाऱ्या आहात. पुरे तुझे गोड बोलणे.''

''शेवटी आमच्या बायकांच्या डोक्यावरच तुम्ही खापर फोडायचे. चोराच्या उलट्या बोंबा! तुम्ही आमच्याजवळ लाळ घोटीत येता, कुत्री होऊन येता, तर आम्ही काय करावे? तुम्हाला का दूर लोटावे, दूर फेकावे? कठोर होऊन तुम्हाला दूर केले तरी तुम्ही रागावणार. तुम्ही जवळ आलात म्हणून तुम्हाला जवळ घेतले तरी तुम्ही रागावणार! दुर्दैवी आहेत स्त्रिया झाले! तुम्ही पुरुष मात्र निर्दोषी, होय ना? सारे पाप आमच्या शिरी. आम्ही मोहमाया. तुम्ही मोह पाडीतच नसाल? तुम्हाला वासनाच नसतील? आम्हीच जणू तुम्हा पुरुषांच्या जीवनात विषयाचे विषकंद लावतो! काय बोलता, तुम्ही लंपट झालात? ते वरुणदेव नाही झाले ते? आम्ही मोह पाडला;

तुम्हाला का पडला? तुमचा विवेक कुठे चुलीत गेला? तुम्ही का शेण खाल्लेत? तुम्हालाच कर्तव्य मुळी नको. तुम्हाला एक आमचा काम. त्या दिवशी मी नको म्हटले तरी किती रागावलात! पेला फेकून दिलात. तुम्हा पुरुषांजवळ कसे वागावे, हेच आम्हाला समजत नाही. पुरुषांचे मन म्हणजे कुत्र्याचे शेपूट. सदैव वाकडे. आम्हाला का बोल? आम्ही संयम आणू पाहतो; परंतु तुम्हाला कोठे हवा?''

''दे, तूही शिव्याशाप दे. वरुणदेवांनी बोलून घेतले, आता तू बोल. तूही मार जोडे. हेच ना पत्नीचे काम? पतीला धीर देण्याऐवजी त्याच्या जखमेवर मीठ चोळणे, हेच ना पत्नीचे काम? पतीची, तो दु:खी असता, निर्भर्त्सना करणे हेच ना पत्नीचे काम?''

''तुमची दु:खी मुद्रा पाहून मी धीरच देऊ पाहात होते. प्रेमाने, मधुर शब्दांनी विचारपूस करीत होते; परंतु तुम्ही एकदम साऱ्या स्त्रियांची नालस्ती सुरू केलीत. मी एक असेन वाईट; परंतु साऱ्या स्त्रियांना का लावता बोल?''

''मी शोकमूढ झालो होतो. दु:खाने विवेक दुरावतो. मला भान नाही राहिले, म्हणून बोललो. शचीदेवी, क्षमा कर. तुझ्या मी पाया पडतो.''

''हे काय काहीतरीच! असे करू नये. आपण नीट बोलूया. कोणता आहे शत्रू, कोणते आहे संकट? सांगा सारे.''

''शत्रूचा अद्याप पत्ताच नाही. त्याने सूर्य व त्याच्या तेज:प्रसवा गाई सर्वांना गिळले असे म्हणतात. शत्रू कोठे राहतो, त्याचे किल्लेकोट कोठे आहेत, गडगढ्या कोठे आहेत, सारे शोधावे लागेल. वाऱ्याला पाठवणार आहे संशोधनासाठी. पण वारा तरी तयार होईल की नाही कळत नाही. सारे भिऊन गेले आहेत.''

''वायूदेव जातील. कोठून तरी ते घुसतील, वार्ता आणतील.''

''अगं, ज्याने सूर्याला तोंड न भाजता गिळले, हात न भाजता धरले, तो वाऱ्याचीही मोट कशावरून बांधणार नाही? सारे चमत्कारिक झाले आहे. मीही उद्या बाहेर पडणार आहे. शत्रूचा नाश करीन तेव्हाच तुला तोंड दाखवीन. विजयी इंद्राला मग पुष्पहार घाल.''

''मला चिंता वाटते. कसे होईल तुमचे?''

''आम्हा देवांना मरण नाही.''

''परंतु क्लेश तर आहेतच. मरण पत्करले; परंतु हे अमृतत्त्व नको. मी येऊ तुमच्याबरोबर?''

''नको. मी अपयशी झालो तर तू ऊठ. स्त्रियांची शक्ती सर्वांच्या शेवटी. कारण तुम्ही यज्ञमूर्ती आहात. पुरुषांपेक्षा तुम्ही यज्ञधर्माची अधिक उपासना करता. मला निरोप दे. कर्तव्य कठोर असते, तुझा बाहुपाश दूर कर.''

''मी तुम्हाला मोह घालणार नाही. माझा बाहुपाश दूर करते. माझा हात तुमच्या खांद्यावर आहे. तो तुम्हाला धीर देण्यासाठी आहे. जा. स्वधर्म आचरा, स्वकर्म करा. विजयी होऊन या. मग मी तुम्हाला पंचारती ओवाळीन. नाथ, आपण दोघे अत:पर स्वधर्माचा सांभाळ करू, एकमेकांस सत्पथावर ठेवू. जा. तुम्हाला यश येवो अशी मी प्रार्थना करीन. दुसरे काय करणार?''

''प्रार्थना कर. प्रार्थना ही मोठी शक्ती आहे. प्रार्थनेने पर्वत विरघळतात. समुद्र मार्ग देतात. पवित्र प्रार्थना. तिने काट्यांची फुले होतात, पाषाणांची पारिजाते होतात. प्रार्थना– तिने भयंकर भुजंगांचे सुकुमार हार होतात. व्याघ्रवृक हरणांप्रमाणे जवळ येतात. प्रार्थना म्हणजे अंधारात प्रकाश, मरणोन्मुखास जीवन. शचीदेवी, प्रार्थना कर. विश्वाचे मंगल व्हावे म्हणून निर्मळ, नि:स्वार्थ प्रार्थना कर.''

''करीन. करीन. जा आता तुम्ही.''

''आता तू खरी इंद्राणी, शुचिव्रता, शचीराणी.''

इंद्र निघून गेला. शचीराणी निरोप देऊन परत आली व प्रार्थना करीत बसली. इंद्राची व वृत्राची शेवटी लढाई सुरू झाली. तेहेतीस कोटी देव एका बाजूला व एकटा वृत्र एका बाजूला. परंतु वृत्र हरेना. 'आ' पसरून वृत्र धावत येई व वातध्वस्त मेघाप्रमाणे देवांची वाताहात होई. तो क्षणात सूक्ष्म होई, क्षणात आकाश व्यापून राही. अग्निदेव प्रचंड ज्वालांनी त्याला जाळायला जाई; परंतु वृत्राला काही होत नसे. झंझावात वायूदेव सोडी; परंतु वृत्र जागचा हलत नसे. वृत्र आगीने जळेना, पाण्याने भिजेना; वाऱ्याने हलेना. सारे देव हतबल झाले, हतबुद्ध झाले. देवेन्द्राने आपले नाना रंगी धनुष्य हाती घेतले. प्रखर बाण त्याने सोडले; परंतु वृत्राला ती पुष्पांची वृष्टी वाटे. इंद्राने सोडलेले प्राणघेते बाण वृत्रासुर काटक्यांप्रमाणे मोडी व फेकून देई. शेवटी इंद्राने ते वज्र हाती घेतले. सारे त्रिभुवन डळमळू लागले. परंतु वृत्र निर्भयपणे उभा होता. ते वज्र चेंडूप्रमाणे झेलण्यासाठी उभा होता. इंद्राचे डोळे रागाने इंगळासारखे लाल झाले होते. सोसाट्याचा वारा सुटला. अग्नी ज्वाळांनी ब्रह्मांड जाळायला उभा राहिला. इतर देवांचेही प्रयत्न सुरू झाले. इंद्राने क्रोधाने पाहिले. वृत्रासुराचे वक्ष:स्थल लक्षून ते वज्र

सोडले गेले. तो जळजळीत लोखंडी गोळा कडाडत चालला. चराचराच्या कानठळ्या बसल्या. मृतवत पडलेली मुले आयांच्या अंगाला अधिकच एकदम बिलगली.

प्रलयकाल ओढवला असे सर्वांना वाटले; परंतु तो वृत्र उभा होता. प्रचंड घोष करीत वज्र आले. 'हतस्त्वं पाप जाल्म' अशी तेहतीस कोटी देवांनी वीरघोषणा केली. वृत्रानेही गर्जना केली. त्याने दंड थोपटले. एक हात त्याने पुढे केला. तो जळणारा गोळा आपल्या बचकेत तो धरणार होता. आले, वज्र आले. जवळजवळ आले. देवांची हृदये आशा–निराशेने खाली–वर होत होती. वृत्र मरणार की मारणार? पकडले, वृत्राने ते प्रचंड वज्र पकडले. त्याने त्याचे शेकडो तुकडे केले. ते तुकडे त्याने दशदिशांत भिरकावले. ते इकडे पर्वतांचा नि:पात करते झाले. ताऱ्यांचा चुरा करते झाले. वज्र मोडून तोडून वृत्राने प्रचंड हाक फोडली, "आलो, देवेन्द्रा! आलो. सावध राहा. पळू नको आता. पाठ नको दाखवूस. आलो!" असे गर्जत व प्रचंड जबडा पसरून वृत्र धावला. इंद्र पळू लागला. सारे देव पळू लागले. इंद्राच्या पाठोपाठ वृत्र येत होता. इंद्र शेवटी शचीराणीच्या अंत:पुरात शिरला. शचीराणी दारात उभी राहिली. वृत्र हसला. "बायकांवर हात टाकणारा मी नाही. बायकांपासून रक्षण मागणाऱ्यावर मी प्रहार करीत नसतो." असे म्हणून वृत्र निघून गेला.

सर्व देवांना आता विचार पडला. काय करावे ते कोणालाच कळेना. सर्वांची मती कुंठित झाली. संकटात ज्याची बुद्धी अधिकच स्फुरते, तोच खरा बुद्धिमान. असा बुद्धिमान देवांत कोण होता? सारे विश्व नष्ट होणार, असे त्यांना वाटले. आपण आपली शक्ती गमावली, असे त्यांना वाटले. ते मनात चुटपुटू लागले. मानवांची मदत घ्यावी, असा विचार निघाला, परंतु मानवांतही कोठे होता राम? मानवही मरून पडले होते. थंड गोळे झाले होते.

"आपण देवही जेथे व्रतच्युत झालो, तेथे मानवांची काय कथा? देव विलासी व विषयलंपट झाले, मग मानव काय निराळ्या मार्गाने गेले असतील? मानव आपणाहूनही क्षीणशक्ती झाले असतील. अंतर्बाह्य पोखरले गेले असतील. ते काय आधार देणार, कोणते साहाय्य करणार?" असे काही देव म्हणाले.

"परंतु मानवात कोणी आहे का महात्मा, ते पाहायला काय हरकत? खोटा अहंकार नको. धर्माचे सिंहासन कोठे असेल, त्याचा नेम नसतो. मोठमोठे घसरतात,

तेथे लहान तरतात. मर्त्यभूमीच्या लोकांनी आपणास अनेकदा साहाय्य केले आहे. मानवांचे ते उपकार विसरू नका. कोणीही कोणास तुच्छ लेखू नये.'' बृहस्पती म्हणाले.

''गुरुदेवांचे म्हणणे बरोबर आहे. आपणा सर्वांस मागे एकदा गर्व झाला होता, परंतु त्या ज्ञानदेवतेने सर्वांचा गर्व जिरवला. त्या वेळेस अग्नीला काडी जाळवेना, वाऱ्याला काडी हलवेना, परमेश्वरी शक्ती कोठे असेल त्याचा नेम नाही. आपले पाप झाले तेवढे पुरे. आता आणखी आढ्यतेचे व गर्वाचे पाप तरी नको.'' इंद्र म्हणाला.

''मानवजातीत कोणी आहे का महात्मा, हे पाहण्यासाठी वरुणदेव जाणार होते ना?'' अग्नीने विचारले.

''हो. ते असे म्हणाले होते. चला, आपण सारे त्यांच्याकडे जाऊ.'' इंद्र म्हणाला.

सारे देव वरुणराजाकडे आले. वंदन करून देवेंद्र म्हणाला, ''हे धृतव्रता वरुणराजा, शत्रूचे पारिपत्य करण्यास आम्ही असमर्थ आहोत. रिपू हटत नाही. आम्हास मार्ग सुचत नाही. माझे अमोघ असे वज्र, तेही त्या वृत्रासुराने काडीप्रमाणे मोडले. अशा प्रबळाशी कोण झुंजणार? सारी शस्त्रास्त्रे व्यर्थ आहेत. मला तरी सृष्टीचा अंत आला असेच वाटत आहे.''

वरुणदेव म्हणाले, ''शचीपते, तू म्हणतोस ती गोष्ट खरी. कोणातच आज त्राण नाही. व्रताचे तेज नाही. तुम्ही देव दुबळे झालात. मानवही तसेच. मानवात मला पराक्रम दिसला नाही. काही महात्मे दिसले, परंतु वृत्राला दूर करील असे तेज त्यांच्याजवळ नाही. मी सारी पृथ्वी शोधली. निराश होऊन परत येणार होतो, परंतु मला एकदम दिव्य सुगंध आला. मी त्या दिशेकडे वळलो. तेथे मला एक महान विभूती आढळली. त्या विभूतीच्या तेजाने तुझे काम होईल.''

''कोठे आहे ती विभूती? कोठे आहे तो महात्मा? सांगा, त्याचे निवासस्थान सांगा. आम्ही सारे देव तेथे जाऊ व त्याच्या पाया पडू. त्या महात्म्याला स्तुतीची स्पृहा नसेल. आमचे प्रणाम पाहून तो गडबडेल. स्तुतीने त्यांना आम्ही मोह पाडू नाही इच्छित. त्यांना पडणारही नाही. आम्ही त्यांच्या पायांवर लोळण घेऊन म्हणू, 'त्रिभुवनाचे रक्षण करा.' वरुणदेवा, काय त्या विभूतीचे नाव? धन्यतम नाव? हा तप:सूर्य कोठे तपत आहे? हा भूदेव कोठे वसत आहे?'' अशी सर्वांनी पृच्छा केली.

वरुणदेव म्हणाले, ''इंद्रा, सुरश्रेष्ठा, त्या भूमीतील राजर्षींनी पूर्वी तुला अनेकदा साहाय्य दिले; ज्या भूमीत यज्ञाची, त्यागाची महती सदैव गायिली जात असते, जेथे लोक स्वधर्माचरण नीट व्हावे म्हणून थोडीफार तरी धडपड करीत असतात, त्याच भरतभूमीत तो महात्मा आहे. त्या भरतभूमीच्या पश्चिम दिग्भागी साबरमती नदीच्या तीरावर तो महात्मा तप करीत आहे. अत्यंत निर्मळ व पवित्र आहे त्याचे जीवन. निरहंकार, निष्काम मूर्ती, त्याच्याकडे सारे जाऊया. साहाय्य मागूया.''

''परंतु कोणती मदत मागायची?'' देवेंद्राने विचारले.

सुदगुरू म्हणाले, ''सर्व शस्त्रास्त्रांपेक्षा पवित्र हृदय अधिक प्रभावशाली असते. अग्नीला शीतलविणारे, पर्वतांना पाझर फोडणारे, वाऱ्याला थांबविणारे, वज्राला फुलाप्रमाणे करणारे, असे एक संताचे हृदय असते. ते फुलाहून कोमल असते. वज्राहून कठोर असते. महात्म्यांच्या रोमरोमात अपरंपार शक्ती भरलेली असते. सर्व त्रिभुवनाशी ते एकरूप झालेले असल्यामुळे सर्व त्रिभुवनाचे सामर्थ्य त्यांच्या जीवनात असते. त्यांचा दृष्टिक्षेप, यात अपार सामर्थ्य असते. देवेन्द्रा, त्या महात्म्याजवळ त्याचे हृदय आपण मागू. त्या महात्म्याचा सारा देहच पवित्र. त्यात हृदय अधिकच पवित्र. त्या हृदयाच्या अस्थी आपण मागू. त्या अस्थींचे कोण चूर्ण करील! त्या अस्थी अभंग आहेत. अमर आहेत. त्या अस्थींचे आपण वज्र करू. हृदयाला वेढून असणाऱ्या अस्थीभोवती त्या अस्थी बसवू. मध्ये हृदय बसवू. असे ते अस्थिमय हृदय वज्राकार करून वृत्रावर फेकू. वृत्राचे पाणी पाणी होईल. वृत्र नाहीसा होईल.''

वरुण म्हणाला, ''देवगुरूंचा सल्ला ठीक आहे आहे. असेच करावे.''

इंद्राने विचारले, ''त्या महात्म्याचे नाव काय?

वरुण म्हणाला, ''दधिची.''

दधिची लहानपणी फार व्रात्य होता. आई-बापांना त्याची चिंता वाटे. पुढे त्यांनी त्याला एका आश्रमात ठेवले. आईबाप निघून गेले. गुरुगृही दधिची राहू लागला. त्याचे अध्ययनाकडे फारसे लक्ष नसे. आश्रमातील गाईंना चारायला नेणे त्याला आवडे.

''गुरुजी, मी गाईंना चारायला नेईन, म्हणजे मला दूधही पुष्कळ पिण्यास मिळेल.'' दधिची म्हणाला.

''ने गाई चारायला. पी पुष्कळ दूध.'' गुरुदेव म्हणाले.



श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

दधिची गाईंना आंजारी गोंजारी. त्यांच्यासाठी पावा वाजवी. रानात पळसाच्या पानांचा द्रोण करून तो गाईखाली बसे. गाई दूध देत. दधिची द्रोण भरभरून पिई. मग वानराप्रमाणे तो झाडावर चढे किंवा पाण्यात डुंबे. मजा करी.

दधिचीचे हाडपेर मोठे होते. तो आता मोठा दिसे. सिंहासारखी त्याची छाती होती. खांदे रुंद होते. तोंडावर एक प्रकारचे तेज दिसे. आश्रमातील सारी मुले त्याला भीत. त्याची खोडी कोणी काढीत नसे. कोणी काढली खोडी, तर त्याची कंबक्ती भरलीच समजा!

एके दिवशी गुरुदेव शिष्यांना काही सांगत होते. सायंप्रार्थना होऊन गेली होती. सारे छात्र मंडलाकार बसले होते. गुरुदेवांची गंगौघाप्रमाणे पवित्र, प्रशांत वाणी सुरू झाली. ते म्हणाले, ''सामर्थ्याशिवाय सारे व्यर्थ. संसारात सामर्थ्य हवे. सामर्थ्याने सारे मिळते. सामर्थ्यवंताला सारे शोभते. सामर्थ्य म्हणजे सौंदर्य, बळाची उपासना करा. बळाने सारे चराचर चालते. बळाने ही पृथ्वी उभी आहे, पर्वत उभे आहेत. बळाने हे अनंत आकाश आधाराशिवाय वर पसरले आहे. चंद्रसूर्यांना, अगणित तारकांना आधार देत आहेत. बळामुळे सूर्य, चंद्र, तारे प्रकाशतात. बळाने वारा वाहतो. बळाने समुद्र उसळतो, बळाने नद्या वाहतात.

तुम्ही आश्रमात आहात. बळ असेल तर तुम्ही उठाल, हिंडाल, फिराल. बळ असेल तर बराच वेळ बसाल, बळ असेल तर बराच वेळ चालाल. बळ असेल तर अध्ययन करता येईल, अनेक ठिकाणी जाऊन ज्ञान मिळवता येईल. बळ असेल तर पृथ्वी खणाल, तिला सस्यसंपन्न कराल. बळ असेल तर दुसऱ्याच्या उपयोगी पडाल. ही सारी पृथ्वी बलवंतांची आहे. दुबळ्याला काही एक मिळायचे नाही. दुबळ्यांना पदोपदी भीती. दुबळ्यांना ना मान, ना स्थान; ना विद्या ना ज्ञान. तुम्ही दुबळे नका होऊ. बलवंत व्हा. आश्रमातून परत जाल तेव्हा तेजस्वी शरीरे घेऊन जा. लाथ मारीन तेथे पाणी काढीन, अशी हिंमत घेऊन जा. पायाखाली धरित्री डळमळते आहे, अशा ऐटीने जा. दधिचीकडे बघा. कसे आहे वज्रासारखे शरीर. तो झाडाला उपटील, दगडाचे चूर्ण करील, सापाला गरगर फिरवून त्याचे मणके ढिले करील. त्याला वाघसिंहाचे भय नाही, भुताखेतांचे भय नाही, तो निर्भय आहे, तो मुक्त आहे. समजलात ना! शक्तीची उपासना करा. बलहीनाला ना संसार, ना परमार्थ. बलहीनाचे जिणे व्यर्थ आहे!''

प्रवचन संपले. दधिची आनंदला. त्याला मुले चिडवीत असत. 'माजला आहे नुसता' असे म्हणत, परंतु आज गुरुदेवांनी एक प्रकारे त्याची बाजू मांडली होती.

"आता हसाल का मला? आता तुम्हीही माझ्याप्रमाणे दूध प्याल, खेळाल, कुदाल, चढाल, डुंबाल." दधिची म्हणाला.

"परंतु तुझ्याप्रमाणे ज्याला त्याला थपडा देणार नाही!" एकजण म्हणाला.

"तुझ्याप्रमाणे नुसते खातच बसणार नाही." दुसरा म्हणाला.

"मनुष्य म्हणजे काही केवळ हेला होणं नव्हे. बैल होणं नव्हे." तिसरा म्हणाला.

"बैल होणे का वाईट? बैल किती उपयोगी! बैलाची तर देवांना उपमा देतात. अग्नी कसा आहे? तर 'वृषभो रोरविती' असे नाही का वर्णन?" दधिचीने विचारले.

"बरेच लक्षात राहिले रे तुझ्या?" कोणी हिणवीत म्हणाला.

"मनात आणीन तर सारे लक्षात ठेवीन." दधिची म्हणाला.

सारे छात्र झोपले. गुरुदेवांच्या बलोपासनेच्या प्रवचनामुळे दधिचीला ताम्रपटच मिळाल्यासारखा झाला होता. त्याने एखाद्या मुलाला एकदम वर उचलावे, एखाद्याला पाठीत गुद्दा द्यावा. कधी झाडांना आपल्या अंगाची धडक द्यावी. कधी बैलांची शिंगे धरून त्यांना हलू देऊ नये, असे शक्तीचे प्रयोग त्याचे चालत.

त्या दिवशी पुन्हा सायंप्रार्थना झाली. सारे छात्र मंडलाकार बसलेले होते. गुरुदेव सांगत होते. छात्र लक्ष देऊन ऐकत होते. शांत वाणी स्रवत होती. अमृतवर्षाव जणू होत होता, "मुलांनो, बळाची उपासना करा, असे त्या दिवशी मी सांगितले. त्या बळाचेच आणखी विवरण मी करणार आहे. बळ नाना प्रकारचे आहे. आपण उत्तरोत्तर श्रेष्ठ बळाकडे गेले पाहिजे. शरीराचे बळ हे प्राथमिक बळ. जे पशूंजवळही असते. शरीराच्या बळापेक्षा बुद्धीचे बळ अधिक आहे. अर्थात बुद्धी शरीरातच असणार, म्हणून शरीरही बलवान पाहिजे. शरीराची उपेक्षा नका करू; परंतु शरीरशक्ती म्हणजेच सर्वस्व, असे नका मानू.

आपणास अनेक पायऱ्या चढून वर जायचे आहे. शरीरबळ ही पहिली पायरी. परंतु सदैव का पहिल्या पायरीवरच राहावयाचे? यासाठी ज्ञानाची दुसरी पायरीही चढा. ज्ञान मिळवा. बुद्धी प्रभावशाली करा. परंतु ज्ञानाच्या बळानेही सारे संपले असे नाही. हृदयाचेही बळ आहे. हृदय शुद्ध राखणे, भावना निर्मळ ठेवणे हेही बळ आहे. प्रेम हीही एक शक्ती आहे. एखाद्या मुलाला तुम्ही मारून समजावू शकणार नाही, बुद्धिवादाने

समजावू शकणार नाही. परंतु माता त्याच्या पाठीवर नुसता हात फिरवील व त्याला समजावू शकेल. एखादा घोडा चाबकाने ऐकणार नाही, परंतु प्रेमाने पाठ थोपटताच तोही प्रेमाने फुरफुरेल.

अंगबळ ही पहिली पायरी. ज्ञानबळ ही दुसरी पायरी. प्रेमाचे बळ ही तिसरी पायरी. परंतु मनोजयाचे बळ ही चौथीरी पायरी. ज्याने मन जिंकले नाही, त्याला ना शरीराचे बळ, ना ज्ञानाचे बळ, ना प्रेमाचे बळ. म्हणून मनावर जो स्वार व्हायला शिकला, तो जगावर स्वार होईल. मनाचा जो स्वामी झाला तो त्रिभुवनाचा स्वामी होईल. एखाद्या मस्त घोड्याला दधिची वठणीवर आणील; परंतु मस्त मनाला वठणीवर आणील तोच खरा. त्या दिवशी दधिची दंड फुगवून बकुळ वृक्षाला धडका देत होता; परंतु दधिची ज्या दिवशी मनातील सारे वेग रोखू शकेल, त्याच दिवशी खरे बळ त्याने मिळविले, असे होईल.

बाळ दधिची, तू मला आवडतोस. त्या दुबळ्यांपेक्षा तुझ्याकडे पाहून प्रसन्न वाटते. परंतु पुढे जा. श्रेष्ठतर बळाची उपासना कर. व्याघ्रसिंहाचे हे शारीरिक बळ तेही थोर आहे; परंतु मानवाने या बळाहून अन्य बळ संपादन करावे. ज्ञानबळ, प्रेमबळ, मनोजयाचे बळ आणि शेवटी साऱ्या त्रिभुवनाशी एकरूप होण्याचे बळ. ज्याला आपपर नाही, सर्व स्थिरचरात एकच शक्ती भरलेली आहे, हे ओळखून त्या शक्तीशी जो एकरूप झाला, त्याच्या बळासमोर सारी बळे फिकी आहेत. इतर सारी बळे त्या परमैक्याच्या बळासमोर साष्टांग नमस्कार घालतील. मानवाचे हे परमध्येय, ही परम गती. हे गंतव्य, हाच मोक्ष. या लहानशा शरीरात राहून साऱ्या विश्वाशी एकरूप होणे, ते अंतिम बळ. शेवटी त्या बळाची उपासना करा.''

प्रवचन संपले. छात्र निघून गेले. ते झोपले. परंतु दधिचीला झोप येईना. तो बळाचा उपासक होता. खऱ्या सामर्थ्याचा उपासक होता. तो आश्रमातील अंगणात फेऱ्या घालीत होता. तो विचारात मग्न झाला. हळूच दधिचीच्या खांद्यावर कोणीतरी हात ठेवला. त्याने वळून पाहिले, तो कोण?

''गुरुदेव!'' तो सकंप वाणीने म्हणाला.

''काय बाळ?''

''मी उत्तरोत्तर उच्च बळाकडे कसा बरे जाईन? खरे बळ मला मिळू दे. तुमचा आशीर्वाद द्या.''

''मिळेल तुला ते परमश्रेष्ठ बळ. माझा आशीर्वाद आहे. जा आता व शांतपणे झोप. तू महापुरुष होशील.''

प्रमाण करून दधिची गेला व विचार करीत करीत झोपी गेला.

दधिचीचे आता खाण्यापिण्यात लक्ष नसे. तो ना फळ खाई, ना दूध पिई. तो पाण्यात आता डुंबत नसे, पहाड चढत नसे. तो विचारात मग्न असे. आश्रमातील मुले त्याची थट्टा करीत.

''दधिची, अरे, ती फळांची टोपली फस्त करून टाक ना! ती फळे केव्हाची तुझी वाट पाहात आहेत.''

''आपला उदार आश्रयदाता आज कोठे गेला, असे मनात येऊन ती फळे रडत आहेत.''

''तुझ्या पोटाच्या पेटाऱ्यात जाऊ देत बाबा ती!''

''खात जा बाबा, नाहीतर हे दोर्दंड दोरीसारखे होतील.''

''हे हत्तीसारखे पाय करकोचाच्या पायांसारखे होतील.''

''आपली त्याच्यावर दृष्ट पडली बहुधा!''

''म्हणून का स्वारीला खाण्याचा वीट आला?''

''अरे, खाऊन खाऊनच तो विटला. किती खाणार?''

दधिची सारे शांतपणे ऐकत होता. तो कोणाच्या अंगावर धावून गेला नाही. पूर्वीचा दधिची राहिला नाही. पूर्वीचा दधिची असे कधीच ऐकून घेता ना. तो कोणाच्या थोबाडीत मारता, कोणाच्या छातीवर बसता, कोणाला बुकलता, बुक्क्या देता. सारा आश्रम तो गजबजून सोडायचा; परंतु आज सिंह शांत झाला होता. दधिची शांत पारवा बनला होता. आज ना धडपड, ना फडफड. दधिची चिडत नाही असे पाहून मुलेही गंभीर होऊन निघून गेली.

दधिची आज आश्रमातून घरी जाणार होता. गुरुगृह सोडून गृहस्थाश्रमात पदार्पण करण्यासाठी जाणार होता. सर्वांना वाईट वाटत होते. तो सर्वांचा निरोप घेत होता. आश्रमातील चैतन्य जणू जात होते. आश्रमातील खेळकरपणा, उत्साह, शक्ती जणू आज जात होती. दधिची गुरुदेवांच्या पाया पडला. त्यांनी त्याला हृदयाशी धरिले व सांगितले, ''जा! नीट राहा! प्रपंचच परमार्थमय कर. सूर्य जाईल तेथे प्रकाश नेईल. गंगा जाईल तेथे ओलावा देईल. तू ज्ञानाचा प्रकाश, प्रेमाचा ओलावा सर्वत्र घेऊन जा.

संसारात आनंद पिकव. स्वतः आनंदी हो, आसमंतात असलेला समाज तोही आनंदी कर. संयम सोडू नकोस. वासनांवर विजय मिळव. भावना निर्मळ ठेव. बुद्धी विशाल ठेव. दृष्टी निर्मल ठेव. जा. माझा तुला आशीर्वाद आहे.''

दधिचीने गृहस्थाश्रम स्वीकारला. तो आईबापांची सेवा करी, स्वतः कृषी करी. त्याने सुंदर फळझाडे लावली, फुलझाडे लावली. शेतात खपावे, मळ्याला पाणी द्यावे, रात्री ताऱ्यांचे चिंतन करावे, असा चालला वेळ. तो रानातील रसाळ फळे आणी व आई-बापास देई. सुंदर फुले आणी व त्यांना देई. त्यांची वस्त्रे तो धुई, त्यांचे पाय तो चेपी; परंतु वृद्ध मातापितरे किती दिवस राहणार? दधिचीला आशीर्वाद देत ती देवाघरी गेली.

दधिची मुलाबाळांजवळ प्रेमाने वागे. त्यांच्याजवळ खेळे, हसे. पत्नीबरोबर कधीही त्याचे भांडण झाले नाही. त्याच्या मुखावरची प्रसन्नताच काही अपूर्व होती. त्याचे मुखमंडल पाहताच दुसऱ्यांच्या कपाळावरील आठ्या मावळत व तेथेही प्रसन्नता फुले. प्रसन्नतेचा स्पर्श व्यापक आहे.

दधिची शेतात खपे. वाईट गवत खणून काढी. ते काम करता करता त्याच्या मनात येई, 'ही पृथ्वी निर्मळ व्हावी म्हणून मी खपत आहे. येथे पुष्टी देणारे धान्य वाढावे म्हणून हे विषारी गवत, निरुपयोगी गवत मी खणून फेकीत आहे. माझ्या हृदयाची भूमी केली आहे काय निर्मळ? तेथील वासनांचे सारे गवत टाकले आहे का उपटून?' असे विचार मनात येऊन तो तसाच तेथे बसे.

हळूहळू हे विचार अधिकच येऊ लागले. त्याला काही सुचेना, रुचेना. त्याला गुरुदेवांचे शब्द आठवले : 'मनोजयाचे बळ आणि शेवटी चराचराशी एकरूप होण्याचे बळ. उत्तरोत्तर पुढे जा.' तो अस्वस्थ झाला. दधिची दुःखी झाला. पत्नीने असा दुःखी चेहरा कधी पाहिला नव्हता. ती एके दिवशी पतीला म्हणाली,

''तुम्हाला काय होते? अशी का अलीकडे मुद्रा? प्रसन्नता कोठे गेली? हास्य कोठे गेले? आनंद का अस्तास गेला? मला नाही का सांगणार? मी का निराळी आहे?''

''तू निराळी नाहीस. मी तुझ्याशी, या आपल्या मुलाबाळांशी, या आपल्या संसाराशी एकरूप आहे; परंतु मला वाढू दे. साऱ्या त्रिभुवनाशी मला एकरूप होऊ दे. साऱ्या विश्वाशी माझा आत्मा नेऊन भेटवू दे. तू देशील मला अनुज्ञा? जाऊ का मी वनात? तपश्चर्या करीन, विश्वाशी एकरूप होईन. जाऊ?''

"तुम्हाला तोच ध्यास लागला असेल तर जा. मी तुम्हाला अडवीत नाही. मी मुलाबाळांना वाढवीन. या कळ्या फुलवीन. तुम्ही खरेच जा. चिंता नका करू. तुमचा आनंद तो आमचा. तुमच्या मोक्षाने आम्ही मुक्त होऊ. एक सूर्य सर्व जगाला प्रकाश देतो. जगाला प्रकाश देण्यासाठी जा. सूर्य व्हा. माझा पतिदेव वाढो, वरती जावो, कृतकृत्य होवो, अशी मी प्रार्थना करीन."

"कर प्रार्थना. प्रार्थना म्हणजे बळ. प्रार्थनेने अप्राप्य प्राप्य होते, अशक्य शक्य होते. तुझ्या पतीसाठी प्रार्थना कर. ती प्रार्थना मला प्रेरणा देईल, पुढे नेईल."

दधिचीने मुलांच्या अंगावरून हात फिरवला. त्यांच्या मुखकमलांचे अवघ्राण केले. निजली होती ती. पिता जागा व्हायला जात होता. पत्नी अंगणापर्यंत आली.

"जातो. मुलांना जप."

"जा, विजयी व्हा, कृतकृत्य व्हा."

"जा आता मागे."

"तुम्ही जा आता पुढे."

"जाऊ, का राहू?"

"जा, मागे पाहू नका. तुमच्या जीवनाचा पतंग उंच जाऊ दे. आम्ही ती शोभा पाहू व पवित्र होऊ."

"किती तुझा धीर! खरी आदर्श पत्नी."

"तुमची आकांक्षा ती माझी. तुमचा विजय तो माझा. तुमचे भाग्य ते माझे. कोठेही गेलात तरी माझेच आहात. माझ्या हृदयात राहून मग चराचरांचे व्हाल. खरे ना? तो पाहा ध्रुव. निश्चल तेजस्वी तारा."

"मलाही होऊ दे स्थिर, करू दे निश्चल. ध्रुव दाखवलास, ध्रुवाप्रमाणे अविचल होऊ दे मला. जातो."

दधिचीने पत्नीचा हात सोडला. त्याने आता मागे पाहिले नाही. सरळ निघाला. पत्नी थरथरत उभी होती. तिचे डोळे आता भरून आले. तिने हात जोडले, तिने प्रार्थना केली. ती घरात आली. तिने चिमुकल्यांचे मुके घेतले. सर्वांत लहानाला कुशीत घेऊन ती पडली.

तपश्चर्येला योग्य असे स्थान दधिची बघत होता. साबरमतीचे पवित्र व प्रशांत तीर त्याला आवडले. शुद्ध, स्वच्छ स्रोतवती साबरमती. वरच्या अनंत आकाशाचे

स्वच्छ प्रतिबिंब तिच्यात पडलेले दिसे. आपल्या निर्मळ हृदयात परम सत्याचे प्रतिबिंब एक दिवस असेच पडेल, असे दधिचीस वाटले. साबरमतीच्या तीरावर उंच वृक्ष होते. माझे मनही असेच उंच होईल, देवाजवळ हितगूज करील, जवळ येतील त्यांना मी छाया देईन, जवळ असेल ते देईन, आधार देईन, या वृक्षाप्रमाणे होईन, असे दधिची मनात म्हणाला.

साबरमतीच्या तीरावरील वनात हिंस्र पशू नव्हते. सिंह, वाघ नव्हते. अस्वल-लांडगे नव्हते. त्या वनात खेळकर हरणे होती. कधी वनगाईंचे कळप दिसत. तसेच मोर, पिक, शुक, मैना हे पक्षीही होते. सुंदर गोड कलरव करणारे पक्षी. नदीची गुणगुण, पक्ष्यांचा कलरव, अलिगणांचा गुंजारव, पानांचा मर्मरध्वनी-याशिवाय तेथे आवाज नव्हता. तपश्चर्येला अनुकूल जागा. मन शांत होण्यासाठी योग्य जागा.

दधिचीने तेथे लहानशी पर्णकुटी बांधली. त्याने तप आरंभिले. मोठ्या पहाटे तो उठे. आकाशातील सप्तर्षी आकाशगंगेत स्नाने करीत व दधिची साबरमतीत स्नान करी. स्नानानंतर दर्भासन घालून त्यावर तो बसे. तो वृत्ती स्थिर करी, वासना संयत करी, भ्रमंती करणाऱ्या मनाला हृदयात निश्चल करू बघे.

दधिची प्रथम थोडी कंदमुळे खात असे; परंतु पुढे तेही त्याने सोडले. झाडावरचे फळ तो पाडीत नसे. पडलेले खात असे. काही दिवसांनी त्याने पर्णाशन आरंभिले: परंतु पुढे पाने तोडून खाण्याचे त्याने बंद केले. पडलेली पानेच तो खाई. अशा रीतीने तो स्वाद जिंकून घेत होता. बाह्यरसाची रुची नाहीशी झाली. बाह्य रसांची आसक्ती कमी झाली. हृदयात रससागर उचंबळू लागला. 'रसानां रसमतः' अशा परमानंद हृदयात भरू लागला. दधिचीला अत्यंत प्रसन्न असे वाटू लागले. वेग नाही. आवेग नाही. धडधड नाही, धडपड नाही. इच्छा नाही, काही नाही. चित्त निर्विषय व निर्विकार झाले. अपार शांती जीवनात आली. ती तोंडावर फुलली, डोळ्यांत शोभली.

दधिचीच्या जीवनात परंज्योती प्रकट झाली. आतील प्रकाश बाहेर आला. त्याचे शरीर जणू कर्पूराचे आहे की काय असे दिसे. कधी कधी त्या शरीरावर सुवर्णाची झाक मारी. ते शरीर सोन्याप्रमाणे सोज्ज्वळ होते व फुलाप्रमाणे हलके होते. जणू जीवात्म्याला पांघरवलेली भक्तिप्रेमाची शुद्ध शुभ्र शाल. जणू जीवात्म्याला पांघरवलेला ज्ञानाचा झगझगीत पीतांबर: ते शरीर शरीर नव्हते. ते जणू चिदंबर होते. तो

देह म्हणजे जणू एक रम्य सुवर्णमंदिर होते व त्या सुवर्णमंदिराच्या आवारात अमृत-सर निर्माण झाले.

दधिचींचा देह पाहून पाखरे वेडी होत, हरणे वेडी होत. दधिचींच्या श्वासोच्छ्वासातून दिव्य सुगंध बाहेर पडे. त्यांचे ते डोळे आणि त्यातील ती बुबुळे-शक्तिपुटातून काळ्या रंगाचे निर्मळ मोतीच बाहेर पडत आहेत असे वाटे. अर्धोन्मीलित असे ते डोळे असत आणि दात म्हणजे जणू हिऱ्यांची पंक्ती, मोत्यांची आवली! दधिचींच्या अंगावर आनंदाचे रोमांच उठत व अष्टभाव दाटून स्वेदकणिका उठत, त्या वेळेस अनंत ताराच अंगावर आहेत असे वाटे.

दधिची कधी कधी अत्यंत एकाग्र होत. त्या वेळेस पक्षी त्यांना प्रदक्षिणा घालीत, हरणे चरणांशी बसत. जणू स्थिरतेचे धडे त्यांना मिळत असत. समाधी सुटावी व दधिचींच्या डोळ्यांतून प्रेमाश्रूंचे शत पाझर सुटावेत. मांडीवर पक्ष्यांनी बसून चंचुपुटे हळूच वर करून ते घळघळणारे अश्रू गिळावेत. असा आनंद, परमानंद त्या वनांत भरला. दधिची स्थिरचराशी एकरूप झाले. प्रेमाने सर्व ब्रह्माण्डाशी मिळून गेले.

त्यांच्या प्रेमाचा, त्यांच्या आनंदाचा, त्यांच्या समवृत्तीचा परिणाम आसपासच्या चराचर सृष्टीवर होऊ लागला. त्या तपोवनातील पक्षी भांडत नसत. साप मुंगसाजवळ खेळे व मोरासमोर प्रेमाने डोले. नागाचा फणा पाहून मोरही प्रेमाने पिसारा उभारी. एकदा सौराष्ट्रातील एक सिंह-मिथुन चुकून या साबरमतीच्या तपोवनात आले. त्या वनात येताच त्यांचे जीवन बदलले. शरीरातील अणुरेणू बदलत आहे असे त्या सिंह-जोडप्याला वाटले. समोरून हरणे आली. मृगेंद्रासमोर मृग नाचत आले. सिंहाने त्यांना चाटले, सिंह व सिंहीण हरणांबरोबर आश्रमाकडे गेली. दधिची एका तरुतळी बसले होते. सिंह व सिंहीण प्रदक्षिणा घालती झाली. हरणांबरोबर नांदू लागली.

त्या तपोवनातील तरू, लता, वेली सदैव टवटवीत दिसत. जणू दधिचीच्या प्रेमातून त्यांना ओलावा मिळे, ऊब मिळे. झाडावरची फुले अधिक सतेज व सुगंधी झाली. फळे अधिक सुंदर व रसाळ झाली. साबरमतीचे पाणी अधिकच स्वच्छ व मधुर असे झाले. पाखरांच्या पंखांचा रंग अधिकच खुलू लागला. सर्वांना जणू अमृताचा स्पर्श झाला. अमर रसायन मिळाले.

एखाद्या दिवशी समाधी सोडून प्रेमभराने दधिची नाचू लागत. जणू ते प्रेम जगाला देत, दोन्ही हातांनी वाटीत. ते नाचू लागले म्हणजे मोर नाचू लागत. सारी पाखरे नाचू लागत. हरणे नाचू लागत, साप डोलू लागत. तरू, लता, वेली नाचू लागत, साबरमतीचे पाणी नाचे, तेथील कंकर नाचत, वाळवंटातील कण थै थै नाचत. पृथ्वीला नाचावेसे वाटे. आसपासच्या टेकड्या नाचात सामील होत. सकल चराचराचा जणू विराट प्रेममय नाच सुरू होई आणि वारा प्रेमाचे सामगीत म्हणे.

असा हा तपःसूर्य तेथे तापत होता. प्रेमचंद तेथे शोभत होता. त्याच्या प्रेमाची ऊब जगाला मिळत होती. म्हणून जगाला धुगधुगी होती. परंतु दधिचींना त्याची जाणीव नव्हती. त्यांचा अहं मेला होता. त्या शरीरात आता दधिची नव्हते राहात. त्या शरीरात विश्वमूर्ती येऊन राहिली होती. विश्वंभर वास्तव्य करीत होता.

अशा या दधिचीकडे देवांसह इंद्र यावयास निघाला. सारे देव पायी येत होते. महात्म्याच्या दर्शनासाठी अनवाणी असे ते येत होते. देवांच्या संगे मानवांचेही काही प्रतिनिधी होते. आपल्या तपःसामर्थ्याने जे अद्याप जिवंत होते, असे अत्री व वामदेव, वसिष्ठ व विश्वामित्र, अगस्ती व गौतम हेही निघाले.

दधिचीच्या तपोवनात मंडळी शिरली. सर्वत्र पावन व मंगल असे वाटले. सर्वत्र सुगंध दरवळत होता. येणाऱ्या थोरांचे पाखरांनी स्वागत केले. वृक्षांनी पुष्पांचे अर्घ्य दिले. देव व मानव आदराने व भक्तीने ओथंबून हळूहळू येत होते. ध्यानस्थ बसलेल्या दधिचीस सर्वांनी प्रदक्षिणा घातली. सारे हात जोडून उभे राहिले. नंतर सर्वांनी स्तव आरंभिला. दधिचींनी हळूहळू नेत्र उघडले.

देवेंद्र बोलू लागला, "हे महर्षे, हे यज्ञमूत, हे प्रेममया, ज्ञानमया, सर्व सृष्टीचा संहार होण्याची पाळी आली आहे. काही उपाय चालत नाही. आम्ही सारे कर्मच्युत झालो. भोगी व विलासी झालो. यामुळे सारी शक्ती गेली. आम्ही आज हतबल आहोत. घोर, प्रबळ शत्रू उत्पन्न झाला आहे. त्याने धेनूंसह सूर्याला पळविले आहे. सर्वत्र हाहाकार झाला. सूर्य लोपला. कर्म लोपले. अशा प्रसंगी आपणच तारू शकाल. आपल्या तपात सर्वांचे संरक्षण करण्याचे सामर्थ्य आहे. समाधी सोडा. दयेने आम्हाकडे पाहा. आपल्या चरणांना आम्ही शरण आहोत."

इंद्र थांबला. देवर्षी व महर्षी गीते गाऊ लागले. पुण्यमंत्र म्हणू लागले. दधिचींनी प्रेमाने सर्वांकडे पाहिले. घळघळ गंगा नेत्रांतून वाहिली. ती सुललित तनू पुलकित झाली.

अष्टभाव दाटले. दधिची विनयाने उभे राहिली. त्रिभुवनाचे मंगल उभे राहिले. कल्याण उभे राहिले. भाग्य उभे राहिले. दधिची बोलू लागले. वृक्षांवर पाखरे मुकी होती. पशूही झाडांखाली कान लावून ऐकत होते. साबरमतीचे पाणीही जणू वाहावयाचे थांबून ऐकू लागले. वृक्षांनी सहस्रावधी पर्णांचे कान केले व दधिचींचे शब्द ते प्राशू लागले.

दधिची म्हणाले, ''देवश्रेष्ठा सुरेंद्रा, हे सर्व देवांनो, हे थोर ऋषिमुनींनो, आपण आज मला कृतार्थ केलेत. आपले दर्शन देऊन मला पावन केलेत. तुमच्या पुण्यमूर्ती पाहून मी धन्य झालो. मी आपला सेवक आहे, नम्र सेवक आहे. योग्य सेवा करता यावी म्हणूनच माझे जीवन मी निर्मळ करीत होतो. हे माझे निर्मळ जीवन घ्या व उपयोगी लावा. तुम्ही ज्या अर्थी माझ्या जीवनापासून सेवा घेणे इच्छित आहात, त्या अर्थी माझे जीवन. मी स्वामी नाही. माझ्या जीवनाचा घडा शुद्धतेने भरलेला असेल तर तो घ्या व तुमच्या सेवेत रिता करा. देवेंद्रा, काय करू मी? कोणती सेवा?''

असे बोलून दधिचींनी सर्वांस सप्रेम लोटांगण घातले. इंद्रवरुणांनी, वसिष्ठवामदेवांनी दधिचीस उठविले. सर्वांची हृदये भरून आली होती. थोरांचे थोर शब्द. ते दगडांना पाझर फोडतात, त्यांना नवनीताप्रमाणे मऊ करतात.

इंद्र म्हणाला, ''भगवन, आपला देह मागावयास मी आलो आहे. मी अगतिक आहे. त्रिभुवनाच्या रक्षणासाठी हे कठोर दान मी मागत आहे. आपल्या प्राणांची भिक्षा घाला. आपल्या या सुपूत, सुसंस्कृत देहाची भिक्षा घाला. तपश्चर्येने पावन झालेला हा देह! या देहातील अणुरेणू अपार सामर्थ्याने भरलेला आहे. आजपर्यंत आपण यज्ञ करीत आलात. विषयवासनांचे, कामनांचे, इंद्रियांचे बाह्यरसांचेद, आसक्तीचे हवन केलेत. उत्तरोत्तर यज्ञ करून पावित्र्य संपादलेत. पावित्र्य म्हणजे चिरयज्ञ. घाण जाळणे. तुमच्या जीवनातील सारा खळमळ जळून गेला. आता शेवटचा महान यज्ञ करा. पवित्र जीवनाची आहुती द्या. तुमचा देह आम्हास द्या.''

दधिचींच्या डोळ्यांत आनंदाश्रू आले. ते म्हणाले, ''देवेंद्रा, तू कठोर नाहीस. तू अत्यंत उदार आहेस. माझ्या या मातीचे तू सोने करीत आहेस. हा देह जगत्सेवेसाठी देता येत आहे, याहून धन्यतम, प्रियतम ते काय? आज जीवन कृतार्थ झाले. तपश्चर्या सुफल झाली. वैराग्य कृतकृत्य झाले. यज्ञदेव प्रसन्न झाला. हा देह शक्य तितका शुद्ध झाला. माझे जीवन शक्य तितके निर्मळ मी केले आहे. अजूनही दोष असतील ते तुम्हा थोरांच्या आशीर्वादाने खाक होवोत. निर्दोष एक परमेश्वर आहे. तुम्ही सारे संत

मजजवळ ही माझी माती मागत आहात. मी आनंदाने देतो. माझ्या मातीचे सोने झाले. देवेंद्रा, तुम्ही कठोर नसून कारुण्यसिंधू आहात. तुम्ही प्राण मागत नसून प्राणदान करीत आहात. मरण देत नसून अमर करीत आहात. मूठभर माती व ही हाडे नेऊन मला परमात्मा अर्पित आहात. कुवडी घेऊन त्रिभुवनाची संपत्ती देत आहात. ज्या तुमच्या नंदनवनात इच्छिलेले देणारे कल्पवृक्ष असतात, सकल कामना पुरवणाऱ्या कामधेनू असतात, ते तुम्ही कठोर कसे व्हाल? तुम्ही उदारांचे राणा आहात.

ईश्वराला मी सदैव एक प्रार्थना करीत असे. त्याला म्हणत असे, 'देवा, माझे असत्य घे व मला तुझे सत्य दे. माझा अंधार घे व तुझा प्रकाश मला दे. माझे मर्त्य शरीर घे व तुझे अमृतत्व मला दे.' ती प्रार्थना परमेश्वराने आज ऐकली असे दिसते. आज माझे नवस पुरले. तळमळ शांत झाली. देवेन्द्रा, किती तुमचे आभार मानू, उपकार मानू? कसा होऊं तुमचा उतराई? हे जीवनाचे फूल मी तुम्हाला दिल्यावर आणखी द्यावयास मजजवळ काय आहे? आता मी समाधिस्थ होतो. माझी ज्योती परंज्योतीत मिळवितो. हा जीवनाचा बुडबुडा चैतन्यसिंधूत मिसळून देतो. माझी लहानशी तान त्या गानसागरात मिळवतो. आधी मी स्नान करून येतो."

असे म्हणून दधिची निघाले. स्नानार्थ निघाले. पाठोपाठ देव होते. इतक्यात वसिष्टांना एक गोष्ट आठवली. दधिचींची थोर पत्नी, त्यांची मुले यांची वसिष्ठांस आठवण झाली. ते वाऱ्याला म्हणाले, "वायूदेवा, धावत जा. दधिचीच्या घरी जा. त्यांची थोर पत्नी व मुले यांना घेऊन ये. शेवटचे दर्शन त्यांना घेऊ दे. शेवटची पूर्णाहुती त्यांना पाहू दे."

वायूदेव धावत गेला. दधिचीची पत्नी पतीच्या प्रेमामुळे जिवंत होती. तिचे त्यागमय जीवन मुलांना ऊब देत होते. वायूदेव दारात उभे राहिले.

"कोण आहात आपण? देव दिसता." पत्नी प्रणाम करून म्हणाली.

"मी वायूदेव आहे."

"सूर्यदेव कोठे आहे?"

"कोणा शत्रूने पळविला."

"मग जगाचे कसे होईल?"

"कोणी महात्मा भेटला तर तो हे संकट टाळील. ज्याच्या जीवनात महान यज्ञतत्त्व ओतप्रोत भरलेले आहे तोच तारील. त्या शत्रूवर इतर शस्त्रे चालत नाहीत."

“मग कोण आहे असा महात्मा?”

“आपला पती. त्यांच्याजवळ आम्ही प्राणभिक्षा मागितली आहे. त्यांचा देह आम्हाला पाहिजे आहे. त्यांचे प्रेममय हृदय पाहिजे आहे. हृदयाभोवतीच्या अस्थी घेऊन मध्ये हृदय बसवून त्याचे वज्र करणार आहोत. चराचरावर प्रेम करणाऱ्या महात्म्याचे ते हृदय. त्या हृदयाचे ते वज्र शत्रूला विरघळवील. ते प्रेमवज्र शत्रूला जिंकील. दधिची भगवान लवकर देह सोडतील. तुम्हाला मी नेण्यासाठी आलो आहे. शेवटचे दर्शन घ्या. आम्हा सर्वांना क्षमा करा. तुमच्या सौभाग्याचे दान आम्ही मागत आहोत. पतिव्रते, कृपा कर. जगाचे कल्याण होऊ दे.”

“माझा पती मरत नसून अमर होत आहे. अखंड सौभाग्य मला मिळत आहे. चला, मी येते. मुलांना घेऊन येते. शेवटचे दर्शन घेईन, प्रणाम करीन. मुले पायांवर पडतील, कृतार्थ होतील.” असे म्हणून पत्नी यायला निघाली. सारी मुले बरोबर निघाली. वायूदेव एका क्षणात त्यांना घेऊन आला.

“शिवोऽहं धन्योऽहं परमकृतकृत्योऽहमधुना।”

असे भावनाकंप ओठांनी म्हणत दधिची साबरमतीचे स्नान करते झाले. त्यांनी साबरमतीस, त्या आपोमातेस, लोकमातेस हात जोडले. ते म्हणाले, “आई, तुझ्या पाण्याने तू मला अपहतमात्मा केलेस. तुझ्या पुण्यजलामुळे माझे जीवन निष्पाप झाले. ‘इदमापः प्रवहत यत्किंच दुरितं मयि’ ही माझी प्रार्थना तुझ्या पाण्याने ऐकली. तुझ्या पाण्याने माझे पाप धुतले गेले. वासनांनी बरबटलेल्या या बाळाला, हे माते, तू शत तरंगांनी प्रत्यही धुतलेस. म्हणून हे जीवन आज जगाच्या सेवेला देता येत आहे.”

दधिची आश्रमाकडे आले. त्यांनी आश्रमाभोवतालची झाडेमाडे, पशुपक्षी यांना प्रेमाने प्रणाम केला. ते म्हणाले, “हे माझे सखेसोयरे. माझे येथील आधार. यांनी मला रिझविले. वातावरण प्रसन्न ठेवले. हे तरू तर माझे सद्गुरू!”

इतक्यात दधिचीही पत्नी तेथे आली.

तू का आलीस? तुझ्याच पाया पडू दे. तू अनुज्ञा दिलीस म्हणून तुझ्या पतीला हे भाग्य मिळत आहे. तू रडली नाहीस, मला अडवले नाहीस, तुझे थोर उपकार! तू थोर आहेस. जगाला माझा यज्ञ दिसत आहे; परंतु तुझा होम मला दिसत आहे.” पत्नीला ते म्हणाले.

तिने मुलांना पायांवर घातले. दधिचींनी मुलांच्या मस्तकावर मंगल हात ठेवला. "सुकृती व्हा!" असा आशीर्वाद दिला.

माता व मुले दूर उभी राहिली. त्यांच्या डोळ्यांतून अश्रू वाहत होते. त्यांनी हात जोडले होते. देवांनी हात जोडले. ऋषिमुनींनी हात जोडले. दधिची आसनावर बसले. सारी सृष्टी स्थिर गंभीर होती. महान यज्ञ सुरू झाला. दधिचींनी समाधी लाविली. पाखरे रडू लागली. हरणे अश्रू ढाळू लागली. सिंह हुंदके देऊ लागला. ऋषी व देव त्या महान यज्ञदेवाला प्रदक्षिणा घालू लागले. पशुपक्षी प्रदक्षिणा घालू लागले. ती माता व तिची लेकरे दुरून बघत होती. दधिचींची प्राणज्योत परमज्योतीत मिळून गेली.

"चला, बाळांनो!" माता मुलांना म्हणाली.

"आई, बाबा कधी भेटतील, कधी उठतील?"

"ते नेहमी भेटतील. ते आपल्याजवळ आहेत, सर्वांजवळ आहेत. चला." ती सद्गदित होऊन म्हणाली. वायूदेवाने त्यांना घरी पोहोचविले.

इकडे तो पवित्र देह आसनावर होता. देहातील अस्थी दिसत होत्या. त्या अस्थींवर जणू झिरझिरीत, लखलखीत, रुपेरी असा त्वचेचा पडदा होता. ती त्वचा कोणी काढायची? अस्थी कोणी काढायच्या? कोणी करायचे ते काम? हलक्या हाताने कोण सोलणार तो देह? आईशिवाय कोण करील हे काम? हलक्या हाताने मुलाचा अंगरखा ती काढते. वसिष्ठ ऋषी म्हणाले, "गोमातांना हे काम सांगावे. या देहाला आपण थोडे मीठ चोळू, म्हणजे शरीराला पाझर सुटेल. गोमाता हे अंग मग चाटतील. हळूहळू प्रेमाने चाटतील. त्वचा झिरपून जाईल. अस्थी जशाच्या तशा मिळतील."

वसिष्ठांच्या म्हणण्यास अश्विनीदेवांनीही संमती दिली. अश्विनीदेवांनीच मीठ चोळावे असे ठरले. त्यांनी हलक्या हातांनी त्या पुण्यमय देहाला मीठ चोपडले. नंदिनी आदी कामधेनू आल्या व त्यांनी तो झिरपणारा देह चाटला. वरचे झिरझिरीत तनुपटल दूर झाले. आतील स्वच्छ अस्थी मिळाल्या.

इंद्राने त्या पवित्र अस्थी त्वष्ट्याच्या स्वाधीन केल्या. त्वष्ट्याने त्या अस्थींच्या मध्ये हृदय बसवून एक वज्रदेह तयार केला. ते अभंग वज्र देवेन्द्राने हातात घेतले. साऱ्या त्रिभुवनाची शक्ती हातात आल्याप्रमाणे त्यांना वाटले. देवांना आनंद झाला. मानव आशेने अंथरुणात आनंदले.

वृत्राला त्या महान यज्ञाची वार्ता कळली होती. दधिचींच्या जीवनार्पणाची वार्ता कळली होती. त्याला आनंदच होत होता. ईश्वराने ज्या कार्यासाठी पाठविले ते आता पुरे होणार व जगात यज्ञतत्त्व जिवंत आहे हे कळून ईश्वराला आनंद होणार, असे मनात येऊन वृत्र नाचू लागला. त्याला स्वतःचे मरण दिसत होते; परंतु त्या मरणाबरोबरच कर्तव्यपूर्ती होणार होती. जगाच्या रंगभूमीवरील त्याची भूमिका समाप्त होणार होती. मग मरणाचे काय दुःख?

दधिचींच्या पुण्यमय देहातील अस्थींचे ते वज्र आपणावर फेकले जाणार, या कल्पनेने वृत्र सुखावला होता. येऊ दे ते पवित्र वज्र. प्रेममय वज्र. ते मी माझ्या हृदयावर घेईन. माझ्या प्राणपुष्पांनी त्याची पूजा करीन. ते वज्र घेताच त्याच्यासमोर मी विलीन होईन. ईश्वरात मिळून जाईन.

इंद्र व वृत्र यांचे पुन्हा युद्ध सुरू झाले. इंद्राने वृत्राला आव्हान दिले व तो म्हणाला, ''वृत्रा, असुरा, अधमा, आता तुझी धडगत नाही. तुला आता कोण वाचवणार, कोण सांभाळणार? त्रिभुवनाला जो गांजतो, त्याला कोण आश्रय देणार? सर्वांना छळणाऱ्या पाप्याला शेवटी आधार नाही, आश्रय नाही. स्वतःच्या पापाने तू मर. तयार हो, इष्ट देवतेचे स्मरण कर. आपल्या आईबापांचे स्मरण कर. हे पाहा वज्र आले, पवित्र अस्थींचे तेजस्वी वज्र, सावध राहा.''

वृत्र म्हणाला, ''देवेन्द्रा, मी याच क्षणाची वाट पाहात होतो. त्या थोर महात्म्याच्या अस्थींच्या स्पर्शाने मला मरण यावे, याहून भाग्य ते कोणते? हा साक्षात परमेश्वराचा स्पर्श आहे. मला मरण नाही येणार, मी विलीन होईन. मी स्वीकारलेली कठोरता वितळून जाईल. येऊ दे ते वज्र, येऊ दे त्या महापुरुषाचे महान हृदय. त्या हृदयकमलाचा स्पर्श होताच माझे हृदय उघडेल. मी माझ्या प्राणांनी त्या पवित्र हृदयाची पूजा करीन. त्या पवित्र हृदयाचा स्पर्श व्हावा, म्हणून मी किती दिवस अधीर झालेलो आहे. माझ्या हृदयकपाटात कोंडून ठेवलेल्या त्या तेजःप्रसवा धेनू त्याही बाहेर यावयास अधीर आहेत. माझ्या हृदयाजवळ मी त्यांना ठेवले होते. आता माझे हृदय उघडेल व त्या धेनू बाहेर येतील. चराचराला पुन्हा तेजःस्नान घालतील, तेजःपान घडवतील. त्या गाई व तो गोपाळ सुखरूप आहेत माझ्या हृदयदुर्गात. फेक ते वज्र, सोड ते वज्र. या असुराच्या देहाला मोक्ष दे. मी उद्धरून जाईन.



श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

मी असुर आहे, मी पापी आहे; परंतु प्रभूच्या आज्ञेने मला पापी व्हावे लागले. तुम्हा सर्वांची परीक्षा घ्यावयास परमेश्वराने मला पाठविले होते. तुमच्यात यज्ञधर्म जिवंत आहे की नाही, ते पाहावयास प्रभूच्या आज्ञेने मी आलो होतो. तुमची कसोटी पाहण्यासाठी मला सारे करावे लागले. तुम्ही मला शिव्याशाप दिलेत, दुष्ट, पापी, अधम, चांडाळ म्हटलेत. माझ्या नावाने सर्वांनी बोटे मोडली, खडे फोडले; परंतु हे सारे मला सहन करावे लागले. कर्तव्य कठोर आहे. ईश्वराने सांगितले ते केले. ते जगाला रुचो वा न रुचो; स्वतःलाही रुचो वा न रुचो, त्याची इच्छा प्रमाण. देवेन्द्रा, सुर-नराची परीक्षा घेण्यासाठी असुर-संभव होत असतो. मानवजातीचे, तुम्हा सर्वांचे हृदय नीट शाबूत आहे की नाही, हे ठोकठाकून आम्ही पाहावयास येत असतो. आम्ही असुर म्हणजे जगाची परीक्षा घेणारे परमेश्वराचे दूत आहोत. त्याग, प्रेम, बंधुभाव, यज्ञ वगैरे महान तत्त्वं जगात जिवंत आहेत की नाही, हे पाहावयासाठी प्रभू आम्हास पाठवीत असतो. असुर हेही प्रभूचा आदेश पार पाडणारे असतात, हे ध्यानात धरा. असुरांचा तिटकारा नका करू. ईश्वराच्या नाटकात आम्हाला जी भूमिका मिळते, ती आम्ही पार पाडतो. असुर होण्याची भूमिका कोणीतरी पार पाडलीच पाहिजे. खरे ना? असो. देवेन्द्रा, हा घे माझा शेवटचा प्रणाम. ही सकल चराचराला अंतिम वंदना. आता येऊ दे ते वज्र, प्रेममय हृदय. मी करांजली जोडून उभा आहे.''

तो असुर वृत्र हात जोडून साश्रू असा उभा होता. इन्द्राने ते अस्थिमय वज्र सोडले. ते निर्मळ हृदयपुष्प येऊ लागले. चराचरात परिमल भरला; गोड सुगंध दशदिशांत दरवळला. मंगल वारे वाहू लागले. जी छाती इंद्राच्या वज्रासमोर निष्कंप राहिली होती, त्या छातीला स्पर्श करून विदीर्ण करण्यासाठी ते हृदयवज्र आले. वृत्राला हृदयाला स्पर्श करते झाले. ती पहाडी छाती दुभंगली, बंद हृदय उघडले, कठोर हृदय विरघळले, कठोर जीव वितळले. वृत्राचा देह पडला. त्याचा आत्मा परमात्म्यात मिळाला.

वृत्राच्या हृदयकपाटात कोंडलेल्या सहस्रावधी तेजःप्रसवा धेनू धावतच बाहेर आल्या. किरीटधारी भगवान सूर्यनारायण गाईंपाठोपाठ उभा होता. बुभुक्षित जगाला त्या गाईंनी लक्षावधी तेजःपयाच्या धारा सोडल्या. जगाला टवटवी आली. झाडे हिरवी दिसू लागली. पाखरांचे फिकट रंग तजेलदार झाले. फुले हसली. मुले-मुली, नारी-नर अंगणात नाचू लागली. ''जय सूर्यनारायणा!'' असे म्हणून नमस्कार करती

झाली. ऋषींनी छाट्या फडकविल्या. बायकांनी फुले फेकली. मुलांनी टाळ्या वाजविल्या. चराचराला आनंद झाला. देवांनी दुंदुभी वाजविल्या. गंधर्व गाऊ लागले. अप्सरा नृत्य करू लागल्या. सृष्टीत आनंद भरून राहिला. विश्वयंत्र पुन्हा सुरळीत सुरू झाले. परमेश्वराचा सर्व त्रिभुवनाने स्तव आरंभिला. भूतलावर सारी मानवजात उभी होती, हात जोडून उभी होती. स्वर्गात तेहेतीस कोटी देव उभे होते. 'हे सृष्टिनियंत्या परमेश्वरा, विश्वरूपा, विश्वेश्वरा, आम्हाला अतःपर सद्बुद्धी दे. आमच्यात त्यागबुद्धी जिवंत ठेव, यज्ञपूजा जिवंत ठेव. दधिची भगवानांचे हे महान बलिदान, त्याची आम्हास सदैव स्मृती राहो!'

परमेश्वराचे हृदय आनंदाने व वात्सल्याने ओसंडून गेले होते. आपल्या दिव्य ज्ञानमय सिंहासनावरून तो म्हणाला, "मुलांनो! हा पाहा बाळ दधिची माझ्या मांडीवर बसला आहे. त्याने यज्ञमय असे थोर पूजन केले आहे. स्वतःचे जीवन निर्मळ करून शेवटी जगत्सेवेस त्याने दिले आहे. त्याने तुम्हाला वाचविले. एखादा महात्माही सकल विश्वाला वाचवितो. धन्य आहे दधिची! त्याचे दिव्य जीवन डोळ्यांसमोर ठेवा. आता उतू नका, मातू नका.

'यज्ञ एव महान् धर्मः ।
यज्ञ एव परा गतिः ।।'

हे सूत्र ध्यानात धरा. हा दधिचीचा महिमा तुम्हाला सदैव जागृती देईल. त्याच्या पुण्याईने मधून मधून महात्मे तुमच्यात उत्पन्न होतील. ज्या स्थानी दधिचीने तप केले, आपले जीवन शुद्ध केले आणि शेवटची पूर्णाहुती दिली ते स्थान अतिपवित्र आहे. तेथील अणुरेणू पवित्र आहेत. तेथील भूमी यज्ञमय आहे. पुनःपुन्हा मुमुक्षू तेथे जातील, आपली जीवने निर्मळ करतील. जगाच्या कल्याणार्थ होमितील. दधिची ध्यानात धरा, संयमी व्हा, कर्तव्यकर्मे नीट पार पाडा. जा आता. तुमचे कल्याण असो!"

चराचराने प्रभूला वंदन केले. दधिचीच्या आश्रमस्थानावर कल्पवृक्षाच्या फुलांची वृष्टी झाली. सुरनर आपापल्या जागी गेले, स्वकर्माने सारे रंगून गेले.

दधिचींच्या त्या महान जीवन-यज्ञाला शेकडो वर्षे झाली. साबरमतीच्या तीरावर दुधेश्वर म्हणून शंकराचे स्थान आहे, तीच काय ती त्या प्राचीन बलिदानाची स्मृती. परंतु या विसाव्या शतकात पुन्हा एक महात्मा तेथे आश्रम काढता झाला. जगातून यज्ञधर्म लोपला आहे. आसुरी वृत्ती बळावल्या आहेत. श्रमणारे मरत आहेत.

श्रीमंतांची गंमत चालली आहे. स्पर्धेला ऊत आला आहे. जीवन म्हणजे काही सुखाची बेरीज, असेच समीकरण होऊ पाहात आहे. संयमाची आज टिंगल होत आहे. वासनांना ऊत आला आहे. जगात 'बळी तो कान पिळी' हे तत्त्व रूढ होत आहे. माणसे पशू होत आहेत. त्यांना पशू केले जात आहे. राष्ट्रे एकमेकांच्या अंगावर धावत आहेत. खरी संस्कृती लोपली आहे. मानव्य मेले आहे. सद्विचार अस्तास गेला आहे. भूतमात्राचे कल्याण पाहण्याची वृत्ती नष्ट झाली आहे. जिकडे तिकडे भेद, मत्सर, द्वेष, कलह, युद्धे. जगात पाहाल तिकडे वणवे पेटले आहेत. हृदयात वणवे, बाहेर वणवे. युरोपातील राष्ट्रे मारणमरणात रंगली आहेत. काही महत्त्वाकांक्षी असुरांच्या महत्त्वाकांक्षेसाठी मानवांची कत्तल होत आहे. इकडे जपान तेच करीत आहे. दुसऱ्याला लुटणे, गुलाम करणे हाच परमधर्म होऊन बसला आहे. मनुष्यरूपाने जो जास्तीत जास्त क्रूर असा पशू होऊ बघेल, त्याची पूजा होऊ लागली आहे.

जगात आसुरी सत्ता पसरत आहेत. माणसांची मडकी केली जात आहेत. ना त्यांना जणू स्वतंत्र मन, स्वतंत्र बुद्धी. एकाचे सारे गुलाम आणि या भरतभूमीत काय आहे? ज्या भारताने येणाऱ्या सर्वांस आधार दिला, सारे धर्म, साऱ्या संस्कृती यांना जवळ घेऊन पोसले त्या भारतात काय आहे प्रकार?

या भारतातही आज द्वेषाची उपनिषदे, द्वेषाची कुराणे पढविली जात आहेत. हिंदुस्थान केवळ हिंदूंचा असे कोणी म्हणत आहेत, तर या हिंदुस्थानचे तुकडे पाहून पाकस्थाने निर्मू, असे कोणी म्हणत आहे. युरोपातील लोकांनी आपले लहान लहान गट केले. सारे स्वसंरक्षणास असमर्थ झाले. उद्या हिंदुस्थानातही जर अलग अलग राष्ट्रे जन्मली, तर सारी स्वसंरक्षणास असमर्थ ठरतील. सारा भारतवर्ष एक. जे जे या भरतखंडात आहेत, येथे ज्यांची घरेदारे, येथे जे राहू इच्छितात, धनी म्हणून नाही, तर एकमेकांचे भाऊ म्हणून नांदू इच्छितात, त्या सर्वांचा हा भारतवर्ष आहे. म्हणूया की, आपण सारे एक. असतील भिन्न धर्म, भिन्न संस्कृती, भिन्न भाषा, भिन्न प्रांत; परंतु भारतीयता एक आहे. या भारतात तरी आपण भेदात अभेद पाहूया, मिळते घेऊया. महान ऐक्यसंगीत निर्मूया.

परंतु कोण ऐकणार? द्वेषाचे फवारे उडत आहेत, गरळे ओकली जात आहेत, लहान लहान मुले जमवून त्यांच्या निर्मळ–निष्पाप मनांत विषे पेरली जात आहेत. अरेरे! भारतमाता रडत असेल. दधिची भगवान काय म्हणतील?

परंतु भारतमातेचा एक सत्पुत्र या प्रचंड विरोधांच्या वावटळीत एका बाजूस साबरमतीच्या तीरी बसला होता. स्वतःचे जीवन शुद्ध करीत होता. मधून मधून तो बाहेर येई, स्वतःच्या जीवनाची शेवटची पूर्णाहुती द्यावी म्हणून बाहेर येई; परंतु पुन्हा थांबे. आणखी होऊ दे निर्मळ जीवन, असे जणू त्या महात्म्यास वाटे.

हिंदू-मुसलमान भांडत आहेत, करू दे प्रायोपवेशन! स्पृश्य बंधू अस्पृश्यांना माणुसकी देत नाहीत, करू दे प्रायोपवेशन! परकीय सरकार भारतात दुही माजवू बघते का? करू दे प्रायोपवेशन! अशा रीतीने हा महात्मा जीवनाचा यज्ञ मांडीत आहे. त्याने होमकुंड पेटवले आहे.

आणि आज १९४० साली फारच भीषण छाया जगावर पसरली आहे. युद्धाचा डोंब पेटला आहे. कोणी जगाला गुलाम करण्यासाठी लढत आहेत. कोणी जगाला स्वातंत्र्य देण्यासाठी म्हणून लढत आहेत; परंतु स्वातंत्र्यासाठी लढणारेही आपल्या पंजाखाली कोट्यवधी लोक दाबून ठेवू पाहात आहेत. सारा दंभाचा, स्वार्थाचा, अहंकाराचा पसारा! आणि या भारतवर्षातही पूर्वी कधी नव्हता इतका परस्पर अविश्वास, इतका परस्परद्वेष आज पसरला आहे. द्वेष पसरविण्यातच कृतार्थता मानली जात आहे.

अशा वेळी साबरमतीच्या तीरावर जेथे दधिचींनी प्राचीन काळी जीवनार्पण केले, त्याच स्थानी बसून ज्याने आपले विशुद्ध जीवन अधिक विशुद्ध केले, असा आजचा हा महर्षी, आजचा हा महात्मा, आजच्या या भीषण काळी जीवनाची शेवटची पूर्णाहुती देण्यासाठी उभा राहात आहे. अंधारात प्रकाश यावा म्हणून जगाला खरी शांती, खरी स्वतंत्रता, खरे सुख-समाधान लाभावे म्हणून शेवटचा यज्ञ करण्यासाठी अधीर होत आहे. या आजच्या नव दधिचीकडे पाहा. त्या यज्ञमूर्तीकडे बघा व आपापल्या जीवनात यज्ञपूजा सुरू करा, लहानमोठी यज्ञज्योत पेटवा. कारण यज्ञहीन राष्ट्र मरते व यज्ञपूजक राष्ट्र जगते. 'त्यागेन एव एकेन अमृतत्वमानुशः' हे श्रुतिवचन आहे.

✦✦✦

# अमोल गोष्टी

## गुणांचा गौरव

ग्रीक लोकांमध्ये स्वतंत्र लोक व गुलाम लोक असे दोन प्रकार असत. सॉक्रेटिससारख्या विचारवंत लोकांसही वाटे की, काही लोकांस ईश्वरानेच गुलाम म्हणून जन्मास घातलेले असते. आपल्याकडेसुध्दा शूद्र वगैरे ईश्वरानेच निर्माण केले म्हणून ते तसेच गुलाम राहणे युक्त असे समजण्यात येई. इतिहासात त्याच त्याच गोष्टी आपणास सर्वत्र दिसून येतात.

या गुलाम समजले जाणाऱ्या ग्रीक लोकांस काही काही बाबतींत मुळीच अधिकार नसत. आपल्याकडे शूद्रांस वेदाध्ययन किंवा दुसरे चांगले धंदे करण्याची परवानगी नसे. तसेच ग्रीस देशात होते. एकदा तर एक असा कायदा करण्यात आला की, शिल्पशास्त्राचा अभ्यास फक्त स्वतंत्र लोकांनीच करावा. निरनिराळ्या मूर्ती, पुतळे वगैरे गुलामांनी करता कामा नयेत. जर त्यांनी शिल्पकलेचे नमुने केले तर त्यांस भयंकर शिक्षा कायद्याने ठरविण्यात आली होती.

या ग्रीक लोकांत क्रेऑन म्हणून एक गुलाम होता, तो स्वतंत्र ग्रीक लोकांचा जसा गुलाम व एकनिष्ठ सेवक होता, त्याप्रमाणेच सौंदर्यदेवतेचा कलादेवतेचापण एकनिष्ठ भक्त होता. सौंदर्य ही त्याची देवता होती. ज्याची त्याची देवता त्याच्या वृत्तीप्रमाणे असते. हे दास म्हणत, 'स्वदेश हा माझा देव आहे व स्वजनसेवा ही माझी देवपूजा आहे.' प्रत्येकाचे विशिष्ट ध्येय म्हणजे त्याचा देव असतो.

या क्रेऑनची देवता शिल्पकला होती. तो स्वत: उत्कृष्ट शिल्पकार होता व एक उत्कृष्ट मूर्तिसंघ तो तयार करीत होता. तत्कालीन दुसरा प्रसिध्द शिल्पीफिडियस याची त्याला वाहवा मिळवावयाची होती. त्याप्रमाणे अथेन्सचा त्या वेळचा सूत्रधार व महान् मुत्सद्दी पेरिक्लीस हाही आपण केलेल्या मूर्ती पाहून प्रसन्न होईल असे त्याला वाटत होते.

त्या मूर्ती तयार करण्यात त्याने सर्व कौशल्य ओतले होते. स्वतःचे हृदय, मेंदू - सर्व जीवनच त्यासाठी त्याने अर्पण केले होते. आपण करतो हा पुतळा अपूर्व होईल असे त्याला वाटत होते. आपणास सर्वजण धन्यवाद देत आहेत हेच त्यास स्वप्नातही दिसे. ग्रीक लोकांची सर्वश्रेष्ठ देवता जी अपोलो तिची, क्रेऑन रोज नवीन नवीन स्फूर्ती देण्यास मनापासून प्रार्थना करी. आपल्या हातून ज्या मूर्ती घडत आहेत त्या अपोलोच्या स्फूर्तीमुळेच घडत आहेत आणि म्हणूनच त्या उत्कृष्ट होणारच असे क्रेऑनला खरोखर वाटे. 'श्रध्दाबलं बहुबलं' - श्रध्देसारखे बल नाही. आपल्या समोरचा मूर्तिसंघ जणू हाडामांसाचा आहे, जिवंत आहे, असे क्रेऑन यास वाटे.

पुतळा- तो मूर्तिसंघ, अद्याप पुरा झाला नव्हता; तोच वर सांगितलेला कायदा जाहीर करण्यात आला. क्रेऑन - गुणी व कलाभक्त क्रेऑन-गुलाम होता. पुतळ्याचे काम तसेच अपूर्ण सोडण्याशिवाय त्याला गत्यंतर नव्हते. ज्या देवतेची तो पूजा करीत होता, त्या देवतेस त्याला सोडून जाणे प्राप्त झाले. फिडियस, पेरिक्लीस वगैरेंकडून शाबास म्हणवून घेऊ वगैरे ती सुखस्वप्ने संपली, मावळली. 'उत्पद्यन्ते विलियन्ते दरिद्राणां मनोरथा;' हेच एकंदरीत कटू सत्य त्याच्या अनुभवास आले.

परंतु भगवंत खऱ्या भावनेला, उत्कृष्ट निश्चयाला साहाय्य करतोच करतो. क्रेऑन याची एक बहीण होती. तिचे नाव क्लिऑन. भावाच्या मनास बसलेल्या जबर धक्क्यामुळे क्लिऑन खचली. खिन्न झाली. ती परमेश्वरास म्हणाली, 'देवा, तू अमर, अनंत आहेस; तू सर्वसत्ताधीश आहेस; तू माझा आधार आहेस; तू माझी आशा आहेस. रोज तुझ्या चरणकमलांवर मी भक्तिभावाने फुले वाहिली आहेत. तू आमचा साहाय्यकर्ता हो. माझ्या भावाचा संकटकाळचा सखा हो."

परमेश्वराची करुणा भाकून क्लिऑन क्रेऑनला म्हणाली, "भाऊ, कष्टी होऊ नकोस, चिंता करू नकोस; आपल्या घराला तळघर आहे ना ? गुप्तपणे आपले काम

कर. तेथे अन्नपाणी मी आणून देत जाईन, तुझे काम सुरू ठेव; परमेश्वर तुझा साहाय्यकारी झाल्याशिवाय राहणार नाही.''

बहिणीच्या त्या उत्साहप्रद व प्रेमळ सांगण्यावरून क्रेऑन तळघरात जाऊन काम करू लागला; त्याची बहीण त्याचे सर्वदा संरक्षण करीत होती. रात्रंदिवस पहारा करून त्या गोष्टीची तिने कोणास दाद लागू दिली नाही. धोक्याचे काम होते; उघडकीस येते तर उभयतांचे मरण होते. क्रेऑन आपल्या मूर्ती घडविण्यात पुन्हा सर्व संकटे विसरून तल्लीन होऊन गेला.

थोड्याच दिवसांनी अथेन्स येथे कलाविषयक वस्तूंचे जंगी प्रदर्शन भरावयाचे होते. पेरिक्लीस हा चतुराग्रणी या समारंभाचा अध्यक्ष व्हावयाचा होता. तो ठरलेला दिवस उजाडला. पेरिक्लीस मुख्य स्थानावर अधिष्ठित झाला. त्याच्या शेजारी त्याची गुणी पत्नी ॲस्पेशिया ही बसली होती. सर्वांत नामांकित कुशल शिल्पी फिडियस तोही येथे बसला होता. मोठा तत्त्वज्ञ सॉक्रेटिस तो पेरिक्लीसजवळ शोभत होता. प्रसिध्द नाटककार सफोक्लीस हाही हजर होता. अशा प्रकारे मोठमोठे गुणी व विद्वान लोक, कवी, चित्रकार, शिल्पज्ञ व मुत्सद्दी तेथे हजर होते. ग्रीस देशातील हजारो लोक तो समारंभ पाहण्यास आले होते.

प्रदर्शन उघडण्यात आले. तेथे नाना प्रकारची सुंदर कामे होती. तेथे मनोहर पुतळे होते; नक्षीकामे होती. मोठमोठ्या कलाविदांनी तयार केलेले उत्कृष्ट नमुने तेथे हारीने मांडलेले होते. परंतु त्या सर्व वस्तूंत एक मूर्तिसंघ अलौकिक ठरला; सर्वोत्कृष्ट ठरला. प्रत्यक्ष अपोलो देवतेनेच तो घडवला असे सर्वांस वाटू लागले. त्या मूर्ती जिवंत होत्या; त्यांचे ओठ बोलत आहेत, मानेच्या शिरा उडत आहेत असे वाटत होते. त्या मूर्तिसंघाची सर्वांनी मुक्तकंठाने प्रशंसा केली. शिल्पज्ञांचा राजा जो फिडियस याने मोकळ्या व असूयारहित वृत्तीने सांगितले, ''हे काम दैवी आहे, मनुष्यांच्या हातून काम होणे कठीण.''

त्या पुतळ्यास, त्या मूर्तिसंघास बक्षीस देण्याचे ठरले; परंतु कोणा अभिनव शिल्पकाराची ही उत्कृष्ट कृती ? कोणाच्या हातांनी ही दैवी स्वर्गीय सौंदर्याची कृती घडवली गेली ? भालदार चोपदारांनी पुन्हा पुन्हा पुकारा केला, परंतु शिल्पकार पुढे येईना व कोणास माहिती दिसेना. सर्व लोक अधीर झाले. ''हे काम एखाद्या गुलामाचे तर नसेल ?'' असा पेरिक्लीसने प्रश्न केला.

इतक्यात एका सुंदर मुलीला लोक ओढीत आणीत होते. सर्वांचे लक्ष तिकडे गेले. तिचे केस विस्कळीत झाले होते; परंतु लोकांचे लक्ष तिच्या करुण स्थितीकडे नव्हते. त्या मुलीस अध्यक्षांसमोर आणून उभे करण्यात आले. सर्वांचे डोळे तिच्याकडे लागले. ती काय बोलते, काय प्रकरण आहे याबद्दल उत्कंठा वाढत होती. सर्व प्रेक्षकसागर हेलावत होता, गर्दीमुळे पुढेमागे होत होता. सरकारी अधिकारी ओरडून म्हणाला, ''या मुलीस त्या शिल्पकाराचे नाव माहीत आहे; परंतु ही हट्टी, उर्मट पोर ते सांगत नाही.''

पेरिक्लीसने परोपरीने त्या मुलीस प्रेमळपणाने, धमकीने विचारले; परंतु ती मुलगी स्तब्ध राहिली. ती शिल्पकाराचे नाव सांगेना. तिच्या डोळ्यांत अढळ व अभंग निश्चय होता. मरणाची बेपर्वाई तिच्या चेहऱ्यावर दिसत होती. ती पण एका पुतळ्याप्रमाणे स्तब्ध उभी आहे हे पाहून पेरिक्लीस संतापला व म्हणाला, ''कायदा कठोर आहे. कायद्याप्रमाणे मला वागले पाहिजे. या मुलीला कारागृहात घेऊन जा. तिला हातकड्या अडकवा.''

पेरिक्लीसचा हुकूम. अधिकारी क्लिऑनला तुरुंगात घालण्यासाठी ओढीत नेणार तोच, तो पाहा एक तरुण गर्दीतून पुढे आला. त्याचा देह कृश झाला होता; परंतु त्याचे ते डोळे पाहा – त्या डोळ्यांत सर्व सौंदर्यदेवताच अवतरल्या आहेत असे वाटत होते ! किती तेजस्वी, सुंदर ते दोन डोळे ! तो तरुण पुढे आला व म्हणाला, ''महाराज, या निरपराधी मुलीस क्षमा करा; तिचा अपराध नाही, ती माझी प्रेमळ बहीण आहे; खरा अपराधी मी आहे; या मूर्ती ज्या हातांनी घडविल्या, ते हे माझे हात – हे गुलामाचे हात आहेत !''

क्षुब्ध झालेला, अविचारी, भावनावश जनसमाज ओरडला, ''दोघांना खेचा, दोघांस तुरुंगात टाका. फाशी द्या गुलामांना !'' जनसमाजाने अशा प्रकारचा निकाल दिला व एकच कोल्हेकुई, हुल्लड सुरू केली. अध्यक्ष पेरिक्लीस उभा राहिला. पेरिक्लीसची चर्या पाहून पुन्हा सर्वत्र शांत झाले; एवढा जनसमाज होता, पण एक सुई पडली असती तर ऐकू आली असती, अशी शांतता उत्पन्न झाली. पेरिक्लीसच्या डोळ्यांत अश्रुबिंदू आले होते; परंतु ते दाबून तो गदग वाणीने म्हणाला, ''नाही, जोपर्यंत पेरिक्लीस जिवंत आहे, तोपर्यंत मी यांना मरू देणार नाही. तो पुतळा पाहा; पाहा तरी त्या सुंदर मूर्ती – प्रत्यक्ष देवाच्या हातच्या त्या मूर्ती वाटत आहेत. मला

माझ्या हृदयातून परमेश्वर सांगत आहे, अन्यायी कायद्यापेक्षा या जगात काहीतरी श्रेष्ठ आहे हे जगास कळू दे. कायद्याचे ध्येय काय ? जे जे सत् आहे, शिव आहे, सुंदर आहे, सत्य आहे त्या सर्वांचे संरक्षण करावयाचे. 'The highest purpose of law should be the development of the beautiful.' अथेन्स जर जगाला ललामभूत व्हायचे असेल, अथेन्सची कीर्ती यावच्चंद्रदिवाकरौ राहो असे जर कोणास वाटत असेल, तर त्याने 'सत्यं शिवं सुंदरं' यांची सतत पूजा केली पाहिजे. कलांची किती भक्तिभावाने अथेन्स पूजा करते हे जगाला कळू दे. कलांची अधिष्ठात्री, कलांची पूजा करणारी अशी ही अथेन्स नगरी विश्वात शोभत राहो. आणा, त्या कृश तरुणास-त्या दैवी देण्याच्या तरुणास-माझ्याजवळ आणा. तुरुंग त्याच्यासाठी नाही.''

सर्व समाज चित्राप्रमाणे तटस्थ राहिला. पेरिक्लीसने मोठ्या प्रेमाने क्रेऑनला स्वत:जवळ बसविले. पेरिक्लीसच्या पत्नीने विजयचिन्हदर्शक माला क्रेऑनच्या गळ्यात घातली; तिने क्रेऑनच्या बहिणीस आलिंगन देऊन पोटाशी धरले.

पेरिक्लीस, फिडियम, सॉक्रेटिस-सर्वांच्या तोंडचे धन्यवाद ऐकून क्रेऑनचे हृदय ब्रह्मानंदाने भरून गेले.

कलांची पूजा, गुणांचा गौरव कसा करावा हे ग्रीस देशाला, अथेन्स शहराला माहीत होते. क्रेऑन गुलाम होता, तरी त्याच्या गुणांची पूजा करण्यात आली. 'इसापनीती' म्हणून ज्या गोष्टी आपण वाचतो, त्या सुंदर व बोधप्रद गोष्टी लिहिणारा इसाप हाही एक गुलामच होता. अथेन्सने त्याचाही गौरव करून त्याचा पुतळा उभारला. ज्या राष्ट्रातील जनतेला व सरकारला गुणांबद्दल आदर आहे, त्या राष्ट्राचा उत्कर्ष का होणार नाही ? परंतु जेथे गुणांची बाजू नाही, जातिभिन्नत्वामुळे जनतेस खऱ्या गुणाला मोल नाही, अधिकारमदामुळे सरकारलाही ते सहन होत नाहीत, त्या राष्ट्राचा उत्कर्ष केव्हा कसा होईल हे भगवंतासच माहीत !

✦✦✦

# राजा शुध्दमती

आपण सर्व जगाकडे दृष्टी फेकली तर आपणास असे दिसून येईल की, सर्व माणसांच्या वाट्यास दुःख आले आहे. जरी काही लोक सुखात व वैभवात दिसले तरी त्यांस दुःखाने सोडले आहे असे नाही. शारीरिक रोग कोणास सुटले आहेत ? मानसिक चिंता कोणास व्यग्र व व्यथित करीत नाहीत ? मरण तर सर्वांनाच ग्रासावयास टपले आहे.

जर सर्वचजण या मर्त्य भूमीत दुःखात व विपत्तीत आहेत, तर अशा परिस्थितीत दुसऱ्याने दिलेल्या साहाय्याची किंमत फार थोर आहे. आपल्या विपत्तीत दुसऱ्याने दाखविलेल्या सहानुभूतीची व साहाय्याची जशी आपणास किंमत वाटते, त्याप्रमाणेच दुसरा विपत्तीत पडला असता त्यास आपण जर सहानुभूती दाखविली, त्यास मदत केली तर त्याला किती आनंद होईल ? आपण सुखात असू त्या वेळेस दुःखी दरिद्री लोकांची सेवा आनंदाने आपण केली पाहिजे; परंतु ज्या वेळेस आपण स्वतः दुःखात असू त्या वेळेसही आपले दुःख दूर सारून दुसऱ्याच्या दुःखाच्या दूरीकरणार्थ आपण धावून जावे.

आपल्या या परमपूज्य भरतखंडात दुसऱ्याच्या दुःखाने दुःखी होणारे व ते दुःख दूर करण्याकरिता झटणारे, प्रसंगी प्राणदान करणारे असे थोर महात्मे कितीतरी होऊन गेले आहेत. अशाच एका थोर राजाची गोष्ट आज मी सांगणार आहे.

फार प्राचीन काळी आपल्या देशात शुध्दमती म्हणून एक राजा होऊन गेला. हा राजा दयाळू व उदार होता. लहानपणापासून त्याचे मन कोमल होते. हृदय हळुवार

होते. लहानपणी मृगया करण्यास त्याने जाऊ नये, कारण कोमल हरणांचे बाणविध्द देह पाहून त्याचे स्वत:चे पंचप्राण कासावीस होत. झाडांचे पल्लव त्याने खुडू नयेत. पुष्पे त्याने तोडू नयेत, का ? तर त्यांस दु:ख होईल म्हणून ! लहानपणापासून अशी ही त्याची वृत्ती. हाताखालच्या नोकरमंडळींचे मन कठोर शब्दांनी तो कधी दुखवीत नसे. कठोर शब्द बोलणे म्हणजे देवाघरीं पातक केले असे होईल असे तो म्हणे.

राजपदप्राप्ती झाल्यावर राजाच्या उदारपणाची सर्वत्र ख्याती झाली. त्याच्या औदार्याची सर्व मुक्तकंठाने स्तुती करू लागले. त्याचा यशपरिमल दशदिशांत भरून राहिला. जो दुसऱ्याच्या दु:खाने खिन्न होतो, जो गरिबांचा कैवार घेतो, अनाथांचा जो आधार, अशाच्या गुणांचे संकीर्तन विश्वजन का करणार नाहीत ? अशा थोर पुरुषास दुनिया दुवा का देणार नाही ?

राजा गोरगरिबांस सर्व प्रकारची भिक्षा वाटीत असे. हे काम तो आपल्या हाताखालच्या लोकांस सांगत असे. देणग्या वगैरे देण्याचे काम तो जातीने करी. कोणीही अतिथी त्याच्या दारातून विन्मुख होऊन परत गेला नाही. तो स्वत: भिक्षागृहात जाई व तेथे कोणी अनाथ निराश्रित नाही अशी खात्री करून घेई.

एके दिवशी सकाळी राजा उठला व आपल्या प्रजेसाठी आपणास जास्तीत जास्त काय करता येईल या गोष्टीचा विचार करीत होता. दुसऱ्यास सुख देण्याचा विचारही किती सुखप्रद व उन्नतिकर असतो. विचार करता करता राजा मनात म्हणाला, ‘‘मी गोरगरिबांस काही धनधान्य देतो यात विशेषसे काय करितो ? सोने, चांदी, वस्त्रप्रावरण या बाह्य वस्तूच मी आजपर्यंत देत आलो. माझे स्वत:चे असे मी काय दिले आहे ? हा देह माझा आहे. हा देह जर मला देता येईल, तर खरोखर मी माझे काही दिले असे म्हणता येईल. माझ्या प्रजेवर माझे जे अलोट प्रेम आहे ते दर्शित करण्यासाठी मी माझे प्राण देण्यास तयार असले पाहिजे. आज ज्या वेळेस मी भिक्षागृहात जाईन त्या वेळेस एखादा दीनदुबळा माणूस जर मला म्हणेल, ‘महाराज, आपले काळीज मला कापून द्या.’ तर मी आपले काळीज भाल्याच्या टोकाने कापून काढीन व एखाद्या शांत सरोवरातून कमळ खुडून आणून देवावर वाहावे त्याप्रमाणे माझे हृदयकमल त्या याचकाच्या पदरी मी अर्पण करीन ! आज जर कोणी माझे रक्त व मांस मागेल तर मी आनंदाने देईन. ‘माझे काम करण्यास कोणी नाही’ अशी रड जर माझ्याजवळ कोणी गाईल तर मी त्यास साहाय्य करण्यास माझे सिंहासन सोडून

जाईन. देवाने दिलेली सर्वांत मोठी देणगी म्हणजे जे हे दोन डोळे तेही जर एखाद्याने मागितले तर वृक्षावरची दोन फुले तोडून द्यावी, त्याप्रमाणे ही माझी नेत्रपुष्पे मी त्या याचकास देईन. माझ्या देहाचा अशा प्रकारे उपयोग करण्यास जर मला संधी मिळेल तर मला किती आनंद होईल!''

राजाचे मन प्रजेवरील प्रेमाने आज भरून आले होते. तो शुचिर्भूत झाला. त्याने स्नान केले. शृंगारलेल्या हत्तीवर बसून तो भिक्षागृहाकडे गेला. राजाच्या प्रशांत भालप्रदेशावर आज अलौकिक तेज दिसत होते. त्याच्या नेत्रद्वयात प्रेमाची मंदाकिनी अवतरली होती. त्याच्या ओठावर फारच मृदू व रमणीय हास्य विलसत होते.

भगवान कैलासपती शंकर यांच्या मनात राजाचे आज सत्त्व पाहावे असे आले. त्या राजाचा आज प्रात:काळचा निश्चय कसोटीस लावून पाहण्याचे शंकरांनी ठरविले. राजाचा हा खरा निश्चय आहे, की मनात हजारो सुंदर निश्चय येतात व मावळतात, तसेच हे लहरी विचार आहेत, हे भगवंतास पाहावयाचे होते. शंकरांनी पार्वतीस आपला मनोदय कळविला तेव्हा भक्तवत्सल पार्वती म्हणाली, ''प्राणप्रिया, असे कठोर वर्तन करू नये. आजपर्यंत अनेक भक्तांचा आपण अमानुष छळ केला. माझे मन त्या त्या वेळी कसे तिळतिळ तुटले. श्रियाळ, चांगुणा यास तुम्ही किती बरे छळले होते ? भक्तमणींचा असा छळ करणे आपणांस उचित नव्हे.''

भगवान शंकर म्हणाले, ''वेडीच आहेस तू ! अगं, सोने कसोटीस लावल्यावर मगच ते जवळ ठेवता येते. भट्टीत घालून सोने झगझगीत निघाले तरच त्यास मोल चढते. परीक्षा पाहिल्याशिवाय वस्तू घेतली व मागून फसलो तर आपल्यासारखे मूर्ख कोणीच नाही ! भक्तांचा मी छळ करतो; परंतु मागून मी त्यांचा बंदा गुलाम होतो, अक्षय त्यांचा ऋणी राहतो वा कसल्याही आघातांचा वारा मी त्यास लागू देत नाही.''

पार्वतीची समजूत घालून मृत्युंजयाची स्वारी मर्त्यलोकी येण्यास निघाली. शंकरांनी एका अंध अतिथीचा वेश धारण केला आणि काठी टेकीत टेकीत व रस्ता विचारीत राजाच्या भिक्षागृहाजवळ ते पोहोचले.

अंध ब्राह्मणास राजाने हात धरून सिंहासनावर बसविले, मग हात जोडून राजा म्हणाला, ''भगवान, किमर्थ येणे झाले ? आपली काय वांछा आहे कृपा करून सांगावी. आपले मनोरथ पूर्ण करण्याचे भाग्य मला लाभेल का ?''

अंध ब्राह्मण राजास म्हणाला, ''हे थोर कीर्तिमान राजा, या विस्तीर्ण पृथ्वीतलावर असे एकही स्थळ नाही, की जेथे तुझ्या थोर सदय अंतःकरणाची कीर्ती पसरलेली नाही. राजा, सांगू नये पण सांगतो; मागू नये पण मागतो. मी तरी काय करू? गरजवंतास अक्कल नसते. राजा, मी आंधळा आहे, या पृथ्वीवरचे व वरील गगनातील ईश्वराने निर्माण केलेले सौंदर्य मी कधी पाहिले नाही. नद्या, झरे, उत्तुंग पर्वत, रमणीय वनराजी, चंद्रसूर्य, नील नभाचा चांदवा, त्यातील लक्षावधी लुकलुकणारे तारे या सर्वांचे वर्णन मी कानांनी ऐकतो, पण दृष्टीने पाहण्याचे भाग्य माझ्या नशिबी नाही. राजा, मी आंधळा आहे. तू आजपर्यंत या विश्वाची सौंदर्यशोभा पाहण्याची संधी मला देशील काय ? राजा, तू आपला एक डोळा मला दे, म्हणजे आपले दोघांचेही काम होईल.''

आपल्या मनात सकाळी जे विचार आले, त्याची परिपूर्णता इतक्या लवकर होईल असे राजाला वाटले नव्हते. राजास फार आनंद झाला. अंतःकरणात झालेला आनंद बाहेर व्यक्त न करता राजा म्हणाला, ''हे विप्रवरा, तुम्हाला या भिक्षागृहात मजकडे येण्यास कोणी सांगितले ? मनुष्याजवळ जी अत्यंत मौल्यवान् वस्तू आहे तीच तर तुम्ही मजजवळ मागत आहात; परंतु हे पाहा, ती वस्तू देणे कठीण आहे असे नाही तुम्हास वाटत ?''

त्या अंध ब्राह्मणाने उत्तर दिले, ''स्वप्नात परमेश्वराने येऊन तुजकडे येण्यास मला सांगितले, म्हणून मी आलो; तू देत नसशील व तुला कष्ट वाटत असतील तर मी आल्या वाटेने परत जातो.''

राजा म्हणाला, ''आपली विनंती मी आनंदाने मान्य करतो. आपण एकच डोळा मागता, परंतु मी दोन्हीही देण्यास तयार आहे.''

राजा अंध ब्राह्मणास आपले सुंदर डोळे काढून देणार ही वार्ता सर्व नगरात लवकरच पसरली. राजाला या वेड्या निश्चयापासून परावृत्त करावे या हेतूने सेनापती व दुसरे अधिकारी राजाकडे आले. हजारो नगरवासी तेथे जमा झाले. ते राजास म्हणाले, ''महाराज, कोणत्याही गोष्टीस मर्यादा असते. औदार्यासही काही सीमा आहे. द्रव्य, रत्ने, माणिक-मोत्यांच्या राशी, भरजरी वस्त्रांनी व मौल्यवान अलंकारांनी शृंगारलेले हत्ती, वायूवेगाचे वारू, हे सर्व काही ब्राह्मणास द्या पाहिजे तर; परंतु आपण

आपले हे सुंदर कमलसम डोळे देता हे काय ? महाराज, हा थोडा अविचार नाही का होत ?''

राजा म्हणाला, ''प्रिय प्रजाजनहो व माझ्या मंत्र्यांनो, आपण हे सर्व सांगता हे माझ्यावरील अंध प्रेमामुळे सांगता. परंतु थोडा विचार करून पाहा बरे ! शरीर हे नाशवंत आहे. निश्चयासाठी, स्वत:च्या वचनासाठी जो शरीरावर पाणी सोडतो, तो इंद्रालाही पूज्य होतो. तो निश्चय पवित्र असला म्हणजे झाले. दानासारखे महापुण्य दुसरे कोणते आहे ? या ब्राह्मणास जे सुख आजपावेतो मिळाले नाही व जे मी आजपर्यंत उपभोगिले, मनमुराद उपभोगिले, ते सुख या ब्राह्मणास आता देण्याची सुसंधी प्राप्त झाली यात वाईट वाटण्यासारखे काही नसून उलट ही आनंदाची पर्वणी आहे. नश्वर शरीर देऊन चिरंतन टिकणारी सत्कीर्ती व पुण्य यांची जोड होत असेल तर त्यात अयथार्थ व अविचाराचे असे काय आहे ? दधिची ऋषीने आपली स्वत:ची हाडे विश्वाचा त्रास जावा म्हणून नाही का इंद्राच्या हवाली केली ? श्रियाळाने पोटचा गोळा दिला, शिबी राजाने मांडीचे मांस हसत कापून दिले, मयूरध्वज राजाने आपले अर्धांग करवतीने करवतून दिले, जीमूतवाहन राजाने नागांचा प्रतिपाल करण्यासाठी गरुडास आपला देह दिला. थोरामोठ्यांची ही उदाहरणे माझ्या समोर आहेत. शरीर हे मृण्मय आहे; मातीचे शरीर मातीत आज ना उद्या जाणार; हे कमलपुष्पांप्रमाणे असलेले डोळे आणखी थोड्या दिवसांनी लोळ्यागोळ्याप्रमाणे होतील. शरीराचे सौंदर्य व या इंद्रियांची शक्ती ही क्षणिक आहेत. यांचा मोह कशाला धरावा ? धर्म हा सत्य व शाश्वत आहे. शाश्वत धर्माचा संग्रह करण्यासाठी मी अशाश्वत देऊन टाकीत आहे, यात वेडेपणा का आहे ? सांगा.'' राजाचे हे उदात्त भाषण ऐकून सर्व विस्मित झाले. नारीनर रडू लागले; त्यांच्या डोळ्यांत अश्रू आले.

राजास पुन्हा एकदा त्याचे मंत्री म्हणाले, ''राजा, तू हे सर्व कशासाठी करतोस? आपल्या जीविताकरिता, सौंदर्याकरिता, शक्तीकरता, कीर्तीकरिता? तुझा हेतू तरी काय ?''

राजा म्हणाला, ''यापैकी कशासाठीही नाही. हे सर्व दान करून जो एक सात्त्विक आनंद मिळतो, त्यासाठी मी हे करण्यास उद्युक्त आहे.''

राजाच्या शस्त्रवैद्यास बोलविण्यात आले. त्या शस्त्रवैद्यांचे हात ते कर्म करण्यास धजेनात. परंतु करणार काय ? मोठ्या कष्टाने त्याने राजाचा एक कमलनेत्र

काढला. राजाने तो डोळा ब्राह्मणाच्या खाचेत बसविण्यास सांगितले. एखाद्या नीलोत्पलाप्रमाणे तो डोळा ब्राह्मणास लागला. दुसऱ्या डोळ्याने त्या याचकाकडे पाहून राजा म्हणाला, ''आपणास माझा डोळा फारच सुंदर दिसतो; दुसरा डोळा पण तुम्ही घ्याच.'' राजाने दुसरा डोळा पण ब्राह्मणास दिला. राजाच्या खाचा रक्ताने भरून गेल्या व ब्राह्मणाच्या मुखमंडलावर ते सुंदर विशाल डोळे दोन ताऱ्यांप्रमाणे शोभू लागले.

राजाचे चर्मचक्षू गेले, पण ज्ञानचक्षू त्यास मिळाले. त्या राजाच्या अंत:करणात डोकावून पाहा. परमेश्वरकृपेने त्यास दिव्यज्ञान झाले. त्याच्या अंतरी ज्ञानदिवा प्रशांतपणे प्रकाशू लागला. ज्या दृष्टीने केवळ सत्य दिसते, अशी दैवी दृष्टी देवाने त्यास दिली. त्या राजाने पुढे काही वर्षे न्यायाने व नीतीने राज्य केले आणि लोक त्याच्यापासून जगात कसे राहावे, परमेश्वर कसा मिळवावा, हे शिकते झाले.

थोर लोक दुसऱ्याचे दु:ख स्वप्राणत्यागानेही दूर करण्यास मागेपुढे पाहात नाहीत, असा हा भारतवर्ष होता. हाच मनाचा थोरपणा आज भारतवर्षात कितपत दृष्टीस पडतो ? आपण पैशाने गरीब झालो आहोतच; आता मनाची श्रीमंती, हृदयाचीही श्रीमंती, ती पण आपण गमावून बसत आहोत का? प्रत्येकाने विचार करून पाहावे झाले.

✦✦✦

# मातेची आशा

त्या गावाचे नाव होते मगरूळ. एके काळी ते गाव संपन्न होते. परंतु आज काय आहे ? तेथील उद्योगधंदे मेले आहेत. लोक कसेतरी जगत आहेत. सारा गाव कर्जबाजारी झाला आहे. जिकडे तिकडे पडकीमोडकी घरे दिसतात. गाव पाहून वाईट वाटते. त्या गावचा जुना इतिहास आठवून डोळे भरून येतात. परंतु साऱ्या हिंदुस्थानचेच असे नाही का झाले ? किती रडणार, आणि रडून काय होणार ?

त्या गावात एक बाई होती. ती विधवा होती. लहान लहान मुले घरात होती, परंतु कर्ते माणूस घरात कोणी नव्हते. सारी त्या मातेवर जबाबदारी होती, काही शेतीवाडी होती. एक लहानसा मळा होता. ती बाई घरी शेती करी. शेजारी-पाजारी मदत करीत. कोणी नांगर देत, कोणी बैलाची जोडी दोन दिवस देई. तिचा संसार साजरा करीत.

परंतु सावकारीचा साप तिच्या संसारात शिरला होता. जेथे हा साप शिरतो तेथे सत्यानाश होतो. हा साप प्रथमच घरात शिरू देऊ नये. परंतु एकदा घरात आला म्हणजे त्याचा विळखा निघता निघत नाही. त्याचा दंश टळत नाही. मग मेल्याशिवाय सुटका नाही.

त्या बाईचा नवरा मेल्यावर सावकार काही दिवस शांत होता. बाईचा मोठा मुलगा सज्ञान केव्हा होतो, त्याची तो वाट पाहात होता. शेवटी आनंदा वयात आला. सज्ञान झाला. सावकाराचे हस्तक त्या गावात होते. एके दिवशी सावकार गावात

आला. आनंदाला बोलावणे गेले. सावकार गोड बोलत होता. त्याच्या ओठांवर साखर होती, पोटात जहर होते.

सावकार : आनंदा, आता तू मोठा झालास. आईला मदत करतोस की नाही?

आनंदा : मदत न करीन तर पाप होईल. आम्हाला तिने काबाड-कष्ट करून पोसले. लहानाचे मोठे केले. मी स्वत: मोट धरतो, मळा करतो.

सावकार : तुझा बाप फार देवमाणूस होता. त्याची नियत चांगली. त्याला मी कधी 'नाही' म्हणत नसे. रात्री बेरात्री आला तरी त्याला पैसे देत असे.

आनंदा : थोर आहात तुम्ही.

सावकार : हे बघ आनंदा, तुम्ही लहान होतात म्हणून आजपर्यंत मी बोललो नाही. म्हटले, तुझ्या आईला का द्यावा त्रास ? परंतु तू आता मोठा झाला आहेस. तुझ्या वडिलांनी पैसे घेतले होते. आज पुन: नव्याने कागद करू. ही लिहून ठेवली आहे प्रॉमिसरी. सही कर म्हणजे झाले.

आनंदा : सही मला येत नाही, शाळेत कोणी घातले नाही.

सावकार : बरे, अंगठा कर पुढे. त्याला शाई लावून येथे उठवितो.

आनंदा तयार होईना. परंतु सभोवतालच्या मंडळींनी 'दे अंगठा; सावकार का फसवील?' असे सांगून आनंदाचा अंगठा घेतला. आनंदास सुपारी फोडून देण्यात आली. त्याच्यापुढे विडी फेकण्यात आली. आनंदा म्हणाला, "मी बिडी ओढीत नाही."

ती लहानशी गोष्ट आनंदा घरी बोलला नाही. अंगठ्याला लागलेली ती शाई सारा संसार बुडवील असे त्याच्या मनातही नव्हते. ती काळी शाई म्हणजे काळसर्पाचे जहर होते. ती काळी शाई म्हणजे सारी कृष्णकारस्थाने होती. परंतु अकपट आनंदाला काय माहीत ? प्रेमळ मातेच्या संगतीत वाढलेले ते पोर. त्याला जगातील छक्केपंजे माहीत नव्हते.

दोन-चार महिने गेले आणि घरी बेलिफ आला. आनंदाला समन्स लागले. सावकाराने फिर्याद केली. आनंदाच्या बापाने दोनशे रुपये घेतले होते. आनंदाची आई म्हणाली, "त्यांनी १०० रुपये तर देऊन टाकले होते व मला वाटले की, सारे देणे त्यांनी चुकते केले. कारण मरताना म्हणाले होते, 'कोणाचे देणे नाही. तुम्ही सुखाने कष्ट करा व राहा.' कोठले आले हे देणे ? मरताना का मनुष्य खोटे बोलेल ?"

ती अनाथ माता सावकाराकडे गेली. ''माझ्या मुलांची भाकर ओढू नका. कोण आहे माझ्या मुलांना ? कोठे जातील ती ?'' - किती तिने सांगितले. सावकाराचे गुमास्ते हसत होते. एकजण म्हणाला, ''अगं बाई, हा व्यवहार आहे. व्यवहारात का दयामाया असते ? कोर्ट-कचेरीत का डोळ्यांतील पाणी उपयोगी पडते ? तेथे शाईचे काम, हिशोबाचे काम.''

सावकाराने सारी शेतीवाडी जप्त केली. आता लिलाव होणार होता. आनंदाचा आनंद अस्तास गेला. त्याची भावंडे रडू लागली. माता लाचार झाली. ती आपली लहान मुले घेऊन सावकाराकडे गेली. मुलांना सावकाराच्या पायांवर घालून म्हणाली, ''यांच्याकडे पाहा हो जरा. तो दीड-दोन विघ्यांचा मळा तरी ठेवा. बाकीचे घ्या सारे. पोरांना तेवढा तरी तुकडा ठेवा, पदर पसरते दादा.''

सावकाराला का दया आली ? मुसळाला का अंकुर फुटतो ? रक्ताला चटावलेला वाघ का दया करतो ? त्याने सारे घशात घातले. लिलावात कोण बोलणार ? तोच बोलणारा. मातीमोलाने सोन्यासारखी शेती गेली. ती माता व तिची मुले मजूर झाली.

ती माता एके दिवशी मजकडे आली व म्हणाली, ''काँग्रेसचे सरकार आहे म्हणतात. माझे शेत परत मिळेल का ? बिघा - दीड बिघ्याचा मळा तरी मिळेल का? पोरांना आधार होईल.'' मी म्हटले, ''कर्जबिल येणार आहे. परंतु जुन्या हुकूमनाम्याची फेरतपासणी होईल की नाही देव जाणे ! शेतकऱ्यांची मूळची शेते त्यांना परत मिळावीत, असा कायदा केला पाहिजे. परंतु तसा आज करता येणार नाही, त्यासाठी झगडावे लागेल. एक दिवस मात्र असा खास उजाडेल की, ज्या दिवशी किसानांची शेती त्यांना परत मिळेल.''

त्या मातेच्या तोंडावर आशा फुटली. तिच्या डोळ्यांत आनंदाश्रू आले. ती म्हणाली, ''दहा वरसांनी का होईना, परंतु मळा परत मिळो. मी मेले तरी मुलांना होईल. दहा वरसांनी तरी मिळेल ना ?''

✦✦✦

# किसन

एका समुद्राकाठी एक लहान नाही, मोठे नाही असे गाव होते. समुद्रकिनारा फारच सुंदर होता. समुद्रकिनाऱ्यावर शिंपा-कवड्यांची संपत्ती कितीतरी विखुरलेली होती. या टेकडीवर नाना प्रकारच्या समुद्रतीरावर उगवणाऱ्या वेली वगैरे होत्या. या टेकडीवरून एकीकडून झाडीतून वर डोके काढणारी गावातील घरांची शिखरे, तर दुसरीकडे अफाट दर्या पसरलेला, असे मनोहर दृश्य दिसे. दूरवर पसरलेला तो परमेश्वराचा पाणडोह व त्यावर हंसाप्रमाणे पोहणारी ती शेकडो गलबते यांची मोठी रमणीय पण भव्य शोभा दिसे. सायंकाळ झाली म्हणजे गावातील मुले-मुली आपले चित्रविचित्र पोषाख करून येथील वाळवंटात किंवा टेकडीवर खेळण्यास येत. टेकडीवरून घसरगुंडी करून खाली घसरत येण्याची मुलांना फार गंमत वाटे. सायंकाळी मावळत्या सूर्याचा सुंदर सोनेरी तांबडा गोळा समुद्रात दूर क्षितिजाजवळ गडप होताना व त्या वेळची हिरवी-निळी कांती दिसताना मनात शेकडो विचार उत्पन्न होत. रात्रीच्या वेळी तर समुद्राचा देखावा फारच सुंदर दिसे.

हजारो ताऱ्यांची प्रतिबिंबे पाण्यात पाहून जलदेवतांची ही वेशभूषणेच चमकत आहेत असे भासे. चंद्रमा उगवला व समुद्राच्या लाटांगणिक अनंत चंद्रमे खाली नटलेले पाहिले म्हणजे शेकडो चांद छातीवर लटकवून हा महासागर आपली अद्भुत शक्ती, आपले प्रभुत्व, आपली संपत्ती दाखविण्यास उत्सुक आहे असे वाटे. खरोखर

ज्या गावाला समुद्र आहे तो गाव धन्य आहे. ईश्वराचे वैभव दाखवणारा समुद्र हा कुबेर आहे; हे ईश्वराचे भव्य सिंहासन आहे.

ती पाहा संध्याकाळ झाली व मुले वाळवंटात खेळत आहेत. मुली कवड्या जमा करीत आहेत. कोणी वाळूत किल्ले वगैरे बांधीत आहेत. परंतु थोड्याच वेळाने भरतीच्या लाटा येऊन हे चिमुकले वाळूचे किल्ले कोठल्या कोठे जातील याची त्या मुलांस कल्पना आहे का ? ती पाहा काही धीट मुले ढोपर ढोपर पाण्यात जाऊन गंमत करीत आहेत व मोठी लाट आली म्हणजे एकमेकांचे हात धरीत आहेत; समुद्राच्या लाटांवरील फेस पाहून ती पण खदाखदा हसत आहेत. पण त्या टेकडीवर पाहिलीत का ती तीन मुले ? काय बरे त्यांचे भांडण चालले आहे ? दोन मुलगे व एक मुलगी. ते दोन मुलगे आहेत ना, त्यांपैकी रतन हा जरा श्रीमंत आहे, परंतु किसन हा त्या मानाने गरीब आहे. त्या मुलीचे नाव लीला.

लीला लहान पण खेळकर होती. ती दिसावयासही चांगली होती. ती या दोघा मुलांची मैत्रीण. ही एके ठिकाणी खेळत, हिंडत, बागडत. संध्याकाळ झाली म्हणजे समुद्राकाठी ती तिघे खेळावयास येत. लीलाच्या घरी कधी थट्टेने म्हणत, की, ''लीला व रतन यांचा जोडा चांगला शोभेल. लीलाचे रतनशीच लग्न लावावे.'' या मुलांच्या कानावर ते शब्द पडत असत. लग्न म्हणजे काय याची त्यांस कोठे कल्पना होती ! अल्लड त्यांची मने. तरी पण आज रतन म्हणाला, ''किसन, लिली माझी बायको होणार, लिली माझी होणार.'' किसन म्हणाला, ''नाही, माझीच होईल, पाहीन तुझी कशी होते ती !'' रतन म्हणाला, ''तू तर भिकारी, तुला कोण लिली देणार ? लिली माझीच.'' हे ऐकून किसनला वाईट वाटले, म्हणून त्याला रडू आले. लिली तर दोघांची मैत्रीण, तिला किसन जरा जास्त आवडे. कारण तो नाना प्रकारचे खेळ शोधून काढी. टेकडीवर सर्वांत आधी तो चढे. समुद्रात पोहण्यात तो पटाईत. म्हणून हा चपळ खेळाडू किसन तिला आवडे. ती म्हणाली, ''किसनदादा, रडू नको. अरे, मी तुम्हा दोघांची लहानशी बायको, तर मग झाले भांडू नका. आपण खेळू.'' लिलीच्या काल्पनिक जगात सर्व गोष्टी त्या वेळेस कोठे माहीत होत्या ? लिलीच्या शब्दांनी किसन आनंदी झाला. ती तिघेजण गमतीचे खेळ खेळून रात्र पडू लागल्यावर आपली माघारी गेली.

बरीच वर्षे गेली. लिली व किसन यांचाच शेवटी विवाह झाला. कारण लिली काही घरची फार श्रीमंत नव्हती. तेव्हा रतनच्याच घरी देण्यास पैशांची अडचण

आली. किसनचे घर लहानसे होते. त्याला रोज कामधाम करावे लागे. लिली पण घरी शिवणाचे वगैरे काम करी व या प्रकारे त्यांचे नीट चालले होते. किसन दमूनभागून घरी आला म्हणजे लिलीने गोड बोलून व काही खावयास देऊन त्याचा श्रमपरिहार करावा. घराशेजारी लिलीने लहानशी बाग केली होती. तेथे मोगरी, शेवंती लावल्या होत्या. शेवंतीची ती पिवळी फुले सोन्यासारखी शोभत. लिली मोठी टापटिपीची व गृहदक्ष गृहिणी होती. मिळेल त्यात मौज करावी व भालप्रदेशावर कधी म्हणून तिने आठी दाखवू नये. आठ्यांचे गाठोडे तिने समुद्रात फेकून दिले होते.

रतनची व यांची आता कधी गाठ पडत नसे. रतनने विवाह केला नाही. रतनचे आईबापही त्यास सोडून गेले. रतनच्या घरात संपत्ती भरपूर होती; परंतु तो उदासीन असे. रात्र झाली तरी तो त्या टेकडीवर बसे व 'मी तुमची दोघांची लहानशी बायको होईन.' हे शब्द तो आठवी. लहानपणाच्या सर्व गोष्टी त्याला आठवत व त्या समोर पसरलेल्या सागराकडे त्याचा हृदयसागर मिळविण्यासाठी अश्रुपुराने बाहेर येई.

किसन यास दोन मुलगें व एक मुलगी अशी तीन गोजिरवाणी नक्षत्रासारखी मुले होती. कोणीही त्या मुलांस उचलावे, त्यांचे मुके घ्यावे. सुंदर फुलास कोण घेणार नाही? शिरावर धरणार नाही ? सुंदर वस्तू जगाचे दुःख दूर करते.

सुंदर वस्तू सुंदर असण्यानेच धन्य आहेत. तिने आपल्या सौंदर्याने समस्तांस रिझवावे व संसारास शोभा आणावी. किसन याची सोन्यासारखी मुले पण किसन दिवसेंदिवस गरीब होत होता. मोलमजुरी अलीकडे भरपूर मिळत नसे. थंडीत त्या गोजिऱ्या बाळांचे देह आच्छादण्यास पुरेसे कपडे नसत. त्यांना दूध वगैरे देता येत नसे. खेळणी आणता येत नसत. त्यामुळे किसन कष्टी होई. लिली त्याचे समाधान करी, परंतु तो असमाधानीच राही.

एक दिवस किसनच्या मनात आले. आपण व्यापारास जावे. दूर-दूरच्या देशात जाऊन व्यापार करावा व श्रीमंत व्हावे. 'साहसे श्री : प्रतिवसति ।' साहस केल्याशिवाय भाग्यदेवता येणार कशी ? येथे माश्या मारीत बसून काय होणार ? धाडस करावे असे त्यास वाटले. त्याने आपला विचार लिलीस सांगितला. त्याबरोबर ती चरकली व म्हणाली, "नको गडे ! असे वेडेवाकडे धाडस करू नये. समुद्र आता हसेल, हसवील; पण मग बुडवील, रडवील. कोकरांप्रमाणे, लहान मुलांप्रमाणे दिसणारा हा

समुद्र मग राक्षसासारखा खवळतो व चेंडूप्रमाणे गलबते फेकून देतो, बुडवितो. नको, येथेच मीठ–भाकर खाऊ. आपली मुले कसलाही हट्ट धरीत नाहीत. मोठी गुणी आहेत माझी बाळे ! पाहा, पाहा, त्यांना एका पांघरुणात निजविले आहे, प्रत्येकास निरनिराळे पाहिजे असा हट्ट धरून नाही बसली ती !'' असे म्हणून तिने सर्वांत लहान मुलाचा निजला असताच एकदम पापा घेतला. आईचे प्रेमाचे पांघरूण असल्यावर मुलांस अन्य काय पाहिजे ! अमृतमय आईच्या दृष्टीचा वर्षाव असला म्हणजे आणखी काय खाऊ पाहिजे! आईचा मुखचंद्रमा असल्यावर दुसरी भिकारडी खेळणी काय कामाची ! पण हे किसनला कोठे पटत होते? तो म्हणाला, ''तुम्ही बायका अशाच भित्र्या. तुम्ही उत्साह देण्याऐवजी पाय मागे ओढणाऱ्या. वेडी आहेस तू. रडावयास काय झाले ? हजारो व्यापारी जातात व श्रीमंत होऊन येतात. मी तुला सिलोनच्या समुद्रातील मोती आणीन. हिंदुस्थानातील हिरे आणीन. अगं, धाडस केल्याशिवाय कसे होणार ?'' लिली काही बोलली नाही. परंतु तिच्या प्रेमळ व सात्विक दृष्टीला काहीतरी अशुभ दिसत होते. शेवटी एक दिवस किसनने व्यापारास जाण्यासाठी निघावयाचे ठरविले. एक मोठे गलबत बंदरात आले होते. त्यावर किसन पण चढला. आपली मुले घेऊन लिली समुद्रावर त्याला पोहोचवण्यास आली होती. रडून अपशकुन होऊ नये म्हणून तिने आपला अश्रुपूर अडवून ठेवला होता. पतीने मुलांचे मुके घेतले, लिलीने प्रेमळ व डबडबलेल्या डोळ्यांनी पाहिले व गेला. तो पाहा गलबतात किसन चढला व बाजूस लिलीकडे तोंड करून उभा आहे.

गलबत हाकारण्यात आले. किसनचे तोंड अजून तेथेच बाहेर होते. लिलीस पिऊन टाकून तो आपल्या हृदयात साठवून ठेवीत होता का ? गलबत लांब गेले; वळले. लिली माघारी वळली. दाबून ठेवलेला अश्रुपूर जोराने बाहेर पडला, परंतु मुलांस आपल्या रडण्याने कसेतरी होईल म्हणून तिने आपले रडे आवरले. डोळे पुसले, ''चला हं घरी.'' असे मुलांस म्हणून ती घरी आली.

तिचे मन कशात रमेना. मुलांना तिने जेवू–खाऊ घातले व मुले फुलपाखरासारखी बाहेर खेळण्यास गेली. लिलीला जेवण नाही, खाणं नाही. एकंदर काही बरे होणार नाही असे तिला वाटे. समुद्रावर काय कष्ट होतील, वारे सोसाट्याचे येतील, आजारी तर नाही पडणार ? ना जवळ कोणी मायेचे. शेकडो दुःखद विचार तिच्या हृदयात उसळत व तिच्या डोळ्यांतून खळखळा पाण्याचे पूर येत.

परंतु काळ हा सर्व दु:खावेग कमी करणारा आहे. दु:खावर सर्वांत मोठे औषध काळाचे आहे. या क्षणीची दु:खाची तीव्रता पुढल्या क्षणी नसते. मोठमोठी दु:खे काळ विसरावयास लावतो. काळ अश्रूंना आटवतो. कोमेजलेले मुखमंडळ काळ पुन्हा खुलवतो. भरलेले डोळे तो पुसून टाकतो.

लिलीचे दु:ख कमी झाले. दु:ख करावयास तिला वेळच नव्हता. या जगात कित्येक गरिबांस रडण्यास तरी कोठे अवकाश असतो ? शेतांतून व कारखान्यांतून कामे करावयास त्यांस डोळे पुसून जावे लागते. किसनने घरात थोडीफार तरतूद करून ठेविली होती, तरी ती पुंजी फार दिवस पुरणार नाही हे लिलीस माहीत होते. शिवाय समुद्रावरची सफर ती ठरल्या वेळी थोडीच थांबणार व संपणार ! चार चार महिन्यांची चार वर्षे व्हायची ! म्हणून लिली आता मोलमजुरी करावयास जाई. मुलांनी खाल्ले की नाही ते पाहावे, त्यांना पोटभर पाहून, त्यांना पोटाशी घेऊन, प्रेमाची ऊब देऊन पुन्हा कामावर जावे.

किसनची येण्याची मुदत संपली. एक वर्ष झाले. किसनचा पत्ता नाही. बंदरात येणाऱ्या गलबताजवळ जाऊन लिली चौकशी करी. कोणी तिला हसत, कोणी थट्टा करीत. कोणी काही उत्तर देई. पतीची वार्ता तिला समजेना. कधी दुसऱ्या गलबताने पत्र नाही, निरोप नाही, काही नाही. घरातील पुंजी संपली. लिलीची मोलमजुरी पुरेशी होईना. ती स्वत: उपाशी राही व मुलांस खाण्यापिण्यास देई. एक दिवस मोठ्या मुलाने विचारले, ''आई, तू नाही गं जेवत ?'' त्यावर लिली म्हणाली, ''हल्ली मी एक व्रत करते. ते रात्री सोडायचे. तुम्ही निजता, तेव्हा मी मग व्रत सोडते !'' मुलांची मने, समजूत पटली. लिलीचे शरीर कृश झाले. तिचे ताऱ्यासारखे डोळे निस्तेज झाले.

आज सणाचा दिवस होता. लिली आज कामावर गेली नव्हती; परंतु घरात मुलांस गोडधोड देण्यासही काही नव्हते. लिली खिन्न होऊन बसली होती. इतक्यात त्यांच्या घरात कोणीसे आले ? ''आई आहे का रे घरात मुलांनो !'' ''हो आहे, या.'' ''आई हे बघ कोण आले आहेत ?''

आपले डोळे पुसून लिली बाहेर आली. तो कोण दृष्टीस पडले ? दुसरे कोणी नसून लहानपणाचा सवंगडी रतन. लग्न झाल्यापासून रतन लिलीजवळ कधी बोलला नाही. पण आज रतन आला होता. दोघांची मने भरून आली. बाळपणीच्या हजारो आठवणी मन:सृष्टीत जमू लागल्या.शेवटी रतन म्हणाला, ''लिले, मी आलो म्हणून

मजवर रागावू नको. तुझे कष्ट मला दिसतात. तुझ्या या मुलांबाळांससुध्दा पोटभर अन्न मिळत नाही हे मला दिसते. तू मरमर काम करतेस तरी भागत नाही. आज सणावाराचा दिवस, पण तू रडत होतीस. हे पाहा, पुन्हा आले अश्रू. लिले, मी तुला खिजविण्यासाठी आलो नाही. साहाय्य करण्यास आलो आहे. लिले, माझी धनदौलत मला काय करायची ? तुझा पती परत येईतो मी तुला मदत करीन, ती तू स्वीकारीत जा. नाही म्हणू नकोस. लहानपणच्या प्रेमासाठी तरी नाही म्हणू नको. मला इतका परका लेखू नकोस. तुझा पती परत आला म्हणजे मी पुन्हा तोंड दाखविणार नाही. लिले, या लहान्यासाठी, बाळपणीच्या प्रेमासाठी तरी मी देईन ती मदत घेत जा. घेईन म्हण. हे पाहा नवीन सुंदर कपडे तुझ्या मुलांसाठी आणले आहेत. हा खाऊ आणला आहे. बोलाव त्या मुलांस आत. आपण हे कपडे त्यांस नीट होतात का पाहू! हे पाच रुपये ठेव. मी दर रविवारी येत जाईन, कमीजास्त मला सांगत जा. तुझ्या मोठ्या मुलास शाळेत घातले पाहिजे. त्याला मी पुढचे वेळी पाटी घेऊन येईन. लिले, तू बोलत का नाहीस ? माझा राग येतो का ? बरे, आता मी जातो. तुझ्याने बोलवत नाही हे मला स्पष्ट दिसते आहे.'' असे म्हणून रतन बाहेर आला. त्या मुलांस घेतले, आंजारले, गोंजारले व निघून गेला. मुले चिंवचिंव करीत घरात आली. ''आई, कोण गं ते ?'' इतक्यात तो खाऊ, ते कपडे सर्व त्यांना दिसले. ''आई, हे त्याने आम्हाला दिले होय ? हो आई ?''

लिलीने अश्रू पुसले. मुलांच्या अंगात ते नवीन अंगरखे घातले. त्यांना खाऊ दिला. ती मुलांस म्हणाली, ''ते तुमचेच आहेत हो. ते पुढील रविवारी येतील आणि माणकूला पाटी आणणार आहेत.'' ''आणि मला, आणि मला-, '' असे ती ओरडू लागली. ''तुम्हास खाऊ, बरे का ? जा आता खेळावयास, मला काम आहे.'' मुले सुंदर पोषाख करून बाहेर आली. त्यांस आज राजाप्रमाणे वाटत होते.

स्वाभिमानी माणसास दुसऱ्याने आपली कीव करावी ही गोष्ट कधी आवडत नाही. लिलीसही आपण गरीब म्हणून रतनने येऊन ही सहानुभूती दाखवावी हे प्रथम आवडले नाही; परंतु रतनचे व आपले बालपणाचे संबंध तिला आठवले. लहानपणी आपण रतनची बायको होणार हे त्यास कसेसेच वाटे. त्याची भयंकर निराशा, आईबापांचे मरण या सर्व गोष्टींनी रतनच्या मनास किती कष्ट होत असतील हे तिला समजून ती किसनला नाही म्हणू शकली नाही. याच वेळेस किसनचे विचार येऊन

तिचे मन पुन्हा भरून आले. आज सणाचा दिवस. आज ते कोठे असतील ? एखाद्या दूर अनोळखी देशात किंवा क्रूर समुद्राच्या भेसूर लाटांवर – का कोठे ?

रतन दर रविवारी येई. मुलांस जवळ घेई. तो आता मुलांच्या ओळखीचा झाला होता. खाऊ देणाऱ्यांची मुलांजवळ लवकर ओळख जमते. त्या मुलांस घेऊन तो समुद्रावर फिरावयास जाई. त्या टेकडीवर तो मुलांबरोबर पळत सुटे व अडखळला म्हणजे मुले हसत. ''मला हसता का रे गुलामांनो ? पण मी लहान होतो तेव्हा तुमच्याहून जास्त पळत असे, आणि किसन तर –'' इतक्यात त्याने ओठ चावला. किसनच्या चपळाईची त्यास आठवण झाली, पण मुलांसमोर तो काही बोलला नाही. माणकू आता शाळेत जात असे. त्याला पाटी-पेन्सिल आणली होती. पाटी-पेन्सिलीचे हे सौभाग्य पाहून त्याला वाटे, आपण केवढे मोठे झालो. रतन रविवारी आला म्हणजे माणकू म्हणे, ''दाखवू मी काढून 'गवताचा ग,' 'मगराचा म' – मला कितीतरी येते लिहावयास.''

किसनला जाऊन थोडेथोडके नाही, सहा वर्षावर दिवस झाले. ना बोटभर पत्र, ना निरोप ! समुद्राच्या लाटा व समुद्रावरचा वारा यांनी सुध्दा काही निरोप आणला नाही. किसनची काय बरे दशा झाली होती ? किसन व्यापार करून संपत्ती घेऊन परत येत होता; परंतु दैव प्रतिकूल त्याला कोण काय करणार ? आपण घरी जाऊन लिलीच्यापुढे हे द्रव्य ओतू व तिला सुखाच्या सागरात डुंबत ठेवू हे त्याच्या मनातले सुखमय विचार – पण क्रूर विधात्याला लोकांचे मनोरथ धुडकावून लावण्यात, चढणाऱ्यास धुळीस मिळविण्यास आनंद वाटतो. किसनचे गलबत वादळात सापडले. सोसाट्याचा वारा व पर्वतप्राय लाटा आपले काळेकभिन्न जबडे पसरून खदखदा विकट हास्य करीत. त्या भीषण लाटा त्या गलबतास गिळंकृत करण्यास चौफेर धावून येत. गलबत वाऱ्याने भडकले, खडकावर आपटले.

किसन पोहणारा पटाईत, समुद्राच्या लाटांशी तो दोन हात करीत होता. फुटलेल्या गलबताची त्याला एक फळी सापडली. तिच्या आधाराने तो किनाऱ्यास लागला. ओलाचिंब असा किसन किनाऱ्यावर आला. थंडीने तो काकडला; भुकेने कासावीस झाला. शेजारी लोक आहेत की नाही हे पाहण्यास तो चालू लागला. किनाऱ्यापासून जवळच एक गाव होते. तेथील भाषा त्यास येत नव्हती; परंतु लोकांनी त्यास कपडेलत्ते दिले; खाण्यास अन्न दिले.



श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

हळूहळू तेथील रीतीरिवाज तो शिकला. तेथून तो दुसऱ्या गावी गेला. त्या देशाच्या राजाच्या पदरी तो नोकरीस राहिला. त्याची हुशारी व त्याचे गुण यामुळे तो मोठा अधिकारी झाला. राजाजवळ तो स्वदेशी परत जाण्यास परवानगी मागे. पण 'तू परत येणार नाहीस; येथेच लग्न करून राहा' असे राजा सांगे.

किसनच्या डोळ्यांसमोर ती गोजिरवाणी मुले व लिली यांची मूर्ती उभी राही. त्यांची काय कंगाल हीनदीन स्थिती झाली असेल, माझी चातकासारखी वाट पाहून कशी निराश झाली असतील, वगैरे विचारांनी किसन कावराबावरा होई. एखादा दिवस तो आपल्या खोलीत खिन्न बसून काढी.

आज मुलांबरोबर लिलीपण टेकडीवर समुद्रावर फिरावयास आली होती. बरोबर रतन पण होता. मुले खाली वाळवंटात खेळू लागली. वाळूचे मनोरे रचू लागली. त्या टेकडीवर दोन दगडांवर लिली व रतन बसली होती. किती दिवसांनी लिली तेथे आली होती. रतनच्या मनात एक गोष्ट विचारावयाची होती पण किती दिवस त्यास धैर्य होईना. आज तो मनाचा हिय्या करणार होता. तो लिलीला हळूच म्हणाला, ''लिले, मी एक गोष्ट तुला विचारीन म्हणून म्हणतो. पण धीर होत नाही. आज विचारतो. तू अगदी रागावू नकोस. लिले, तू माझ्याशी लग्न लाव. लहानपणी तू म्हणाली होतीस. 'मी तुमची दोघांची लहानशी बायको होईन.' ते आठव. आज आठ वर्षे झाली. किसनचा पत्ता नाही. समुद्राने त्याला दगा दिला असावा. नाहीतर तो येता. पत्र अगर निरोप पाठवता. आता तू मला नाही म्हणू नकोस. लहानपणचे तुझे शब्द देवाने खरे करण्याचे ठरविले का? लिले, माझ्या या औद्धत्याबद्दल, स्पष्टपणाबद्दल रागावू नकोस.''

लिलीच्या मनात काय आले, काय ठरले ? ती म्हणाली, ''विचार करीन.'' सायंकाळ संपली व सर्वजण घरी गेले.

मुले जेवून-खाऊन गुरफटून निजली. लिली एकटीच विचार करीत बसली. ती मनात म्हणाली, 'रतन म्हणतो त्याप्रमाणे केले तर काय होईल ? माझा पूर्वपती किसन खरोखरच या जगातून निघून गेला का ? ते जिवंत असतील आणि येतील तर? परंतु शक्यच नाही. समुद्राच्या लाटांनी केव्हाच त्यास गिळंकृत केले असेल ; त्याच वेळेला मला वाटले, 'काहीतरी अशुभ होणार.' देवाच्या मनात मी दोघांची व्हावे असेच असेल का ? काही हरकत नाही. रतनची मी पत्नी झाले तर – भगवंता ! माझ्या मनात

पाप नाही; संपत्तीचा, सुखाचा माझ्या मनात अभिलाष नाही. लहानपणचे हे दोन सवंगडी – मी दोघांची होते.'

लिलीने ठरविले. पुन्हा रतन भेटला. लिली म्हणाली, ''सहा महिने थांबू व मग आपण पतिपत्नी होऊ.'' रतनचे मन आनंदित झाले. त्याचे उदासीन हृदय सुखासीन झाले. सहा महिने गेले व लिली आणि रतन हे नवरा–बायको झाले. लिली व तिची मुले रतनच्या घरात राहावयास गेली. रतनचे घर आतापर्यंत भेसूर दिसे, ते झकपक झाले, झाडलोट झाली, बैठकी घातल्या, चित्रे टांगली, बागबगीचा फुलला, सर्वत्र टवटवी नटली, रतन संसारात रमू लागला. लिलीचे मन मात्र एखादे वेळेस खिन्न होई व तिचे हृदय चरके.

किसनला राजाने घरी जाण्याची परवानगी दिली. माझी मुले–माणसे घेऊन मी येथे परत येईन अशी त्याने कबुली दिली. किसन घरी जाणाऱ्या गलबतावर चढला. आनंदाच्या शिखरावर चढला. घराची आठवण झाली. मुले सर्वत्र दिसू लागली. पत्नी डोळ्यांसमोर दिसू लागली. उत्कंठेचा आनंद – त्याचे वर्णन किती करणार ? त्या लाटा जशा खालीवर होत होत्या, तसे किसनच्या मनाचे होई. माझी मुले सर्व सुखरूप असतील का? लिली कुशल असेल ना ? या विचाराने मन खाली जाई, तर सर्व चांगले असेल या विचाराने मन वर जाई. समुद्रावरचा प्रवास संपत आला. किसनचा गाव, ती टेकडी दिसू लागली – त्याचे हृदय उचंबळून आले. आठ–नऊ वर्षांनी तो परत मातृभूमीस आला होता. परदेशातील सुखांच्या राशीपेक्षा स्वदेशातील दुःखही गोड असते.

किसन किनाऱ्यावर उतरला; परंतु त्यास कोणी ओळखले नाही. त्याच्या चेहऱ्यावर किती फरक दिसत होता. वादळाचा, समुद्राचा, हालअपेष्टांचा, चिंतेचा, परदेशीय हवेचा कितीतरी परिणाम त्याच्यावर झाला होता. किसन एकदम घरी गेला नाही. किनाऱ्यावरच्या एका खानावळीत तो गेला. ही खानावळ पूर्वीचीच होती. एका म्हाताऱ्या बाईची ती खानावळ होती. किसनने त्या म्हातारीस ओळखले. किसनने आपले सामान तेथे ठेवले व खाटेवर बसला. म्हातारीने जेवण वाढले. किसनने म्हातारीस विचारले, ''बाई, या गावातील किसन, रतन यांची काही माहिती आहे तुम्हाला ?'' म्हातारी म्हणाली, ''हो, आहे तर ! गरीब दुर्दैवी किसन, लहानपणी कितीदा तो येथे खेळे. प्रवासास गेला, तो तिकडेच मेला. दहा वर्षे झाली, परत

आला नाही. त्याची बायको, ती मुले, कोण कष्टात ! लिली तर मोलमजुरी करी, शेवटी एक वर्षापूर्वी तिने रतनशी लग्न लावले. रतन त्यांचा लहानपणाचा मित्रच. बरे झाले मुलाबाळांस. किसन मात्र गेला.'' हे सर्व ऐकून किसन काळवंडला. त्याच्या डोळ्यांतून अश्रू आले. म्हातारीने पाहिले. ती म्हणाली, ''रडून त्रास होणार, देव ठेवील तसे राहावे.''

किसनला पायांखालची सर्व सृष्टी बुडाली असे वाटले. समोरच्या समुद्रात उडी घ्यावी असे त्यास वाटले. लिलीकडे जाऊन तिला ठार मारू ? छे! लिली प्रेमळ मनाची 'मी तुमची दोघांची लहानशी बायको होईन हे शब्द त्याला आठवले. लिली, फुलासारखी कोमल लिली. मी जाऊन तिच्या सुखावर निखारे ओतू ? तिच्या कुसुमसम हृदयाची होळी पेटवू ? छे ! रतन तरी माझा मित्रच, राहू दे. त्यांना सुखात राहू दे. मी आलो, जिवंत आहे हे त्यांस कळवू नये, आपण दूरदेशी निघून जावे.

परंतु दुसऱ्या दिवशी किसनला झणझणून ताप आला. म्हातारीने त्याला अंथरूण दिले. म्हातारीस तरी कोण होते ? मुलाप्रमाणे म्हातारी त्याची शुश्रूषा करी. ताप कमी होईना. एक दिवस म्हातारी त्याच्या खाटेजवळ बसली होती. किसनने डोळे उघडले. त्याचे ओठ थरथरले. म्हातारी म्हणाली, ''मुला, तुला काही सांगावयाचे आहे ?'' किसन म्हणाला, ''मन घट्ट करा, ऐका. मी किसन.'' म्हातारी चपापली. नीट न्याहाळून पाहू लागली, तो खरेच ओळख पटली. किसन याने थांबून थांबून सर्व हकिकत सांगितली व म्हणाला, ''म्हातारबाई – आजीबाई, माझे हे धनद्रव्य तुमचे, तुम्ही लिलीस काही कळवू नका. मला जगण्याची आशा नाही. मी आता मरणारच.'' म्हातारीच्या डोळ्यांतून अश्रू तिच्या सुरकुतलेल्या गालांवर आले. त्या दिवसापासून किसन शुध्दीवर आला नाही.

म्हातारीने लिलीस ही गोष्ट कळवली. लिली, रतन, मुले सर्व म्हातारीकडे आली. परंतु किसनने कोणास ओळखले नाही. किसन या जगातून निघून गेला.

किसनचा थोरपणा लिली व रतन यांच्या मनावर कायमचा ठसला. त्याचा फोटो त्यांच्या दिवाणखान्यात आहे, त्याची ती रोज पूजा करितात.

✦✦✦

# स्वतंत्रतादेवीची कहाणी

आपले एक आटपाट नगर होते. तेथे एक भाग्याची बाई राहात असे. लेकी-सुनांनी घर भरलेले, गुराढोरांनी गोठा भरलेला, खायलाप्यायला काही कमी नव्हते. पाटीभर दागिने एकेकीच्या अंगाखांद्यावर होते. लोक आपापले उद्योगधंदे करून सुखाने दिवस काढीत होते. त्या नगरात सर्वत्र बाईचीच सत्ता होती. तिचे भाग्य मोठे थोर म्हणून तिला 'भाग्यबाई' म्हणत. तिची मुलेही मोठी उद्योगी; कोणी उत्कृष्ट कारागीर, कोणी उत्कृष्ट संगीतज्ञ, कोणी शास्त्रज्ञ, कोणी तत्त्वज्ञ, कोणी चांगले विणकर, कोणी चांगले योध्दे; कोणी मुत्सद्दी, कोणी तपस्वी असे होते. सर्व त्या त्या कामात मोठे वाकबगार, मोठे दर्दी ! परस्परांचा हेवादावा त्यांना माहीत नाही. सर्वच धंदे चांगले, ज्याला आवडेल तो त्याने करावा, असे होते. मुलांच्या या प्रेमळपणामुळे, या ऐक्यामुळे भाग्यबाई मोठी सुखी होती. तिचे मुख नेहमी प्रसन्न दिसे.

भाग्यबाई इतकी श्रीमंत व वैभववती होती, तरी तिला इवलादेखील गर्व नव्हता हो. कोणी आला गेला, आतिथ्यअभ्यागत, सर्वांचे ती स्वागत करी. तिला सर्वच चांगले दिसत. जो कोणी भुकेला, तहानलेला येई त्याला तिने जवळ घ्यावे, त्याला कुरवाळावे, त्याला खायला द्यावे, कोणास तिने शेतीभाती द्यावी, वतनवाडी द्यावी असे चाले. परदेशातून कितीतरी नवीन नवीन बुभुक्षित लोक तिची कीर्ती ऐकून येत. तिची कीर्ती दिगंतात गेली होती. कोणी तिच्या नगराला 'सोन्याची नगरी' म्हणत, कोणी तेथील जमिनीला 'सुवर्णभूमी' म्हणत. कर्णोपकर्णी तिची कीर्ती सर्व

त्रिभुवनात पसरली. कोणी संपत्तीसाठी, कोणी ज्ञानासाठी भाग्यबाईच्या नगरात येऊ लागले. कोणी कायमची वस्ती केली तरी भाग्यबाई 'ना' म्हणत नसे. ''माझी बाळे तसेच तुम्ही. या. गुण्यागोविंदाने राहा. भांडू नका, तंडू नका, मिळून मिसळून राहा. माझ्या मुलांच्या मनोभावना दुखवू नका, ते पण तुमच्या दुखावणार नाहीत.'' असे ती आपली म्हणायची.

एखादे वेळेस मुले जरी भांडली, तरी ती त्यांना जवळ घेई व त्यांची भांडणे मिटवी. असे आपले चालले होते.

होता होता काय झाले, दूर देशचा एक व्यापारी आला. पांढऱ्या तोंडाचा व पांढऱ्या पायांचा तो होता. बोलायला मोठा मिठ्ठास ! वाणी अमृताची, करणी कसाबाची, असा तो होता. त्याच्या जिभेवर ऊस लावलेले होते, परंतु पोटात विषाचे गरळ होते. भाग्यबाई भोळी, सर्वांवर तिचा विश्वास. तिने या पांढऱ्या व्यापाऱ्याला दुकान घालण्याची परवानगी दिली.

व्यापाऱ्याने वखार थाटली. व्यापार चांगला चालू लागला. त्याने एका वखारीच्या दोन केल्या, दोहीच्या चार झाल्या. चारांच्या दहा झाल्या. त्याचा पसारा वाढत चालला. व्यापारासारखे वैभव व वैभवासारखा हावभाव असतो. व्यापार वाढला तर वैभव वाढले. व्यापारी मोठा कुशल होता. नाना तऱ्हेचा माल मांडी. दिसायला सुबक. किमतीला स्वस्त. भाग्यबाईच्या नगरातील लोक हा माल घेऊ लागले. व्यापाऱ्याला बरकत चढली. भाग्यबाईची सर्व मुले तो माल पाहून लोभावली. गोऱ्याचा माल घेऊ लागली. कोणी उधार घेई. कोणी रोख घेई. उधारवाल्याकडे बाकी थकली की, गोरा व्यापारी त्याची शेतीवाडी, बागबगीचा, घरदार जप्त करी व आपण मालक बने.

हळूहळू भाग्यबाईच्या नगरातील लोकांनी आपले धंदे सोडले. गोरा व्यापारी स्वस्त व भरपूर माल आणी व विकी. गोऱ्याची सत्ताही पैशाबरोबर वाढू लागली. वखारीच्या रखवालदारीसाठी तो प्रथम शिपाई – प्यादे ठेवू लागला. हेच शिपाई तो दुसऱ्यांना पण मदतीसाठी कधी कधी देई. गोरा मोठा हुशार, शिपाई चांगले शिकवी. त्यांना कवायती सांगे, चांगली शस्त्रास्त्रे देई. भाग्यबाईच्या नगरात कोणाला शिपाई लागले तर गोऱ्या व्यापाऱ्याजवळ मागत. गोऱ्याचे सैन्य वाढू लागले. आपले शिपाई

नाहीसे होऊ लागले. असा गोऱ्याचा व्याप वाढत होता. हळूहळू एकेक वेढा भाग्यबाईच्या नगराला देत होता.

भाग्यबाई भोळी व तिची मुले पण भोळी. हळूहळू ती परावलंबी होऊ लागली. त्यात या गोऱ्याने त्यांना दारू व बिडीची व्यसने लावली. चहा- विड्यांची चटक लावली. त्यांना शुध्द राहात नाहीशी झाली. गोऱ्याने एकेक घर, एकेक शेत सर्व बळकावले.

आता तो तोऱ्याने राहू लागला. लोकांच्या डोळ्यांत लख्ख प्रकाश पडला. अरे, आपण मायेला भुललो, परावलंबी झालो, त्यांचे शिपाई ठेवू लागलो, त्यांचा माल घेऊ लागलो, आपण होऊन त्यांच्या हातात आपली शेंडी दिली. अरेरे ! आता काय करावे? चला, पुन्हा आपले उद्योगधंदे सुरू करू - चला, म्हणा हरहर महादेव - घ्या देवाजीचे नाव, घ्या अल्लाचे नाव.

परंतु गोरा व्यापारी कसला वस्ताद. तो व्यापाऱ्यांचा आता राजा झाला. फौजफाटा ठेवू लागला; तागडी जाऊन तरवार दिसू लागली. गोऱ्यांचे जातभाई टोळांसारखे सर्वत्र हिंडू-फिरू लागले. त्यांच्या हातात व्यापार गेला; त्यांनी सर्व धंदे घेतले. जेव्हा भाग्यबाईच्या मुलांचा निश्चय या गोऱ्यांच्या जातभाईस कळला, तेव्हा गोरे गुरगुरू लागले. आम्हाला धंदे करू देईनात. आमच्या मालावर जकाती बसविल्या, शेकडो नियंत्रणे घातली. मलमल विणणाऱ्यांनी मलमल विणू नये, गलबते बांधणाऱ्यांनी गलबते बांधू नयेत. सर्वत्र मज्जाव ! विणकऱ्यांनी संतापाने आपापले अंगठे तोडले. ज्या बोटांनी आम्हाला मलमल विणू देत नाही ती बोटे काय शोभेला ठेवायची ? त्यांना संताप आवरेना, क्षोभ आवरेना. टाकली स्वत:चीच बोटे तोडून, चावले स्वत:चेच दातओठ - परंतु गोऱ्याला त्याचे काय होय ! तो आपला फिदीफिदी हसे व दु:खावर डागण्या देई. त्यांचे एका गोष्टीकडे लक्ष असे. ते म्हणजे पैसा-पैसा हा त्यांचा देव. तो पैशाशी बसे, पैशाशी उठे. असे त्याचे चालले.

भाग्यबाईची बाळे दीन दिसू लागली. तिला स्वत:ची चूक समजली. अरेरे, उगीच मी गोऱ्या पायांना येथे येऊ दिले. दाढीवाले, टोपीवाले आले तरी तेही पत्करले. त्यांनी मला तितके छळले नाही, जितके हा छळतो. आता काय करावे ? आता रडावे. केली चूक नि जन्माचे दु:ख ! भाग्यबाई म्लान झाली. तिची मान खाली झाली. तिच्या तोंडावरचे ते दैवी प्रसन्न तेज लोपले. तिच्या लावण्याला अवकळा

आली. ती दुःखीकष्टी - दीनवाणी झाली. आपल्या मुलाबाळांचे हाल पाहून तिला वाटे, 'मरून जावे आता. कोठे माझ्या मुलांची विद्या, कोठे त्यांचे ज्ञान, कोठे त्यांचे शील, कोठे त्यांची संपत्ती ? सर्व - सर्व या चोरांनी नाहीसे केले. आत, बाहेर, जनात व मनात नागविले. अरेरे ! कोठे त्या दुधातुपाच्या नद्या, कोठे ते खंडोगणती धान्य ! कोठे त्या कला, कोठे ते सुखभोग - अरेरे ! नंदनवनाला यांनी स्मशान केले; भरल्या गोकुळाचा मसणवाटा केला. बाळांनो, सोनुकल्यांनो, नाही रे मला तुमचे हाल पाहवत !' असे ती म्हणे व आपल्या डोळ्यांतून टिपे काढी. खरोखर वैऱ्यावरही असा प्रसंग येऊ नये.

दुःखाने दुःख वाढू लागते. दारिद्र्य आले म्हणजे सर्व दुर्गुण पण येतात. भाग्यबाईची मुले भाकरीसाठी भांडू लागली. गोरा धनी भाकरीचा तुकडा चौघांना दाखवी व लठ्ठालठ्ठी लावून देई. कधी पैसे देऊन स्वतःच्या बांधवांची तो हत्या करण्यास लावी. त्याचे नुकसान करण्यास लावी, गोरा धनी आपली स्तुतिस्तोत्रे कोणास गावयास लावी. आपली भाषा बोलण्यास लावी. गोऱ्या धन्याने जाहीर केले, 'माझी भाषा शिका, माझा पोषाख करा. माझी संस्कृती उचला. जो असे करील त्यास मी मान देईन. पैसा देईन.' बुभुक्षित भाग्यदेवतेची बाळे - भराभरा तसे करू लागली. येस, नो, येसफेस करू लागली. विजार-बूट पेहरू लागली. जो असे न करील त्या स्वतःच्याच बांधवांस तुच्छ लेखू लागली ! होता होता इतकी स्थिती झाली की, भाग्यबाईची ही विधुळी पोरे जर कधी कधी आईची आठवण होऊन घरी आली तर आईच्या भाषेत त्यांना बोलताही येत नसे. आईची भाषा विसरून गेले. आईला नमस्कार करण्याऐवजी म्हणत, 'गुड मॉर्निंग - बुट मारिंग' म्हणत. भाग्यबाई म्हणे, 'कोणाला बूट मारतोस, मला का ?' असे तिने म्हणताच ते रागावत व म्हणत, म्हातारडी कोठली! अरेरे ! स्वतःच्याच मातेची अशी विटंबना त्यांनी आरंभावी ना?

परंतु एक दिवस असा येतो की, ज्या वेळेस चुकलेल्यास चूक समजून येते, तसे भाग्यबाईच्या मुलांचे पण झाले; त्यांना आपल्या चुका कळल्या, किती झाले तरी हा धनी परका, त्याला का खरा कळवळा येणार आहे ? प्रसंग आला की गोरा गोऱ्याला मिळे व भाग्यबाईच्या मुलांचे वाभाडे निघत. गोऱ्याची लावालावी, त्याची लफंगेगिरी, त्याचे डावपेच भाग्यबाईच्या बाळांना समजून येऊ लागले; गोरा जास्त जास्त पिळू लागला, दडपू लागला - तसतसा भाग्यबाईच्या मुलांचा स्वाभिमान

जागृत होऊ लागला. तिची काही मुले मोठी गुणी निघाली. त्यांनी हा गोऱ्यांचा दंगा उघड केला. गोऱ्यांची सत्ता व्यापारावर आहे, त्यांचा व्यापार आपण बंद करूया; असे म्हणू लागली. परंतु सर्वांस पटेना. गोऱ्याकडे दर वर्षी जाऊन आपली गाऱ्हाणी सांगू व 'आमची सत्ता आम्हाला द्या' असे म्हणत जाऊ, असे त्यांनी ठरविले.

दर वर्षी मार्गशीर्षाच्या महिन्यात भाग्यबाईची मुले एकत्र जमत व यंदा कशा तऱ्हेने भीक मागण्यासाठी जावयाचे हे ठरवीत. परंतु भीक मागायला आले म्हणजे गोऱ्या बाईचे उत्तर ठरलेले. "वा रे वा, चावट कोठले ! तुम्हाला रे काय देऊ ? माझ्याच मुलाबाळांस पोटभर पुरत नाही. दासीबटकींना उरत नाही. माझ्याच मुलांत अजून बेकारी आहे, दारिद्र्य आहे. चला चालते व्हा इथून."

असे आपले दर वर्षी व्हावयाचे. गोऱ्या मुलांची आई भाग्यबाईच्या मुलांस पाण्यात पाही. तिला भाग्यबाईचा पाणउतारा करावा असे पदोपदी वाटे. हा पाणउतारा करण्यास कोणी ग्रंथकार, कोणी ग्रंथकर्ता तिला आपला मिळायचा. म्हणतात ना, 'मोठे कुले तिकडे जग भुले.'

भाग्यबाईचे रडून रडून डोळे सुजले, लाल झाले. एक दिवस ती वैतागली व म्हणाली, "जीव देते जाऊन. मला मुलांचे हाल पाहवत नाहीत. सतरा साथी, अठरा दुष्काळ, सर्व आपत्तींनी मुले खंगून गेली. डोळे खोल गेले, गाल बसले; मला नाही रे देवा हे पाहवत.' असे म्हणून ती उठली व फाटक्या वस्त्रानिशी रानात निघाली. जिने भरजरी शालू नेसावे, जिने अलंकार घालावे, जी शिबिकेमध्ये नेहमी बसायची, भालदार - चोपदार जिच्यापुढे ल..नकारायचे - ती भाग्यबाई अनवाणी, निरलंकार, फाटक्या वस्त्रानिशी रडत चालली होती. सूर्याला ते पाहवले नाही. त्याने ढगाचे दाट वस्त्र आपल्या तोंडावर घेतले.

भाग्यबाई इकडे तिकडे पाहात नव्हती. पायांना दगड खुपत होते, काटे बोचत होते, रक्त भळभळा येत होते; परंतु दुःखसंतापाने ती वेडी झाली होती. अत्यंत सुखाचे वेळी किंवा अत्यंत दुःखाचे वेळी स्वतःला स्वतःचीच शुध्द नसते.

रानात पुढे पुढे चालली. आता रान मोठे सुंदर लागले: दाट जंगल लागले, मोठमोठे वृक्ष तेथे होते. त्यांनी आकाशाला उचलून धरले होते, गर्द छाया होती; नाना रंगांचे पक्षी उडत होते. नाना स्वरांचे पक्ष्यांचे आलाप ऐकू येत होते. मधुर सुंदर फुलांचा वास भरून राहिलेला वाऱ्याबरोबर येई.



श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

होता होता एक अत्यंत सुंदर स्थळ आले. फारच रमणीय वनस्थली ती होती. तेथे प्रशांत सरोवर पसरले होते. लावण्यदेवतेचा जणू तो आरसाच होता. पाणी स्फटिकाप्रमाणे निर्मळ होते. मधून मधून निरनिराळी कमळे फुलली होती. हंस तेथे पोहत होते. तेथील त्या प्रशांत सौंदर्याचे कोण वर्णन करील ?

भाग्यबाईलाही थोडा दुःखाचा विसर पडला. परंतु इतक्यात आपण कशाला आलो याची तिला आठवण झाली. या प्रचंड जलाशयात आपला अभागी देह सोडून द्यावा असे तिने ठरविले. शेवटचा निश्चय तिच्या डोळ्यांत दिसू लागला. तिने आपले केस बांधले, पदर बांधला. मुलांची आठवण होऊन पुन्हा ते चार अश्रू पाहा गालांवर घळघळले. माया मोठी कठीण, मोठी कठीण हो!

इतक्यात या पाहा स्त्रिया तिकडून धावतच येत आहेत. कोण या स्त्रिया - आणि त्या का बरे धावत येत आहेत ! ती पाहा, एकजण भाग्यबाईच्या जवळ जाऊन तिला सावरून धरते आहे, तिची विचारपूस करते आहे. चला, आपण त्यांचे बोलणे ऐकू. त्या स्त्रियांतील मुख्य जी होती, तिचे नाव अकलंका होते. अकलंका भाग्यबाईस म्हणाली, ''बाई, अशा जिवावर उदार का होता ? जीव कधी देऊ नये. आत्महत्या हे घोर पातक आहे.''

भाग्यबाई म्हणाली, ''हो. ते मला माहीत आहे; परंतु आजपर्यंत सर्व सहन केले हो. माझ्याइतकी सहनशीलता कोणीच दाखविली नसेल ! परंतु सर्वच गोष्टींना मर्यादा आहे - नाही का ? कोठवर तरी बाई सहन करावयाचे ? नाही हो बाळांचे हाल पाहवत. बोंडलेभर दूध नाही, चिमूटभर पीठ नाही. पूर्वीचे माझे भाग्य केवढे - तुम्हीसुध्दा माझे नाव ऐकले असेल - भाग्यबाई - ती हो मी - पण मी आज अभागी!''

अकलंका म्हणाली, ''काय, तुम्हीच का भाग्यबाई ! हो, तुमचे नाव आम्ही ऐकले आहे. तुमचे मुलगे मागे एकदा आमच्या मदतीसाठी आले होते. दिलीप, दशरथ हे आले होते. तुम्हाला आज अशी दशा कशाने आली ? या, अशा नीट बसा. तुम्ही थोर आहात.''

भाग्यदेवता म्हणाली, ''मी फसले व स्वातंत्र्य गमावून बसले, मुलगे मोहाला बळी पडले. आता गोरा चोर सर्व घेऊन बसला आहे. माझी मुले गोऱ्या बाईकडे जातात व भीक मागतात - 'द्या हो एक तरी तुकडा.' तर गोरी बाई उलट काही न देता फटकारे

मारून हाकलून देते. मला मुलांची अन्नान्नदशा पाहवत नाही. जेथे फुले टिपली तेथे शेण्या वेचायची पाळी आली. केले सहन – परंतु आता नाही हो करवत.''

अकलंकेचे डोळे भरून आले; इतर स्त्रियांनी सुध्दा डोळ्यांस पदर लावले. थोरामोठ्यांवरची विपत्ती सर्वांच्या हृदयाचे पाणी करते. अकलंका डोळे पुसून म्हणाली, ''भाग्यबाई, तुम्ही सर्व उपाय केलेच आहेत; परंतु मी उपाय सांगते तो करून पाहा. मी एक तुम्हाला व्रत सांगेन. या व्रताप्रमाणे तुम्ही व तुमची मुले वागतील तर गेलेले वैभव परत येईल. स्वतंत्रता हसत येईल.''

भाग्यबाई म्हणाली, ''सांगा ते व्रत. मी मर्त्य लोकांची असले तरी उतणार नाही, मातणार नाही, घेतलेला वसा टाकणार नाही. घेतलेले व्रत सोडणार नाही. पूजासाहित्य सर्व जमवीन. सांगा मला वसा.''

अकलंका देवी म्हणाली, ''आम्हाला हे व्रत पूर्वी नारदाने सांगितले होते, ते तुम्हाला सांगते. त्याचा वसा कसा घ्यावा, काय पुजावे, कसे पुजावे, काय करावे सर्व सांगते. हे हातात तांदूळ घ्या. हं, ऐका आता. हा वसा केव्हा घ्यावा. केव्हाही घ्या. ज्या दिवशी मनी पवित्र विचार असतील त्या दिवशी उठावे, दिवस वार ठरवू नये, चांगले विचार येतील तीच वेळ धरावी. त्या दिवशी स्वतंत्रतादेवीची मूर्ती करावी. तिला खादीचे शुभ्र वस्त्र नेसवावे, स्वतःही खादीचे वस्त्र परिधान करावे. स्वतंत्रतादेवीला फुलांच्या माळा घालाव्या – फुले कोठली घालायची ? एकेक सद्‌गुणाचे फूल आणून ऐक्याचे दोऱ्यात ते ओवावे. अशी गुंफलेली माळच तिला आवडते. तिला नैवेद्य लागतो. नैवेद्य कसा करावयाचा तो ऐका. व्रतात चूक होता कामा नये. कर्म यथासांग झाले पाहिजे म्हणून नीट ऐका. स्वावलंबनाची डाळ आणावी, ती दुहीच्या जाळावर कळकळीच्या तुपावर भाजावी; ती डाळ मग चांगली दळावी. दळून झाल्यावर तिच्यात प्रयत्नांची शर्करा घालावी व तिला प्रेमाचा कढ आणावा. देशभक्तीचे व धर्मशक्तीचे लवंगा – वेलदोडे आणावे व देवभक्तीचे केशन आणावे – ते त्यात सर्व नीट प्रमाणात घालावे. मग हे लाडू नीट वळावे. स्वतंत्रतादेवीला नैवेद्य दाखवावा. नंतर स्वतंत्रतादेवीची मंगल आरती करावी. पूजा संपल्यावर सर्वांनी हा प्रसाद भक्षण करावा. दर वर्षी असे करीत जा. असे झाले तर स्वतंत्रतादेवी प्रसन्न होईल. ती तुमच्याकडे नांदावयास येईल. चोराचिलटांना दूर करील. अशी नारदांनी सांगितलेली पूजा तुम्हाला सांगितली. तुम्ही करा. आता आम्ही जातो, फार उशीर झाला. स्वर्गात आमची वाट पाहात असतील.''

भाग्यबाईने त्यांना नमस्कार केला. देवता निघून गेल्या. भाग्यबाईच्या मनात श्रध्दा होती. भक्ती होती. तिच्या हृदयात आशा उत्पन्न झाली. तिने तेथे स्नान केले व पुन्हा माघारी घरी आली. तिने सर्व मुलांना एकत्र बोलाविले. सर्व मुले मातेच्या भोवती जमा झाली. भाग्यबाईने मुलांना ते व्रत सांगितले. त्यांनी ते व्रत करण्याचे ठरविले.

दर वर्षी मार्गशीर्ष या पवित्र महिन्यात, पवित्र विचार मनात आणून भाग्यबाईची बाळे स्वतंत्रतेची सुंदर मूर्ती करीत. तिला सद्‌गुणांची माळ घालीत. स्वावलंबनाचे लाडू सांगितल्याप्रमाणे करीत. अशा रीतीने पहिले वर्ष त्यांनी केले - तो गोरी बाई फारच भिऊ लागली. गोरी बाई जसजशी भिऊ लागली, तसतशी भाग्यबाईच्या बाळांची श्रध्दा बळावत चालली. ते दुप्पट उत्साहाने व्रत करू लागले. शेवटी एक दिवस गोरी बाई म्हणाली, ''मी माझ्या देशात आले तशी जाते. ही घ्या तुमची सत्ता, ही घ्या तुमची मत्ता. मला काही नको. भाग्यबाई, मी तुला छळले, पण मनात ठेवू नको. मी चुकले, मी पापे केली. मी तुला नाडले, पाडले, छळले, मारले, पोळले - क्षमा कर. तू थोर आहेस, तू खरी आमची अन्नदात्री, तू विद्यादात्री. त्या तुलाच कृतघ्नपणे आम्ही हीनदीन केले. मनात नको हो ठेवू हे. उदार मनाने आम्हाला क्षमा कर. माझी मुले-बाळे आली सवरली तर त्यांना हाकलून देऊ नको. ती आता सौजन्याने राहतील. करशील ना ही कृपा?''

भाग्यबाई म्हणाली, ''खुशाल येथे राहातना ! पण नीट राहू देत, मला आई मानून येथे राहू देत. मला त्यांनी परकी समजू नये म्हणजे मी त्यांना समजणार नाही. क्षमा हा माझा धर्म आहे. माझी सर्व मुले - हा मोठा मुलगा वसिष्ठ, हा लहानसा मोहनदास - पाहा किती क्षमावान आहेत. येऊ देत हो तुझी पण मुले. अगं, त्यात काय जाते ? येतील, एके ठिकाणी खेळतील, खातील, शिकतील, सवरतील, मोठी होतील. एकमेकांना साहाय्य करून जगात आनंदाने सर्वांनी राहावे, उन्मत्त होऊ नये, फसवू नये असे आपले मला वाटते.''

गोरी बाई मनाने चांगली होऊन निघून गेली. भाग्यबाई पुन्हा भाग्यवती झाली. जगाची मार्गदर्शक - तारक झाली; सुखी झाली. तसे तुम्ही आम्ही होऊ या. ही साठा उत्तरांची कहाणी पाचा उत्तरी सुफळ संपूर्ण !

+++

# अब्बूखाँकी बकरी

(डॉ. जाकीर हुसेन हे सुप्रसिध्द शिक्षणशास्त्रज्ञ होते. वर्धा-शिक्षण पध्दतीचे ते प्रमुख होते. हिंदीच्या परिचय - परीक्षेसाठी त्यांनी लिहिलेली "अब्बूखाँकी बकरी" ही सुंदर गोष्ट आहे. ती मनोहर व भावपूर्ण गोष्ट माझ्या सर्व वाचकांस कळावी म्हणून देत आहे)

हिमालयाचे नाव कोणी ऐकले नाही ? हजारो मैल लांब तो पसरला आहे. त्याची शिखरे इतकी उंच आहेत, की कोणी त्यावर अद्याप पोहोचला नाही. हिमालय पर्वतात मधून मधून वस्ती आहे. अशा वस्तीच्या जागांपैकी आल्मोडा ही एक आहे.

अल्मोडात एक मोठा मिया राहात होता. त्याचे नाव अब्बूखाँ. बकऱ्यांचे त्याला फार वेड. तो एकटा होता. ना बायको, ना पोर. दिवसभर बकऱ्या चारीत असे. त्या निरनिराळ्या बकऱ्यांना तो गमतीगमतीची नावे ठेवी. एकीला कल्लू म्हणे, दुसरीला मुंगीया म्हणे, तिसरीला गुजरी, चौथीला हुकमी. तो बकऱ्यांजवळ बसे व नाना गोष्टी करी. सायंकाळी बकऱ्या घरी आणी व बांधून ठेवी.

आल्मोडा ही पहाडी जागा. अब्बूखाँच्या बकऱ्या पहाडी जातीच्या. अब्बूखाँ बकऱ्यांवर इतके प्रेम करी, तरी त्या पळून जात. मोठा दुर्दैवी होता. बकऱ्या पळून जात व एक लांडगा त्यांना मटकावी. अब्बूखाँचे प्रेम, सायंकाळचा दाणा, कशाचाही त्यांना मोह पडत नसे.

ते दाणे, ते प्रेम त्यांना रोखू शकत नसे. पहाडी लांडग्याचे भयही त्यांना डांबू शकत नव्हते. पहाडी प्राण्यांना स्वातंत्र्याची चाड असते. आपले स्वातंत्र्य कितीही मोठी किंमत मिळाली तरी गमविण्यास ते तयार नसतात. आनंद व आराम मिळावा यांसाठी कैदेत पडणे त्यांना रुचत नसे.

अब्बूखाँच्या ध्यानात येत नसे की, बकऱ्या का पळून जातात. तो त्यांना हिरवे हिरवे गवत चारी. शेजाऱ्यांच्या शेतात चोरून चारून आणी. सायंकाळी दाणा देई. तरीही त्या बिचाऱ्या पळून जात ! लांडग्याला आपले रक्त देणे का पसंत करीत ?

अब्बूखाँने आता निश्चय केला की, बकरी नाही पाळायची. बकरीशिवायच राहावयाचे. तोही म्हातारा झाला होता; परंतु एकट्यालाही काही करमेना. पुन्हा बिचाऱ्याने एक बकरी आणली. बकरी लहान होती. पहिल्यानेच व्यायली होती. लहानपणीच आणली तर लळा लागेल असे म्हाताऱ्या अब्बूखाँला वाटले. ही बकरी फार सुंदर होती. ती गोरी गोरी पान होती. तिच्या अंगावरचे केस लांब लांब होते. काळी काळी शिंगे जणू शिसवाच्या लाकडावर कुणी नक्षी करून तयार केली होती. डोळे लालसर होते. बकरी दिसायलाच चांगली होती असे नाही, तर स्वभावही चांगला होता. अब्बूखाँचे हात ती प्रेमाने चाटी. लहान मुलाने धार काढली तरी ती पाय उचलत नसे. दुधाचे भांडे पाडीत नसे. अब्बूखाँला तर तिला कोठे ठेवू अन् कोठे न ठेवू असे होई. तिचे नाव काय ठेवले होते, माहीत आहे ? चांदणी. चांदणीजवळ तो गप्पा मारी. पहाडातील लोकांच्या गोष्टी सांगे.

लहानशा अंगणात बकऱ्या कंटाळून पळून जात असतील असे मनात येऊन त्याने एक नवीन मोठे वाडगे तयार केले. चारी बाजूंनी कुंपण घातले. चांदणीच्या गळ्यात लांब दोरी बांधली. त्यामुळे ती खुंट्याला बांधलेली असली तरी दूरवर फिरू शके.

अब्बूखाँला वाटले की, चांदणी आता रमली; परंतु ती त्याची भूल होती. स्वातंत्र्याची भूक अशी लवकर मरत नाही. पहाडात स्वातंत्र्यात नांदणाऱ्या जनावरांना चार भिंतीत मेल्यासारखे होते व गळ्यातील दोरी तोडण्याचा प्रयत्न सुरू होतो.

एक दिवस सकाळी रवंथ करीत असता चांदणीचे डोळे एकदम पहाडाकडे गेले. सूर्य अद्याप डोंगराच्या आडच होता. त्याचे कोवळे सोनेरी किरण शुभ्र पहाडावर पडून अवर्णनीय शोभा दिसत होती. चांदणी मनात म्हणाली, 'तेथे किती मौज

असेल? तेथील ती मोकळी हवा कोठे व इथली कोंदट हवा कोठे ? तेथे नाचता-कुदता येईल, खेळता – खिदळता येईल. येथे तर अक्षय्य ही मानेला गुलामगिरीची दोरी. अशा या गुलामीच्या घरात दाणे खायला मिळतात म्हणून गाढवांना फार तर राहू दे. खेचरांना राहू दे. आम्हा बकऱ्यांना विशाल मैदानातच मौज.'

चांदणीच्या मनात हे विचार आले, या भावना उसळल्या. आणि चांदणी पूर्वीची राहिली नाही. तिचा आनंद लोपला. तिला हिरवा चारा आवडेना, पाणी रुचेना. अब्बूखाँच्या गप्पा तिला नीरस वाटत. ती कृश होऊ लागली. तिचे दूध आटले. सारखे पहाडाकडे डोळे. 'बें बें' करून दीनवाणी रडे, दोरीला हिसके देई. अब्बूखाँला बकऱ्यांचे बोलणे समजू लागले होते. प्रेमामुळे त्यांची भाषा तो सहज शिकला. 'मला पहाडात जाऊ दे, येथे नाही माझ्याने राहवत' हे चांदणीचे शब्द ऐकून तो चमकला. त्याचे अंग थरारले. हातातील मातीचे दुधाचे भांडे खाली पडले व फुटले.

अब्बूखाँने करुण वाणीने विचारले, ''चांदणी, तूही मला सोडून जाणार ?''

ती म्हणाली, ''हो, इच्छा तर आहे.''

अब्बूखाँ म्हणाला, ''येथे का तुला चारा मिळत नाही ? सायंकाळी दाणे देतो, ते किडलेले असतात ? आज चांगले दाणे आणीन.''

बकरी म्हणाली, ''खाण्यापिण्याकडे माझे लक्षही नाही.''

त्याने विचारले, ''मग का दोरी आणखी लांब करू ?''

ती म्हणाली, ''त्याने काय होणार ?''

अब्बूखाँने विचारले, ''मग पाहिजे तरी काय ?''

ती म्हणाली, ''पहाड. मला पहाडात जाऊ दे.''

तो म्हणाला, ''वेडी आहेस तू. तेथे लांडगे आहेत. ते आले म्हणजे काय करशील ?''

ती म्हणाली, ''देवाने दिलेल्या शिंगांनी त्यांना मारीन''

'तो म्हणाला, ''वा:! लांडग्याला मारणार ना तू ? वेडे, त्याने आजपर्यंत माझ्या किती बकऱ्या मटकावल्या ! त्या माझ्या बकऱ्या तुझ्यापेक्षा मोठ्या होत्या. कल्लू बकरी तू पाहिली नाहीस. कल्लू का बकरी होती ! छे ! जणू काळे हरीण होते हरीण ! कल्लू रात्रभर लांडग्याशी शिंगांनी झुंजली. परंतु उजाडता उजाडता लांडग्याने शेवटी तिला मारले व खाल्ले.''

चांदणी म्हणाली, ''गरीब बिचारी कल्लू. परंतु ते काही असो. मला पहाडातच जाऊ दे.''

अब्बूखाँ रागाने म्हणाला, ''तू पण लांडग्याच्या पोटात जाऊ पाहतेस, मला सोडू पाहतेस? कृतघ्न आहेस तू. मी तुला खाऊ देणार नाही. तुला तुझ्या इच्छेविरुध्द वाचवणार. तुझा हेतू कळला. तुला घरात कोंडून ठेवतो. नाहीतर संधी मिळताच पळशील. असे म्हणून अब्बूखाँने तिला घरात बांधले. दाराला कडी लावून गेला, परंतु बिनगजाची खिडकी उघडी होती. अब्बूखाँ बाहेर पडतो न पडतो तो चांदणी खिडकीतून पळून गेली !

उंच पहाडावर ती गेली. तिच्या आनंदाला सीमा नव्हती. मुक्तीचा आनंद मुक्तच जाणे. तिने लहानपणी डोंगरावरची झाडे पाहिली होती; परंतु आज त्या झाडांत काही विराळीच गोडी तिला वाटत होती. जणू ते सारे वृक्ष उभे राहून पुन्हा येऊन पोहोचल्याबद्दल तिला धन्यवाद देत होते, तिचे स्वागत करीत होते !

नाना प्रकारची फुले फुलली होती. शेवंतीची फुले आनंदाने हसू लागली. डोलू लागली. उंच उंच गवत चांदणीच्या गळ्याला मिठी मारू लागले. तिचे अंग कुरवाळू लागले. बंधनात पडलेली ती छोटी बकरी पुन्हा आलेली पाहून त्या साऱ्या पहाडाचा आनंद गगनात मावेना. चांदणीची मन:स्थिती कोण वर्णील ? आता ना ते वाडगे, ना ते कुंपण, ना ती गळ्यातील दोरी, ना तो खुंटा. आणि तो पहाडातील सुगंधी चारा तसा गरीब अब्बूखाँला तर कधीही आणता येत नसे.

चांदणी स्वातंत्र्याचा आनंद अनुभवू लागली. ती इकडे उडी मारी, तिकडे कुदी मारी. इकडे धावे, तिकडे पळे. ती पाहा घसरली, परंतु पुन्हा सावरली. आजवर बांधलेला उत्साह शतमुखांनी प्रगट होऊ लागला. एक चांदणी आली; परंतु साऱ्या पहाडात जणू नवचैतन्य आले. नवीन प्रकारचे तेज आले. जणू दहावीस बकऱ्या सुटून आल्या होत्या ! तिने गवत खाता खाता जरा मान वर करून पाहिले तो खाली अब्बूखाँचे घर दिसले. ती मनात म्हणाली, 'त्या चार भिंतींच्या आत मी कशी राहिले? इतक्या दिवस त्या घरकुलात कशी मावले ? कसे सारे सहन केले ?'' त्या उंच शिखरावरून तिला खालची सारी दुनिया तुच्छ व क्षुद्र वाटत होती.

साऱ्या जन्मात नाचली बागडली नसेल, हसली कुदली नसेल, इतकी ती आज हसली कुदली. वाटेत तिला एक पहाडी बकऱ्यांचा कळप भेटला. त्यांच्याशी थोडी

बातचीत झाली. तरुण बकरेही तिच्या भोवती जमल;. परंतु पांढऱ्या ठिपक्यांचा एक काळा बकरा होता; चांदणी व तो जरा लांब गेली. त्यांची काय बोलाचाली झाली कोणाला माहीत ? तेथे एक स्वच्छ पाण्याचा प्रवाह वाहत होता. त्याला कदाचित माहीत असेल. त्याला विचारा. परंतु तोही कदाचित सांगणार नाही.

चांदणी पुन्हा बंधनात पडू इच्छित नव्हती. तो ठिपकेवाला काळा बकरा निघून गेला. सायंकाळ झाली. सारा पहाड लाल लाल झाला होता. चांदणी मनात म्हणाली, 'सायंकाळ झाली ! आता रात्र येणार.'

खाली पहाडात कोणी धनगर बकऱ्यांना कवाडात कोंडीत होता. त्यांच्या गळ्यांतील छोट्या घंटांचा आवाज येत होता. तो आवाज चांदणीच्या परिचयाचा होता. तो घंटांचा आवाज ऐकून ती जरा उदास झाली. अंधार पडू लागला. तो ऐका 'खू खू' आवाज एका बाजूने येत आहे.

तो आवाज ऐकताच लांडग्याचा विचार चांदणीच्या डोक्यात आला. दिवसभर लांडग्याचा विचारही मनात आला नाही. खालून अब्बूखाँच्या बिगुलाचा, शिट्टीचा आवाज ऐकू येत होता. 'चांदणी, परत ये' असे तो आवाज म्हणत होता. इकडून लांगड्याचा 'खू खू' आवाज येत होता.

कोठे जावयाचे ? क्षणभर चांदणीने विचार केला. परंतु तिला तो खुंटा, त्या भिंती, ते कुंपण, ती गळ्याभोवतालची दोरी, सारे आठवले. ती मनात म्हणाली, 'गुलामगिरीत जगण्यापेक्षा येथे स्वातंत्र्यात मरण बरे.' अब्बूखाँची शिट्टी ऐकू येईनाशी झाली. पाठीमागून पानांचा सळसळ आवाज झाला. चांदणीने मागे वळून पाहिले तो, ते टवकारलेले दोन कान. ते अंधारात चमकणारे दोन डोळे ! लांडगा जवळ आला होता.

लांडगा जमिनीवर बसला होता. त्याने घाई केली नाही. आता कोठे जाणार ही पळून ? असा त्याला विश्वास होता. बकरीने त्याच्याकडे तोंड केले. लांडगा म्हणाला, 'अब्बूखाँचीच बकरी, चांगली केली आहे धष्टपुष्ट!' त्याने आपल्या काळ्यासावळ्या ओठांवरून आपली लाल जीभ फिरवली. चांदणीला कल्लू बकरीची गोष्ट आठवली. कल्लू उजाडेपर्यंत झुंजली, अखेर मेली. असे झुंजण्यात काय अर्थ? एकदम त्याच्या स्वाधीन का होऊ नये ? असे चांदणीच्या मनात आले. परंतु पुन्हा म्हणाली, 'नाही, आपणास लढता येईल तोपर्यंत लढायचे.' तिने शिंगे सरसावली. पवित्रा बदलला.

चांदणीला का स्वत:ची शक्ती माहीत नव्हती ? लांडग्याशी आपण टिकणार नाही हे तिला का कळत नव्हते ? कळत होते. पण ती म्हणाली, 'आपल्या शक्तीप्रमाणे आपण शेवटपर्यंत झगडणे हे आपले काम. जय वा पराजय हे देवाहाती. कल्लूप्रमाणे उजाडेपर्यंत मला टक्कर देता येते की नाही हे पाहण्याची इच्छा होती. आली आहे वेळ. झुंजू दे मला.'

लांडगा पुढे आला. चांदणीने शिंगे सावरली. लांडग्यावर तिने असे हल्ले चढवले की, तो लांडगाच जाणे ! दहा वेळा तिने लांडग्याला मागे रेटले. मध्येच ती प्रभात होऊ लागली की नाही हे पाहण्यासाठी वर पाही.

एकेक तारा कमी होऊ लागला. चांदणीने दुप्पट जोर केला. लांडगाही जरा मेटाकुटीस आला होता. इतक्यात पहाटेची वेळ झाली. कोंबड्याने नमाजाची बांग दिली. खालच्या मशिदीतून 'अल्लाह अकबर' आवाज आला. चांदणी म्हणाली, 'देवा, पहाटेपर्यंत शक्तीप्रमाणे स्वातंत्र्यासाठी झुंजले. तुझे आभार. माझे काम मी केले. आता तुझी इच्छा प्रमाण.'

मशिदीतील शेवटचा 'अल्लाह अकबर' आवाज आला व चांदणी मरून पडली. तिचे गोरे गोरे अंग रक्ताने लाल झाले होते. लांडग्याने तिला फाडले, खाल्ले. उजाडू लागले. झाडावरील पाखरे किलबिल करू लागली. तेथील झाडावरील चिमण्या चर्चा करू लागल्या, 'जय कोणाचा? लांडग्याचा की चांदणीचा?' पुष्कळांचे मत पडले 'लांडग्याचा.' परंतु एक म्हातारी चिमणुलीबाय म्हणाली, ''चांदणीने जिंकले.''

+++

## आई, मी तुला आवडेन का ?

''माझी सोन्यासारखी पोर अंथरुणास खिळली आहे आणि या कारट्यास जरा त्या मुलीला घे सांगितले तर नुसता एरंडासारखा फुगला आहे ! अवदसा आठवली आहे मेल्याला ! पुण्यास दिवे लावून आले पळपुटेराव, आता येथे आईशीला गांजावयास आले. चल, ऊठ घे त्या शांतीला व खेळव झोपाळ्यावर तिला. उठतोस की नाही; का घालू कमरेत लाथ !''

संतापलेल्या आईचे बाग्बाण विश्वनाथाच्या हृदयास घरे पाडीत गेले. विश्वनाथ दिसायला हूड होता; परंतु बाहेरून कठोर दिसणारे त्याचे हृदय मृदू व प्रेमळ होते. त्याचा खरा स्वभाव कोणालाच कळला नव्हता. प्रेमाच्या व सहानुभूतीच्या अभावी त्याचे हृदयपुष्प कोमेजून जात होते.

विश्वनाथ पुण्यास आपल्या मामांकडे शिकावयास राहिला होता. परंतु तेथे त्याचे पटेना व तो तीनदा घरी पळून आला. या वेळेस तो घरी पळून आला त्या वेळेस त्याची एकुलती एक बहीण आजारी होती. या बहिणीवर सर्वांचा जीव. ती खरोखर फार गुणाची होती. सासरी तिचे किती हाल होत, परंतु ते माहेरी तिनें कधी सांगू नये. फक्त या दुखण्यात मात्र वातात ती ते सर्व बोलली. तिला एक मुलगी होती. तिचे नाव शांती. शांती लहान आठ-दहा महिन्यांची होती; परंतु तापात आईजवळ कशी द्यावयाची ? तिला सांभाळण्यास कोणीतरी लागे. विश्वनाथ तिला घेऊन घेऊन कंटाळला व त्याने शांतीस खाली ठेवून दिले, आणि शांतीने रडण्यास आरंभ केला.

आणि मग वर सांगितल्याप्रमाणे विश्वनाथास त्याच्या आईने वाग्बाणांनी घायाळ केले.

आयुष्यात असे काही क्षण येतात की, त्या वेळेस सर्व आयुष्यास निराळेच वळण मिळते. उनाड उद्योगशील होतात, चोर साव होतात, गर्विष्ठ नम्र होतात. विश्वनाथाचे तसेच झाले. त्या क्षणापासून विश्वनाथ निराळा झाला. तो शांतीस जराही रडू देत नसे. रात्रीच्या वेळी आपल्या बहिणीच्या तप्त कपाळावर ताम्हणात गार पाणी घालून तो ते धरून बसे. त्या खेडेगावात बर्फ व बर्फांच्या पिशव्या कोठून मिळणार ? विश्वनाथ बहिणीच्या शुश्रूषेत तहान, भूक, झोप सर्व विसरून जाऊ लागला.

गावातील सर्व वैद्य थकले, पण बहिणीच्या दुखण्यास उतार पडेना. एक दिवस विश्वनाथ आपल्या आजोबांस म्हणाला, ''आजोबा, त्या आयुर्वेद ग्रंथात आपणच आक्काच्या दुखण्याची लक्षणे पाहून एक काढा ठरवूया.'' नातवाचा पोक्त विचार आजोबांस पटला. ते मराठी पुस्तक दोघेजण पाहू लागले. त्यांनी एक काढा ठरविला. आजोबा म्हणाले, ''आता देवावर विश्वास, हा काढा द्यावा झाले.''

विश्वनाथ आक्कास काढा करून देई. काढ्याजवळ तोच चुलीजवळ बसत असे.

आज पहाटेची वेळ होती. बाहेर झुंजुमुंजू होते तोच विश्वनाथ आज समुद्रतीरी गेला होता. विश्वनाथाचे गाव समुद्रकाठी होते. अफाट समुद्राकडे विश्वनाथ पाहात होता. ते त्याचे डोळे पाहा. त्याच्या हृदयसागरातील लाटा डोळ्यांवाटे बाहेर पडून समोरच्या समुद्रास मिळू पाहात होत्या. विश्वनाथ कसचा बरे विचार करीत आहे ? ते पाहा, उगवत्या सूर्यनारायणाला त्याने हात जोडले व म्हणत आहे, ''देवा, माझ्या बहिणीस माझे आयुष्य दे; मला मरण दे. माझ्या आईस मी आवडत नाही. तुझ्याकडे येऊन मी चांगला होईन व मग पुन्हा आईकडे येईन. देवा, माझी प्रार्थना ऐक; बाबराची प्रार्थना तू ऐकलीस तशी माझी पण ऐक.'' विश्वनाथ घरी निघून गेला.

विश्वनाथाच्या बहिणीस उतार पडू लागला. विश्वनाथास वाटले, 'देवाने प्रार्थना ऐकली.' विश्वनाथ आनंदी दिसू लागला. घरात आनंद वाटू लागला. परंतु हा आनंद फार दिवस राहावयाचा नव्हता.

एक दिवस सायंकाळी विश्वनाथ समुद्रकिनाऱ्यावरून आला तो तसाच अंथरुणावर जाऊन निजला. तो आज जेवला नाही, खाल्ला नाही. बोलला नाही,

चालला नाही. थोड्या वेळाने विश्वनाथाची बरी झालेली अशक्त बहीण त्याच्याजवळ गेली व म्हणाली, ''का रे, बरे नाही का वाटत?'' असे म्हणून तिने त्याच्या कपाळास हात लावून पाहिले. विश्वनाथाची उशी रडून भिजून गेली होती, त्याचे कपाळ सणसणले होते. त्यास फणफणून ताप आला होता, आक्का बरी झाली नि विश्वनाथ आजारी पडला.

विश्वनाथाचा ताप दोषी होता. चढउतार होत होता. आज दोन दिवस तर तो वातातंच होता. ताप उतरावा म्हणून शंकरावर अभिषेक, अनुष्ठाने चालली होती. शंकराची पिंडी रोज थंड दहीभाताने लिंपण्यात येत होती. विश्वनाथाचा ताप दैवी किंवा मानवी प्रयत्नांनी हटला नाही.

''आई, मी तुला आवडत नाही; तर देवाकडे जातो व चांगला होऊन येतो, मग तर तुला आवडेन ना ! मग मला रागाने नाही ना बोलणार ?'' वातात विश्वनाथ असे बोलत होता. ते शब्द ऐकताच त्याच्या उशाशी खिन्न व सचिंत बसलेल्या त्याच्या आईचे हृदय चरकले. तिला त्या दिवशीची आठवण झाली. भरल्या डोळ्यांनी ती म्हणाली, ''बाळ, नको रे असे बोलू; नाही बरे माझ्या बाळास रागाने बोलणार !'' परंतु आईचे शब्द विश्वनाथास कोठे समजत होते ? चूक वेळेवर बरोबर कळावी लागते. मग उशीर होतो.

''देवा, मला ने व माझ्या आक्कास वाचव, ही माझी प्रार्थना तू ऐकलीस वाटते. मग फार काही वाईट नाही तर मी –'' विश्वनाथ वातात बोलत होता. ते शब्द ऐकून त्याच्या बहिणीच्या खोल गेलेल्या डोळ्यांतून मोत्यांसारखे घळघळ अश्रू येऊ लागले.

आज विश्वनाथ शुध्दीवर आला होता. तो आपल्या खोल गेलेल्या आवाजाने आईस म्हणाला, ''आई, घे ना माझे डोके तुझ्या मांडीवर ! घे, हां. मी आता सांगतो तसे करा – मी की नाही माझे मृत्युपत्र करतो.'' विश्वनाथाने 'मृत्युपत्र' शब्द ऐकला होता, त्याच्या मास्तरांनी त्याचा अर्थ त्याला समजावून दिला होता.

''बाळ, नको रे असे बोलू. माझ्या बाळाला देव उदंड आयुष्य देईल.'' ''छे, आई; आता मी बरा होणार नाही. मी की नाही देवाला प्रार्थनाच केली होती की मला ने. तो मला नेणार. आई, माझी रामाची तसबीर आहे ना, ती माझा मित्र नारायण आहे ना, त्याला दे.'' दम लागला म्हणून विश्वनाथ थांबला. पुन्हा क्षीण स्वराने तो म्हणाला,

''माझा पोपट त्या नामदेवास द्या. कारण तो प्रेमळ आहे. तो त्याला वेळच्या वेळी खावयास-प्यावयास देईल, आणि माझा मोगरा, त्याला कोणी-तरी पाणी घाला, नाहीतर तो सुकून जाईल. माझी चांदीची झारी शांतीला द्या. कोठे आहे गं शांती ? ती पाहा हसते आहे गुलाम. शांते, आता रडत जाऊ नकोस, आक्कास त्रास देऊ नकोस, आता मी नाही हो तुला घेणार. आजोबा-बाबा-'' अडखळत सर्व प्राण कंठी एकवटून विश्वनाथ बोलत होता, ''आई, माझे सर्व मित्र बोलाव ना ! अरे, हे तर आलेच आहेत, मग आत का नाही आलात ? आई, आई, देवाने ऐकले म्हणून मी जातो - मी की नाही, चांगला होऊन येईन - आई -''

विश्वनाथ किती क्षीण स्वराने हे बोलत होता. जाणाऱ्या जिवाची ती शेवटची शक्ती होती. विश्वनाथ मातेच्या मांडीवर मलूल होऊन पडला आणि दोन-चार घटकांत त्याचे प्राणोत्क्रमण झाले.

✦✦✦

## राम–रहीम

शंकरराव अलीकडे हिंदू महासभेचे मोठे अभिमानी झाले होते. काँग्रेसच्या नावाचा उल्लेख होताच त्यांच्या पायांची आग मस्तकास जाई. काँग्रेस म्हणजे धर्मबुडवी, काँग्रेस म्हणजे मुसलमानांची बटीक, वाटेल ते ते बरळत. महात्मा गांधी म्हणजे हिंदू धर्माला लागलेले ग्रहण, असे ते म्हणत. काँग्रेसला शिव्या देणे म्हणजे त्यांची संध्या. काँग्रेसच्या थोर सेवकांची निंदा करणे म्हणजे त्यांचा गायत्री जप.

परंतु त्यांचा मुलगा राम हा अगदी निराळा होता. महात्मा गांधींचा जयजयकार करणे म्हणजे त्याचे सुखसर्वस्व होते. त्याच्या त्या अभ्यासाच्या खोलीत महात्मा गांधी, जवाहरलाल वगैरेंची चित्रे होती. तिरंगी झेंडा लावलेला होता. कोटावर तिरंगी झेंड्याचे छोटे बटण लावल्याशिवाय तो शाळेत जात नसे. हृदयात तिरंगी झेंडा व छातीवर तिरंगी झेंडा. थोर काँग्रेस–सेवकांच्या गोष्टी ऐकण्यात तो तहानभूक सारे विसरी. महात्माजींचे चरित्र, काँग्रेसचा इतिहास, जवाहरलालांचे चरित्र वगैरे पुस्तके तो पुन:पुन्हा वाची, काँग्रेसचा इतिहास वाचून त्याला वाटे, पुन्हा सत्याग्रह केव्हा सुरू होईल व आपण केव्हा जाऊ. जवाहरलालांनी, त्यांच्या डोक्यावर लाठीमार घेतला, असा आपण केव्हा घेऊ शकू, आपण भिणार तर नाही ना ! असे विचार तो करीत बसे. तो आपल्या डोक्यावर कधी लाठी मारून घेई. तरी जोराने मारून घेण्यास धीर होत नसे.

परंतु मुलाचे हे काँग्रेस-प्रेम पित्याला पापमय वाटू लागले. वेळीच आळा घातला पाहिजे, असे त्याने ठरविले. एके दिवशी राम शाळेत गेला. शंकररावांनी त्याच्या खोलीतील चित्रे फाडून टाकली. तिरंगी झेंडा फाडून फेकून दिला. तेथे एक भगवा झेंडा लावून ठेवला.

राम शाळेतून घरी आला तो हा प्रकार ! तो खोलीत खिन्न होऊन बसला. त्या खोलीत त्याला शून्य वाटू लागले. इतक्यात पिता तेथे आला. त्यांचा संवाद झाला.

राम : बाबा, काय केलेत हे ? तिरंगी झेंडा कोठे आहे ? चित्रे कोठे आहेत?

बाप : तिरंगी झेंडा चुलीत गेला. चित्रे कचऱ्याच्या पेटीत टाकली.

राम : बाबा, येथे तुम्ही भगवा झेंडा लावला आहे. त्याचा मी अपमान करणार नाही. त्याला प्रणाम करीन. विशिष्ट धर्माची म्हणून ती खूण आहे. परंतु तिरंगी झेंडा त्याहून विशाल आहे. ४० कोटी जनता तो आपल्याखाली घेऊ इच्छितो. भगवा झेंडा १७ व्या शतकात ध्येय म्हणून शोभला. आज ध्येय वाढले आहे. आज तिरंगी झेंडा पूजिला पाहिजे.

बाप : तिरंगी झेंडा हिंदूंचा अपमान करतो.

राम : तुम्ही म्हणता, तो हिंदूंचा अपमान करतो. मुसलमान म्हणतात, तो मुसलमानांचे अहित करतो. याचा अर्थ काय ? याचा अर्थ एकच की, तो दोघांना सांभाळू शकतो. दोघांना संयमात राहा असे सांगतो. विशाल भारत उभारू इच्छितो. म. गांधी वगैरे हिंदू धर्माचे का शत्रू आहेत ? हिंदू धर्माला त्यांच्यामुळे सात्त्विक तेज चढले आहे.

बाप : त्यांच्याइतकी हिंदू धर्माची हानी कोणीही केली नाही.

राम : पुराव्याशिवाय बोलणे पाप आहे. हिंदू धर्माची सेवा दोन प्रकारची. एक हिंदू धर्मातील थोर तत्त्वे जीवनात आणणे, दुसरे म्हणजे हिंदू समाजाची सेवा करणे. महात्माजी दोन्ही प्रकारची सेवा करीत आहेत. जीवनात सत्य, अहिंसा, ब्रह्मचर्य आणण्याचे जीवनावधी प्रयोग करीत आहेत आणि ज्या जातीतून लोक विशेषतः परधर्मात जातात ते स्वधर्मात राहावे म्हणून त्यांची सेवा करीत आहेत. भिल्ल, हरिजन वगैरे मागे पडलेल्या, तुम्ही उपेक्षिलेल्या शेकडो जातींतून कोट्यवधी लोक परधर्मात गेले. ती भोके महात्माजी व त्यांचे सेवक ठायी ठायी आश्रम काढून आज २० वर्षे बुजवीत आहेत. परधर्मात गेलेली एखादी स्त्री वा पुरुष तुम्ही शुध्द करून घेता व

टिपऱ्या बडवता; परंतु लाखो जातील ते जाऊ नयेत म्हणून मुकेपणाने महात्माजी सेवाद्वारा व्यवस्था करीत आहेत.

बाप : ते मुसलमानांना डोक्यावर घेतात.

राम : त्यांनी सत्याला डोक्यावर घेतले आहे. सेवेला डोक्यावर घेतले आहे. मुसलमान या देशात शेकडो वर्षे राहिले. त्यांच्याजवळ जर आपणास नीट राहता आले नाही, तर सदैव मारामाऱ्याच होत राहणार. यासाठी दोघांनी स्नेहभावाने राहावे असे त्यांना वाटते. त्यांना चिडवणे किंवा डिवचणे हा तो मार्ग नव्हे.

बाप : मुसलमानांनी का चिडावे ?

राम : कोण म्हणतो ?

बाप : मग त्याचा निषेध तुम्ही का करीत नाही ?

राम : मुसलमानांचा निषेध करणे म्हणजे तमाम सारा मुसलमान समाज वाईट म्हणणे असा नव्हे. तुम्ही सर्व समाजाला नावे ठेवीता. सात कोटी लोक का सारे पै किमतीचे ? त्यांना का हृदय नाही ? मुसलमानांतील गुंडांचा किंवा हिंदूतील गुंडांचा – सर्व गुंडांचा निषेध काँग्रेस करते. वाईट लोक सर्वांमध्ये आहेत.

बाप : मुसलमान आमच्या आयाबहिणी पळवितात.

राम : पुष्कळ वेळा हिंदू गुंडही त्यांना त्या पुरवतात. शिवाय हिंदू समाजातील एखाद्या स्त्रीचे पाऊल तुमच्या दुष्ट रूढीमुळे वेडेवाकडे पडले तर तुम्ही तिचा सांभाळ करीत नाही. त्या स्त्रिया मग परधर्माचा आश्रय करतात किंवा मरणाला मिठी मारतात. आपल्या अनुदारतेचा हा परिणाम आहे. काही मुसलमान मुद्दाम हिंदू आयाबहिणींची कुचेष्टा करतात. त्यांना शासन करावयास उभे राहिले पाहिजे. परंतु माझे म्हणणे की, सर्व समाजाला दोष देऊ नका. हिंदुस्थान हिंदूंचाच असे म्हणू नका.

बाप : तुम्हा भेकडांना असे म्हणणे शक्य होत नसेल तर तुम्ही नका म्हणू. आम्ही म्हणणार.

राम : आम्ही भेकड नाही. इंग्रजांच्या गोळीबाराला न भिणारे, मरणाला न भिणारे लोक भेकड नसतात. राष्ट्राच्या मंगलाची महात्माजींसारख्यांस अधिक तहान आहे. मुसलमानांना येथे स्थान नसेल तर तुम्हासही नाही. तुम्हीही उत्तर ध्रुवावरून आलात. वेदात साम्राज्यवाद्यांच्या व येथील एतद्देशीय राजे मारून राज्य स्थापले, वगैरेंच्या कथा आहेत. मुसलमान मक्केकडे तोंड करतात व आपण उत्तर दिशा पवित्र



श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

मानतो. खेड्यापाड्यातून गरीब मुसलमान भगिनी दळताना ज्या ओव्या म्हणतात त्यात सुंदर गंगा-यमुनांची वर्णने आहेत. बंगाली मुसलमान कवींनी गंगास्तोत्रे लिहिली आहेत. हिंदू-मुसलमान गुण्यागोविंदाने राहण्यास शिकत होते. परंतु इंग्रज आले. त्यांनी विकृत इतिहास लिहिले. त्यांच्या 'फोडा-झोडा' धोरणाला आपण सुशिक्षित बळी पडत आहोत. इंग्रजांची नीती अप्रत्यक्षपणे आपण उचलून धरीत आहोत. बापा, काँग्रेसच्याच मार्गाने जाऊया, त्यायोगेच यश येण्याचा संभव तरी आहे.

बाप : ते काही नाही. माझ्या घरात काँग्रेस नको, मला बुध्दिवाद नको. तुला माझ्या घरात राहावयाचे असेल तर मी सांगेन त्याप्रमाणे वागले पाहिजे.

असे म्हणून बाप निघून गेला. रामाला आपल्या जीवनातून रामच निघून गेला असे वाटू लागले. परंतु त्यांच्या हृदयातील प्रेम कोण मारणार ? तेथील काँग्रेस कोण दूर करणार ?

एके दिवशी शंकरराव मुलास म्हणाले, ''ती गांधी टोपी काढून टाक, काळी टोपी डोक्यावर घाल. खादी आजपासून बंद. खादीमुळे मुसलमानांस धंदा मिळतो. सापांना पोसणे पाप आहे.''

राम : परंतु शेकडो हिंदू माय - बहिणींच्या पोटालाही मिळत आहे !

बाप : मला बुध्दिवाद नको.

राम : बाबा, हिंदुस्थानातील मुसलमान हे बहुतेक आपल्यातीलच आहेत. ते वाईट असतील तर आपणच वाईट आहोत, असा नाही का अर्थ ? आपल्या पूर्वजांची क्षुद्र दृष्टी नव्हती. हे मुसलमान एके काळचे आपल्यातीलच - काही हिंदू धर्मातील छळामुळे, काही परकीय धर्माच्या जोरामुळे व काही स्वार्थामुळे परधर्मात गेले. त्यांना आपल्या पूर्वजांनी जगविले. त्यांना काही धंदे दिले. आपल्या समारंभास आपल्या चौघड्याबरोबर त्यांचे ताशेही आपण बोलावीत असू. त्यांनाही जगू दे. आपल्या शेजारचेच ते. त्यांना उपाशी ठेवणे धर्म नव्हे. कोठे ती थोर दृष्टी व कोठे आमचे घातकी इंग्रज सरकारच्या वळणाचे धोरण ! बाबा, मी खादीची टोपी घालणार. देशाचे तोंड उजळ करणारी, हिंदू-मुसलमानांचे ऐक्य साधणारी, साम्राज्याला दूर करणारी स्वातंत्र्याची खूण अशी ही स्वच्छ शुभ्र टोपीच मी घालणार. या टोपीवर इंग्रजांनी लाठीमार केले. ही टोपी घालणाऱ्यांवर इंग्रजांनी गोळ्या

झाडल्या, तुम्ही तेच करणार असाल तर तुम्ही त्याच साम्राज्यवाल्यांच्या, माझ्या देशाला गुलाम करणाऱ्यांच्या जातीचे ठराल.

बाप : येथे राहावयाचे असेल तर मी सांगेन तसे वागले पाहिजे.

बापाने गांधी टोपी फेकून दिली. रामाच्या डोक्यावर काळी टोपी चढविण्यात आली. फाशी देताना टोपी घालतात तसे रामाला वाटले त्याच्या डोळ्यांसमोर काळोखी आली. काय करावे त्याला कळेना.

सुदैवाने आतापर्यंत रामच्या शाळेत चांगले शिक्षक होते. त्यांच्यामुळेच रामला असा बुध्दिवाद करता येई. परंतु नवीन वर्षी द्वेषाचे विष पेरणारे शिक्षक त्या शाळेत आले. ते इतर परीक्षांबरोबर विषप्रसाराचीही परीक्षा पास झालेले होते. एके दिवशी ते नवीन शिक्षक एका वर्गात येताच विचारू लागले, ''आर. एस्. एस्. मध्ये किती जण जातात ?'' त्या शाळेचे निर्मळ नाव हे कलंकित करणार असे काही थोर वृत्तीच्या मुलांस वाटले.

रामाच्या वर्गावर ते नवीन विषारी शिक्षक आले. तेथे त्यांनी तोच प्रकार सुरू केला. राम एकदम उभा राहिला.

राम : आपल्या शाळेत 'सहनाववतु सहनौ भुनक्तु' वगैरे प्रार्थना म्हणण्यात येत असते. गुरुशिष्यांच्या अभेदाची ही प्रार्थना आहे. तुम्ही तर आमच्यात हिंदू-मुसलमान भेद निर्मित आहात. या शाळेच्या ध्येयाप्रमाणे तुम्ही वागले पाहिजे.

शिक्षक : खाली बैस. तुला पोराला काय समजते ? संघटना म्हणजे काय पाप आहे ?

राम : संघटना दुसऱ्याच्या द्वेषासाठी नको. शेजारी शेजारी राहणाऱ्यांचा द्वेष शिकविणे पाप. निदान आम्हा मुलांना तरी या नरकात, या अग्नीत फेकू नका.

शिक्षक उपहासाने हसले. रामला वाईट वाटले. तो त्या शिक्षकांच्या तासाला जाईनासा झाला. ते विष त्याला सहन होत नसे. त्या तासाला वाचनालयात जाऊन 'हरिजन' वाची, 'सर्वोदय' वाची, 'क्रांती' वाची. हेडमास्तरांच्या कानांवर ही गोष्ट गेली. ते रामला म्हणाले, ''वर्गात बसले पाहिजे. शिस्त सांभाळली पाहिजे.'' राम म्हणाला, ''मग ती प्रार्थना तरी बंद करा. शिक्षकांची जाहिरात देताना इतर पदव्यांसंबंधी लिहिता; परंतु तो मुलांत भेदाचे विष पसरविणारा असता कामा नये, अशीही महत्त्वाची एक अट का घालीत नाही ?'' हेडमास्तर म्हणाले, ''तुम्हाला

अजून जगाचा अनुभव यायचा आहे. शाळा चालवताना, संस्था चालवताना, काय अडचणी येतात, तुम्हाला काय कळणार ? जा, वर्गास बस. त्या विषाचा परिणाम होऊ देऊ नको.''

राम म्हणाला, ''माझ्यावर नाहीच होणार. इतर मुलांचे काय ? त्यांच्या जीवनाला हे द्वेषाची कीड लावणार, तुम्हांला वाईट नाही वाटत?''

हेडमास्तर म्हणाले, ''तू माझा गुरू आहेस. परंतु माझे ऐक. माझ्यासाठी वर्गात बसत जा.''

राम वर्गात बसू लागला. त्याच्या वर्गात एक नवीन मुलगा आला. त्याचे नाव रहीम. रामचे त्या विषारी शिक्षकाशी खटके उडत. रहीमला कौतुक वाटे. रहीम व राम मित्र झाले. ते दोघे बागेत फिरावयास जात. त्या बागेत अनेक प्रकारची फुले फुललेली पाहून दोघा निर्मळ मित्रांस आनंद होई. त्यांचे संवाद चालत.

रहीम : राम, निरनिराळी फुले बगीच्यात फुललेली आहेत. त्यांचे भांडण नाही.

राम : या हिंदुस्थानात नाना धर्म, नाना जाती प्रेमाने फुलतील, एकमेकांस शोभा देतील.

रहीम : परंतु काही मुसलमान हिंदुस्थानच्या बाहेर पडतात.

राम : काही हिंदू म्हणतात हिंदुस्थान हिंदूंचा.

रहीम : इतर मुसलमान राष्ट्रांतील बंधू आम्हास हसतात. आमची ही भांडणे ऐकून तो थोर केमालपाशा आमचा तिरस्कार करी. तुर्कस्तानात मशिदीवरून बँड वाजत जातात. परंतु येथे आम्ही हा चावटपणा मांडला आहे.

राम : आमच्यातील काहींना मशीद आली, की अधिक जोराने ओरडण्याची व अधिक जोराने वाजविण्याची कधी कधी स्फूर्ती येते.

रहीम : माझे वडील मुस्लीम लीगवाले आहेत. ते मला मुस्लीम लीगच्या स्वयंसेवकांत जा सांगतात. मला ते करवत नाही. पेशावर प्रांतात तर तीस सालच्या चळवळीत शेकडो मुसलमान मोटारखाली चिरडले गेले. पंधरा हजार पेशावरी पठाण तुरुंगात गेले. मी तेच करणार. काँग्रेस राष्ट्र निर्मित आहे.

राम : मुस्लीम लीग व हिंदू महासभा या नबाबांच्या आहेत. गरिबांसाठी त्यांचा कार्यक्रम नाही. शेतकरी – कामकरी यांच्याविषयी त्यांना आस्था नाही. जगात खरे

भेद हिंदू – मुसलमान असे नसून पिळले जाणारे व पिळणारे असे दोनच भेद. गीतेत हेच दोन भेद सांगितले आहेत.

रहीम : कानपूरला हिंदू–मुसलमान कामगार एक आहेत. त्यांचे ऐक्य मोडावे म्हणून तेथे सारखे हिंदू–मुस्लीम दंगे मुद्दाम पेटविण्यात येतात. परंतु कामगार अलग राहतात. परवा बारीसालचे हिंदू–मुस्लीम किसान मिरवणूक काढीत आले. मुस्लीम लीगवाल्यांनी मुसलमान शेतकऱ्यांस फोडण्याचा प्रयत्न केला. परंतु हिंदू–मुसलमान शेतकरी गर्जना करून म्हणाले, ''आम्हाला ही धर्माची सोंगे माहीत आहेत.'' हिंदू जमीनदार, मुसलमान जमीनदार एक होतात व गरीब हिंदू–मुसलमानांस छळतात.

राम : तिकडे कोकणात हिंदू महासभेचे अभिमानी खोत खोतसंघात शिरतात. त्या संघातही मुसलमान असतात. त्या वेळेस त्यांचा अभिमान कोठे जातो ?

रहीम : सर्वांना पैशाचा अभिमान आहे. पैसेवाले एकमेकांचे भाऊ. गरीब गरिबांचे भाऊ.

राम : रहीम, माझे वडील तर मला जसे मारायला उठतात !

रहीम : माझी तीच स्थिती.

दोघा मित्रांनी हात हातात घेतले, सायंकाळ होत आली. हिंदू–मुस्लीम ऐक्याचा नमाज ते पढत होते. हिंदू–मुस्लीम ऐक्याची संध्या ते म्हणत होते.

त्या दिवशी काँग्रेसचे काही स्वयंसेवक भिक्षेसाठी हिंडत होते. काँग्रेसचे प्रचारक ठेवता यावेत म्हणून ही भिक्षा ते मागत असत. रामाच्या दारी आले ते. राम घरातून ताम्हणभर गहू घेऊन आला; तो तिकडून शंकरराव आले, ''या धर्मद्रोह्यांना एक दाणाही येथे मिळणार नाही. निघा येथून –'' ते गरजले. राम तेथे थरथरत उभा होता. स्वयंसेवक निघून गेले. पितापुत्रांचा संवाद झाला.

शंकरराव : कोणी सांगितले हे तुला ?

राम : हिंदू धर्माने. दारात कोणीही येवो, त्याला देव मान, असे हिंदू–धर्म सांगतो. हिंदू धर्माचा मोठेपणा तुम्ही नष्ट करीत आहात.

शंकरराव : त्या मोठेपणामुळेच समाज मरत चालला. फकीर आला, घाल भिक्षा. अमुक आला, घाल भिक्षा.

राम : हे तरी निदान फकीर नव्हते !

शंकरराव : फकीर पत्करले. परंतु हे कुऱ्हाडीचा दांडा गोतास - काळ असे नकोत.

राम : त्या दिवशी त्या सार्वजनिक विहिरीवर हरिजन पाणी भरू लागले; तेव्हा काँग्रेसचे लोक तेथे गेले. तुम्ही हिंदू महासभावाले कोठे मेले होतेत ? श्री. सावरकरांचे तरी ऐका. परंतु तेही तुम्हाला पचत नाहीत. येथील मंदिरांतून हरिजनांना प्रवेश मिळावा म्हणून सत्याग्रह करा. तुम्ही घरच्या विहिरीवर त्यांना पाणी भरू द्या. तुम्ही त्यांना घरात घ्या. सार्वजनिक ठिकाणी त्यांची अस्पृश्यता राहू नये म्हणून खटपट करा. चालले हैदराबादला. स्वतःच्या हरिजनांना माणुसकी मिळावी म्हणून करा हजारोंनी सत्याग्रह. बाबा, तुमचा दंभ आहे. काँग्रेसला शिव्या देणे एवढाच तुमचा धर्म.

शंकरराव : मला बुध्दिवाद नको. तू या घरातून जा. काळे कर तोंड!

राम : बरे बाबा.

पित्याला प्रणाम करून राम बाहेर पडला. त्याचे डोळे भरून आले होते. या भरलेल्या प्रवाहाला तिकडून रहीमचा प्रवाह येऊन मिळाला.

रहीम रडत होता.

राम : रहीम, काय झाले ?

रहीम : काँग्रेसच्या स्वयंसेवकांस मी दाणे घालीत होतो. इतर गरीब मुसलमान आयाबहिणींनी भिक्षा घातली. एका अम्माने पीठ घातले, परंतु मला बाबांनी दाणे घालू दिले नाहीत. ते खूप बोलले. म्हणाले, 'माझ्या घरातून चालता हो." मी बाहेर पडलो. अल्लाच्या सेवकाला का फकीरच व्हावे लागते ?

रामनेही त्याला हकिकत सांगितली. ते दोन गंगा-यमुनांचे प्रवाह होते, ती जोडी गुरू-शुक्रांची जणू युती होती. गुलाब व मोगरा यांची ती भेट होती. राम व रहीम यांची ती भेट म्हणजे भारतीय ऐक्याची नवीन पताका होती. आता ते दोघे रस्त्यातून हिंदू-मुस्लीम ऐक्याची गाणी गात. रस्ते झाडीत, जणू आकाशातील दोन देवदूत असे आया-बायांना वाटे. ते बाल-फकीर बनले. त्या गावाला ऐक्याचे कुराण, प्रेमाचे उपनिषद ते आपल्या गीतांनी ऐकवीत. कोणी त्यांना भाकरी देई.

त्या दिवशी एकदम हिंदू-मुसलमानांचा दंगा सुरू झाला. लाठ्या-काठ्या, सुरे कृतार्थ झाले. रहीमचे वडील व रामचे वडील यांच्या प्रयत्नांस यश आले. ब्रिटिश

सरकारला आनंद झाला.राम व रहीम धावत आले. ''नका भांडू, नका एकमेकांस मारू. नका, भाई हो नका.'' असे ते हात जोडून सांगत होते. परंतु हे काय ? रहीमने किंकाळी फोडली. रामनेही किंकाळी फोडली. रहीमच्या पित्याचा खंजीर रहीमच्या अंगात खुपसला गेला. शंकररावांची लाठी रामच्या डोक्यावर बसली. ती दोन मुले रक्ताने न्हाऊन तेथे पडली. लोक थबकले. दंगा शांत होऊ लागला. पोलीसही आले.

राम व रहीम हॉस्पिटलमध्ये होते. त्यांच्या खाटा जवळजवळ होत्या.

''आमचे हात एकमेकांच्या हातात द्या.'' ते दोघे क्षीण परंतु गोड आवाजात म्हणाले.

''हिंदू-मुस्लीम ऐक्याचा जय होवो, काँग्रेसचा जय होवो.'' असे म्हणत त्यांनी प्राण सोडले.

त्या गावी 'राम-रहीम' या नावांची सुंदर इमारत बांधली गेली. हिंदू-मुस्लीम बंधू-भगिनी तेथे जातात, अश्रूंची फुले वाहतात व प्रेमाचा खरा धर्म शिकतात !

✦✦✦

## समाजाचे प्राण

ती मोटार लांबची होती. वाटेत ती बिघडली. दुरुस्त होईना. बाहेर अंधार पडू लागला. आकाशातील तारे लुकलुकू लागले. लहान मुले कंटाळून रडू लागली. मोटारीत कुटुंबवत्सल माणसे होती. रात्री कोठे जाणार ? गार वारा वाहत होता. जवळच्या शेतातून कोल्हे ओरडत होते. मुले मातांना घट्ट बिलगत होती. लहानगा धीट रमेश मात्र ड्रायव्हरला म्हणाला, ''पों पों वाजव म्हणजे कोल्हे भिऊन पळून जातील.''

तिकडून एक वृध्द मुसलमान आला. तो उंच होता. त्याच्या हातात काठी होती. जवळच्या खेड्यातील तो होता. लहान होते ते खेडे. वीस-पंचवीस घरांची वस्ती होती. तो मुसलमान तेथील पुढारी होता. पूर्वीचे खानदानी घराणे; परंतु आता त्याला गरिबी आली होती. तो मोटारजवळ आला व म्हणाला, ''गावात चला. येथे वाऱ्यात का राहता ? बालबच्चे बरोबर आहेत. डाळ-रोटी खा. सामान देतो. गावात रात्रीचे निजा. सकाळी मोटार दुरुस्त झाली की जा.''

प्रवासी मंडळी बोलेनात. धीट रमेश म्हणाला, ''चला जाऊ गावात; परंतु आम्हाला दूध द्याल का हो दाढीवाले ?'' दाढीवाला म्हणाला, ''हा बेटा, गाईचे दूध देईन. चला सारे.'' तो वृध्द मुसलमान आग्रह करू लागला. शेवटी भाऊ म्हणाले, ''चला जाऊ. येथे रानावनात मुलाबाळांस घेऊन कसे राहावयाचे?''

ती मंडळी गावात आली. त्यांना रसोईचे सामान देण्यात आले. मुलांना दूध मिळाले, सर्वांची जेवणे झाली. दाढीवाल्याने विचारले, ''आत निजता की बाहेर? आतील ओटी मोकळी करून देतो. बाहेर गार वारा आहे. मुलाबाळांस बाधेल.'' मंडळी म्हणाली, ''येथे बाहेरच बरे.'' त्यांना झोरे देण्यात आले. घरातील होते नव्हते ते पांघरावयास देण्यात आले.

काहींना झोप लागली, काही जागे होते. एक जण म्हणाला, ‘‘मुसलमानाच्या घरी येण्यापेक्षा रानात पडलो असतो तरी बरं. वाघाचा विश्वास धरवेल एक वेळ, परंतु यांचा नाही धरता येणार. भाऊ, हा तुमचा वेडेपणा. येथे बरे-वाईट झाले तर ? विश्वास दाखवून गळे कापले गेले तर ?’’

भाऊ बोलले नाहीत. पलीकडे गाय झोपली होती. तिचे वासरू विश्वासाने झोपले होते. बुद्धिमान माणसाला कोठला विश्वास ? परंतु हळूहळू सारे झोपले. पहाटेचा कोंबडा आरवला. वृद्ध मुसलमान नमाज पढण्यासाठी उठला. रमेशच्या अंगावर पांघरून नव्हते. वृध्दाने अंगावरची चादर त्याच्या अंगावर घातली.

सगळी मंडळी उठली. शौच-मुखमार्जने झाली. त्यांना चहापाणी करण्यात आले. ‘‘रमेश, तुला दूध पाहिजे ना ?’’ वृद्धाने विचारले. रमेश हसला. तो म्हणाला, ‘‘तुम्ही घातलेत वाटते मला पांघरूण ? कशी ऊब आली होती !’’ रमेश गाईचे दूध प्याला. मंडळी जायला निघाली. वृद्ध मुसलमान जरा घरात गेला. मंडळींत कोणी म्हणाला, ‘‘सुटलो एकदाचे.’’ ते शब्द त्या मुसलमानाच्या कानी पडले. तो चमकला. त्याच्या हृदयाची कालवाकालव झाली. तो कापऱ्या आवाजाने म्हणाला, ‘‘असे का म्हटलेत?’’ उत्तर मिळाले, ‘‘तुमची भीती वाटत होती. मुसलमानांवर विश्वास कसा राखावा ?’’

दाढीवाला काही बोलला नाही. त्याला बोलवेचना. मोटारीपर्यंत तो पोहोचवायला गेला. मोटार दुरुस्त झाली होती. मंडळी आत बसली. दाढीवाला बाहेर उभा होता. त्याच्या डोळ्यांतून अश्रू आले. पिकलेल्या दाढीवरून ते खाली आले. किती पवित्र होते ते दृश्य ! तो शेवटी म्हणाला, ‘‘सारे मुसलमान वाईट नका समजू. असे समजणे देवाचा अपमान आहे. माझ्या अश्रूंनी माझ्या बंधूंचे पाप कमी होवो !’’

सारे स्तब्ध होते. बाळ रमेश दाढीवाल्याकडे बघत होता. या वृध्दाने एकदम पुढे होऊन रमेशच्या तोंडावरून हात फिरवले व त्याचे चिमुकले हात हातात घेतले. रमेश म्हणाला, ‘‘तुम्ही छान आहात. तुमच्या गाईचे दूध छान आहे.’’ दाढीवाला अश्रूंतून हसला. मोटार सुरू झाली. भाऊंनी कृतज्ञ व साश्रू नयनांनी वृध्दाकडे पाहून प्रणाम केला. दोघांनी एकमेकांचे हात हातात घेतले.

गेली मोटार. वृध्द तेथे उभा होता. मोटारीत भाऊ म्हणाले, ‘‘प्रत्येक समाजात हृदये जोडणारे असे देवाचे लोक आहेत, म्हणून जग चालले आहे. असे लोक समाजाचे प्राण. त्यांच्याकडे आपण बघावे व जीवन उदार, प्रेमळ व सुंदर करण्यास आशेने झटावे.’’

✦✦✦

## तरी आईच !

एक गरीब विधवा होती. तिचा एकुलता एक मुलगा होता. त्या मायलेकांचे उभयांवर फार प्रेम. एकमेकांवर विसंबत नसत. तो मुलगा लहानाचा मोठा झाला. तो आता तारुण्यात आला. तो एका तरुणीच्या नादी लागला. तिच्या नादी लागून त्या तरुणाचा सर्वस्वी नाश झाला. त्याची संपत्ती, त्याची बुद्धी, त्याची श्रध्दा, त्याचा चांगुलपणा, त्याचा स्वाभिमान, त्याची मातृप्रीती सर्व-सर्व गेले. या तरुणाचे सर्वस्व हिरावून घेऊनही ती तरुणी तृप्त झाली नाही.

एक दिवस ती तरुणी त्या प्रियकरास म्हणाली, ''तुमचे प्रेम माझ्यावर आहे असे म्हणता, परंतु अजून माझी खात्री होत नाही. तुम्ही मला धन-द्रव्य जे जे मागितले ते ते दिले तरीही आपल्या मजवरील प्रेमाबद्दल शंका आहे. जर आज मी जे सांगेन त्याप्रमाणे तुम्ही कराल तरच तुमचे खरोखर प्रेम मजवर आहे असे मी समजेन.'' तो वेडा व उल्लू तरुण म्हणाला, ''सांग, तुझ्यासाठी काय करू ?'' ती म्हणाली, ''जा तर आणि स्वतःच्या आईचे हृदय कापून आणा.'' ते तरुण त्वरेने गेला. त्याने आपल्या आईस ठार मारले व तिचे काळीज कापून घेऊन ते त्या आपल्या प्रियकरणीस देण्यासाठी लगबगीने निघाला.

परंतु जाण्याच्या घाईत तो फरशी रस्त्यावरून पाय सरकून पडला. त्याच्या हातातील काळीज दूर पडले. परंतु ते काळीज त्या तरुणास हळूच कनवाळूपणे म्हणाले, ''बाळ, लागलं का रे तुला ? कितपत लागलं माझ्या बाळाला !''

मुलांनो, आईच्या प्रेमास सीमा नाही.आईचे प्रेम हा अथांग सागर आहे. पृथ्वीवरील मातीचे कण मोजवतील व आकाशातील ताऱ्यांचे गणन होईल ; परंतु आईच्या प्रेमाची मोजदाद कोण करील ? अशा आईला दुखवू नका हो ! आई हे दैवत आहे.

+++

# खरा सुगंध

गोविंदाचा एक मित्र फार दूरच्या देशात – फिझी बेटात गेला होता. फिझी बेटात आपल्या देशातील मजूर पुष्कळ आहेत. त्यांना शिक्षण देणे, आपल्या धर्माची ओळख करून देणे या पवित्र कार्यासाठी गोविंदाचा मित्र गेला होता. त्याचे नाव रामचरण. रामचरणने आपला देश, घरदार, सर्व स्नेही यांस सोडून दिले होते. जे आपले बांधव हजारो मैलांवर आहेत, त्यांना ज्ञानदान करण्यासाठी तो गेला होता. त्या गरीब मजुरांच्या मनात सीता, सावित्री, रामकृष्ण यांची आठवण राहावी, हिंदू-संस्कृती त्यांच्या मनात जिवंत राहावी म्हणून तो गेला होता.

आज गोविंदा फिझी बेटात गेलेल्या आपल्या मित्रास काही वस्तू भेट म्हणून पाठविणार होता. गोविंदाच्या बहिणीने तयार केलेला एक रुमाल, एक खादीचा-सुताचा हार, श्रीरामाची भरलेली तसबीर, गीतेचे सुंदर पुस्तक वगैरे वस्तू तो बांधीत होता.

इतक्यात खोलीत एकाकी सर्वत्र सुगंध दरवळून राहिला. जणू जाई-जुईची, गुलाब मोगऱ्याची फुलेच फुलली आहेत. कोठून बरे वास येत होता ? गोविंदास तर समजेना. इतक्यात त्याला खिडकीत असलेली अत्तराची बाटली उपडी झालेली दिसली. धांदलीत धक्का लागून बाटली पडली होती व तिच्यातील अत्तर त्या पाठविण्यात येणाऱ्या वस्तूंवरही सांडले.

ते सामान सर्व पॅक करून फिझी बेटात पाठविण्यात आले. रामचरणला ते पार्सल मिळाले. रामचरण दिवसा काम करून दमला भागला होता. ते पार्सल फोडावयास

त्याला दिवसा वेळ मिळालाच नाही. रात्र झाली होती. नेहमीप्रमाणे रामचरणचे प्रवचन ऐकण्यास मजूर जमले होते. रामचरणने तो खोका फोडण्यास आरंभ केला होता ; व जमलेले मजूर वाटोळे बसले होते.

खोका फोडल्याबरोबर एकदम दिव्य सुगंध बाहेर पसरला. ते मजूर म्हणाले, ''दादा, किती गोड वास हा ! अत्तर आहे यावर.''

रामचरण त्या वस्तू पाहून सद्‌गदित झाला होता. तो मजुरांस म्हणाला, ''होय, या आलेल्या सुंदर वस्तूंवर अत्तर सांडले आहे हे खरे; परंतु अत्तराच्या बाटलीपेक्षाही दुसऱ्या एका बाटलीतील तेलाचा गंध या वस्तूंस येत आहे.'' ते मजूर म्हणाले, ''कोणते ते तेल?'' रामचरण म्हणाला, ''अंतःकरणातील प्रेम व सहानुभूती यांची जी भरलेली बाटली आहे ती या वस्तूंवर उपडी झालेली आहे. या वस्तू प्रेमाने पाठविलेल्या आहेत. तशा नसत्या तर या बाहेरच्या अत्तराची मला काय किंमत होती! गड्यांनो, आपण नेहमी काही ना काही तरी देत असतो. कधी आनंदाने देतो तर कधी दिले पाहिजे म्हणून देतो. पण मी तुम्हाला सांगतो, कोणतीही लहानमोठी जी वस्तू द्याल, पै-पैसा द्याल त्यावर अंतःकरणातील प्रेमाच्या बाटलीतील दोन थेंब टाकीत जा; त्यामुळे दिलेल्या वस्तूस कितीतरी सुंदर वास येईल ! आणि अंतःकरणातील प्रेमाची बाटली असे थेंब टाकल्याने रिकामी होत नाही. जो जो द्यावे तो तो ती बाटली भरभरून येते.''

रामचरणचे त्या दिवशी हेच प्रवचन झाले. परंतु त्याच्या त्या चार शब्दांचा परिणाम मजुरांच्या मनावर केवढा झाला होता हे त्यांच्या डोळ्यांत चमकणाऱ्या अश्रुबिंदूंवरून दिसून येत होते.

✦✦✦



श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा

# सत्य केव्हातरी बाहेर येतेच

युरोपातील एका शहरात फार प्राचीन काळी ही गोष्ट घडली. त्या शहराचे नाव मात्र मला आता आठवत नाही. या शहरात न्यायदेवतेचा एक भला मोठा पंचरसी धातूचा एक पुतळा होता. भर चौकात तो उभारलेला होता. त्या पुतळ्याच्या डाव्या हातात एक तराजू होता व उजव्या हातात तलवार होती. या शहरात कोणत्याही गोष्टीचा निकाल नीट तोलून पाहून देण्यात येतो. त्यात रेसभरही चूकभूल होत नाही हे दर्शविण्यासाठी तो तराजू होता; आणि अन्यायाचे निर्दालन करण्यात येते हे दाखविण्यासाठी ती तलवार होती.

पुढे काही वर्षे लोटली. त्या शहरात पूर्वीचा न्याय राहिला नाही. अन्याय व अनीती यांचे राज्य सुरू झाले. सद्गुणास शिक्षा व दुर्गुणास बक्षीस असा अस्मानी सुलतानी व्यवहार सुरू झाला. तो न्यायदेवतेचा दगडी पुतळा जरी तेथे होता, तरी प्रत्यक्ष व्यवहारात रोज न्यायदेवतेचा खून होत होता; बळी तो कान पिळी हा नियम आता झाला होता. त्या राज्यात दुर्बलांचा वाली कोणी राहिला नाही. दुष्ट व राक्षसी लोक वाटेल तसा जुलूम करू लागले. सर्वत्र कहर गुदरला.

या पुतळ्याच्या हातात तराजू होता, तो केवढा थोरला होता. या तराजूत पक्ष्यांनी आपली घरटी केली; त्या पाखरांना त्या पुतळ्याच्या हातातील तलवारीचे मुळीच भय वाटत नसे. सकाळ झाली म्हणजे या तराजूतील घरट्यातून पाखरे भुरभुर उडून जात,

सायंकाळ झाली म्हणजे चिव चिव करीत परत घरट्यात येत. पक्ष्यांची वसाहतच तेथे बसली म्हणा ना !

अशी परिस्थिती असता एका मोठ्या उमरावाच्या घरी एक मौल्यवान मोत्यांचा कंठा हरवला. त्या उमरावाच्या घरी एक मोलकरीण काम करण्यास होती. तिला जगात कोणी नव्हते. ना आई, ना बाप. त्या पोरक्या पोरीवर तो मोत्याचा कंठा चोरल्याचा आळ आला. त्या पोरीची चौकशी झाली व ती दोषी ठरली. गरीब बिचारी मुलगी ! तिला त्या माणिक-मोत्यांचे काय करावयाचे होते! परंतु न्यायदेवता त्या वेळेस त्या शहरात आंधळी झालेली होती.

त्या वेळच्या कायद्याप्रमाणे त्या मुलीला गुन्हेगार ठरवून तिला फाशीची शिक्षा देण्यात आली. त्या निरपराध पोरीला फासावर मरण आले !

तिचा पवित्र आत्मा परमेश्वराजवळ जाऊन राहिला. त्या मुलीची प्रामाणिकता आंधळ्या जगास पटवून द्यावी असे परमेश्वराच्या मनात आले. एक भले मोठे प्रचंड वादळ उठले ! पर्वतासही उडवील असा झंझावात सुटला ! विजा चमचम चमकू लागल्या. प्रचंड मेघगर्जना होऊन विश्वाचे कान बधीर झाले! तो पाहा मुसळधार पाऊस पडू लागला. आजच प्रलय ओढवला असे भासले.

कडाड् कडाड - अरे बापरे, केवढा आवाज ! तो पाहा विजेचा लोळ त्या पुतळ्यावर आदळला, पुतळा कोसळला ! न्यायदेवतेच्या हातातील तो तराजू छिन्नभिन्न होऊन खाली पडला; त्यातील पाखरांची घरटी खाली कोलमडून पडली, आणि काय आश्चर्य ! त्या एका पाखराच्या घरट्यातून तो पाहा मोत्यांचा हार एकदम खळकन खाली पडला ! पाखराने तो हार केव्हातरी चोचीत धरून नेला असावा व घरट्यात ठेवून दिला असावा. पण त्याबद्दल त्या पोरीला फाशी जावे लागले.

त्या मुलीची निर्दोषिता जगास पटली, पण आता काय उपयोग ? उपयोग नाही असे म्हणू नका. उपयोग हा की, सत्य हे बाहेर येते. सत्य लपत नाही - आज ना उद्या एवढाच प्रश्न.

+++

## वृद्ध आणि बेटा

सुमारे अडीच हजार वर्षांपूर्वीची गोष्ट. भगवान बुध्द त्या काळी अवतरले होते, व सर्व लोकांस सदुपदेश करून सन्मार्ग दाखवीत होते.

एकवीस वर्षे वयाचा एक तरुण ब्रह्मचारी होता. त्याच्या तोंडावर अग्नीसारखे तेज होते. तो विद्वान व बुध्दिमंत होता. लोकांनी आपल्या हुशारीची तारीफ करावी म्हणून त्यास अधिकाधिक शिकण्याची इच्छा असे. त्याने देशोदेशी नवीन ज्ञान मिळविण्यासाठी प्रवास केले. तक्षशिला, राजगृह, कौसंबी, उज्जयिनी वगैरे तत्कालीन सर्व विद्यापीठांतून तो निरनिराळ्या शास्त्रांत पारंगत होऊन आला. जे जे नवीन पाही, ते ते स्वत:स यावे असे त्याला वाटे, ते शिकण्याचा तो प्रयत्न करी व त्यास ते प्राप्त होई.

एक दिवस बाण तयार करणारा बाणकार त्याने पाहिला. लगेच तो बाण करण्यास शिकला; दुसऱ्या एकाजवळ ठाण मांडून बाण मारण्यास शिकला; एका देशात गलबते बांधावयास शिकला; अन्यत्र घरे बांधावयास शिकला; तो भिल्लविद्या शिकला; तंतुवाद्यकला शिकला; चर्मवाद्य विशारद झाला; गायनातही निष्णात झाला. सोळा देशांत प्रवास करून अनेक कला हस्तगत करून स्वारी परत स्वदेशी आली. ‘‘माझ्याइतका हुशार, अनेककलाभिज्ञ जगात कोण आहे ?’’ असे गर्वाने तो ज्याला त्याला विचारी.

भगवान बुध्दांनी त्या ब्रह्मचाऱ्यास पाहिले व ब्रह्मचारी जे काही शिकला होता, त्याहून अधिक मौल्यवान असे काही त्यास शिकवावे असे त्यांच्या मनात आले. वृध्द यतीसारखा वेश घेऊन हातात भिक्षापात्र व कमंडलू घेऊन बुध्ददेव त्या तरुण मनुष्याचे समोर येऊन उभे राहिले.

ब्रह्मचारी विचारता झाला, ''तू कोण आहेस?''

बुद्ध म्हणाले, ''आपल्या शरीरावर व मनावर स्वामित्व चालविण्यास शिकलेला मी आहे.''

ब्रह्मचारी म्हणाला, ''तुझ्या म्हणण्याचा अर्थ काय ?''

बुध्दांनी उत्तर दिले, ''बाणकार बाण तयार करतो; धनुर्धारी बाण मारतो; नाखवा गलबत बांधतो; सुतार लाकूड तासतो; गाणारा गातो; वाजवणारा वाजवतो; विद्वान वादविवाद करतो; परंतु खरा ज्ञानी पुरुष स्वत:वर सत्ता चालवितो.''

ब्रह्मचारी म्हणाला, ''ज्ञानी कशा रीतीने स्वत:वर सत्ता चालवितो?''

बुध्द म्हणाले, ''लोकांनी स्तुतिसुमने वाहिली किंवा निंदेच्या निखाऱ्याची आग पाखडली तरी त्या ज्ञानी पुरुषाचे मन अचल राहते, समाधानातच असते. सद्वर्तन, सच्छील, भूतदया व विश्वप्रेम याच गोष्टींवर त्याचे मन अनुरक्त असते आणि त्यामुळे त्याचे मन शांत असते.''

तो ब्रह्मचारी हतगर्व झाला. ज्ञानाचे खरे स्वरूप समजून बुध्ददेवांच्या पाया पडला व नम्र झाला. बुध्ददेव म्हणाले, ''आता तू खरा शिकावयास आरंभ केलास. नम्रता हा ज्ञानाचा आरंभ आहे, समजलास बेटा ?''

✦✦✦

## मुलांनो, सावध !

ग्रीस देशातील इसापप्रमाणे पुष्किन् म्हणून एक रशियन ग्रंथकार शे-दोनशे वर्षांपूर्वी होऊन गेला. त्याच्या गोष्टींपैकी एक गोष्ट पुढे देतो.

एक लहानसा ओढा होता. उन्हाळ्यात पाण्याचा एक थेंब त्यात आढळेल तर शपथ. पावसाळ्यात मात्र त्याची कोण ऐट व मिजास ? एकदा खूप मुसळधार पाऊस पडला, जिकडे तिकडे पाणीच पाणी झाले. आमचा हा लहानसा ओढा पाण्याने फुगून गेला. त्याच्या तीरावर धान्यांची सुंदर शेते होती. त्या नाल्याने आपले पाणी दूरवर पसरिले, ती सुंदर शेते वाहून गेली. त्या उद्धट धटिंगण ओढ्याने सामर्थ्याच्या जोरावर ती सुकुमार व उपकारक शेते वाहवून न्यावी ना ? त्या शेतांमुळे या ओढ्याचेच सौंदर्य वाढत असे, परंतु दुष्टाला दुसऱ्याचे नुकसान करण्यात स्वत:चेही शेवटी नुकसान होईल हे दिसत नसते.

त्या शेतांस वाईट वाटले. आपण मोठ्या नदीकडे फिर्याद न्यावी म्हणजे या गर्विष्ठ ओढ्यास ती चांगले शासन करील असे त्या गरीब शेतास वाटले. ती शेते उरलेले हिरव्या रंगाचे कपडे घालून महानदीकडे फिर्याद देण्यासाठी आली, परंतु एकदम 'आ' पसरून चकित झाली. हजारो शेते, हजारो गावे, प्रचंड वृक्ष, त्या महानदीच्या प्रचंड ओघाने वाहून जात होती. या ओढ्याने दोन-चारच शेते बुडविली. परंतु ही सवाई राक्षसीण - हिने तर हजारो सुंदर शेतांस मूठमाती दिली, गावच्या गाव उद्ध्वस्त केले ! स्वत:च्या संपन्मदाने मदांध झालेली ती बेफाम नदी

पाहून आपली गाऱ्हाणी सांगून दाद मिळण्याची आशा त्या फिर्यादी शेतांस कोठून राहणार ?

ती शेते खाली मान घालून, खिन्नपणे सुस्कारे सोडीत माघारी गेली.

मुलांनो, पुष्किनने लिहिलेली ही कल्पित गोष्ट त्या काळातील रशियातील स्थितीवर कितीतरी प्रकाश पाडते. रशियातील अधिकारी गोरगरिबांस नाडीत असत. खालच्यापेक्षा वरचा अधिकारी जास्त उर्मट, बेजबाबदार, जुलमी ! खालचे परवडले पण वरचे नको. सारांश, रशियन लोकांस कोणी त्राता नव्हता. हीच स्थिती वाढत गेली व रशियात पुढे क्रांत्या झाल्या.

अधिकारी असतात ते जनतेचे नोकर असतात, परंतु आमच्याकडील पोलीस पाटलांपासून ते थेट वरपर्यंत सर्वच मुळी बादशहा, लोकांस कस्पटासमान लेखणारे, त्यांस नाडणारे असे दिसतात. याचा परिणाम केव्हाही सुफलदायी होणार नाही. पुष्कळ वेळा युरोपियन अधिकारीही पुरवतात, परंतु आपली काळी नोकरशाहीच जास्त जाचते. 'कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ' म्हणतात ना, तशातली गत. मुलांनो, तुम्ही पुढे मामलेदार, मुन्सफ कोणी झालात तर प्रजेच्या सुखासाठी कामे करा. फुकटाफाकट पगार घेऊ नका व बादशाही ऐटीने आपल्याच बांधवांस दडपू नका.

✦✦✦

## पहिले पुस्तक

एक अत्यंत गरीब मुलगा होता. तो गरीब होता तरी त्याला शिकण्याची फार इच्छा होती. एक दिवस तो एका शेजारच्या मुलाजवळ खेळत होता. त्या मुलास तो म्हणाला, ''मला जर तू अक्षरे वाचावयास शिकवशील तर सहा अक्षरांस एक बैदुल याप्रमाणे मी तुला देईन.'' तो मुलगा तयार झाला. परंतु पुस्तकाची पंचाईत आली. तो गरीब मुलगा पुन्हा म्हणाला, ''पुस्तकाची व्यवस्था मी करतो.'' पुष्कळ प्रयत्न करूनही त्या मुलास पुस्तक मिळाले नाही. शेवटी त्याच्या कल्पक मेंदूने एक युक्ती शोधून काढली. मनुष्य मेल्यावर त्यास पुरतात व त्याच्या शवावर दगड ठेवतात व त्यावर त्या मृत माणसाचे नाव, जन्म, मृत्यू वगैरे लिहिलेले असते. तो गरीब मुलगा त्या शेजारच्या मुलास म्हणाला, ''चल रे, त्या कबरस्थानात कितीतरी पुस्तके आहेत. तेथे येऊन तू मला शिकव.'' त्या मुलाच्या लक्षात काही येईना. कबरस्थानात पुस्तके कोठून येणार ? शेवटी ते दोघे प्रत्यक्ष कबरस्थानात गेले. त्या गरीब मुलाने त्या दगडावरील अक्षरे स्वत:स शिकवावयास त्यास सांगितले. त्या मुलाच्या लक्षात आता सर्व आले. त्याने ती अक्षरे त्याला वाचावयास शिकविली. रोज तेथे येऊन तो दगडी पुस्तके वाची. हळूहळू तो वाचावयास शिकला.

नंतर तो एका अनाथ शाळागृहात गेला. गुरुजींनी विचारले, ''तुला वाचता येते का?'' ''होय'' असे म्हणून आपण वाचावयास कसे शिकलो हे त्याने सांगितले. गुरुजींस ते खरे वाटेना, परंतु इतर मुलांनी ''हे खरे आहे'' असे सांगितले. गुरुजी त्या

मुलास म्हणाले, ‘‘या पुस्तकातील ही प्रार्थना वाच. जर वाचशील तर हे सुंदर पुस्तक तुला बक्षीस देईन.

नम्रपणे तो गरीब मुलगा उभा राहिला व त्याने ती प्रार्थना वाचली. ते पुस्तक बक्षीस मिळाल्यावर त्याच्या चिमुकल्या हृदयास किती बरे खराखुरा आनंद झाला असेल ? सारांश, दृढ इच्छेस उपाय हा असतोच.

+++

## योग्य इलाज

गोल्डस्मिथ हा इंग्रजी भाषेतील नामांकित कवी अठराव्या शतकात झाला. 'विकार ऑफ वेकफिल्ड' ही त्याची कादंबरी व 'ट्रॅव्हलर अॅण्ड डेझर्टेड् व्हिलेज' या त्याच्या कविता जगप्रसिध्द आहेत. गोल्डस्मिथ हा कवी होता. त्याबरोबरच त्याला वैद्यविद्या पण थोडीफार अवगत होती. तो उदार म्हणूनही प्रसिध्द होता. एखाद्याजवळून घरखर्चासाठी कर्जाऊ पैसे तो आणी, पण वाटेत कोणी भिकारी भेटल्यास त्यास तो देऊन टाकी.

एकदा एक गरीब बाईचा नवरा आजारी पडला. तेव्हा ती बाई गोल्डस्मिथकडे आली व म्हणाली, ''महाराज, कृपा करून घरधन्यांची प्रकृती पाहाल व औषध द्याल तर गरिबावर फार उपकार होतील.''

गोल्डस्मिथ लगेच त्या बाईकडे गेला. त्याने त्या बाईच्या नवऱ्याची प्रकृती वगैरे तपासून पाहिली. परंतु त्यास रोग आढळला, तो एवढाच की पुरेसे अन्न वगैरे त्यास मिळत नाही.

गोल्डस्मिथ त्या बाईस म्हणाला, ''माझ्याबरोबर तुमचा मुलगा पाठवा. मी त्याच्या हाती औषध पाठवून देतो.''

गोल्डस्मिथ घरी गेला. त्या मुलाबरोबर दहा सोन्याची नाणी पिशवीत घालून त्याने पाठवून दिली.

पिशवीतील औषध पाहून तो गरीब मनुष्य चकित झाला. आपला रोग दारिद्र्याचा होता हे गोल्डस्मिथने ओळखले, असे त्याला पक्के समजले. त्याने त्याला मनात धन्यवाद दिले.

तो मनुष्य नीट बरा झाला. बरा झाल्यावर गोल्डस्मिथकडे जाऊन तो म्हणाला, ''महाराज, मी आपला कायमचा ऋणी आहे. तुम्ही मला वाचविलेत, नाहीतर माझ्या चार कच्च्याबच्च्यांचा सांभाळ माझी एकटी बायको कशी करती?''

गोल्डस्मिथ म्हणाला, ''बाबारे, प्रत्येकाने दुसऱ्यास शक्य ते साहाय्य करावे हे कर्तव्य आहे. मी मोठेसे काय केले ?''

✦✦✦

# चित्रकार टॅव्हर्निअर

ज्यूलस टॅव्हर्निअर म्हणून अमेरिकेत एक मोठा चित्रकार होऊन गेला. एकदा एका लखपती व्यापाऱ्याने त्याला आपल्या बंगल्याशेजारच्या बागेत बसून समोर देखावा दिसेल त्याचे मोठे चित्र काढण्यास सांगितले. टॅव्हर्निअरला हे काम सांगून तो व्यापारी युरोपमध्ये काही कामासाठी निघून गेला.

टॅव्हर्निअर त्याच दिवसापासून ते चित्र तयार करू लागला. रोज त्या बागेत जाऊन जसे दिसेल त्याप्रमाणे चित्र तयार होऊ लागले. एक वर्ष ते चित्र तयार करण्यास लागले. पुढे वर्षभराने तो व्यापारी परत आला, तो ते चित्र तयार झाले होते. व्यापाऱ्याने ते चित्र पाहून चित्राची तारीफ केली; परंतु एक चूक त्याला दाखवावीशी वाटली. व्यापारी म्हणतो, "ही झाडे वगैरे सर्व हुबेहूब आहेत; परंतु There ought to have been a few dashes of sunlight- या सूर्यप्रकाशाचा रंग जरा जास्त उठावदार पाहिजे होता." चिताऱ्याची चूक तर दाखविली पाहिजे म्हणून त्या व्यापाऱ्याने दाखविली. परंतु टॅव्हर्निअर नि:स्पृह होता. तो त्या धनिकास म्हणाला, "या बाबतीत तुम्हास ईश्वराकडे तक्रार केली पाहिजे. सूर्याचा प्रकाश चित्र काढावयाचे वेळेस जसा होता, तसा मी दाखविला आहे. I have not the way to change the way the sun shines. I cannot paint what I don't see. सूर्याच्या प्रकाशाला मला बदलता येणार नाही. जे मला दिसत नाही ते मी चितारू शकत नाही." टॅव्हर्निअरचे उत्तर ऐकून तो व्यापारी लाजला. त्याने योग्य ती किंमत दिली. हे चित्र अत्यंत उत्कृष्ट म्हणून कॅलिफोर्नियामध्ये प्रसिध्द आहे.

✦✦✦

# मरीआईची कहाणी

एक आटपाट नगर होते. तेथे एक राजा होता. राजा मोठा पुण्याचा, मोठा भाग्याचा. पाच सुना; दोन्ही लेकी सासरी सुखाने नांदल्या सवरल्या. त्याचे राज्य म्हणजे सुखाचे. त्रास नाही, चिंता नाही. रोग नाही, राई नाही. कशाचा म्हणून उपद्रव नाही. सारे लोक सुखी होते. पण होता होता काय झाले, एकदा आखाडाचा महिना आला. झिमझिम पाऊस पडू लागला. शेते हिरवीगार दिसू लागली. गाईगुरांना चारा झाला; दूधदुभत्याची चंगळ झाली. शेतातील कामे संपली; सासुरवाशिणी माहेरपणाला माहेरी आल्या. आईबापांना आनंद झाला. माझी नव्या नवसाची, भरल्या चुड्याची बाबी आली, तिला कोठे ठेवू असे झाले. रोज नवी नवी पक्वान्ने होऊ लागली. नगरात आनंदीआनंद होता. खाण्यापिण्यात ताळतंत्र राहिले नाही.

इकडे काय झाले ? मरीआई देवीने हे सारे पाहिले. तिने मनात विचार केला, राजाच्या राज्यात जावे. लगबगा उठली. तिने कुंकवाचा मळवट भरला, केस मोकळे सोडले नि अनवाणी चालत निघाली. नगराच्या वेशीपाशी आली आणि तिने आत डोकावून पाहिले. तिला मोठा आनंद झाला, नगरात ती शिरली. तिचे रूप कसे होते? गाल बसलेले, डोळे खोल गेलेले, तोंड पांढरे फटफटीत व हाडांचा सांगाडा; फाटकेतुटके वस्त्र नेसलेली अशी ती होती.

मरीआई रस्तोरस्ती फिरू लागली. प्रत्येक घरात डोकावून पाही. घाण दिसली, की शिरली तेथे. मरीआईची कृपा पुष्कळांवर होऊ लागली. लोक पटापट मरू

लागले. मोठा कहर गुदरला. रोज पाचपन्नास माणसे मरू लागली. वार्ता राजाच्या कानी गेली. राजाला फार वाईट वाटले; माझी प्रजा कोण का मारते ? मी कधी कुणाचे वाईट केले नाही. देवाच्या सेवेत अंतर केले नाही; गोरगरिबांना नाडले नाही; कर वाटेल तसे घेतले नाहीत. मग देवाचा माझ्या राज्यावर कोप का ? राजा दु:खी झाला, त्याला खाणेपिणे रुचेना, सुखविलास सुचेना. अनन्य भावाने देवाला शरण गेला व म्हणाला, ''देवा नारायणा, शेषशायी भगवाना, चुकले-माकले क्षमा कर. माझी प्रजा सुखी कर.''

राजाच्या स्वप्नात देवाने दृष्टांत दिला. ''राजा, राजा, ऊठ. अरे, निजतोस काय? तुझ्या नगरात मरीआईचा फेरा आला ना ? तिला नगराच्या बाहेर घालव. ती उद्या तुझ्या राजवाड्याकडे येणार आहे. तिच्या स्वागताची तयारी ठेव.''

राजा उठला. मरीआईच्या स्वागताची त्याने तयारी केली. सर्व राजवाडा झाडूनझुडून स्वच्छ केला होता; कण्या-रांगोळ्या घातल्या होत्या; धूपदीप लावले होते; चंदनाचे सडे घातले होते. घाणीचे कोठे नाव नव्हते. उंची उंची आसने मांडून राजा मरीआईची वाट पाहात बसला.

मरीआई त्या दिवशी लवकर उठली व राजवाड्याकडे जाऊ लागली; परंतु राजवाड्यातील स्वच्छता पाहून ती दु:खीकष्टी झाली. राजाने मोठ्या मानाने तिला सिंहासनावर बसविले. राजा म्हणाला, ''आई, आपण दु:खीकष्टी का ? सेवेत काय न्यून आहे ?'' मरीआई म्हणाली, ''काय सांगू ? राजा, मला तुझ्या राज्यात फारसे खायला मिळाले नाही.'' राजा म्हणाला, ''आई, इतकी प्रजा बळी पडली तरी तू सुखी नाहीस ?'' मरीआई म्हणाली, ''राजा, माझी भूक तुला माहीत नाही. मी जाते तेथे गावची पांढर (स्मशानातील राख) मात्र शिल्लक ठेवते. तुझ्या नगरात मला पोटभर खायला मिळाले नाही. मी उपाशी आहे.''

राजाने विचारले, ''आई, माझे राज्य तुला आवडले नाही का ?'' ''नाही रे, तितकेसे काही आवडले नाही. तुझे लोक फार स्वच्छतेने वागतात. घर स्वच्छ दिसले की माझे कपाळ उठते. त्या घरात मी शिरत नाही. या नगरात शिरले नि काय पाहिले? लेकीसुना घरी आलेल्या, घरेदारे स्वच्छ केलेली, रंगरंगोटी दिलेली; खाणेपिणे बेताने चालले होते. शिळेपाके कोणी खाईना. पाणी गाळीत व तापवून पीत. अशा घरी शिरावेसे मला वाटेना !'' राजा बोलला, ''मग, मरीआई, माझी इतकी माणसे कशी

मेली?'' मरीआई म्हणाली, ''राजा, थोडी घरे माझ्या आवडीची सापडली, त्या घरांत मी गेले. दारातच उकिरडे होते. तेथे घाणीची रास साचलेली, माश्यांचे घोंघावणे चाललेच आहे. राजा, या जागा मला फार आवडल्या. काही लोकांनी खाण्यात घरबंध ठेवला नव्हता. वाटेल तेव्हा, वाटेल तितके, हवे तसे खात होते. त्यांच्यावर मी कृपा केली.''

राजा बोलला, ''मरींआई, तुझी कृपा आणखी कोणावर होते ?'' मरीआई म्हणाली, ''तरणीताठी मुले मला फार आवडतात. म्हातारीकोतारी, अशक्त, दुबळी मला आवडत नाहीत. नियमित वागणारी व स्वच्छतेची भोक्ती माणसे, त्यांना भेटावयास मी मेले तरी जाणार नाही. राजा, स्वच्छता मला आवडत नाही, लिंबाचा वास खपत नाही; जेवताना कोणी लिंबे खात असेल तर मी तेथून पळ काढते.''

राजाने मनात विचार केला – मरीआईला स्वच्छता का आवडत नाही ? – ठीक आहे. राजाने नगरात दवंडी पिटविली, ''घरेदारे स्वच्छ ठेवा; दारात उकिरडे करू नका; शिळेपाके खाऊ नका; माश्या अन्नावर बसू देऊ नका; पाणी गाळून तापवून घ्या; जेवताना लिंबाचा सढळ हाताने उपयोग करा.''

दवंडी लोकांनी ऐकली व लोक तसे करू लागले. मरीआई संतापली. रागाने खवळली, जशी नागीण. ती राजाकडे गेली व म्हणाली, ''राजा, मोठा रे कपटी आहेस तू; मला भुकेने मारतोस. मी तुझ्यावर कोपले आहे. तुझ्या राज्यात फिरून म्हणून येणार नाही.''

राजाला आनंद झाला. लोक सुखी झाले, तुम्ही आम्ही पण सुखी होऊया. अशी ही साठा उत्तरांची कहाणी, पाचा उत्तरी सुफल संपूर्ण.

+++



श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

## कृतज्ञता

गंगा नदीच्या पवित्र तीरावर एक अंजिराची बाग होती. त्या बागेतील अंजिरांचा ताजा मेवा खाण्यास हजारो पोपट येत व बागेतच राहात. या पोपटांत एक पोपट फारच सुंदर होता. एका अंजिराच्या झाडावर तो सदैव असायचा. दर वर्षी या अंजिराची मधुर फळे खाई, गंगेचे निर्मळ पाणी पिई व मोठ्या संतोषाने असे.

परंतु सर्वच दिवस सारखे नसतात. काही वर्षे गेल्यावर त्या वृक्षाचे सौंदर्य व सामर्थ्य नष्ट झाले. तो अंजीरवृक्ष वाळत चालला. त्या झाडास पाने-फळे येतनाशी झाली. शेवटी राहता राहता सुकलेले शुष्क खोड मात्र राहिले. अंजिराच्या झाडात पुष्कळ ढोल्या होत्या व त्यातून भुसा बाहेर पडत असे.

तो तांबड्या चोचीचा सुंदर हिरव्या पंखांचा पोपट कोठे होता ? तो पोपट आपल्या जुन्या मित्रास चिकटून राहिला. ज्या झाडाने पूर्वी आपणास सुंदर अंजीर दिले त्या झाडाला त्याच्या शेवटच्या दिवसांत पोपटाने सोडले नाही. तो झाडाची वाळलेली साल व ढोलीतून गळणारा भुसाच खाई व गंगेत उतरून तृषा भागवी.

त्या पोपटाची निष्ठा देवाने पाहिली. एका हंसाचे रूप धारण करून भगवान ब्रह्मदेव त्या अंजीरबागेत आले. हंसरूपी ब्रह्मदेव पोपटास म्हणाले, ''शुका, जेथे सुंदर फळे वगैरे असतात तेथे पाखरे राहतात, तू वेड्यासारखा या वाळलेल्या खुंटावरच का बसून राहतोस ?''

पोपट म्हणाला, ''हे हंसा, हा वृक्ष व मी दोघे बाळपणापासून मित्र मित्र आहोत. हा वृक्ष अंगात शक्ती व सौंदर्य असेपर्यंत माझे पोषण करी - मला अंजीर देई. यावज्जीव ज्याने मजवर प्रेम केले, त्याला मी कसा सोडू ? मी कृतघ्न कसा होऊ ? मी येथेच मरेन पण उडून अन्यत्र जाणार नाही.''

ब्रह्मदेवास आनंद झाला. त्याने आपले स्वरूप प्रगट केले व आपल्या कृपेने त्या वाळलेल्या झाडास पानेफुले आणली. तो वृक्ष सुंदर दिसू लागला. मरेपर्यंत तो पोपट त्याच झाडावर राहिला.

सारांश, पशुपक्षीसुध्दा कृतज्ञता व प्रेम दाखवतात. मग विचारशील मनुष्याने किती थोरपणाने वागले पाहिजे बरे ?

✦✦✦

## श्रेष्ठ बळ

कुराणात पुढे दिलेला संवाद देवदूत व देव यांच्यामध्ये झाल्याचे लिहिले आहे.

देवदूत : प्रभो, या जगात दगडापेक्षा बलवान अशी कोणती वस्तू आहे का? सर्व वस्तू दगडावर पडून फुटतात, पण दगड मात्र अभंग राहतो.

देव : होय. दगडापेक्षा, खडकापेक्षा कठीण अशी वस्तू आहे. लोखंड हे खडकापेक्षा बलवान आहे. कारण लोखंडी घण खडकास फोडू शकतो.

देवदूत : लोखंडाहून प्रबळ अशी कोणती वस्तू आहे ?

देव : लोखंडाहून अग्नी प्रबळ आहे; कारण अग्नी लोखंडाचा रस करू शकतो.

देवदूत : अग्नीपेक्षा प्रबळ काय आहे ?

देव : पाणी हे अग्नीहून प्रबळ आहे. कारण पाणी आग विझवू शकते.

देवदूत : पाण्याहून प्रबळ कोण ?

देव : पाण्याहून प्रबळ वारा आहे. पाण्यास वारा हलवू शकतो.

देवदूत : वायूहून प्रबळ काय आहे ?

देव : पर्वत वायूस अडवू शकतात, म्हणून पर्वत हे वायूपेक्षा प्रबळ आहेत.

देवदूत : प्रत्येक वस्तूहून दुसरे काहीतरी प्रबळ आहेच. सर्वांत प्रबळ असे काय आहे?

देव : उजवा हात काय देत आहे हे डाव्या हातासही माहीत नाही अशा गुप्त रीतीने परोपकार करणारे, दान करणारे सदय अंत:करण हे सर्वात श्रेष्ठ होय.

+++

## चतुर राजा

सालोमन म्हणून एक प्राचीन काळी पश्चिमेकडे राजा होऊन गेला. तो शहाणपणाविषयी फार प्रसिध्द होता. त्याच्या चातुर्याची कीर्ती दूरवर पोहोचली होती. कीर्तीही पंखाशिवाय उडत जात असते. एक दिवस सालोमन आपल्या दरबारात बसला होता. मोठमोठे अमीर, उमराव, सरदार आपापल्या ठिकाणी बसले होते. इतक्यात दरबारात एक स्त्री आली. तिच्याकडे सर्वांचे लक्ष वेधले. सालोमनने विचारले, ''बाई, आपले काय काम आहे ? आपणास कोणी दुष्टाने त्रास दिला आहे का ? बोला, परंतु तुमच्या चर्येवरून तर तसे काही दिसत नाही. मग आपण का आल्या आहात ?'' ती स्त्री म्हणाली, ''राजा, तुझ्या चातुर्याची कीर्ती ऐकून त्या चातुर्याची परीक्षा घेण्यासाठी मी आले आहे. हे पाहा, माझ्या हातात दोन हार आहेत. या दोन हारांपैकी कृत्रिम फुलांचा हार कोणता व खऱ्या फुलांचा कोणता हे आपण दुरूनच सांगा. जर आपण ओळखले तर आपण माझ्या परीक्षेस उतरला असे मी समजेन.''

ती सभा तटस्थ राहिली. राजास वासाने ओळखता आले असते; परंतु ती बाई दूर बसली होती. आपल्या राजाची एक बाई फजिती करून जाणार की काय असे सभासदांस वाटू लागले. राजा विचारात पडला. इतक्यात त्याला उत्कृष्ट युक्ती सुचली. ज्या खिडकीजवळ ती बाई बसली होती त्या खिडकीबाहेर मधमाश्या घोंघावत होत्या, राजाने आपल्या नोकरास ती खिडकी सताड उघडण्यास सांगितले.

खिडकी उघडताच काही मधमाश्या आत आल्या व नेमक्या एकदम खऱ्या फुलांच्या हारावर बसल्या. झाले ! ती बाई सर्व उमजली. ती राजास म्हणाली, ''आपल्या शहाणपणाचा लौकिक, एकंदरीत खरा आहे.''

मुलांनो, मधमाशी क्षुद्र प्राणी, परंतु तीसही कृत्रिमता आवडत नाही; खरी वस्तू त्या प्राण्यास आवडते. तुम्ही पण ढोंगीपणास भुलू नका, खऱ्या कामाची पारख करून ते आपलेसे करीत जा.

✦✦✦

# सभाधीटपणा

फ्रान्स देशातला फोंतेन म्हणून एक गोष्टीलेखक होऊन गेला. त्याच्या पुष्कळ गोष्टी आहेत, त्यांपैकी एक देतो.

पॅरिसमध्ये एक तरुण विद्यार्थी कायद्याचा अभ्यास करीत होता. तो विद्वान होता, परंतु वक्तृत्व त्याच्या ठिकाणी नसल्यामुळे स्वत:चे विद्वत्व व्याख्यानातून वगैरे त्यास दाखविता येत नसे. एकदा त्याचा बाप त्याला भेटण्यास आला. त्याचा बाप त्याला म्हणाला, ''तुझ्या अंगात सभाधीटपणा आला पाहिजे. यासाठी तू अभ्यास करीत जा. शहराबाहेर बागेत, मळ्यात वगैरे जावे आणि तेथे मोठमोठ्याने पाठ केलेले म्हणावे, अशा रीतीने आत्मविश्वास अंगी आला म्हणजे तू समाजात चांगलाच पुढे येशील.''

वडील निघून गेले; मुलगा बापाच्या सांगण्याप्रमाणे वागू लागला. तो रोज एका कोबीच्या मळ्यात जाई व तेथील कोबीच्या कांद्यासमोर मोटमोठ्याने व्याख्यान देई, काही दिवस असे चालले. त्या तरुणास आता असे वाटले की, आपण मोठ्या सभेतही व्याख्यान देऊ शकू. तो एका बड्या कॉलेजच्या अधिकाऱ्यास भेटला व आपले व्याख्यान ठरवा असे तो म्हणाला. कॉलेजच्या अधिकाऱ्यांनी ही विनंती मान्य केली. दिवस ठरला, सर्व तयारी झाली, सभागृह भरून गेले, मोठमोठे प्रोफेसर तेथे आले होत., ठरल्या वेळी आपला हा तरुण व्याख्यान देण्यासाठी उभा राहिला, परंतु तो चारपाच वाक्ये जेमतेम बोलला आणि गडबडला, शेवटी तो म्हणाला,



श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
-वालय, सातारा.

‘‘कोबीच्या बागेत कोबीच्या कांद्यांस विद्वान श्रोते समजून मी व्याख्यान देऊ शकतो; परंतु या सभेत विद्वान श्रोत्यांस कोबीचे कांदे समजून मला व्याख्यान देण्यास धीर येत नाही.’’ असे बोलून तो तरुण लज्जेने खाली बसला.

मुलांनो, सभाधीटपणा अंगी पाहिजे. त्याशिवाय आपणास पदोपदी अडचणी भासतील, तो जन्मत:च अंगी नसेल तर अंगी आणा, परंतु कोबीच्या बागेत अभ्यास न करता सभांतूनच बोलण्याचा प्रयत्न व्हावा.

+++

साने गुरुजी लिखित अनमोल ग्रंथसंपदा

अध्यापन कार्य, समाजसेवा, स्वातंत्र्ययुध्द अशा बहुविध क्षेत्रांमध्ये आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटवणारे आदर्श व्यक्तिमत्त्व म्हणजे 'साने गुरुजी!' मातृभूमीच्या सेवेसाठी नोकरीचा राजीनामा देऊन स्वातंत्र्यसमरात त्यांनी स्वत:ला झोकून दिले आणि अखेरच्या श्वासापर्यंत जनतेच्या सुखासाठी झटत राहिले. समाजातील अस्पृश्यता नष्ट व्हावी, एकता निर्माण व्हावी, शेतकरी-कामकरी वर्गाचे दैन्य-दारिद्र्य दूर व्हावे व सर्वत्र समाजवादाची स्थापना व्हावी या हेतूने ते सर्वत्र जनजागृती करत राहिले. लहान मुले, स्त्रिया, तरुण, दीन-दलित यांना स्वत्त्वाची जाणीव व्हावी व उत्तमोत्तम विचारांची देणगी मिळावी यासाठी अत्यंत संस्कारक्षम असे साहित्य त्यांनी निर्माण केले.

आज साने गुरुजींसारखे उदात्त व्यक्तिमत्त्व आपल्यामध्ये नसले तरीही त्यांचा हा साहित्यरूपी अनमोल ठेवा आपल्याकडे आहे. अत्यंत सोप्या भाषेतील या बोधप्रद कथा, वैचारिक लेख, इतर भाषांमधील महान लेखकांचे अनुवादित साहित्य घरोघरी पोहोचावे या हेतूने साने गुरुजींची सर्व पुस्तके एकूण ५१ खंडामध्ये आम्ही आपणासमोर सादर करीत आहोत. महाराष्ट्रातील प्रत्येक घर गुरुजींच्या विचारांनी पावन व्हावे, हीच एकमेव इच्छा !

मेंग चियांग व इतर कथा

₹ 230

200047

e mail : riyapublications@gmail.com

रिया पब्लिकेशन्स्